मराठी समीक्षेचे आदिपर्व

भा. श्री. परांजपे

मराठी समीक्षेचे आदिपर्व

पद्मश्री प्रकाशन, नागपूर.

प्रथमावृत्ती : जानेवारी १९७१

मूल्य : रु. ७.५०

प्रकाशक :
सौ. छाया परांजपे
पद्मश्री प्रकाशन,
हनुमाननगर, नागपूर ३.

मुद्रक :
मा. बा. मोडक,
माधव प्रिंटिंग प्रेस,
नवी शुक्रवारी, नागपूर २.

मराठी समीक्षेचे आदिपर्व

: चिपळूणकर काल :

प्रा. भा. श्री. परांजपे, एम्. ए.
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपूर.

पद्मश्री प्रकाशन, नागपूर.

प्रा. भा. श्री. परांजपे यांची पुस्तके

वसंताच्या खुणा (कथासंग्रह) ◻ मुलांसाठी माडखोलकर ◻ नऊ नाथ (चरित्र) ◻ मच्छिंद्रनाथ (चरित्र) ◻ पेशवेकालीन साधुकवि ◻ दख्खनचा वाघ (नाटक) ◻ मुक्तेश्वरकृत रामायण (संपादन) ◻ वामनपंडित : कवित्व आणि काव्यदृष्टी ◻

गेल्या पिढीतील एक ज्येष्ठ टीकाकार

माझे वडील

कै. ती. प्रो. श्रीधर विष्णु परांजपे

यांच्या स्मृतीस

निवेदन—

पद्मश्री प्रकाशन संस्थेचे हे पहिले पुस्तक. यादृष्टीने निवेदनाचे हे दोन शब्द क्षम्य ठरावे. मराठी समीक्षेच्या क्षेत्रातील एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नासंबंधीच्या पुस्तकाने प्रकाशनाच्या अनोळखी क्षेत्रात आम्ही हे पाऊल टाकीत आहोत. गेल्या काही वर्षांत वाढलेला चिकित्सक नजरेचा वाचक 'सहृदया'च्या भूमिकेतून या पुस्तकाचे (आणि पाठोपाठ येणाऱ्या इतर पुस्तकांचे) स्वागत करील असा भरवसा वाटतो.

मराठीचे एक नामवंत टीकाकार श्री. ग. त्र्यं॰ माडखोलकर यांची प्रस्तावना म्हणजे सहृदय सुहृदाची पाठीवरील थापच! त्याबद्दलचे आभार मानण्याचा औपचारिकपणा त्यांना मानवणारा नसला तरी त्यांचे आभार मानणे आमच्या दृष्टीने एक कर्तव्यच ठरते.

त्याचबरोबर माधव प्रिंटिंग प्रेसचे श्री मोडक यांचा आणि मुखपृष्ठाबद्दल प्रा. वसंतराव वऱ्हाडपांडे यांचा ऋणनिर्देश करणे आवश्यक ठरेल.

–प्रकाशक

प्रस्तावना—

माझे मित्र प्रो. भा. श्री. परांजपे यांच्या 'मराठी समीक्षेचे आदिपर्व' या त्रिखंडात्मक संकलित ग्रंथाच्या या पहिल्या भागाला कोणत्याहि प्रकारच्या प्रस्तावनेची किंवा पुरस्काराची खरोखरी तशी कांही गरज नाही. विद्यार्थिदशेतच ते कथालेखक म्हणून पुढे आले; व तेव्हापासून आतापर्यंत ललित आणि गंभीर असे दोन्ही प्रकारचे साहित्य त्यांनी निर्माण केलेले आहे. मुख्यत: जुन्या नव्या मराठी वाङमयाचे संपादक आणि समीक्षक अशा दोन्ही नात्यांनी त्यांनी केलेली कामगिरी मुक्तेश्वरकृत रामायण आणि वामन पंडितांवरील प्रबंध यांच्या रूपाने आज वाचकांपुढे आहे. हे दोन्ही ग्रंथ, त्यांच्या जुन्या मराठी वाङमयाच्या व्यासंगाप्रमाणेच, त्यांची सूक्ष्म संशोधन बुद्धि आणि मार्मिक टीकादृष्टि यांचीहि साक्ष देतात. पण याबद्दल मला नवल वाटत नाही. कारण ज्ञानोपासनेचा वारसा त्यांचे सन्मान्य वडील प्रो. श्रीधर विष्णु परांजपे यांच्याकडून त्यांना मिळालेला आहे. प्रो. श्रीधरराव हे संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांतील साहित्याचे पंडित होते; व इंग्रजी वाङमयाचाहि त्यांचा अभ्यास चांगला होता. त्याचप्रमाणे, जिज्ञासु, चिंतनशील माणसाच्या सहजप्रवृत्तीनुसार, समीक्षणाला पूरक आणि पोषक असलेल्या अनेक विषयांचाहि त्यांनी परिचय करून घेतलेला होता. उतारवयात त्यांनी काढलेल्या आपल्या 'केकावली'वरील भाष्याच्या १५०० पेक्षा जास्त पानांच्या चौथ्या प्रचंड आवृत्तीत त्यांच्या या गाढ पांडित्याचा आश्चर्यकारक आविष्कार आपल्याला पाहावयाला मिळतो. अशा विद्वान भाष्यकाराचा वारसा प्रो. भा. श्री. परांजपे

यांना लाभलेला असल्यामुळे, अध्यापनाच्या व्यवसायाला सुरवात केल्यावर, जुन्या नव्या मराठी वाङ्मयाच्या परिशीलनात त्यांचे मन रमावे, हे साहजिकच होय.

आज माझ्यापुढे असलेल्या या पहिल्या भागांत १८०० पासून १८८३ पर्यंतच्या कालावधीतील मराठी समीक्षेचा आढावा घेतलेला आहे. त्याची पार्श्वभूमि प्रथम ध्यानांत घ्यावयाला हवी. आंग्लपूर्व काळांतील आठ शतकांतले जुने मराठी वाङमय हे मुख्यत: संस्कृत वाङ्मयाच्या व्यासंगाने परिपुष्ट आणि प्रभावित झालेलें होते. या काळात संस्कृतेतर वाङ्मयाशी मराठीचा संबंध आला नाही, असे मात्र नाही. महाराष्ट्राची उत्तर सीमा सोडली, तर इतर सर्व दिशांनी तो कर्नाटक आणि आंध्र या द्राविड देशांनी घेरलेला आहे. त्यामुळे त्या देशांची विशिष्ट संस्कृति, देवदैवते आणि साहित्य यांचा खोल ठसा त्याच्या जीवनावर उमटला. विठ्ठलभक्तीचा संप्रदाय कर्नाटकांतून म्हाराष्ट्रांत आला, अशी इतिहासाची साक्ष आहे. इतकेच नव्हे, तर विठोबाप्रमाणे खंडोबा आणि यलम्मा ही दोन्ही दैवतेहि कर्नाटकांतून आलेली असून, त्यांना मुलें वाहाण्याची पद्धतहि तेथूनच आली, असे कांही संशोधकांचे मत आहे. कारण, खुद्द महाराष्ट्राची अशी खास देश्य दैवते कोणती, असा प्रश्न जर विचारला, तर त्याचे उत्तर महादेव, अंबा आणि गणपति हीच असल्याचे द्यावे लागेल. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पांच महाराष्ट्रात असून, अष्टविनायक तर सगळेच महाराष्ट्रात आहेत. त्याचप्रमाणे देवीची स्थानेहि बहुतेक महाराष्ट्रातच आहेत. रामभक्ती उत्तरेकडून आणि विष्णुभक्ति दक्षिणेकडून महाराष्ट्रात आली, असे दिसते. कर्नाटकातून जसा विठ्ठल तसा आंध्र देशातून वेंकटेश महाराष्ट्रात आला. या दैवतांबरोबरच वैष्णव पंथहि महाराष्ट्रांत आला असावा. मराठी संस्कृति आणि भाषा या दोन्हीहि संस्कृतोद्भव असून देखील महाराष्ट्र जो भरतखंडातील द्राविड देशात गणला जातो, तो बहुधा याच कारणामुळे! पण, मूळचा तो शैव होता, हे मात्र नि:संशय. महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व जातींची

कुलदैवते शैव कुटुंबातील आहेत. विष्णु किंवा त्याचे अवतार हे प्राय: कुणाचेच कुलदैवत नाहीत. बालाजी म्हणजे गिरीचा वेंकटेश हे कुलदैवत असलेली कुटुंबे तेलंगणातून महाराष्ट्रात आली, हे उघड आहे. तथापि, उत्तर आणि दक्षिण या दोन दिशांकडून झालेल्या या आध्यात्मिक आक्रमणातहि महाराष्ट्राने आपले शैवत्व कायम ठेवले, हे त्याच्या स्वतंत्रप्रज्ञतेला शोभण्यासारखेच आहे. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या मस्तकावरील शिवलिंग हे त्याचे प्रतीक म्हणून दाखविता येईल. कांही संशोधकांचे तर असे मत आहे की, पांडुरंग हा मूळचा खरोखरी शिवच असून, नंतर त्याला विष्णुरूप देण्यांत आलेले असावे. महाराष्ट्रावर झालेल्या या आध्यात्मिक आक्रमणाचा आपली देश्य दैवते आणि संस्कृति यांच्याशी मेळ घालण्याची कामगिरी वारकरी पंथाच्या प्रवर्तकांनी केली; व तो कडवा विलासी वैष्णव पंथ महाराष्ट्रांत, वारकरी पंथाचे सौम्य सात्विक स्वरूप घेऊन, रूढ झाला. हरिहरातील अभेद आणि अद्वैताचा पुरस्कार हे शांकर तत्वज्ञानाचे दोन्ही विशेष त्या पंथाने आत्मसात् केले. शांकर तत्वज्ञान आणि नाथपंथ ही दोन्हीहि शैव आहेत. त्यांच्याशी समन्वय साधूनच ज्ञानदेवाने रचिलेल्या पायावर भागवत धर्माचे मंदिर महाराष्ट्रांत उभारण्यांत आले.

द्राविड संस्कृतीप्रमाणेच महाराष्ट्राच्या जीवनावर जर दुसऱ्या कोणत्या संस्कृतीचा ठसा उमटलेला असेल, तर तो इस्लामी संस्कृतीचा होय. फरक इतकाच की, हा ठसा, द्राविड संस्कृतीप्रमाणे परस्पर विनिमयाने न उमटता, छलबलाने उमटविण्यांत आला. तेराव्या शतकांत अल्लाउद्दिन खिलजी नर्मदा ओलांडून दक्षिणेत उतरण्यापूर्वीच, इस्लामी धर्मातील सूफी पंथाचे प्रचारक महाराष्ट्रात, थेट कृष्णेपर्यंत, येऊन पोचलेले होते. मूर्तिपूजेचा अपवाद सोडल्यास, त्या पंथाच्या तत्वज्ञानाचे आणि उपासनेचे वैष्णव पंथांशी, काही बाबतीत, साधर्म्य होते. इस्लामी आक्रमणाबरोबर आलेल्या अरबी आणि फारशी या दोन भाषांनी, दरबारी भाषा म्हणून, मराठीवर जो काय आपला पगडा बसवला असेल, तेवढाच. द्राविड भाषा आणि अध्यात्म यांच्या मानाने

तर अगदीच अगण्य. कारण, मूर्तिपूजा आणि अनेकदैवतत्व निंद्य मानणारे असहिष्णु इस्लामी अध्यात्म, सूफी पंथाच्या प्रणयप्रधान रुचिर स्वरूपात आलेले असताना देखील, महाराष्ट्रीय किंबहुना भारतीय अस्मिता आणि अध्यात्म यांना अजिबात रुचण्यासारखे नव्हते. त्यामुळे, अरबी आणि फारशी या भाषा जरी प्रौढ आणि प्रगत होत्या, तरी दरबार–कचेऱ्यांतील कामाकाजाची परिभाषा सोडल्यास, मराठीच्या जीवनांत त्यांचा रिघाव फारसा होऊ शकला नाही. अर्थात्, इस्लामी राज्यसत्ता चार शतके महाराष्ट्रांत गाजलेली असतांना सुद्धा, मराठी वाङ्मयाचे जुने संस्कृतनिष्ठ स्वरूप कायमच राहिले. उत्तर भारतात कबीर पंथापासून तो शीख पंथापर्यंत इस्लामी अध्यात्माने अंशतः प्रभावित आणि संमिश्रित झालेले असे काही पंथ निघाले; व त्यांचे निराळ्या प्रकारचे वाङ्मयहि उत्पन्न झाले. तसा प्रकार महाराष्ट्रांत कांही घडला नाही. इतकेच नव्हे, तर वारकरी पंथांत जे मुस्लिम भक्त सामील झाले, त्यांनी मूर्तिपूजा आणि अनेकदैवतत्व यांचा जरी स्वीकार केला नाही, तरी त्या पंथाचे तत्वज्ञान मात्र आत्मसात् केले. त्यामुळे, मराठी वाङ्मयात बखरींच्या रचनेव्यतिरिक्त, कोणतेच नावीन्य इस्लामी आक्रमण निर्माण करूं शकले नाही.

मराठी वाङ्मयाचे हे आठ शतके बव्हंशी न बदललेले स्वरूप, एकोणिसाव्या शतकात, पाश्चात्य संस्कृति 'आणि इंग्रजी भाषा यांनी आपल्या प्रभावाने अवघ्या पन्नास वर्षात आमूलाग्र बदलून टाकले. चिपळूण-करांनी 'वाघिणीचे दूध' असे जे त्या भाषेचे यथार्थ वर्णन केलेले आहे, ते केवळ पाश्चात्य पद्धतीची स्वातंत्र्य–कल्पना आणि राष्ट्रवाद यांच्या-पुरतेच मर्यादित नसून, एकंदर जीवनाकडे पाहाण्याची मराठी समाजाची दृष्टीच मुळी त्या दुधाच्या गेली पावणे दोनशे वर्षे चालू असलेल्या खुराकामुळे बदलून गेली. इतकी की, आता जरी आपण स्वतंत्र होऊन तेवीस वर्षे होत आलेली असली, तरी पाश्चात्य जीवनप्रणाली जास्तीत जास्त उचलण्याकडे आपला जबरदस्त ओढा आहे. त्यामुळे मराठी वाङ्मयाचेंहि झपाट्याने पाश्चात्यीकरण होत असल्यास त्यात

आश्चर्य नाही. विशेषत:, १९३५ साली, ब्रिटिश सरकारने प्रांतिक स्वायत्तत्ता बहाल केल्यानंतर, तोपर्यंत बऱ्याच प्रमाणांत अशिक्षित आणि असंस्कृत असलेल्या ज्या मागासलेल्या जाति–जमाती, शैक्षणिक सवलती मिळाल्यामुळे, सुशिक्षित होऊन पुढे येत गेल्या आणि शासनांतहि त्यांच्या बहुसंख्येचे प्राबल्य वाढत गेले, त्याना १८०० ते १९४० पर्यंत पुढारलेल्या जातिजमातींनी उत्पन्न केलेले मराठी वाङमय आवडेनासे झाले; व आपली विशिष्ट सुखदु:खे आणि आशा–आकांक्षा आपल्या पद्धतीने प्रकट करण्याची प्रवृत्ती त्यांच्या ठिकाणी साहजिकच बळावत गेली. त्याहिपेक्षा महत्वाची गोष्ट ही की, त्यांचा इंग्रजीचा व्यासंग जरी अगदी बेताचा होता आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर त्या भाषेला आलेल्या गौणतेमुळे तो जास्त जास्त कमी होत गेला, तरी नवे क्रांति-कारी पाश्चात्य सामाजिक आणि राजकीय तत्वज्ञान, आपली स्वत:ची जातीय बैठक कायम ठेवून, त्यांनी मोठ्या ईर्ष्येने उचलले; व तदनुसार समाज आणि शासन या दोहोंतहि परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली. या संक्रमणातूनच स्वातंत्र्योत्तर काळांतील कला, साहित्य आणि समीक्षा यांच्यासंबंधीच्या नवीन कल्पना आणि अपेक्षा उद्‌भूत झालेल्या आहेत. पुढारलेल्या जातिजमातींचे राजकारणातील नेतृत्व जसे त्यांनी झुगारून दिलेले आहे, तसे साहित्यांतील नेतृत्वहि झिडकारलेले आहे. त्यांच्या स्वत:च्या साहित्यविषयक कल्पना जरी अद्याप स्पष्ट आणि निश्चित झालेल्या नसल्या, तरी जुन्या परंपरागत कल्पना स्वीकारावयाच्या नाहीत, एवढा मात्र त्यांच्या मनाचा पक्का निर्धार झालेला दिसतो. त्यामुळे १९४० पूर्वीचे मराठी साहित्य आपले मानण्याची आणि हातात धरण्याची कांही त्यांची आज तयारी नाही. मागासलेल्या जातिजमातींतील या सुशिक्षित सत्ताकांक्षी पिढीबरोबरच पुढारलेल्या जातिजमातींतील मध्यमवर्गीय नवीन पिढीत, गेल्या महायुद्धानंतर आणि त्याहिपेक्षा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनामुळे झालेला बदलहि ध्यानांत घ्यावयाला हवा. या पिढीपुढे तर, सध्या मुळी, आपली मध्यमवर्गीय परंपरा, संस्कार

आणि शिक्षण यांना अनुरूप अशा प्रतिष्ठेने आपल्याला कसे जगता येईल, हाच मुख्य प्रश्न आहे. त्यामुळे, पुढारलेल्या जातिजमातींतील ही नवी पिढी, वैफल्याच्या जाणिवेने वेडीपिशी होऊन, आज विद्रोहाची भाषा बोलत आहे; व कांही बाबतीत मागासलेल्या जातिजमातीतील नवशिक्षित पिढीशी सहकार्यहि करीत आहे.

मराठी वाङमयांत आज उत्पन्न झालेली ही चमत्कारिक संक्रमणावस्था काळजीपूर्वक ध्यानांत घेऊन १८०० पासून १९२० पर्यंत निर्माण झालेल्या समीक्षा-साहित्याचा विचार करणे अवश्य आहे. वाङ्मय हे कालसापेक्ष असल्यामुळे, त्या त्या काळातील परिस्थिति लक्षांत घेऊनच, त्याचा परामर्श घ्यावयाला हवा, ही गोष्ट अगदी खरी. पण, त्याबरोबरच ही गोष्टहि तितकीच खरी आहे की, तसा परामर्श घेताना, वर्तमान आणि भविष्य यांच्याशी त्या भूतकालीन साहित्याचा सांधा कितपत जुळतो, वर्तमानातील नव्या प्रवृत्तींचे उगम त्यांत किती प्रमाणांत दृष्टीस पडतात आणि त्याच्या गर्भात भविष्याची कांही बीजेहि आढळूत येतात की नाही, हे सुद्धा पाहावयाला हवे. उदाहरणार्थ, विष्णुशास्त्री चिपळूणकर हे कितीहि देशाभिमानी आणि स्वातंत्र्यप्रेमी असले, तरी आजच्या भारतीय लोकशाहीचे चित्र त्यांच्या डोळ्यांपुढे नव्हते व हरिभाऊ आपटे हे कितीहि उदारमतवादी आणि सुधारक असले, तरी दलित जातींच्या आजच्या उत्थानाचे चित्र त्यांच्या डोळ्यांपुढे नव्हते, हे या दोघा थोर साहित्यकारांच्या वाङमयातील वैगुण्य सिद्ध आहे. उलट, कोल्हटकरांच्या डोळ्यांपुढे आजच्या समाजक्रांतीचे स्पष्ट चित्र होते, हे त्यांनी 'सहित्यबत्तिशी'ला लिहिलेल्या प्रस्तावनेवरून प्रत्ययाला येते. हेच केशवसुतांविषयीहि म्हणता येईल. साहित्यक्षेत्रात तर कोल्हटकरांसारखा चिकित्सक आणि चिंतनाग्रणी दुसरा झालाच नाही. म्हणून, गतकालाची समीक्षा करतांना, वर्तमान आणि भविष्य या दोहोंचेहि अवधान, विशेषतः मूल्यमापनाच्या बाबतीत तरी, दक्षतेने ठेवणे प्राप्त आहे. गतकाल हा वर्तमान आणि भविष्य यांच्याशी किती प्रमाणांत अनुस्यूत झालेला आहे, हे समजल्याशिवाय त्याचे यथार्थ

मूल्यमापन होणेच शक्य नाही. लेखक हा जसा वर्तमानाचा प्रवक्ता, तसाच तो भविष्याचा द्रष्टाहि असला, तरच त्याच्या वाङ्मयाला त्रिकालाबाधित महत्व प्राप्त होते. म्हणून समीक्षेचे समालोचन तिन्ही कालांच्या अनुसंधानाने व्हावयाला हवे. कारण, समीक्षा हे एकंदर वाङमयाचे मूलममापन करण्याचे शास्त्र आणि साधन असल्यामुळे, तिच्या बावतींत तर ही कसोटी विशेष लागू पडते. लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रम्हचारी, फुले, रानडे प्रभृतींच्या विचारसरणींत अनेक वैगुण्यें असून देखील, त्यांचें महत्व आज जे टिकून आहे, ते केवळ त्यांच्या ठिकाणी कांही प्रमाणांत द्रष्टेपणा असल्यामुळे. म्हणून, १८०० ते १९२० या कालावधीतील समीक्षेचा आढावा घेतांना, गताबरोबरच वर्तमान आणि भविष्य या दोन्हीहि कालांचे अवधान ठेवावयाला हवे. प्रो. भा. श्री. परांजपे यांनी या पहिल्या भागांत ती दक्षता घेतल्याचे पाहून मला समाधान वाटले. चिपळूणकरांना राजकीय दृष्टी नव्हती, हे त्यांचे वैगुण्य स्पष्टच आहे. पण, साहित्यादि कलांच्या बाबतीत त्यांची दृष्टी किती सर्वस्पर्शी आणि पुरोगामी होती, हे प्रो. परांजपे यांनी सोदाहरण विशद केलेले असून, सामाजिक बाबतीतहि ते कसे प्रगतिपर वृत्तीचे होते, याचे त्यांनी केलेले विवरण चिपळूणकरांना पुराणमतवादी ठरविणाऱ्या आक्षेपकांनाहि विचारार्ह वाटेल. त्यांनी केवळ आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधकसमाज इत्यादि नवे पंथ आणि त्यांचे दयानंद सरस्वती, लोकहितवादी, फुले, रानडे प्रभृति प्रवर्तक यांच्यावर टीका केली, एवढयाच एका कारणामुळे त्यांना प्रतिगामी ठरविणे अन्यायाचे होईल. राजकीय आणि सामाजिक बाबतीत त्यांना तादृश महत्त्व नसले, तरी त्यांचे साहित्यातील स्थान आणि महत्त्व ही जी सतत चालू असलेल्या प्रतिकूल टीकेच्या भडिमाराला पुरून उरलेली आहेत, ती याच कारणामुळे. शिवाय, पारतंत्र्याच्या त्या तमोयुगातील युयुत्सु राष्ट्रवादाचा आद्य प्रवर्तक आणि प्रवक्ता म्हणूनहि त्यांचे महत्त्व राजकीय क्षेत्रांत तसे कायमच आहे. प्रो. परांजपे यांनी केलेले चिपळूणकरांच्या या एकंदर भूमिकेचे विवेचन सूक्ष्म आणि समतोल वाटते,

जुने मराठी वाङमय पारमार्थिक असले, तरी त्यांत अगदी सुरवातीपासून आख्यानक आणि व्याख्यानक असे दोन स्पष्ट प्रवाह किंवा प्रवृत्ती दृष्टीस पडतात. जुन्या पंडित कवींनी जी लहान मोठी आख्याने रंगविली, ती देखील, "वाटे चरित्र त्यांचें आपण कांही तरावया गावे," याच उद्देशाने; संस्कृत कवींप्रमाणे साहित्यिक दृष्टीने नव्हत. त्यामुळे, ज्याला आपण निखालस ऐहिक, सामाजिक किंवा काल्पनिक साहित्य म्हणू, असे कांही जुन्या मराठी वाङमयात, बखरींव्यतिरिक्त, लक्षांत घेण्याजोगे नाही. ही जी त्यांची पारमार्थिक दृष्टी, ती व्याख्यानांच्या बाबतीत तर परमावधीला गेलेली दिसते. गीतेवर जितकी लहान मोठी भाष्ये गेल्या आठ शतकांत मराठींत झाली, तितकी अन्य कोणत्याहि भारतीय भाषेत झाली नसतील. 'विवेकसिंधू'पासून तो 'दासबोधा'पर्यंत जे त्यातल्या त्यांत स्वतंत्र म्हणण्यासारखे ग्रंथ मराठींत झाले, त्यांना सुद्धा 'योगवासिष्ठा'पासून तों गीतेपर्यंत सगळ्या प्राचीन वेदान्तग्रंथांचा आधार होता. हे जे व्याख्यानग्रंथ अकराव्या शतकापासून मराठींत झाले, त्यांना, 'व्याख्यान' या शब्दाच्या पारिभाषिक अर्थानुसार, समीक्षेच्या कोटीत घातले पाहिजे, असा काही साहित्यपंडितांचा आग्रह असून, प्राचीन मराठीतहि, निराळ्या प्रकारचे कां होईना, समीक्षात्मक वाङमय विपुल आहे, असे ते प्रतिपादन करीत असतात. इतकेच नव्हें, तर 'ज्ञानेश्वरी' हा सर्जनशील टीकेचा,—'क्रिएटिव्ह क्रिटिसिझम'चा,—एक अप्रतिम नमुना आहे, असेहि ते म्हणतात. हे त्यांचे मत क्षणभर मान्य केलें, तरी सुद्धा ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे की, पाश्चात्य पद्धतीची समीक्षा मराठीत प्रथम इंग्रजी राजवटीतच सुरू झाली. मल्लिनाथ किंवा ज्ञानेश्वर हे व्याख्याकार किंवा भाष्यकार म्हणून कितीहि श्रेष्ठ असले, तरी टीकेची आधुनिक पाश्चात्य लक्षणे त्यांना अजिबात लागू पडत नाहीत, हे निश्चित. म्हणून, "टीकावाङ्मयाचा प्रारंभ हे एकोणिसाव्या शतकाचे वैशिष्टय आहे," हे प्रो. परांजपे यांनी, 'ऐहिक मूल्यांचे नवे आविष्कार' या प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्याच प्रकरणांत, केलेले विधान अगदी यथार्थ ठरते. वस्तुतः, बहुतेक सगळ्याच जुन्या मराठी कवींनी

प्राचीन संस्कृत साहित्याचे अवलोकन थोडे बहुत केलेले होते, असे त्यांच्या उद्गारांवरून वाटते. अर्थात्, साहित्याची समीक्षा ऐहिक म्हणजे साहित्यविषयक मूल्यांनीच करावयाला हवी, याची जाणीव त्यांना असलीच पाहिजे. तरी देखील, वामन, मोरोपंत यांच्यासारख्या पंडित कवीनी सुद्धा, रामदासादि संतकवींप्रमाणे, साहित्याला पारमार्थिक कसोटीच लागू केली. इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर, पाश्चात्य साहित्याच्या प्रभावामुळे, हे जुने पुराणे कसोटीचे दगड बाजूला सारून, ऐहिक मूल्यांच्या कसोटीवर साहित्याची पारख करण्याची पद्धत प्रचलित झाली; व अशा रीतीने त्यापूर्वी मराठीत अजिबात नसलेली समीक्षणाची नवी शाखा झपाट्याने परिपुष्ट होत गेली. प्रस्तुत प्रबंधातील या मुद्याचे विवेचन कोणालाही समर्पक वाटेल.

या भागाला देण्यात आलेले 'चिपळूणकर काल' हे नाव अत्यंत वास्तविक आहे. कारण, १८४० ते १८८० पर्यंतच्या या कालावधीत जरी लोकहितवादीपासून गुंजीकरांपर्यंत अनेक टीकाकार होऊन गेले, तरी कृष्णशास्त्री आणि विष्णुशास्त्री या पिता–पुत्रांची समीक्षेच्या क्षेत्रातील कामगिरी अद्वितीय म्हणावी लागेल. आपल्या विविध टीकात्मक वाङ्मयाने त्यानी या चाळीस वर्षांतील मराठी समीक्षेचा पाया घातला. व्याकरणासारख्या रुक्ष शास्त्रीय विषयापासून तो काव्यासारख्या रसाळ ललित विषयांपर्यंत सर्व विषयांवरील ग्रंथांचा या पिता-पुत्रानी, केव्हा मूलग्रामी चिकित्सक बुद्धीने, तर केव्हा रसग्राही मार्मिक वृत्तीने, घेतलेला परामर्श नवीन पिढीला मार्गदर्शक झाला. तथापि, प्रो. परांजपे यांनी त्यांच्याबरोबरच या कालातील इतरहि सर्व टीकाकारांचा तितक्याच अगत्याने शोध घेतलेला असून, विस्मृतीच्या गर्तेत बेपत्ता होऊन गेलेल्या त्यांच्याहि कामगिरीची योग्य संभावना केली आहे, हे पाहून मला मोठा आनंद वाटला. दादोबा पांडुरंग, मराठे, रानडे, कुंटे, प्रधान, कीर्तने, पाळंदे, गुंजीकर प्रभृति तत्कालीन लेखकांचे निबंध, टीकालेख, अभिप्राय, प्रस्तावना वगैरे वाङ्मय अत्यंत बारकाईने तपासून, त्यांच्या लिखाणातील केवळ प्रमेयें

किंवा निष्कर्षच नव्हत, तर अगदी लहान सहान नवीन मुद्दे सुद्धा त्यांनी आजच्या अभ्यासकांच्या निदर्शनाला आणले, यावद्दल खरोखरी त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. आधुनिक मराठी टीका वाङ्मयाचा ऐतिहासिक पद्धतीने संशोधनपूर्वक सोपपत्तिक, सूक्ष्म आढावा घेणारा अशा स्वरूपाचा ग्रंथ, माझ्या माहितीप्रमाणे, मराठीत आतापर्यंत झालेला नव्हता. ती उणीव प्रो. परांजपे यांच्या या संकलित ग्रंथरचनेने उत्तम रीतीने भरून निघेल, अशी मला उमेद वाटते.

धंतोली, नागपूर १ **ग. त्र्यं. माडखोलकर**

भूमिका—

भारतवर्षाच्या इतिहासात इंग्रजी सत्तेच्या उदयास्ताचा जो शंभर-सव्वाशे वर्षांचा एक कालखंड येऊन गेला त्याने मराठी वाङमयावर बराच प्रभाव गाजविला आहे यात शंका नाही. याच काळात मराठी-च्या क्षेत्रात नव्या नव्या वाङमयप्रकारांचे पीक आले आणि काही जुन्या प्रकारांना तर असे कांतिमान स्वरूप आले की त्यात त्यांचा जुनेपणा कायमचा मावळून गेला. वाङमय समीक्षेचा मराठीत आज घटकेला जो विलास आपणास पाहावयास मिळतो तो याच स्वरूपाचा होय. कवि आणि कवित्व, साहित्य आणि साहित्यकार यांची परीक्षा करून त्यांची सरसनीरसता, इष्टानिष्टता किंवा श्रेष्ठकनिष्ठता ठरविणे हा साहित्यशास्त्राच्या क्षेत्रातला एक महत्वाचा व्यापार या काळातच आपण शिकलो. टीका, परीक्षण, समीक्षण, रसग्रहण, मूल्यमापन अशा निरनिराळ्या नावाने आळविली जाणारी ही साहित्यप्रक्रिया मराठी साहित्यशास्त्राच्या भांडारात किती तरी मोलाची भर टाकून गेली पण त्याबरोबरच तिने स्वतःलाही एक समृद्ध, संपन्न व स्वयंसिद्ध असे रूप प्राप्त करून घेतले या रूपाच्या आगळेपणाची आणि कर्तृत्वाची तिला स्पष्ट जाणीव होऊ पाहत आहे. साहित्यशास्त्राने मात्र तिची अद्याप योग्य ती दखल घेतलेली नाही—आणि हीच तिची आजची एकमेव व्यथा आहे.

या व्यथेची कारणेही लक्षात घेण्यासारखी आहेत. वाङमयसमीक्षेने गेल्या शंभर सव्वाशे वर्षांत बरीच प्रगति केली आहे; बऱ्याच समस्या हाताळल्या, निरनिराळ्या समरप्रसंगात कडोविकडीने झुंज घेतली, नव्याने येऊ पाहणाऱ्या वाङमयान्तर्गत जाणिवांची व तत्त्वांची यथायोग्य

चिकित्सा केली, व्यक्तित्वाच्या आंतरजीवनाचा शोध घेतांना परात्मप्रवेशाची सिद्धि मिळविली, रसिकांना भुलविणारी निरनिराळी वेधकतेची सामग्री अवगत करून घेतली आणि प्रसंगी ललितकृतीच्या मुळाशी जाऊन सौंदर्याचे मर्मही हस्तगत केले--आणि म्हणूनच साहित्यशास्त्राला उपयुक्त ठरतील असे निकष शोधून काढणे आणि ते साहित्यशास्त्राच्या भांडारात 'विनापोच' वेळोवेळी जमा करीत राहणे अशी 'साहित्य-शरण' भूमिका आजच्या वाङमयसमीक्षेची राहिलेली नाही. साहित्यकृतीचे आकलन, विवरण, मूल्यमापन आणि पुनर्मूल्यांकन यासारखी महत्वाची विविध कार्ये संपादतांना साहित्यशास्त्राला मदत करावी एवढाच एकमेव जीवितहेतु मनाशी ठेवणे यापलीकडे तिला शक्य नाही. एखाद्या शाळा–मास्तराप्रमाणे पेपर–तपासणी करण्याचा वा दिपोटीप्रमाणे शेरे–ताशेरे झाडण्याचा काळ तिच्या आयुष्यात सुरुवातीला येऊन गेला असेल पण आज तो काळ राहिलेला नाही. टीका, परीक्षण, रसग्रहण, समालोचन आणि मूल्यमापन यासारखी विविध कार्ये बदलत्या युगानुसार ती करीत गेली–आणि पुढेही कदाचित करील. पण ज्या ललितकृतींचा परामर्श ती वेळोवेळी घेत आली, ज्यांच्या सान्निध्याचा योग तिला लाभला, ज्यांच्या वेधकतेची कला तिला अवगत झाली त्यांच्याप्रमाणेच आपणही एक 'सर्जनशील–कलाकृती आहोत, काव्यकादंबऱ्याप्रमाणेच आपणातही कलात्मकता आहे याची जाणीव तिला झाली आहे--आणि ही जाणीव रसिकांनीही यापुढे ठेवावी अशी तिची आकांक्षा आहे.

मराठी वाङमयाच्या क्षेत्रात आज घटकेला वाङमयसमीक्षा आणि

साहित्यशास्त्र ही आपापल्या परीने नेमून दिलेली कार्ये जिव्हाळ्याने करीत आहेत –आणि तरीही त्यांचा अन्योन्यसंबंध असावा तितका परस्परपोषक वा जिव्हाळ्याचा वाटत नाही. साहित्यशास्त्र हे बहुतांशी संस्कृताच्या वळणाचे आहे तर वाङ्मयसमीक्षेचा तोंडवळा इंग्रजी नमुन्याचा दिसतो. साहित्यशास्त्र म्हटले म्हणजे ते रस, ध्वनि, रीति वक्रोक्ति यासारख्या वाङ्मयीन तत्त्वांची मूलभूत चिकित्सा करणारे शास्त्र अशी आमची समजूत आहे; इतकेच नव्हे तर ही सारी तत्त्वे जुनाट असून त्यांचा आजच्या वाङ्मयसमीक्षेला काडीमात्र उपयोग नाही असाही एक समज आजच्या टीकालेखनाच्या क्षेत्रात वावरत आहे. पण एका दृष्टीने पाहता हा समज योग्य वाटावा अशीच वस्तुस्थिती प्रत्यक्षात दिसत नाही काय? आमचे नव्याने सिद्ध होऊ पाहणारे साहित्यशास्त्र अद्याप संस्कृत पद्धतीने रसालंकाराची जुनीच परिभाषा वापरताना दिसते पण आजची ग्रंथपरीक्षणे मात्र या जुन्या तत्त्वांना शिरोधार्य मानून चालताना दिसत नाहीत. एकंदरीत संस्कृत वळणाचे साहित्यशास्त्र आणि इंग्रजी नमुन्याची वाङ्मयसमीक्षा यांच्यात आज बरेच अंतर पडलेले आहे. संस्कृत वळणाच्या रस–ध्वन्यादि तत्त्वांच्या आश्रयाने मराठीतील ग्रंथपरीक्षणे होत नाहीत हे जितके खरे तितकेच इंग्रजी वळणाने जात असलेली वाङ्मयसमीक्षा अद्याप आमच्या साहित्यशास्त्रात एक घटक म्हणून समावेश पावलेली नाही हेही खरे.

वाङ्मयसमीक्षा आणि साहित्यशास्त्र यांचा अन्योन्यसंबंध परस्परांना पोषक व उपकारक असाच असतो–निदान असावा. साहित्यशास्त्रातील मूलभूत तत्त्वांचा आश्रय घेऊन वाङ्मयसमीक्षा एखाद्या ग्रंथाचे अपूर्वत्व

सिद्ध करते तर याच्या उलट एखाद्या अपूर्व ग्रंथाचे परीक्षण करण्याच्या निमित्ताने वाङमयसमीक्षा कधी कधी साहित्यशास्त्रालाही अपरिचित अशा नव्या निकषांचे उद्‌घाटन करते आणि अशा नव्या मूलभूत तत्त्वांचा शोध लावून तो साहित्यशास्त्राच्या भांडारात जमा करते. पण हे कार्य करीत असताना 'सुरवंटाचे फुलपाखरू व्हावे' तशी एक नवी कांति—नव्हे, एक नवा देह या समीक्षेला लाभतो.

मराठी वाङमयसमीक्षेचे उद्देश आणि साहित्यशास्त्राच्या क्षेत्रातील तिचे महत्वाचे स्थान समजून घेणे हे प्रत्येक मराठी रसिकाचे कर्तव्य आहे. समीक्षा ही एक विकासशील कृति आहे. तिला स्वतःची एक परंपरा आहे. काव्य–कादंबऱ्यादि इतर ललितसाहित्याप्रमाणे सर्जनशील कलात्मकता तिलाही लाभलेली आहे. स्वतःचा एक दीर्घकालीन इतिहास तिच्या पाठीशी उभा आहे. वाङ्‌मयसमीक्षेच्या या अवस्थांतराच्या जन्मकाळापासूनच खुणा मराठीच्या अभ्यासकांनी अवगत करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

समीक्षेच्या या अभ्यासाची दुसऱ्याही एका दृष्टीने आवश्यकता तिपादिता येईल.

गेल्या सात–आठशे वर्षापासून मराठीत वेळोवेळी जी उत्कृष्ट ग्रंथसंपत्ति निर्माण झाली तिचा परिणाम निरनिराळ्या मूल्यमापन–तत्त्वांची टीकावाङ्‌मयात भर पडण्यात झाला. वेळोवेळी निर्माण होत गेलेल्या या भिन्नभिन्न तत्त्वांचे संकलन व संशोधन करून त्या तत्त्वांच्या सरसनीरसतेचा विचार व्हावयास हवा. यादवकालापासून आजतागा-

यत निर्माण झालेल्या भिन्न कालखंडातील सारी मूल्यमापनतत्त्वे आज-घटकेला मराठीच्या दरबारात वावरत आहेत. त्यापैकी कित्येकानी एकेका युगावर आपले अधिराज्य गाजविले आहे तर कित्येक मूल्ये केवळ आपल्या अभिनवतेच्या गुणावर परीक्षकांना लोभाविष्ट करू पाहत आहेत. भिन्न भिन्न कालखंडातील सारी मूल्यमापनाची तत्त्वे आज एकत्र आली असल्यामुळे साहित्यकृतीच्या सरसनीरसतेविषयी तज्ज्ञात मतभेद उत्पन्न होत आहेत.

उदाहरणार्थ 'मराठी भाषेचा शिवाजी' म्हणून समजल्या जाणाऱ्या चिपळूणकरांच्या वाङमयीन कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना हा मता-मतांचा गलबला चांगलाच प्रत्ययास येतो. कुणी त्यांच्या निबंधमाले-तून महत्वाच्या सामाजिक जाणिवा प्रकट होत असल्याबद्दल प्रशस्तिपत्र देतात, परंतु त्याबरोबरच त्यांच्या कडक भाषेचा निषेध करतात. कुणी निबंधमालेतील देशाभिमानाची दीप्ति पाहून तिला आधुनिक देशभक्तिपर राष्ट्रीय वाङमयात पहिले स्थान देऊ इच्छितात परंतु तीत ईश्वरी प्रसादाचे तेज नसल्याबद्दल हळहळतात. कुणी चिपळूणकरांना आधुनिक भाषाप्रभूत अग्रगण्य मानतात परंतु त्यांच्या भाषेतील अलंकाराचा थाटमाट वाचकाना विकारवश करीत असल्याची किंवा अलंकाराच्या थाटमाटापलीकडे त्यांच्या भाषेत काही विशेष नसल्याची ग्वाही देतात.

चिपळूणकरांच्या टीकाकारांनी रचिलेली ही 'परंतु–रामायणे' वाचकाच्या मनाला जशी गोंधळात पाडतात तद्वतच तुकारामाच्या संदर्भात टीकाकारांनी स्तुतिसुमने उधळण्याच्या बाबतीत चालविलेली

अहमहमिका पाहून त्याला विस्मय वाटतो. गंमत अशी की अव्वल इंग्रजीतील डायरेक्टर ग्रांट साहेबापासून तो काल परवाच्या 'पुरोगामी' टीकाकारापर्यंत साऱ्यांनी या अहमहमिकेत भाग घेतलेला आढळतो. कुणी त्यांचे अंत:करणापासून निघालेले उत्कट उद्‌गार वाचून आंग्लकवि वर्डस्वर्थशी त्यांची तुलना करतात. कुणाला तत्कालीन दांभिकांवर त्यांनी चढविलेला हल्ला आवडतो. कुणी त्यांच्या कवितेला वास्तव-वादी म्हणतो तर कुणी ते बहुजन-समाजाच्या भावनांचे चित्र मानतो. कुणी लोकसमूहाच्या मनाचे चित्रण केल्याबद्दल त्यांना 'लोक-कवि' म्हणून गौरवतो तर त्यांच्या कवितेतील जीवन-संघर्षाचे भावरम्य चित्रण पाहून खूष झालेले काही टीकाकार त्यांच्या कवितेवर 'पुरोगामित्वा'चे शिक्कामोर्तब करताना आढळतात.

एकाच लेखकाबद्दल वा कवीबद्दल जशी निरनिराळी मते वा कसोट्या लावलेल्या दिसतात तद्वतच कधी कधी एकाच टीकाकाराच्या लेखणीतून भिन्न मते वा कसोट्या उतरतानाही दृष्टीस पडतात. मोरोपंतांच्या 'केकावली'तील 'रतिसुख' व 'कुच' अशा शृंगारिक शब्दांची वकिली करणारे आणि प्रो. श्रीधरपंत परांजप्यांनी वामन-पंडितास त्याच्या कवितेवरून रंगेल ठरविल्याबद्दल त्यांचा काहीसा अधिक्षेप करणारे पांगारकर स्वत: मात्र 'शिशुपालवध' काव्या। माय-बापांचा शृंगार वर्णिल्याबद्दल भास्कर कवीला दोष देताना आढळतात. बालकवींच्या फुलराणीची प्रशंसा करणारे प्रा. नारायण केशव बेहरे एकोणिसाव्या शतकातील पंडित-कवींना त्यांच्या कवितेत तत्कालीन महाराष्ट्राचे प्रतिबिंब न दिसल्याबद्दल दूषण ठेवतात. फार कशाला,

खुद्द चिपळूणकर आणि कोल्हटकर यासारख्या मान्यवंत टीकाकारांच्याही लेखनात हा गोंधळ पाहावयास मिळतो. उत्कट अंतःकरणाचे उद्‌गार ही शाहिरांच्या काव्याची कसोटी मानूनही चिपळूणकर मोरोपंतांना 'महाकवि' मानतात तर नीतितत्त्व उराशी कवटाळून बसलेले कोल्हटकर नीतिबोध आवश्यक नाही म्हणून स्वतःच कधी कधी प्रतिपादिताना दिसतात.

मराठीतील समीक्षाक्षेत्रात आज घटकेला जे अराजक भासत आहे त्याला एकाच वेळी एकत्र येऊ पाहणाऱ्या प्रभावी वाङमयमूल्यांची भिन्नता कारणीभूत ठरली आहे असे म्हटले तर ते फारसे चुकीचे ठरणार नाही. पण हे अराजक लक्षात घेत असतानाच एकाबाजूने या वाङमयमूल्यांच्या रसिक मनावर पडलेल्या प्रभावाचे कौतुक वाटते तर दुसऱ्या बाजूने त्यांच्या आजतागायत टिकून राहिलेल्या अस्तित्वाबद्दलचे कुतूहल वाढू लागते. हे कुतूहल शमविण्यासाठी या भिन्न भिन्न मूल्यांच्या उदयाची आणि अस्तित्वाची कथा मुळात जाणून घ्यावयास हवी. इंग्रजी सत्तेच्या उदयाच्या बरोबरीने मूल्यांची ही भिन्नता जाणवू लागली असे तज्ज्ञांचे या बाबतीतले मत दिसते. परंपरेने चालत आलेल्या मूल्यांना आव्हान देणारी परिस्थिती अव्वल इंग्रजीत उत्पन्न झाली आणि पहिल्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंत ती टिकून होती असाच महाराष्ट्राचा सामाजिक इतिहासही सांगतो. या दृष्टीने पाहता एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून तो महायुद्धाच्या अंतापर्यंतचा (सन १८०० ते सन १९२० चा) समीक्षेचा इतिहास अभ्यासकाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा ठरेल. चिपळूणकर–पूर्वकाला-

पासून श्रीपाद कृष्ण कोल्हटकरापर्यंतच्या या काळात जन्मलेल्या आणि आजघटकेस मिरविणाऱ्या साऱ्या प्रभावी वाङमयमूल्यांचे संशोधन व संकलन करून त्यांची संगतवार मीमांसा करावयास हवी आणि शक्यतर त्यांच्या कार्यक्षमतेचा शोध घ्यावयास हवा आणि तेच प्रस्तुत ग्रंथाचे उद्दिष्ट आहे.

या उद्दिष्टाबरोबरच आणखी एक गोष्ट स्पष्ट करावयास हवी. ती म्हणजे मराठी मनाची आवडनिवड हाच मराठी समीक्षा-वाङमयाचा पाया आहे--आणि हाच सिद्धांत नजरेपुढे ठेवून या ग्रंथातील समग्र विवेचनाची उभारणी केली जात आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून पहिल्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंत एकशेवीस वर्षांचा कालखंड आधुनिक समीक्षेच्या इतिहासातील एक दीर्घ आणि लांबचा पल्ला ठरेल. या काळातील साधनसंपत्ती प्रस्तावना, परीक्षणे, कवि–चरित्रात्मक निबंध, काव्यादि वाङमयप्रकारांची चर्चा, वादविवाद, अध्यक्षीय भाषणे, समालोचने आणि वाचकांची पत्रे याप्रमाणे बरीच विविध असून तीही विखुरलेल्या अवस्थेत आहे. या दृष्टीने पाहता मराठी समीक्षेचा हा कालखंड महाभारतातील आरंभीच्या विशाल आणि भव्य अशा आदिपर्वाची आठवण करून देतो आणि म्हणूनच त्याला मराठी समीक्षेचे आदिपर्व असे नामाभिधान दिले आहे. या आदिपर्वाचे भाग पाडताना विवेचनाच्या सोयीसाठी चिपळूणकर पर्व, आगरकर–टिळक पर्व आणि कोल्हटकर पर्व तीन उपपर्वे आम्ही योजिली आहेत.

□ □ □

ऐहिक मूल्याचे नवे आविष्कार : १

> Here there are two facts–the fact that the educated do not find Marathi tolerable and the fact of the Shastries looking down upon it. They look at it either from a Sanskrit or from an English point of view.

चांदणे दो दिवसाचे गार--

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्राची भौतिक परिस्थिति थोडक्यात वर्णन करावयाची झाल्यास 'चांदणे दो दिवसाचे गार' ह्या शाहिराच्या शब्दात करता येईल. पण हे चांदणे रामदासांनी दासबोधात वर्णिलेले 'सत्वाचे चांदणे' नसून उन्मादाला बहर आणणारे 'शिमग्याचे चांदणे' होते. अठराव्या शतकापासून महाराष्ट्रात वावरू लागलेली सुखोपभोगाची तृष्णा एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला चांगलीच उफाळून वर आली. ह्या शतकाच्या सुरवातीला पुण्यात ज्या सवाई राजेन्द्राचा अमल होता तो या नव्या सुखलोलुप प्रवृत्तीला उधाण आणणारा ठरला. सरदारांच्या ऐवजी सुंदर स्त्रियांचा घोळ पेशव्यांच्या वाड्यात दिसू लागला. गाण्याबजावण्याला ऊत आला. राजवाड्यात जमणाऱ्या 'चंद्रावळी'च्या रासन्हाण्यात खजिन्याच्या पैका खर्च व्हावा अशी अवस्था आली तर दरबारात कीर्तनप्रसंगी रासक्रीडेचे आख्यान लावा अशा तऱ्हेची सूचना हरदासाला खाजगी कारभाऱ्यांकडून देण्यात

येऊ लागली*. अठराव्या शतकाच्या शेवटी सवाई माधवरावाच्या काळात दिल्ली दरबारातला ऐषआराम महाराष्ट्रात रंगपंचमी साजरा करावयाला आला होता त्याचे रावबाजीच्या काळात रंगेलपणात‡ परिवर्तन झाले. गुणीजनांचे आश्रयस्थान म्हणून नांवाजलेले पुणे ह्या ऐहिक सुखवादाच्या नव्या प्रवृत्तीचे केंद्र बनले. होनाजी, सगन आणि प्रभाकर ह्यासारखे आश्रित कवि ह्या सुखोपभोगाची थाटदार वर्णने करून आपल्या राजेंद्राला रिझवू लागले. पुण्यातल्या साळू–मैना ही कवने रागदारीवर आळवू लागल्या आणि त्यावर आकर्षित होणाऱ्या विलासी मधुपांचे थवे† पुण्याच्या बोळाबोळातून हिंडताना दिसू लागले. शृंगाराला त्याज्य मानून ऐहिक सुखोपभोगाकडे पाठ फिरविणारी आणि स्त्रीवेषधारी पुरुषाचे मुखावलोकन त्याज्य मानणारी श्रीधर–मोरोपंतादि$ कवींची आणि डफावर थाप मारणाऱ्या फंदीला निर्भत्सणाऱ्या अहिल्याबाईसारख्या§ सत्वशील रसज्ञांची पिढी क्षितिजाआड झाली आणि भक्तिभाव आणि चारित्र्य यांना प्रमाणभूत मानणारी देवाधर्माची कला मावळत्या पंथाला लागली. इतकेच नव्हे तर ज्यांच्या रजोगुणातहि ओजाचा आविष्कार प्रगट होत

* ल. रा. पांगारकर–**मोरोपंतचरित्र आणि काव्यविवेचन**, मुंबई, १९०८ पृ. ७० वरील तळटीप.

‡ "पेशव्यांचा शनवारवाडा हे आजपर्यंत मराठी राजकारणाचे केंद्रस्थान होते त्याठिकाणी आता श्रीमंतानी नाचरंग आणि तमाशे सुरू केले. नायकिणीचे शृंगारयुक्त हावभाव आणि त्यांच्या मुरके बाज लावण्या ऐकण्याचा तर श्रीमंतांना अतिशयच षोक होता." वासुदेव वामन खरे–नाना फडनवीसांचे चरित्र, आ. ३ मिरज, १ ०७ (पृ. १९८)

† रा. ब. दादोबा पांडुरंग––**श्रीमद्रामनंदनमयूर विरचित, केकावली,** आवृत्ती दुसरी मुंबई, १९३१ (प्रस्तावना पृ. १४).

$ पाहा श्रीधर––**शिवलीलामृत**, (अ. ७) आणि पांगारकर–**मो. च.** (पृ. १५५)

§ शं. तु. शालिग्राम–**अनंतफंदीकृत कविता अथवा लावण्या**, भा. १ ला २ री आवृत्ति पुणे, १९०८ (प्रस्ता. पृ. १०)

असे ती पटवर्धन–शिंदे ह्यासारख्या पराक्रमी सरदारांची पिढी गेली आणि त्यांच्याबरोबरीने शौर्याचे विचारहि मावळले. अशारीतीने साधु गेले, वीर गेले आणि सुखोपभोगाचे तत्वज्ञान मात्र मागे राहिले.

एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या शेवटी महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीत फारच मोठा परिवर्त घडून आला, पेशवाईच्या रूपाने दृश्यमान होणारे स्वातंत्र्य–लक्ष्मीचे वैभव सन १८१८ त पुरते अस्तंगत झाले आणि संगमापलीकडे दिसणारे इंग्रजाचे युनियन जॅक् खुद्द शनिवारवाड्यावर फडकू लागले. "मराठी सेनेतील तोफांचे दणदणाट, घोड्याचे थयथयाट व शस्त्रास्त्रांचे खणखणाट थांबले. ते खलबतखाने, घुसलखाने सारे ओस पडले.†" सावकारांचे वसूल बुडाले. पेढ्यांची दिवाळी वाजली. जुनी खानदानी माणसे आणि वीर मुत्सद्दी अंतर्धान पावले. संस्थाने हळुहळू हतप्रभ झाली. वीराची हत्यारे गेली. शिलेदार होते ते शागीर्द बनले आणि शाहिरांचा आश्रय तुटून फडफडत खाली येणाऱ्या पतंगाप्रमाणे त्यांची अवस्था झाली. 'पेशवाइचे राज्य बुडाले केवढा बसला धका असे मनातल्या‡ मनात हळहळण्यापलीकडे कुणालाच गत्यंतर उरले नाही.

पण शाहिरांचा पोशिंदा गेला म्हणून पुण्यातला रंगेलपणा मावळला नाही. रावबाजी पुण्यातून गेले पण पुण्यातील शिमग्याचे चांदणे लोपले नाही. पुण्याच्या मागोमाग नागपूर, सातारा, झांशी ह्यासारखी मराठी सत्तेची एकेक केंद्रे सूर्योदयाबरोबर लुप्तप्राय होणाऱ्या तारकांप्रमाणे एकामागोमाग एक अशी ढळू लागली पण मराठीच्या सामंतयुगाने पोसलेले हे चांदणे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातहि बराच काळ क्षितिजावर रेंगाळत राहिले. महाराष्ट्राच्या नव्या सुखवादी तत्वज्ञानाला या स्थित्यंतराने विशेष ढळ पोचला नाही. उलट रावबाजीच्या राजवटीतील अस्वस्थतेला कंटाळलेल्या जनतेला नवी राजसत्ता सुखाचे माहेरघर वाटली. खेड्यापाड्यांतील कुळंब्याच्या तोंडून 'साहेबाचे राज्य चांगले;

† द वा. पोतदार–मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, पुणे, १९२२ (पृ. १०)
‡ मो. च. (पृ. ११६)

साहेब इन्साफ चांगला करतो' असे उद्गार बाहेर पडू लागले तर पेशव्यांच्या संगतीत व्यसनांची चटक लागलेल्या सरदार-जहागिरदारांनी एल्फिन्स्टन साहेबास मानपत्र दिले* त्यात 'तुम्ही राज्य घेतले हे बरे जाहले' असे सांगण्यास कमी केले नाही. 'क्षमातळी इंग्लिशासारखा प्रभु नाही दुसरा' अशी एकाबाजूने नव्या प्रभूंची स्तोत्रे गात दुसऱ्याबाजूने पेशवाईच्या धामधुमीत त्रासलेल्या जिवाला 'घ्या सुख आता खेदु पहिली सर्व तुम्ही विसरा,' असे‡ सांत्वनाचे शब्द नवा कविवर्ग सांगताना दिसू लागला.

अव्वल इंग्रजीच्या अमदानीत जो स्थिरतेचा, स्वास्थ्याचा क्षण सरदार–जहागिरदारांच्या वाट्याला आला त्याचा उपयोग ऐहिक सुखोपभोगाचे ध्येयहीन, निष्क्रिय आणि स्वैर आयुष्यक्रम जगण्यात त्यांनी केला. राजेरजवाडे आणि संस्थानिक सुखविलासात गर्क झाले आणि दिवसा आचारीपाणक्यांची कामे करणाऱ्या शागीर्दांचा आणि खेड्यात रिकामटेकडे आयुष्य घालविणाऱ्या पूर्वीच्या शिलेदारांचा वर्ग या श्रीमंतांच्या करमणुकीसाठी रात्री नाटकतमाशात सोंग घेऊ लागला. सामान्य जनतेच्या आणि श्रीमंत सरदारांच्या या शिथिल आणि शृंगारप्रवण आयुष्यक्रमात स्वास्थ्यसंपन्नता पावलेल्या मध्यमवर्गानेहि मोठ्या हौसेने भाग घेण्यास सुरवात केली. थोड्याशा इंग्रजी शिक्षणामुळे सरकार–दरबारांत मोठमोठ्या नोकऱ्या व अधिकाराच्या जागा मिळाल्यामुळे या मध्यमवर्गाचे डोळे तारुण्यमदाने धुंद झाले आणि तारुण्यातल्या नव्या नव्या उपभोगाचा भ्रमरवृत्तीने शोध घेता घेता त्यांच्या पायाखालची जमीन कधी कधी निसटू लागली. इंग्रजी शाळेत शिकणाऱ्या या तरुण पिढीच्या विद्वत्तेचे सरकारदरबारी चीज झाले म्हणून एका बाजूने कौतुक करीत असतानाच दुसऱ्या बाजूने त्यांच्या स्वैरवर्तनाला आळा उरला नाही म्हणून हळहळणारी

* श्री. रा. टिकेकर–**लोकहितवादीची–शतपत्रे**, मुंबई, १९४० (पत्र क्र. ४६ पृ. ७५)

‡ "वाई संग्रहालयात परशुरामपंतांचे (गोड बोंळ) इतिहासावरील सोपी कविता हे पुस्तक (इ. स. १९६४) पाहावयास मिळालं त्यातील हा उतारा आहे." (**म. ग. इ. अ.** उपोद्घात पृ. १९ वरील टीप)

वडिल* माणसे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पुण्यातल्या पुण्यात काही कमी नव्हती. हा सुखासीन मध्यमवर्ग श्रीमंतांच्या नाटकतमाशात स्वतःही हौसेने भाग घेऊन जिवाची करमणूक करून घेऊ लागला. यापैकी काही शास्त्रीपंडितांचा वर्ग नाटकतमाशासाठी पदे आणि संवाद रचून देऊ लागला, तर त्यांच्यापैकी एखादा शास्त्री स्त्रीपाटर्चाला शिकविण्यासाठी स्वतः† स्त्रीवेष घ्यायलाही संकोच करीनासा झाला. कित्येकांनी तर याहीपलीकडे जाऊन रंगेलपणाची कमाल केली. कपाळाला केशरी गंध, डोक्याला चुणीदार पागोटे आणि हातात छडी अशा रंगदार वेषातला पुण्यातला सभ्य प्रियजन रस्त्यात हिंडताना दिसू लागला. रात्रीच्या वेळी हातात फुलांचे गजरे घालून मशालीच्या झगझगीत प्रकाशात प्रियाराधनार्थ बाहेर पडणे कमीपणाचे वाटेनासे झाले. इतकेच नव्हे तर कित्येक वेळेस सकाळच्या प्रहरी आपल्या गुरुजनाला प्रियपात्राच्या रंगमहालांतून जागे करून आणण्याचे काम विद्यार्थ्यांच्या* वाटचाला येऊ लागले. तत्कालीन समाजाची ही शृंगारप्रवणता लक्षात घेऊनच की काय प्रतिष्ठित हरदासही आपल्या कीर्तनातून लावण्यांचा थाट दाखवू लागले. अशी गोष्ट सांगतात की एका नामांकित हरदास-बुवांनी रामजोशींची छेकापन्हुति कीर्तनात म्हणावयास काढली. आधीच रामजोशांची लावणी आणि त्यांतून बुवांच्या म्हणण्याचा थाटहि न्यारा होता. मग श्रोतृवृंदाची 'रात्रिरेवं व्यरंसीत्' अशी स्थिति होण्याची वेळ आली तर नवल नाही. कीर्तनाला असा विलक्षण रंग चढला की जवळच नातूंच्या वाडचाला आग लागली तरी श्रोत्यांना त्याची शुद्ध नव्हती. कीर्तन आटोपल्यावर प्रसाद घेऊन लोक बाहेर येऊन पाहतात तो काय, आगीचा नुसता डोंब उसळलेला त्यांच्या दृष्टीला§ पडला.

---

* लो. बा. गं. टिळक–चिपळूणकर यांच्यावेळची स्थिति, **केसरी १० मार्च १९०१**

† क्रु. आ. गुरुजी––नाटकाची स्थित्यंतरे, रंगभूमि मासिक वर्ष ४ अं. ११ (पृ. २३–२९)

§ वि. कृ. चिपळूणकर–मोरोपंतांची कविता, **निबंधमाला** अ. ५२ (पृ. ४ वरील तळटीप पाहा)

आणि या छेकापन्हुतीच्या गोष्टीवरूनच तत्कालीन समाजाची दुसऱ्या तऱ्हेची रसिकताही आपणाला दिसते. ही रसिकता केवळ शृंगारापुरतीच मर्यादित नसून त्याहून कांहीशी व्यापक आणि कांहीशी उच्च प्रतीची होती. संस्कृतांतील पंच–महाकाव्यांच्या आणि नाटकांच्या अध्ययनाने ही रसिकता पल्लवित झालेली होती. निवळ शृंगाराच्या वातावरणातून समाजाला उच्च अभिरुचीच्या पातळीवर न्यायला या रसिकतेची बरीच मदत झाली. एकुणिसाव्या शतकाच्या सुरवातीला जी सुखोपभोगाची तृष्णा शृंगाराच्या रूपाने वर उफाळून आली ती फार दिवस तशीच टिकणे शक्यही नव्हते. प्युरिटनांच्या वर्चस्वाखाली इंग्लंडात नाटकगृहांना जी कुलुपे घालण्यात आली तिचा परिणाम पुढे दुसऱ्या चार्लसराजाच्या अमदानीत सुखविलासाची दाबलेली तृष्णा जोराने वर उफाळण्यात झाला होता. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस महाराष्ट्राची अवस्था याच तऱ्हेची होती. फार काळ पारमार्थिक कल्पनांच्या पाशात जखडलेला महाराष्ट्र पहिल्याप्रथमच इतक्या मोकळेपणाने ऐहिक जीवनांतील सुखांची चव घेऊ लागला होता. अशास्थितीत त्याच्या अभिरुचीचा कल क्वचित उत्तान शृंगाराकडे वा अश्लीलतेकडे वळला तर त्यात नवल नव्हते. पण लवकरच ही तृष्णा शांत झाली आणि याच सुमारास संस्कृती वळणाची नवी रसिकता पुढे आली. विदग्ध, नागर आणि रसालंकारयुक्त काव्ये वा नाटके, त्यांतील छंदोबद्ध आणि चमत्कृतियुक्त सरणी, भाषेची शुद्धता व डौल, वर्णनातील बारकावे आणि रमणीयता या गोष्टी या नव्या रसिकतेची अंगे होत. या रम्य अंगोपांगांनी महाराष्ट्राचे लक्ष या रसिकतेकडे वेधले. एका बाजूने संस्कृतांतील काव्य–नाटकांची भाषांतरे मराठीत होऊ लागली तर दुसऱ्या बाजूने या संस्कृत नाटकाचे प्रयोग रंगभूमीवर हौसेने करण्यात येऊ लागले आणि ते पाहायला युरोपातून इकडे आलेल्या विद्यागुरूंची आणि 'हपीसरां'ची गर्दी जमू लागली. ठिकठिकाणच्या शाळा–कॉलेजांतून संस्कृत नाटकांचे वाचन आणि प्रयोग होऊ लागले. १८७१ साली पुणे येथील डेक्कन कॉलेजच्या गॅदरिंगच्या निमित्ताने कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी वेणीसंहार

नाटकाचा प्रयोग† केला तर मुंबईच्या 'कालिदास एल्फिन्स्टन सोसायटी'-च्या विद्यमाने शाकुंतल नाटकांचा प्रयोग इंग्रजीत वठविण्यात आला. या प्रसंगासाठी शकुंतलेला नेसण्यास चारशे रुपयाची वल्कले मुद्दाम मद्रासहून मागविली होती तर शकुंतलेच्या पुष्पशय्येसाठी पुण्याहून फुलांच्या दोन 'वाघिणी' भरून मुंबईला नेण्यात आल्या होल्या*.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात माजलेले सुखवादाचे हे प्राबल्य वाङमयनिर्मितीवर आणि वाङ्मयमूल्यावरही आपला ठसा उमटविल्यावाचून राहिले नाही. नाटक आणि कादंबरी ही मराठींतील दोन ललिताची अंगे याच काळात उजेडात आली. सांगलीचे अधिपति श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांच्या प्रोत्साहनाने विष्णुदास भावे यांनी १८४३ त सीतास्वयंवर नाटक मराठीत लिहून रंगभूमीवर आणले तर लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी १८६१ त मुक्तामाला लिहून मराठीत कादंबरी–वाङमयाचा पाया घातला. ही कादंबरी इतकी लोकप्रिय ठरली की तिचे अनुकरण करणाऱ्या कादंबरी–लेखकांचा एक वर्गच पुढे आला आणि खुद्द या कादंबरीकर्त्याला बडोद्याच्या तत्कालीन अधिपतींकडून वर्षासन सुरू झाले. साहजिकच या धर्तीवर 'अरबी भाषेतील सुरस गोष्टी'तले जादूचे महाल, मंजुघोषादि कादंबऱ्यांतली भुयारे आणि मेघदूतांतली रत्नखचित मंदिरे मराठीत दाखविली जाऊ लागली. ऐहिक सुखवादाच्या पोटी रंजनप्रधानता हे वाङमयाचे नवे ध्येय अशारीतीने जन्माला आले, वाङमयनिर्मितीत ते दिसू लागले आणि गंमत की या काळातील कृष्णशास्त्री चिपळूणकरासारखे प्रमुख रसज्ञही 'कवितेचे मुख्य लक्षण म्हटले म्हणजे तीतील अर्थ मनोरंजक रसिक व चमत्कारिक असा असला पाहिजे' असे कवितेचे–नव्हे साऱ्याच वाङ्मयाचे–नवे मूल्य बोलून‡ दाखवू लागले.

† ल. कृ. चिपळूणकर–**विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र**, पुणे, १८९४ (पृ. ७०)

* आ. वि. कुळकर्णी–**मराठी रंगभूमि**, पुणे, १९०३ (पृ. ४१)

‡ **शालापत्रक** १८६१

टीकाकार व्यक्तीचा उदय

मुकुंदराजापासून महीपतीपर्यंतच्या काळात ज्या निरनिराळ्या पारमार्थिक कल्पना मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रावर प्रभुत्व गाजवित होत्या त्या एकोणिसाव्या शतकात आपापल्यापरीने कायम होत्या आणि त्या धर्तीची वाङ्मयरचनाही होत होती. परंतु जुन्या काळाप्रमाणे या कल्पनांचा पगडा मात्र तितक्या जोरकस प्रमाणात या काळात समाजावर बसला नाही. उलट या कल्पनांच्या पाशातून बाहेर निसटून ऐहिक सुखविलासांचा आस्वाद घ्यावा ही नवी प्रवृत्ति या काळात जोमाने वावरू लागली होती आणि त्याचा परिणाम या काळांतील वाङ्मयनिर्मितीवर आणि वाङ्मयविषयक आवडीनिवडीवर झाला. रावबाजींच्या अमदानीत आणि पुढे अव्वल इंग्रजीतही वाङमयाचे लक्ष देवाधर्माकडून ऐहिक विषयाकडे वळले आणि विशेषत: 'रंजन' वा 'करमणूक' हेच वाङमयाचे प्रमुख ध्येय होऊन बसले.

अव्वल इंग्रजीतील परिस्थिति जशी या नव्या रंजनात्मक ध्येयाला पुढे येण्याच्या दृष्टीने उपकारक होतीच. या काळातील वाङमयक्षेत्रातील नेतृत्वही या नव्या मूल्याच्या वाढीला उपकारकच ठरले. पेशवाईत विद्वानांच्या सभेत ज्यांना अग्रभागी मान होता ते शास्त्रीपंडितच अव्वल इंग्रजीत वाङमयक्षेत्राचे नेते होते. अव्वल इंग्रजीत पेशवाईतल्याप्रमाणेच संस्कृत विद्येची प्रतिष्ठा कायम राहिली आणि शास्त्रीपंडितांचा मानमरातब पूर्वीप्रमाणेच होता. श्रावणमासांतील दक्षिणा आणि वर्षासने नाहीशी झाली असली तरी नव्या पद्धतीचे उत्तेजनाचे प्रकार चालू होते. किंबहुना बक्षिसे व उत्तेजने, हुद्याची नोकरी व मानमान्यता ही सारी प्रतिष्ठा या काळातल्या शास्त्रीपंडितांना उपभोगायला मिळाली. इतकी अनुकूल आणि सुखाची परिस्थिति या वर्गाला पुढे कधीच अनुभवाला आली नाही. याचाच परिणाम म्हणजे १८४८ च्या सुमारास कृष्णशास्त्री चिपळूणकरासारखे तरतरीत बुद्धीचे शास्त्री पुण्याच्या पाठशाळेत वयाची पंचविशी उलटल्यानंतर इंग्रजी शिकण्यास आरंभ करूं लागले तर त्याच घटकेला मेजर कँडीसाहेबासारखे त्यांचे विद्यालयीन प्रमुख गुरुजन या 'कृष्णा

चिपळूणकरा'ने शाळेत शिकत असताना लिहिलेले पाठ आपल्या मराठीच्या क्रमिक पुस्तकात समाविष्ट करून घेत होते. § या काळातील दुसरे प्रसिद्ध शास्त्री महादेवशास्त्री कोल्हटकर यांनाही मेजर कँडीनी असे सांगितले होते म्हणतात की, 'महादेव, शहाणा असशील तर इंग्रजी शिक, तुझ्या बुद्धीचे चीज होईल'.* आणि तसे झालेही! तत्कालीन प्रमुख मराठी पंडिताना अग्रणी समजले जाणारे परशुरामपंत गोडबोले हे तर मेजर कँडीचे उजवे हात होते. कोणतीही मराठी कविता हातात आली तर मेजर कँडीकडून ती गोडबोले यांच्याकडे अभिप्रायदाखल करून घेण्यास जायची आणि गोडबोले लिहतील तो अभिप्राय सरकारी दप्तरात नमूद व्हायचा. ‡

या विद्वान शास्त्रीपंडितांनी सरकारी हुकमावरून कोशव्याकरणादि रचना करून आणि शालोपयोगी ग्रंथांचा पाया घालून मराठी भाषेला योग्य ते वळण दिलेच पण त्याहीपेक्षा संस्कृत काव्यनाटकांची भाषांतरे करून मराठी रसिकतेला वळण देण्याचे जे काम केले ते विशेष महत्वाचे ोय. १८५७ साली मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना होऊन उच्च शिक्षणक्रमास जी सुरवात झाली ती या संस्कृती वळणाच्या रसिकतेला पोषकच ठरली. वैदिक आणि शास्त्रज्ञ पंडितापेक्षा संस्कृतातील काव्यनाटकादि वाङमयाचा अभ्यास केलेल्या रसिक पंडितांची इंग्रजी पंडितात विशेष चहा होती. विल्यम जोन्स, डॉ. हॉल यासारख्या इंग्रज पंडितांनी संस्कृत काव्यनाटकांची इंग्रजीत भाषांतरे केली होती आणि उच्च शिक्षणक्रम शिकविण्यास इकडे आलेले यरोपियन विद्यागुरु संस्कृत काव्यनाटकाचे आस्थेने वाचन व अध्ययन करू लागले होते.

---

§ म. ग इं अ. (पृ. १८)

* अ. ब. कोल्हटकर–वामनराव कोल्हटकर–**मासिक मनोरंजन,** जून १९२०

‡ खं. भि. बेलसरे–**चिपळूणकरकृत किरकोळ लेखांचा संग्रह** भा. २ पुणे, १९०२ (पृ. १७)

वर सांगितलेल्या मुंबई विश्वविद्यालयाच्या स्थापनेने संस्कृती वळणाच्या रसिकतेला परिपोषक वातावरण तर उत्पन्न केलेच पण त्याबरोबरच इंग्रजी वाङमयाच्या आवडीनिवडीचीही मुहूर्तमेढ महाराष्ट्रांत रोवली. उच्च विद्यालयीन शिक्षणात इंग्रजींतील उत्तमोत्तम काव्य-नाटकांचा अभ्यास करण्याची संधि महाराष्ट्राला मिळाली आणि त्याचा परिणाम त्याच्या मनावर या नव्या आवडीनिवडी बिंवण्यात झाला. वर्डस्वर्थचे निसर्गप्रेम आणि अंतःकरणापासून निघणारी उत्कट भाषा आपल्या नाविन्याने महाराष्ट्राचे मन मोहून घेऊ लागली. स्कॉटच्या कादंबऱ्यातील यथातथ्य रेखाटन आणि मानवी विकारांचे हुबेहूब चित्रण पाहून आपण कांहीतरी अपूर्व गोष्ट पाहत आहोत असे त्याला वाटू लागले तर शेक्सपीयरच्या नाटकांतील विकारदर्शनाची सूक्ष्मता आणि सखोलता पाहून त्यांचे मन स्तिमित होऊ लागले. ललितवाङमयाच्या बरोबरीने इतिहासाविषयीची आस्थाही नव्या पदवीधरांच्या मनात रुजू लागली. इतिहास कसा लिहावा आणि तो कसा रंगवावा याचे धडे याच काळात महाराष्ट्रात गिबन, ह्यूम आणि मेकॉले या ग्रंथकारांपासून गिरविण्यास सुरवात केली. इतिहासाच्या आस्थेने लेखन–प्रवृत्त झालेले या काळातील दोन प्रमुख लेखक म्हणजे लोकहितवादी आणि वि. कों ओक हे होत. ललिताच्या प्रांतातही इतिहासची प्रीति पाळेमुळे धरू लागली आणि हळुहळु ऐतिहासिक काव्य, नाटक आणि कादंबरी हे रचनेचे नवे प्रकार मराठीत दिसू लागले. १८६१ साली डेक्कन कॉलेजात शिकत असलेल्या विनायक जनार्दन कीर्तने या तरुण विद्यार्थ्याने 'थोरले माधवराव पेशवे' हे मराठीतील पहिले ऐतिहासिक नाटक वयाच्या विसाव्या वर्षी रचले आणि ते विद्वत्सभेत वाचून दाखविले तेव्हा या तरुण नाटककाराची विद्वानांनी फार तारीफ केली. थोरले माधवरावांच्या मागोमाग त्यांचे बंधु नारायणराव यांची आठवण व्हावी हे साहजिकच होते. ती आठवण झाली नागपूरच्या हरिपंत पंडितांना. 'विविधज्ञानविस्तारा'ने हे पंडितांचे नाटक छापले आणि नागपूरच्या नीलसिटी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पंडितांच्याच देखरेखीखाली या नाटकाचा प्रयोग वठवून दाखविला *

* म रं. (पृ. ७९)

होता असे म्हणतात. नाटकाप्रमाणे काव्याच्या प्रांतात 'राजा शिवाजी' 'अकबरकाव्य', 'नारायणराव पेशवे' यासारखी ऐतिहासिक काव्ये आणि कादंबरीक्षेत्रात 'मोचनगड' 'करण वाघेला' या सारख्या ऐतिहासिक कादंबऱ्या रचण्याचे प्रयत्न झाले. इतिहासाप्रमाणेच सद्यःस्थिति हाही कित्येक लेखकांनी आपल्या नाट्य–कादंबऱ्यांचा विषय केला आणि सभोवतीच्या जगांतील वस्तुस्थिति दर्शविणारे 'मनोरमा' 'स्वैरसकेशा' यासारखे नाट्यात्मक आणि 'शिरस्तेदार' 'नारायणराव आणि गोदावरी' यासारखे कथात्मक ग्रंथ मराठीत निर्माण होऊ लागले.

पण या वाङमयनिर्मितीतील एकोणिसाव्या शतकाचे वैशिष्टच डोळ्यापुढे उभा करणारा प्रकार म्हणजे टीकावाङमयाचा प्रारंभ होय. या प्रकाराने वाङमयाच्या प्रांतात आजवर अभावाने तळपणाऱ्या "टीकाकार" या नव्या व्यक्तीचा उदय झाला. ज्ञानेश्वरापासून महीपतीपर्यंतच्या काळांत वाङमयविषयक आवडीनिवडीचा विचार करताना कवि, हरिदास आणि श्रोता या तीन घटकांचा विचार करावा लागे. परंतु एकोणिसाव्या शतकात एका बाजूने मुद्रणालयाचा प्रसार आणि दुसऱ्या बाजूने ग्रंथनिर्मितीत होत जाणारी वाढ या दोन गोष्टींमुळे ग्रंथसंपत्तीची पाहणी करून तिची सरसनीरसता ठरविणे आणि अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालणे या दोन्ही गोष्टी एका नव्या घटकाची आवश्यकता उत्पन्न होऊन गुणदोषविवेचनाचे कार्य करणारा टीकाकार हा नवा वर्ग उदयास आला. या वर्गाच्या उदयाला थोड्या अंशाने का होईना सरकार-दरबारी नव्याने नियुक्त झालेल्या मराठी ट्रान्स्लेटराचे व रिपोर्टराचे अस्तित्वही कारणीभूत झाले. अव्वल इंग्रजीत मराठीला विद्यालयात आणि पुढे विश्वविद्यालयातही काही काळ स्थान मिळाले. सरकार-दरबारात शास्त्रीपंडिताच्या रूपाने मराठीला सन्मानाची जागा मिळालेली होती. विद्यापीठासाठी जशी क्रमिक शालोपयोगी व शास्त्रीय पुस्तके तयार होत होती तशीच स्वतंत्र व भाषांतरात्मक उत्कृष्ट ग्रंथरचना करणाऱ्यालाही बक्षिसे वा उत्तेजने ठेवून चांगला वाव देण्यात आला होता. याचा परिणाम ग्रंथनिर्मितीवर व्हायचा तसेच झाला. १८२७

ते १८३७ पर्यंतच्या दहा वर्षांत दहा पुस्तके निघाली. त्यानंतरच्या दहा वर्षांत ही संख्या तिपटीवर गेली. पुढल्या दहा वर्षांत एका शेकड्याची मर्यादा गाठली गेली आणि १८५७ च्या नंतर ग्रंथप्रकाशनाला जणु पूर येऊन त्याच्या पुढल्या आठ वर्षांच्या काळात तर ही ग्रंथांची संख्या साडेपाचशेच्या घरात गेली. १८५७ सालापासून वातावरणातही नवा रंग आला आणि शालोपयोगी व शास्त्रीय पुस्तकांच्या बरोबरीने नाटक-कादंबऱ्यादि ललितवाङ्मयांत ग्रंथकाराची गति वाढू लागली. वर्तमानपत्रे व मासिके निपजू लागली आणि सभासोसायट्यांतून वाचण्यात येणारे आणि बक्षिसाला पात्र होणारे निबंध त्यातून छापले जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस वाङ्मयाच्या क्षेत्रात निवळ क्रमिक पुस्तकांच्या रूपाने दिसणारी बाल्यावस्था मावळून सभा आणि सोसायट्या, बक्षिसे आणि उत्तेजने, लेखन आणि प्रकाशन, पुस्तके आणि मासिके अशा बऱ्याच नव्या गोष्टी १८५७ नंतरच्या वातावरणात दिसू लागल्या. एका बाजूने या ग्रंथसंपत्तीची मोजदाद व मूल्यमापन करणारे सरकारी रिपोर्ट तयार होऊ लागले तर दुसऱ्या बाजूने या साऱ्या वाङ्मयप्रकारांना आणि प्रवृत्तींना योग्य ते मार्गदर्शन करू इच्छिणारे टीकालेख सभेतून वाचले जाऊ लागले आणि वर्तमानपत्रातही मोठ्या डौलाने लेखकाच्या नावाने झळकताना दिसू लागले. या टीकालेखाच्या कार्यात शास्त्रीपंडित, पदवीधर आणि वर्तमानपत्रकर्ते सारेच मोठ्या अहमहमिकेने भागहि घेऊ लागले. कृष्णशास्त्री चिपळूणकरासारखे पंडित शालापत्रकातून 'थोरले माधवराव पेशवे' 'जयपाळ' यासारख्या नव्या पुस्तकावर अभिप्राय देऊ लागले. रा. ब. माधवराव रानड्यांसारखे ताज्या दमाचे पदवीधर सरकारी रिपोर्टाच्या निमित्तात विशेष परिश्रम घेऊन पुस्तकाचे गुणदोष-विवेचन करू लागले. रा. ब. मराठे 'नावले व नाटके' यांच्या गुण-दोषांची मीमांसा करीत आहेत, नीलकंठराव कीर्तने यासारखे कॉलेजां-तील विद्यार्थी ग्रँट डफच्या बखरीतील दोष निर्भीडपणे सभेत बोलून दाखवीत आहेत आणि इंदुप्रकाशासारखी वर्तमानपत्रे ते लेख अगत्याने मागून घेऊन छापवीत आहेत असाही देखावा दिसू लागला. रानड्यांचे समालोचनात्मक लेखही सरकारी दप्तरात गुंडाळून न राहता बॉम्बे

गॅझेटासारख्या पत्रांत प्रसिद्ध होत. नव्या पुस्तकावर अभिप्राय येत राहावेत अशी मागणी करणारी वाचकांची पत्रे या काळात संपादकांना येऊ लागलेली दिसतात. असेच एक पत्र बॉम्बे गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले असता इंदुप्रकाश पत्राच्या संपादकांनी हे काम वृत्तपत्रांचे नसून स्वतंत्र मासिकांचे होय असा अभिप्राय देऊन वर 'अशात-हेची मासिके मराठीत नाहीत' म्हणून खेद प्रदर्शित केला तेव्हा 'विविधज्ञानविस्तार' मासिकाच्या संपादकाने त्याला उत्तरादाखल जो टोला हाणला तो पाहण्यासारखा आहे. विस्तारकर्ते लिहितात :—

> पुस्तकाविषयी मत देणे हे जरी मासिक पुस्तकांनी करू नये असे नाही तरी वर्तमानपत्रकारांनी त्याविषयी मत देऊ नये ही गोष्ट आज नवीन बाहेर पडली. आणखी मुंबई-मध्ये विविधज्ञानविस्तार म्हणून एक मासिक निघत असते व त्यामध्ये नेहमी पुस्तकपरीक्षा येत असतात ही गोष्ट जरी बॉम्बे ग्याझेटातील पत्र पाठविणारास माहीत नसली तरी इंदुप्रकाशकर्त्यांनी असे आंधळ्या बहि-यांचे सोंग घेणे हे फार आश्चर्यकारक आहे. हे इंदुप्रकाशास जर खरोखरीच ठाऊक नसले तर आम्ही आणखी कळवितो की आमच्या पुस्तकात टीका आली नाही असे जर एकादे पुस्तक त्यांच्यापाशी टीकेकरता आले असले व पुढे येईल तर त्यांच्या हातून तर ती होत नाहीच याकरिता ते कपाटात पडून कुजत राहावे यापेक्षा आम्हाकडे त्यांनी बेलाशक पाठवून द्यावे. आम्हाकडून काही अडचण नाही. आम्ही त्याविषयी योग्य विचार प्रसिद्ध करून नंतर हवे असल्यास त्यांचे त्यांना परत करू*.

विस्तारकारांच्या या उत्तरातून व्यक्त होणारी तडफ आणि तत्परता या काळातील प्रमुख लेखकात टीकाविषयक जाणीव किती खोल रुजली होती याचे एक प्रत्यंतरच होय.

---

* **वि. विस्तार** पु. ४ अं. ३

ऐहिक अभिरुचीची नवी वळणे

संस्कृत व आंग्ल वळणाच्या दोन्ही तऱ्हेच्या आदर्शांचा आणि अभिरुचीचा परिणाम मराठी ग्रंथरचनेवर जसजसा होऊ लागला तसतशी या दोन्ही वळणांची मते व मूल्ये वाङमयाच्या क्षेत्रात प्रतिपादिली जाऊ लागली. मराठीच्या दृष्टीने पाहता ही दोन्ही वळणे नवीनच होती आणि दोन्ही ऐहिकाच्या साच्यात बसणारी अशीच होती. पंडिती वळणाची काव्ये कथानकांच्या दृष्टीने पुराणावर अवलंबिलेली दिसत असली तरी त्यांची पद्धति संस्कृतांतील पंचमहाकाव्याच्या वळणाची असून त्यांचा हेतु चमत्कृतिप्रधान व रसालंकारयुक्त काव्ये रचून लोकरंजन करणे हाच होता. तत्कालीन रसिकांचे अग्रणी आणि संस्कृतांतील साहित्यशास्त्राचे दर्दी कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या 'कविता' या लेखात जे काव्यलक्षण सांगितले आहे ते या नव्या प्रवृत्तीचे द्योतक आहे. "काव्याची मातब्बरी ही त्यांतील बोधपर परिणामावरून मोजावयाची नसून त्यातील मनोरंजक वा चमत्कारिक (म्हणजे चमत्कृतिजनक) अर्थनिष्पत्तीवरून मोजली जाते*" असा जो या काव्यलक्षणातून त्यांनी आपला अभिप्राय दिला आहे तो लक्षात ठेवण्यासारखा आहे. तत्कालीन हेतुहीन आणि सुखवादी जीवनाला हे नवे काव्यलक्षण किती अनुरूप आहे तेही पाहण्यासारखे आहे. कृष्णशास्त्री लिहितात :--

> काव्यातील अर्थ उपयुक्त किंवा बोधपर असला तर असेल परंतु तो तसा असलाच पाहिजे असा नियम नाही व तो तसा नसला तरी काव्यात काही न्यूनता आली असे होत नाही. तो अर्थ मनोरंजक असला म्हणजे पुरे. सारांश कवितेचे मुख्य लक्षण म्हटले म्हणजे तीतील अर्थ मनोरंजक रसिक व चमत्कारिक असा असला पाहिजे.†

---

* शालापत्रक १८६१

† **तुळा**–"एखाद्या ग्रंथात सरस व मनोरंजक कल्पना असली व प्रास, यमक इत्यादि भूषणे नसली तरी त्यास काव्य म्हणावयास चिंता

वरील उताऱ्यावरून कृष्णशास्त्री यांचा दृष्टिकोन कसा पूर्णपणे ऐहिक स्वरूपाचा आहे हे दिसून येते व किंबहुना हा दृष्टिकोन निव्वळ ऐहिकच नव्हे तर तत्कालीन गद्ययुगाच्या वाढत्या प्रपंचालाही तो कसा उपकारक होता हे त्यांच्या याच लेखातील पुढील उताऱ्यावरून दिसेल.

> ग्रंथास काव्यपणा येण्यास तो छंदोबद्धच असला पाहिजे असा नियम नाही; व जो छंदोबद्ध असतो तो म्हणजे काव्यरूपच असतो असाही नियम समजू नये. संस्कृतात बाणकविकृत कादंबरी, दंडी नामक कवीने रचिलेले दशकुमारचरित्र इत्यादि ग्रंथ छंदोबद्ध नसताही काव्ये आहेत. तसेच मनुसंहिता वगैरे धर्मशास्त्रातील व सिद्धांतशिरोमणि, वाग्भट वगैरे ज्योतिषाचे व वैद्यकाचे हे ग्रंथ हे छंदोबद्ध असताही काव्ये नव्हेत.

या ठिकाणी कृष्णशास्त्री यांनी 'छंदोबद्धता' आणि 'बोधपरता' ही दोन्ही लक्षणे गौण मानून गद्य आणि पद्य या दोन्हीतऱ्हेच्या वाङमयाचा एकत्र विवेक केला आहे आणि अर्थचमत्कृति हे दोन्ही तऱ्हेच्या वाङमयाचे एकमेव लक्षण मानले आहे ते संस्कृत साहित्यशास्त्रांतील काव्यलक्षणांना धरूनच आहे. 'काव्य' या पदाचा उल्लेखही याठिकाणी कृष्णशास्त्र्यांनी संस्कृत साहित्यशास्त्राप्रमाणेच 'ललितवाङमय' या व्यापक अर्थाने केलेला दिसतो. काव्याविषयीचा हा नवा दृष्टिकोन प्रगट करून त्यांनी तत्कालीन गद्ययुगातील नाटक–कादंबरी या नव्या ललितप्रकाराचे लक्षण दाखविले तद्वतच जुन्या ललितवाङमयाला लागू पडेल असे एक सार्वत्रिक व व्यापक मूल्यच बोटाने दर्शविले आहे असे म्हणायला हरकत नाही.

कृष्णशास्त्री चिपळूणकर यानी तत्कालीन वाङमयीन प्रवृत्तीला साजेसे नवे व्यापक काव्यलक्षण ठरविले व ते ठरविताना संस्कृत साहि-

---

नाही. परंतु प्रास, यमक इत्यादि असून जर ग्रंथात एकहि चमत्कारिक कल्पना नसली तर त्यास कविता अशी संज्ञा अप्रयोजक." (ज्ञानप्रसारक एप्रिल १९५४ उद्धृत आलोचना मार्च १९६३ वर्ष १ अं. ७ पृ. २३)

त्यशास्त्राचा आदर्श अनुसरला. हेच वळण कायम ठेवून तत्कालीन वाङ्मयाचे गुणदोषविवेचन करणारा दुसरा रसज्ञ म्हणजे 'विविधज्ञान-विस्तार' मासिकाचे संचालक रामचन्द्र भिकाजी गुंजीकर होय. 'राजा शिवाजी' या नव्या कवितेचे परीक्षण करण्याच्या निमित्ताने गुंजीकरांनी 'द्राक्षापाक', 'इक्षुपाक' व 'नारिकेलपाक' असे कवितेचे जे तीन प्रकार दर्शविले ते संस्कृत साहित्यशास्त्रातूनच घेतलेले आहेत. गुंजीकरांच्या मते द्राक्षापाक कविता–म्हणजे प्रसाद गुणाने मंडित अशी कविता ही श्रेष्ठ होय. सत्काव्य कोणते ते सांगताना गुंजीकर लिहितात--

> ते वाचताच त्यापासून वाचणाऱ्याच्या अंत:करणामध्ये अप्रतिम आल्हाद उत्पन्न होत असतो. ते काव्य वाचून त्याच्या अर्थाकरिता अन्वय शोधीत बसण्याची गरज लागत नाही. त्यातील उपमा, दृष्टांत इत्यादि अलंकार स्वाभाविक व उघड असतात. अर्थाकरिता त्यांची ओढाताण करावी लागत नाही.†

पण गंमत अशी की सत्काव्याला साधेपणाची आवश्यकता मानूनही गुंजीकरांनी राजा शिवाजी या साध्या मराठी काव्याला सत्काव्य मानलेले दिसत नाही. उलट "या कवितेत संस्कृतातील प्रौढ शब्द गाळल्याने असावे तितके माधुर्य नाही आणि 'खडाडा' 'धडाडा' अशा शब्दांशी वारंवार गाठ पडल्याने ती अतिशय रुक्ष वाटते" असा अभिप्राय त्यांनी दिला असून संस्कृतातील प्रौढ शब्द गाळण्याची जी गर्भित प्रतिज्ञा कवीच्या काव्यपद्धतीतून दिसते तिचा अधिक्षेप केला आहे. गुंजीकर लिहितात--

> साधारण लोकांच्याही म्हणण्यामध्ये जी पदे, भूपाळ्या, श्लोक, आर्या, कटाव येतात ते तर सोडाच परंतु सगनभाऊ, होनाजी बाळा वगैरेच्या लावण्यांमध्येही मोठेमोठे प्रौढ शब्द असंख्य आले आहेत व ते अगदी अशिक्षितांनाही समजतात

† वि. विस्तार १८७१

अ से असता प्रौढ शब्द गाळण्याची काय बरे गरज होती ? . .
ही संस्कृत शब्द गाळण्याची कल्पना □ इंग्लिश लोकांकडूनच घेतलेली दिसते. . संस्कृत भाषेपासून मराठी भाषा फार दूर दूर जाऊ नये. मराठी काव्यामध्ये बहुतेक प्रकारे इंग्लिश तऱ्हा आणण्याचा कुंटे यांचा जो बेत दिसतो त्यापेक्षा संस्कृत शब्द आणणे हे काही वाईट नाही.

संस्कृती वळणाचे मूल्य याप्रमाणे चमत्कारयुक्त पण हेतुहीन काव्य-लक्षणावर भर देत असतानाच दुसरीकडे हेतुप्रधान वाङ्मयच श्रेष्ठ मानणारा दुसरा लेखकांचा वर्ग पुढे येत होता. याही लेखकांची दृष्टि ऐहिकावरच खिळलेली होती. पण ऐहिक जीवनांतील पांचट, शृंगारिक आणि हेतुहीन वातावरण या वर्गाला आवडत नव्हते. अशा लेखकांत लोकहितवादी हे कालानुक्रमाने पहिले होत. अव्वल इंग्रजीतील स्वास्थ्यसंपन्नतेमुळे महाराष्ट्रांत जे रंगेल आणि निष्क्रिय वातावरण उत्पन्न झाले आणि ज्या वातावरणांतून मध्यमवर्गातील कर्तबगार व धुरीण नेत्यांवरही ख्याली-खुशालीत, विषयोपभोगात आणि प्रिय-पात्राच्या महालात रात्रीच्या रात्री घालविण्याइतकी जी बेजबाबदार-पणाची नशा आली तो सारा या संस्कृती वळणाच्या हेतुहीन पांडित्याचा आणि शृंगारिक वाङ्मयाचा परिणाम होय असे लोकहितवादींना मना-पासून वाटत होते. They have made vice fashionable in Poona हे लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीचे काढलेले चित्र * लोकहितवादींना दिवसाढवळ्या दृष्टीपुढे दिसत होते आणि त्याच्याच बरोबरीने इंग्रज राज्यकर्त्यांचे कर्तृत्व, त्यांची सुधारणा-प्रियता, त्यांची ज्ञान मिळविण्याची धडपड आणि राष्ट्रजागृतीचे प्रयत्न प्रत्यक्ष अवलोकनाने आणि इतिहासाच्या वाचनाने त्यांच्या मनश्चक्षूपुढे

□ "गुंजीकरांचे हे विधान वर्डस्वर्थच्या 'लिरिकल बॅलॅड : प्रस्तावनेस उद्देशून असेल काय ?" **साहित्य शोध आणि बोध,** (पृ. १८७)

* लों. टिळकांचे केसरीतील लेख-खंड ४, पुणें १९३० (पृष्ठ २९१)

सदैव खेळत होते इतिहासापासून राष्ट्राला मिळणारी स्फूर्ति त्यांच्यापुढे जणु इंग्रजांच्या रूपाने उभी होती आणि त्यामुळे आपल्याही राष्ट्राचा इतिहास असाच कर्तृत्वशाली व्हावा असे त्यांना वाटत होते. किंबहुना इतिहासासारखे सद्य:स्थितीला स्फूर्तिदायक वाङमय दुसरे नाही अशी त्यांच्या मनाची धारणा होती. या धारणेने प्रेरित होऊनच त्यांनी शतपत्रे लिहिली. ऐतिहासिक गोष्टी संग्रहित केल्या आणि शौर्यशाली रजपुतांची कथा सांगणाऱ्या टॉडच्या राजस्थानच्या इतिहासाचे भाषांतर केले. इतिहासाचा हा डोळा लावून ते वाङमयाकडे पाहत असल्यामुळे वाङमयही सद्य:स्थितीची जाणीव देणारे, उन्नतीचा मार्ग सुचविणारे आणि राष्ट्राला स्फूर्ति देणारे असावे असे त्यांना फार वाटे आणि ज्या काव्यात हे गुण नाहीत अशी कालिदासासारख्या कवीची काव्ये, भागवतासारखी पुराणे, चपूभाण यासारखे प्रबंध आणि होनाजी–बाळासारख्याच्या लावण्या या साऱ्या वाङमयावर त्यांनी सरसहा पुढीलप्रमाणे ताशेरा झाडला. लोकहितवादी लिहितात--

> भागवतासारखे शृंगारिक ग्रंथ, नवरस, अष्टनायिकांचे वर्णन आणि गीत–गोविंदासारखी काव्ये ही लोकांस प्रिय होत चालली! चंपू काव्यांचा काल म्हणजे जसा बाजीरावाचे वेळेस होनाजी बाळाचा काळ आला आणि मराठी भाषेत निरुपयोगी काव्यांचा भरणा झाला तसाच होय. †

'निरुपयोगी' या एकाच शद्बात लोकहितवादींचा काव्यविषयक निषेध जसा थोडक्यात सामावतो तसाच त्यांचा काव्यविषयक दृष्टिकोनही दिसतो. याच दृष्टीने निबंधसंग्रहातील एका लेखात नवीन विद्या अधिक शोधावयाच्या सोडून काव्य करू लागले याबद्दल प्राचीनांना मूर्ख म्हणायला ते कमी करीत नाहीत. मग कालिदासादि कवींची काव्ये-जिच्या वाचनाने स्त्रैण व लंपट वातावरण उत्पन्न होऊन लोक हतवीर्य होतात अशी त्यांची समजूत होती ती त्यांनी देशाच्या प्रगतीला अपकर्षकारक अतएव घातुक व त्याज्य ठरविली तर नवल काय?

† लोकहितवादी–स्वाध्याय, नाशिक १८८० (पृष्ठ ९१)

कालिदासादि संस्कृत कवीप्रमाणे मराठीतील देवाधर्माच्या विषयावर शुष्क शब्दबंध रचत राहणाऱ्या मोरोपंताचाही त्यांनी निषेध केला. पेशव्यांच्या काळांत राहूनही देशाच्या उत्कर्षाच्या त्या प्रसंगी मोरोपंतासारख्या वाग्देवीच्या कंठमणीने त्या काळच्या प्रसंगावर एखादे वीररसप्रधान काव्य रचू नये याचे त्यांना फार आश्चर्य वाटे. एकंदरीत देशाला सद्य:स्थितीची जाणीव करून देणारे, त्याच्या उत्कर्षाची गाणी गाणारे व त्याला स्फूर्तिदायक होणारे ऐतिहासिक वा वीररसात्मक काव्यच लोकहितवादींना श्रेष्ठ दर्जाचे वाटत होते असे दिसते.

लोकहितवादींच्या विचारसरणीत ज्या नव्या ऐहिक मूल्याचा अजाण आविष्कार दिसतो त्याची स्पष्ट ओळख याच काळातील एक विद्यार्थ्याच्या टीकालेखात आढळते. १८६७ साली नीळकंठ जनार्दन कीर्तने या विद्यार्थ्याने 'पूना यंग मेन्स असोशिएशन' च्या सभेत 'ग्रांट डफ यांच्या मराठी इतिहासावर टीका' या नावाचा जो लेख वाचला तो तत्कालीन विद्वानांच्याही नजरेतून सुटला नाही. त्या सभेत कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि रा. ब. शंकर पांडुरंग पंडित यासारखे संस्कृत इंग्रजी वळणाचे 'शास्त्री–पंडित' उपस्थित होते. त्यानी या लेखाचे कौतुक केले इतकेच नव्हे तर पंडितानी तो लेख 'इंदुप्रकाश' पत्राकडे पाठवून प्रसिद्धही केला.

तत्कालीन इंग्रजी शिक्षणाने नव्या सुशिक्षित पिढीमध्ये इतिहासप्रेमाचे जे वारे वाहत होते त्याचा नमुना कीर्तने यांच्या प्रस्तुतच्या टीकालेखात आढळतो. इतिहासविषयीचे हे प्रेम खऱ्या अर्थाने पाहता इतिहास या विषयासंबंधीचे प्रेम नव्हते तर भूतकाळातील तेजस्वी परंपरेचा उफाळून आलेला अभिमानच अशारीतीने व्यक्त होऊ पाहत होता. या अभिमानातून देशातील थोर पुरुषाविषयी आणि त्यानी केलेल्या पराक्रमाविषयी जी चर्चा आणि जे चिंतन सुरू झाले तेच कळतनकळत मराठीला पुढे देशाभिमानाच्या आणि देशभक्तीच्या एका नव्या वाटेने घेऊन गेले.

कीर्तने यांच्या या निबंधाचा विशेष म्हणजे ग्रँट डफ सारख्या

इंग्रज इतिहासकाराचे दोष निर्भीडपणे त्यांनी दाखविले आणि मराठ्यांचा इतिहास नव्याने कसा लिहिला जावा यांचीहि सूचना दिली. पण त्याबरोबरच सुशिक्षितांच्या इतिहासविषयक अप्रीतीची त्यानी केलेली कारणमीमांसा आणि त्याबद्दलचा सरकारी विद्याखात्याकडे जाणारा दोष यांचेही त्यानी तितक्याच निर्भीडपणे दिग्दर्शन केले. कीर्तने लिहितात—

> या विषयावर सर्वांचे दुर्लक्ष आहे; युरोपियनांचे तर असो परंतु हिंदुस्थानातील लोकांचे देखील दुर्लक्ष ! मराठी लोकांचे देखील दुर्लक्ष !! आमचे शाळेतील मुलास व कॉलेजातील विद्यार्थ्यांस ग्रीस, रोम आणि इंग्लंड इत्यादि देशाची माहिती बरी असत्ये. मागे काही दिवस ग्रांट डफ साहेब यांच्या ग्रंथाचे भाषांतर मराठी शाळात 'वाचन बुक' असे. परंतु मुलानी शिवाजी–कारकीर्दीपर्यंत वाचून कांही ज्ञान संपादिले न संपादिले, त्यांचे मनात आपले देशाचे शूर पुरुषाविषयी काही पूज्यबुद्धि आली न आली इतक्यातच ते इंग्रजी शिकण्यास प्रारंभ करीत व थोडेच दिवसात या विषयावरची माहिती विसरून जात. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे की माजी डायरेक्टर हावर्ड व ग्रांटसाहेब यांनी मराठी कवितेस जसे उत्तेजन दिले तसे या मराठ्यांच्या इतिहासास दिले नाही. §

कीर्तने यांच्या प्रस्तुत उद्गारातून प्रकट होणारी निर्भयता ही निश्चितपणे एका नव्या मूल्याची ओळख करून देते आणि ते म्हणजे स्वदेशाच्या हितसंबंधाची आणि स्वाभिमानाची जाणीव हे होय. ही जाणीव वर वर पाहता इंग्रजी विद्येच्या प्रादुर्भावाने झाली असली तरी तो तिचा प्रत्यक्ष प्रभाव नव्हे आणि म्हणूनच या जाणिवेचे स्वरूप इंग्रजी वळणाचे आहे असे म्हणता येण्यासारखी परिस्थिति नाही.

§ नी. ज. कीर्तने–**ग्रँट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका,** आ. २, १८८४ (पृ. २)

ग्रँट डफच्या इतिहासावरील कीर्तने यांच्या टीकालेखात देशाभिमानाचे जे नवे वारे दिसते तेच काव्याच्या क्षेत्रात कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' या ऐतिहासिक काव्यात नजरेस पडते. "स्वराज्य-प्रीति आणि धर्म यांचे अभिमानाने जुन्या बखरीत जो एक प्रकारचा रंग उठला आहे तोहि (ग्रँट) साहेबांचे ग्रंथात नाही." हे कीर्तने यांचे उद्‌गार त्यांच्या आंगच्या देशाभिमानी वृत्तीचे द्योतक आहेत यात शंका नाही. कुंटे यांचा 'राजा शिवाजी' याच देशाभिमानाच्या नव्या मूल्याने प्रेरित झालेले आणि एका नव्या महान् वाङ्मयध्येयाने स्फुरलेले काव्य आहे. आमच्या इतिहासातील श्रेष्ठ व्यक्तींच्या गुणांचे आकलन होण्यास इंग्रज ग्रंथकारानी लिहिलेले इतिहास अपुरे पडतात ही कीर्तने यांना झालेली जाणीव कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' मध्ये पुढील उद्‌गारातून कशी प्रगट झाली आहे ते पाहा. कुंटे आपल्या इंग्रजी प्रस्तावनेत लिहितात--

> The History of Shivaji cannot be studied from Elphinstone's History or Murray's British India. It requires to be studied from Ramdasa's writings and Tukaram's utterances. ‡

अशा तडफदार उद्‌गारामुळेच कुंटे यांची ही प्रस्तावना त्यांच्या मूळ काव्यापेक्षा जास्त वाचनीय ठरते. रामदास, तुकारामांचे वाङ्मय हेच अस्सल मराठी वळणाचे काव्य आहे आणि तीच मराठमोळ्या लोकांच्या अंत:करणाची खरी भाषा आहे असे जेव्हा कुंटे सांगतात तेव्हाही ते मराठी कवितेचे मर्मच बोलून दाखवीत आहेत असे वाटते. पण अस्सल मराठीचा अभिमान बाळगणारे हेच कुंटे आपल्या इंग्रजी प्रस्तावनेत पोवाडा आणि महाकाव्य यातील भेद सांगताना 'पोवाडा म्हणजे व्यक्तीचे संपूर्ण चरित्र' असे पोवाड्याचे लक्षण सांगू लागतात तेव्हा मराठी कवितेच्या या परंपरेबद्दल ते अज्ञानच प्रदर्शित करीत आहेत हे लक्षात येते आणि क्वचित असेही वाटते की पोवाड्याचे हे लक्षण कुंटे इंग्रजी

‡ म. मो. कुंटे—राजा शिवाजी, आ. २ १९२४, प्रस्ता. पृ. १५

पोवाड्याला अनुलक्षून तर सांगत नाहीत ना ? कारण महाकाव्याचे त्यानी जे लक्षण दिले आहे ते संस्कृती वळणाच्या पंचमहाकाव्यापेक्षा इंग्रजी वळणाच्या ऐतिहासिक काव्यालाच जास्त लागू पडणारे आहे. कुंटे लिहितात--

> Now the most important elements in an epic are— it applies to the origin, growth and end of a whole nation and includes devolopment of all sentiments from the affectionate which is seen in the inner recesses of a home to the marvellous which is unlocalised and indefinite. *

ज्या कवितेमध्ये एखाद्या राष्ट्रातील जातिधर्मादिकाच्या संबंधाने एकवाक्यता पावलेला जो लोकसमुदाय त्याचा उद्भव, उत्कर्ष आणि संहार यांचे यथार्थ विवेचन असते आणि जीवनाला व्यापणाऱ्या सर्व भव्य व कोमल अशा रसांची जीमध्ये योग्यरीतीने परिस्फुटता झालेली असते अशा कवितेला कुंटे 'महाकाव्य' म्हणतात.

लोकसमूहाच्या विचारविकारांचे हुबेहूब आणि प्रातिनिधिक चित्रण करणारे महाकाव्यच अकृत्रिम आणि नैसर्गिक भावना दाखवीत असल्यामुळे 'उत्तम कला' या पदवीला योग्य ठरत असून याच्या उलट घटपटादि खटपट करणारे पंडिती तऱ्हेचे काव्य कुंटे यांच्या मते 'हीन प्रतीचे काव्य' होय.

> Art, when it immitates nature i. e. is not opposed to it, is true art. But when it seeks to produce a certain effect by intensifying and by exceeding nature, it should cease to be called art. The style derived from this description of art is what I mean by an artificial style, which corresponds with what is called the classical style. The style which keeps close to nature is natural or

* तत्रैव–प्रस्ता. पृ. ११

Romantic. This division can be distinctly seen in Sanskrit as well as Marathi writings. †

वरील अवतरणात 'क्लासिकल' आणि रोमँटिक' असे शैलीचे दोन भेद कुंटयांनी सांगितले आहेत आणि हे भेद मराठी कवितेतही दिसतात असे स्पष्टीकरणही दिले आहे. वामन–मोरोपंतांची कविता ही 'क्लासिकल' तर रामदास तुकारामांची कविता 'रोमँटिक' स्वरुपाची आहे आणि ही रोमँटिक शैलीच आपल्या अकृत्रिमतेमुळे लोकसमुदायाचे यथार्थ चित्रण करू पाहणाऱ्या महाकाव्याला जास्त अनुरूप ठरते असेही मत कुंटे प्रतिपादिताना दिसतात. गंमत अशी की मराठीतील पंडिती परंपरेचा ' कृत्रिम ' म्हणून अधिक्षेप करणारे कुंटे इंग्रजीतील त्याच परंपरेच्या मिल्टनी Epic ला जास्त जवळ करताना दिसतात.

महाकाव्याचे लक्षण सांगतानाही महाभारतासारखे महाकाव्य त्यांच्या नजरेपुढे उभे आहेसे दिसत नाही. अशा गोष्टी लक्षात घेता परंपरागत ज्ञानाचा–अभाव हा कुंटे यांच्या वाङमय–विचारातील न्यूनपूर्ण भाग वाटतो आणि बहुधा त्यामुळेच इंग्रजी वळणाचा वाङमय-विचार एवढेच त्यांच्या या विद्वत्ताप्रचुर प्रस्तावनेचे महत्व ठरते. परंतु या वाङमयविचारापेक्षा कुंटे यांच्या वाङमयनिर्मितीचा आवांका निश्चितच मोठा आहे. कुंटे यांचे हे काव्य प्रायोगिकदृष्टया अयशस्वी वाटले तरी त्या काव्याने ऐतिहासिक वाङमयाची एक परंपरा निर्माण केली, एक अभिरुचि वाढविण्याचा प्रयत्न केला– किंबहुना एक नवा मूल्यविचार प्रस्थापित केला ही त्यांची कामगिरी दृष्टीआड करता येण्यासारखी नाही.

निर्मितीच्या दृष्टीने असाच दुसरा अभिनव प्रयत्न म्हणजे विष्णु परशराम रानडे यांचा जॉर्ज वाशिंग्टनवरील चरित्रग्रंथ हा होय. 'वि. प. रानडे यास देशाभिमानी पुरुषांची चरित्रे वाचण्याचा नाद फार होता आणि त्यातही त्यास जॉर्ज वाशिंग्टनचे चरित्र अत्यंत प्रिय

† तत्रैव–प्रस्ता. पृ. १४

होते.' * चरित्रनायकाविषयीच्या या जिव्हाळ्यामुळेच या चरित्र-ग्रंथात देशाभिमानाचा रंग उमटला. वाचकवर्गास ते इतके आवडले की दोन वर्षांच्या आत त्याची दुसरी आवृत्ती काढावी लागली. या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत चरित्रविषयाचे अपूर्वत्व सांगताना प्रस्तावनाकार विष्णुशास्त्री पंडित यानी या देशाभिमानाच्या मूल्यावरच बोट ठेवले आहे. पंडित लिहितात—

> ज्याने आपल्या विलक्षण बुद्धिचातुर्याने, परमावधीच्या निस्पृहतेने व स्वभावसिद्ध देशाभिमानाने आपला देश परराष्ट्राच्या अमलातून स्वतंत्र करून आपले नाव या भूमंडळावर अमर केले, त्याचे चरित्र लोकास समजणे उपयुक्त आहे हे लिहून कळविता पुरवत नाही. तर स्वदेशहितेच्छु लोकांनी स्वतः वाचूनच त्याचा अनुभव घेतला पाहिजे. *

लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की इंग्रजी राजवटीची जेमतेम पन्नास वर्षे उलटली नसतील तोच सुखवादाचे तत्वज्ञान मागे पडले आणि रंजनाबरोबरच उद्‌बोधन हे नवे ध्येय वाङ्मयाच्या क्षेत्रात मिरवू लागले.

पण कृष्णशास्त्री चिपळूणकरापासून विष्णुशास्त्री पंडितापर्यंतच्या रसिकानी ज्या अभिरुची प्रगट केल्या त्या पाहावयास भिन्न वाटल्या तरी त्या साऱ्या ऐहिकाचेच स्तोत्र गाणाऱ्या आहेत हे मात्र विसरून चालता येत नाही. अर्थात या रसिकत्वात एक सूक्ष्म भेद दिसतो. पहिल्या तऱ्हेचे रसिकत्व जीवनातील रसपूर्ण ठरलेल्या जुन्या अनुभवांची निवड करते तर दुसऱ्या तऱ्हेचे रसिकत्व हे नव्या कलात्मक अनुभवांचा शोध घेत असते. कृष्णशास्त्री चिपळूणकरांची रसिकता ही पहिल्या तऱ्हेची आहे. संस्कृती वळणातील रस समजून देताना ती जुन्या

---

* वि. प. रानडे—जॉर्ज वाशिंग्टन याचा इतिहास, आ. २, १८७२ विष्णुशास्त्री पंडित यांची प्रस्तावना पाहा.

अनुभव–सत्यांची कलात्मक घडण रसिक वाचकांच्या लक्षात आणून देऊ इच्छिते याच्या उलट कीर्तने किंवा पंडित यांची रसिकता दुसऱ्या तऱ्हेची असून ती संस्कृत काव्य-नाटकात न आढळणाऱ्या स्फूर्तिदायकता, जिवंतपणा, देशाभिमान यासारख्या काही नव्या कलात्मकतेचा प्रत्यय रसिकाना द्यावा अशी धडपड करताना दिसते. पण या दोन्ही तऱ्हेच्या कलात्मक आदर्शांचा कल सरसनीरसता वा श्रेष्ठकनिष्ठता ठरवू पाहणाऱ्या निकषांचा शोध घ्यावा हाच दिसतो.

निर्मितिमूल्ये आणि आस्वादमूल्ये

या कालखंडाचा एक विशेष दिसतो तो हा की या काळातील निर्मितिमूल्ये आणि आस्वादमूल्ये ही बरीचशी सरमिसळपणे वावरतात. या काळातील प्रमुख नाटक–कादंबऱ्यांच्या प्रस्तावना वाचताना ही गोष्ट फार जाणवते. उदाहरणार्थ 'जयपाळ' नाटकाच्या प्रस्तावनेतील हा उतारा पाहा––

> It is not dramatist's business to draw a picture of the outward man It is with the feelings and passion of a man alone one can concern himself in a work like this. *

या ठिकाणी 'नाटककाराचे लक्ष भावभावनाकडे केंद्रित असते' हा मांडलेला विचार समर्थनाचे स्वरूप टाकून एखाद्या विशिष्ट कलातत्वाचे प्रगटीकरण करू लागलेला दिसतो.

बजाबा नेने यांच्या सैरंध्रीची प्रस्तावना देखील ‡ अशीच आहे. आपल्या भाषेचे मर्म सांगताना 'मनातील भावना जेव्हा उत्कट व तीव्र होतात तेव्हा त्याक्षणी भाषेचे स्वरूप सहज सुंदर बनते. उदाहरणार्थ 'जसजशी भीतिव्याकुळता वाढते तसतसे मनुष्य आपल्या स्वाभाविक भाषणावर येत जाते' असे नाटककर्ता बोलू लागतो तेव्हा तो आपल्या

* वि. ज. कीर्तने–जयपाळ १८६५ (इं. प्रस्ता. पृ. १–२)

‡ बजाबा बाळाजी नेने-सैरंध्री १८७२ (प्रस्ता. पृ. १–७)

कलानिर्मितीचा एक अनुभव आपल्याजवळ व्यक्त करीत आहे असे दिसते. पण हेच बजाबा आपल्या नाटकातील संगीताचे स्वरूप सांगता सांगता—

> "उंच स्वर, वाढती लय, शब्द स्वरांचे पुनरावर्तन, स्पष्टोच्चार, लोकप्रिय विषय आणि मंजुळ वाद्यसंगीत हे आबालवृद्धास मोह पाडणारे रंगदेवतेचे मुख्य दृश्यावयव जसे ठुमरीत तसे ते अन्य गानप्रबंधात नाही" ‡

असे ठुमरीचे स्वरूप डोळ्यापुढे ठेवतात तेव्हा कळत नकळत ते त्या गानप्रबंधाचे आस्वादमूल्य आम्हाजवळ नव्याने प्रकट करू पाहत आहेत असे वाटते आणि अशावेळी हे विचार प्रस्तावनेच्या स्वरूपाचे असले तरी ते शुद्ध कलात्मक स्वरूपात कलास्वादाच्या उच्च पातळीवर जाऊन पोचतात यात शंका नाही.

'शांकरदिग्विजय' या अण्णा किर्लोस्करांच्या १८७४ साली प्रसिद्ध झालेल्या गद्यात्मक नाटकाची प्रस्तावनाही अशीच लक्षणीय आहे. पुढील काळात नाटकात संगीताचे वर्चस्व गाजविणाऱ्या किर्लोस्करांच्या या नाटकात पद्यभाग मुळीच नाही. शंकराचार्यांच्या चरित्राचा विषय नाटकाच्या माध्यमाने का सांगावासा वाटतो याचे जे कारण किर्लोस्कर देतात ते त्यांच्या कलादृष्टीला साजेसेच आहे. पण यापेक्षाही 'ऐतिहासिक नाटकात पद्य आणणे हे रसभंग करणारे ठरते' हा त्यांचा दुसरा विचार कलेच्या दृष्टीने विशेष मोलाचा ठरेल. किर्लोस्कर सांगतात—

> नाटक हे गद्यपद्यात्मक असणे योग्य आहे परंतु मी हा ग्रंथ केवळ **वाक्यरूपे** करण्याचे कारण हेच की पद्ये ही कवीच्या वक्रदृष्टीमुळे आणि दूरन्वयामुळे केव्हा केव्हा फार कठीण होतात. याकरिता ह्यातील अर्थ सर्वास समजणार नाही आणि **कथाविच्छेद होईल** व कवितेत वर्णन केलेला अर्थ

‡ तत्रैव

> पुन्हा गद्यात आणल्यास ज्यास ती कविता समजेल त्यास द्विरुक्ती वाटेल इत्यादि भीतीमुळे आद्यंती दोन श्लोक घालून बाकीचा सर्व ग्रंथ वाक्यरूपाने लिहिला आहे. §

किर्लोस्करांचे हे विचार आपल्या नाटकाचे स्वरूप विशद करून सांगण्यांच्या स्वरूपाचे असले तरी त्यांची भूमिका स्वत:चे समर्थन करण्यापेक्षा एखादे आस्वादमूल्य रसिकाना समजावून द्यावे अशा पद्धतीची वाटते.

पण निर्मिति आणि आस्वाद यांच्या भूमिकातही फरक असतो तो लक्षात न घेता आपले मत वाचकावर लादण्यासाठी कधी कधी प्रस्तावना जोडल्या जातात असेही दिसते. 'मनोरमा' या सामाजिक नाटकाला जोडलेली चितळे यांची इंग्रजी प्रस्तावना या थाटाची आहे. या प्रस्तावनेचे निमित्त करून चितळे जणु पौराणिक आणि भाषांतरित नाटकावर तुटून पडले आहेत. अशावेळी हा नाटककर्ता क्षणभर आपली निर्मात्याची भूमिका सोडून समीक्षेचा मानदंडच हातात घेऊन बसला आहे असे वाटू लागते. चितळे यांचे भाषांतरित नाटकाविषयीचे हे मत पाहा –

> आता मराठीत लिहिलेली जी नाटके आहेत त्यापैकी एक दोन शिवाय करून बाकीची सर्व संस्कृत नाटकांची भाषांतरे आहेत. या भाषांतरापासून भाषेत पुस्तकांची संख्या मात्र वाढते. परंतु आपले विचार सुधारण्याचे काम मात्र अशा पुस्तकातून होत नाही. *

यापुढे संस्कृत नाटकाविषयी त्यांनी शेरा दिला आहे तो असा––

> संस्कृत नाटके सुद्धा दोषरहित आहेत असे नाही. बहुतकरून ह्या नाटकात देवादिकांच्या किंवा पुण्यशील

§ ब. पां. किर्लोस्कर–शांकरदिग्विजय, १८७४ प्रस्तावना (पृ. १–३) तुळा–रा. म. ताकभाते–हंसपालिका, १८७२ ग्रंथकर्त्याचा उद्देश (पृ. ४–५)

* म. वा. चितळे–मनोरमा, १८७१ (प्रस्ता. पृ. १–२)

> राजांच्या कथा असतात. तेणे करून त्याचा कित्ता घेणे म्हणजे मोठे दुर्घट कृत्य आहे असे वाचणाराच्या अंतःकरणात सदोदित वागत असते. तेणे करून नाटक वाचल्याने मनावर सद्‌गुणाचा ठसा उमटून त्याचा कित्ता घेण्याची उत्सुकता मनात उत्पन्न व्हावी हा जो उद्देश तो सिद्धीस जात नाही. *

मनोरमाकर्त्याचा हा अभिप्राय पाहिला म्हणजे इंग्रजी शिकलेल्या तरुण पिढीला जुन्या वाङमयाविषयी अनादराचे किंवा अधिक्षेपाचे उद्‌गार काढण्याची सवयच लागू पाहत होती की काय अशी शंका मनाला चाटून गेल्याशिवाय राहत नाही.

पण सारेच साहित्यकार या वृत्तीचे दिसत नाहीत. आपण निर्माण करीत असलेल्या साहित्यप्रकाराहून भिन्न प्रकार वा भिन्न मूल्ये असू शकतात याची जाणीव काही समंजस साहित्यकार दाखवितात. उदाहरणार्थ, 'मंजुघोषा' सारखी कल्पित कथा रचणारे ना. स. रिसबूड स्वतः कल्पिताच्या जाळ्यात गुंतले असले तरी 'अनुभवमिश्रित गोष्टींचा' दुसराही कथेचा प्रकार असू शकतो हे ते जाणतात. रिसबूड लिहितात–

> मनुष्याला वयपरत्वे मनोरंजन करण्यास निरनिराळ्या ग्रंथांची गरज लागते. लहानपणी केवळ कल्पित गोष्टीने आपले मनोरंजन होते. पुढे तारुण्यावस्थेत असताना कल्पित गोष्टींची तात्पर्ये व तशाच प्रकारच्या दुसऱ्या साधारण प्रपंचातील अनुभवमिश्रित गोष्टी किंवा कल्पनेचे अति उत्कृष्ट तरंग त्यापासून आपले समाधान होते. †

एकंदरीत रिसबुडांना 'अनुभवमिश्रित गोष्टी' आणि 'कल्पनेचे तरंग' हे कथेचे दोन्ही प्रकार मान्य आहेत. या 'अनुभवमिश्रित गोष्टी' ऐवजी आपण अद्‌भुताकडेच धाव घेण्याचे कारण सांगताना ते म्हणतात--

* तत्रैव

† ना. स. रिसबूड–मंजुघोषा आ. ११ पुणे १९६२ ('मूळ लेखकाचे प्रास्ताविक चार शब्द' पृ. १५–१७)

"हिंदु लोकांच्या प्रपंचाच्या स्थितीविषयी शोध करून पाहता असे दिसून येते की त्या स्थितीत फारसा बदल नसून तीत काही अद्‌भुत चमत्कारहि दृष्टिगोचर होत नाहीत.. आपले आयुष्य चमत्कारिक रीतीने सगळयाचे अगदी एक सारखे होत आहे विवाहरीतीच्या व आणखी दुसऱ्या पुष्कळ कारणानी आपल्या म्हणजे हिंदुलोकांच्या आयुष्यामध्ये अतिशय मोहक सद्‌गुण किंवा दुर्गुण हे दोन्ही आढळत नाहीत व हीच नॉव्हेलसारखे ग्रंथ करण्यात हल्ली अडचण आहे. †

याठिकाणी 'नॉव्हेलसारखे' असा शब्द रिसबुडानी वापरला असला तरी तो अनुभवमिश्रित गोष्टी आपण का लिहित नाही हे सांगण्याच्या संदर्भात आलेला आहे त्याअर्थी आपल्या भोवतालच्या जगात 'सामान्याहून वेगळे' असे अनुभव मिळत नसल्यामुळे आपणास अद्‌भुताचा आश्रय करावा लागत आहे असा रिसबुडांच्या म्हणण्याचा अर्थ दिसतो. हे समर्थन स्वतःची वकिली करण्याच्या स्वरूपाचे असले तरी याठिकाणी 'अनुभव-मिश्रित गोष्टी' तलाही अनुभव 'सामान्याहून वेगळा' म्हणजे अपूर्व असावा लागतो हे सांगताना रिसबुडानी संस्कृतात अभिनवगुप्ताने छेडलेल्या एका महत्वाच्या कलाविषयक प्रश्नाला कळत नकळत स्पर्श केला आहे की काय असे वाटते.

याच्याच जोडीला रिसबुडांची 'हिंदु लोकात मोहक सद्‌गुण वा दुर्गुण आढळत नसल्याची' तक्रारही निर्मितीच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे. त्या तक्रारीवरून पाहता रिसबुडाना आदर्श नायक वा खलनायक उत्पन्न करण्याची इच्छा असूनही प्रत्यक्षात मात्र तशी प्रेरक परिस्थिति नाही असे म्हणावयाचे दिसते. रिसबुडाचे हे विधान बरेचसे दुर्बोध व सैल वाटते. प्रत्यक्षातील लोकाभिरुची ही अशा निर्मितीच्या आड येते असे रिसबुडाना म्हणावयाचे असल्यास ते निर्माता आणि वाचक यांच्या अभिरुचीत पडणारे अंतर दाखवीत आहेत

† तत्रैव

असे म्हणावे लागेल.

पुष्कळ वेळेस निर्मात्याची कलाकृतीविषयीची प्रगल्भ व प्रगत कल्पना काळाच्याही पुढे धाव घेत असते आणि प्रत्यक्षात मात्र लोकाभिरुचीपुढे माघार घ्यावी लागते असा एकंदरीत रिसबूड यांच्या प्रस्तावनेचा जो सूर दिसतो तो मात्र मान्य करण्यासारखा नाही. कारण निर्मितिविषयी प्रगत मूल्ये मनात बाळगणारा आणि तडफदारपणे ती रचनेच्या क्षेत्रात राबविणारा लेखकांचा वर्ग याच काळात कुंटे–चितळे यांच्या रूपाने आपल्या डोळ्यापुढे दिसतो. 'फटफजितीचा कळस' या फार्सवजा नाटकात कृ. प. गाडगीळ यांनी तर 'दुष्टबुद्धी' हे पात्र रंगविताना कमालीचा दुष्ट पुरुष कसा असतो हे दाखविण्याचा उद्देश समोर ठेवलेला दिसतो. नाटकाला जोडलेल्या आपल्या इंग्रजी प्रस्तावनेत ते स्पष्टच म्हणतात :--I have long been picturing to myself a shameless criminal *

आपल्या खलनायकाचे चित्र रंगवताना गाडगीळांच्या नजरेपुढे 'ऑथेल्लो' नाटकातील प्रयोगाचे चित्र असण्याचा बराचसा संभव आहे. इंग्रजी नाटकातील या खलनायकाचा आदर्श समोर ठेवूनच त्यांनी खलनायक रंगविण्याची ईर्षा मनात धरली असावी. ऑथेल्लो नाटकातील हा खलनायक नजरेपुढे असल्यामुळेच कदाचित रिसबुडानी 'हिंदु लोकात मोहक दुर्गुण' नसल्याची तक्रार केली असावी. एक गोष्ट मात्र खरी की इंग्रजी शिकलेल्या विद्यावंतांना इंग्रजीतील काव्यनाटकाची गोडी लागत होती आणि ती गोडी मराठी वाचकाना कळावी याच हेतूने त्यांच्यापैकी बहुतेकानी आपली वाङ्मयनिर्मिति केली.

संस्कृत नाटकांची मराठीतून भाषांतर करणाऱ्या लेखकांचीही भूमिका जवळ जवळ याच स्वरूपाची होती. बहुधा म्हणूनच हे भाषांतरकर्ते निर्मितीस आवश्यक अशा मूल्यांचाच काय तो विचार करीत नसून त्यातील आस्वादही वाचकाना समजावून देऊ इच्छितात.

* कृ. प. गाडगीळ–फटफजितीचा कळस, १८७४ प्रस्ता. पाहा.

विक्रमोर्वशी नाटकाचे भाषांतर करणाऱ्या भा. दा. पाळंदे या रसिकोत्तमाने आपल्या प्रस्तावनेत काढलेले उद्गार या दृष्टीने लक्षणीय ठरतील. पाळंदे लिहितात :--

> कालिदास याची सर्व कविता सुगम व सुरस आहे हे विद्वज्जनास माहीतच आहे. परंतु कविता संस्कृत असल्यामुळे सर्व लोकांस तिजमधील रसाची प्राप्ती होत नाही. याजकरिता भाषांतर केले आहे. †

विक्रमोर्वशी या नाटकाची निवड का केली हे सांगताना ते म्हणतात--

> कालिदास यांची दोन नाटके प्रसिद्ध आहेत. एक शाकुंतल दुसरे विक्रमोर्वशी. ही दोन्ही नाटके उत्तम आहेत. परंतु विक्रमोर्वशी यात खरे नाटकचातुर्य विशेष आहे असे वाटते. †

एकंदरीत पाहता संस्कृत नाटकांची भाषांतरे मराठीत उतरविण्याचा भाषांतरकारांचा प्रधान उद्देश कालिदासासारख्या अव्वल दर्जाच्या नाटककाराची निर्मिति कळून मराठी वाचकास तिची गोडी लावावी आणि मराठी लेखकानी ते नाटकचातुर्य आदर्श म्हणून वागवावे असा दिसतो. यामुळेच निर्मिति कशी असावी याविषयीचा विचार सांगत असताना 'आस्वाद कसा घ्यावा' याचीही सूचना ते वाचकवर्गास देत असतात.

सरस नीरसतेचे निकष

नाटक-कादंबऱ्यांच्या येथवर उद्धृत केलेल्या प्रस्तावनापेक्षा आणखी एकातऱ्हेच्या प्रस्तावना या काळात आढळतात. त्या म्हणजे ग्रंथकर्त्यांना पाठिंबा देण्याच्या वा भाषांतरित ग्रंथाचे हृद्गत सांगण्याच्या स्वरूपाच्या होत. दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी या नात्याने कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी परशुरामपंत गोडबोले, कृष्णशास्त्री राजवाडे,

† ज्ञानप्रसारक, पृ. ४ अं. १२.

गणेशशास्त्री लेले यासारख्या पंडित-मंडळींच्या संस्कृतातून भाषांतरित केलेल्या मराठी नाटकाना वेळोवेळी ज्या प्रस्तावना किंवा सूचना जोडल्या त्या अशा प्रकारच्या आहेत. या लेखकांचा हेतु मागे सांगितल्याप्रमाणे संस्कृत नाटकांची गोडी मराठी वाचकाला कळावी आणि त्यांच्यातील रसज्ञता जागृत व्हावी हा होता. तो लक्षात घेऊन कृष्णशास्त्र्यानीही आपल्या प्रस्तावनामधून संस्कृती वळणाच्या रचनाचातुर्याचे स्पष्टीकरण वा दिग्दर्शन केले आहे उदाहरणार्थ 'जानकीपरिणय' नाटकाच्या भाषांतरकर्त्याने मूळ संस्कृत नाटकाचे 'उत्कृष्ट संविधानकरचना' असे जे वैशिष्टय सांगितले ते मान्य करूनही कृष्णशास्त्री यांनी त्या नाटकाचे मोल ठरविणारे जे भाष्य आपल्या 'सूचने'-मधून केले ते कसे मार्मिक आहे ते पाहा.

> 'या नाटकात संविधानकाचा चमत्कार विशेष आहे असे जे भाषांतरकर्त्यांने लिहिले आहे ते खरे आहे. चमत्कारिक रीतीने पात्रांची घटना करून त्यांस नानाविध रसानुगुण स्थितीत आणण्याची कल्पना या ग्रंथकारात अपूर्व खरी, तथापि पुढे त्या पात्रांच्या भाषणादिकावरून रसांचे पुष्टीकरण करण्याचे सामर्थ्य तादृश त्याच्या अंगी नाही. ते जर असते तर हे नाटक फारच उत्कृष्ट झाले असते. *

'संविधानक रचनेपेक्षा रसनिर्मिति श्रेष्ठ' हे कृष्णशास्त्र्यांच्या या सूचनेमधील मर्म आहे. ते लक्षात घेता नाटकाचीच नव्हे तर एकंदर ललित वाङ्मयाची सरसनीरसता ठरवू पाहणारे कलामूल्यच कृष्णशास्त्री या ठिकाणी बोलून दाखवीत आहेत असे म्हटले तर ते अगदीच चूक ठरणार नाही.

रसनिर्मितीचे हेच मूल्य नजरेपुढे ठेवून कृष्णशास्त्री चिपळूणकरानी आपल्या काळातील नाटक-पुस्तकांची ही परीक्षणे केलेली दिसतात. उदाहरणार्थ वि. ज. कीर्तने यांच्या 'जयपाळ' या नाटकाची त्यानी

* ग. त्र्यं. लेले—जानकीपरिणय १८६५, आ. २ री मधील 'सूचना' पाहा.

जुन्या संस्कृत नाटकांशी तुलना करून त्यातले संविधानक खुबीदार नाही आणि एकदा रस प्रधान कल्पून तो परिपुष्ट करावयास हवा होता तेही नाटककाराने केलेले नाही अशा शब्दात जी तक्रार केली ती रसाला प्रधान मानणाऱ्या संस्कृत वळणाच्या त्यांच्या आवडीची द्योतक आहे. 'जयपाळ'बद्दल त्याना दुसरी जी तक्रार केली आहे तीही जवळ जवळ याच स्वरूपाची वाटते. पौराणिक ग्रंथातून प्रसंग घेऊन नाटकाची मांडणी केली असती तर ती जनमनास संभाव्य वाटून तिचा खुबीदारपणा वाढला असता; प्रस्तुतच्या स्वरूपात ती बऱ्याच प्रमाणात परकीय वाटते असे मत त्यानी संविधानकाच्या बाबतीत प्रदर्शित केलेले दिसते. या परधार्जिण्या वृत्तीबद्दल त्यांनी नाटककारास पुढीलप्रमाणे कसा सूक्ष्म चिमटा घेतला आहे तो पाहा--

> आता कदाचित आमच्या पुराणातल्यापेक्षा नीरस व पचपचीत कथा इंग्रज लोकांच्या धर्मपुस्तकात भरल्या आहेत असे आपल्या हिंदु वाचणारास दर्शविण्याचा कीर्तने यांचा बैबलातील गोष्ट घेण्यात एक उद्देश असला तर कोण जाणे! *

महाराष्ट्रातल्या रीतीभातीशी न जुळणाऱ्या गोष्टीविषयी कृष्णशास्त्री पुढीलप्रमाणे शेरा देतात--

> लग्नाच्या गोष्टीत वधूवराची एकमेकावर प्रीति असण्याच्या आवश्यकतेविषयी जो प्रकार लिहिला आहे तोही हिंदु लोकांच्या अर्वाचीन किंवा प्राचीन रीतीस अनुसरून असण्यापेक्षा युरोपियन लोकात जे काही या गोष्टीविषयी अतिशयच खूळ आहे त्यास अनुसरून फार आहे असे आम्हास भासते.

परतु जयपाळ नाटकावर अशी कडक टीका करून त्यातील दोष दाखविणारे कृष्णशास्त्री नाटकातील गुणांची दखल घ्यावयास चुकत नाहीत.

---

* शालापत्रक पु ४ अं. १२

याच परीक्षण-लेखाचा उपसंहार करताना ते नाटककर्त्याच्या गुणांची खालीलप्रमाणे प्रशंसाही करतात--

> एकंदरीत पाहता कीर्तने यांची खुबीदार व रसिक भाषा, लिहिण्याची शैली व त्या त्या पात्राच्या भिन्न स्वभावाचे हुबेहूब वर्णन करण्याचे सामर्थ्य व त्या त्या प्रसंगास योग्य मनोविकार दर्शविण्याची खुबी वगैरे नाटककर्त्याच्या अंगी जे गुण अवश्य असावे लागतात ते कीर्तन्यांच्या अंगी नावाजण्यासारखे आहेत असे सर्वास कबूल केले पाहिजे.

'थोरले माधवराव पेशवे' या कीर्तन्यांच्याच ऐतिहासिक नाटकाचे कृष्णशास्त्री यानी केलेले परीक्षण याहून मार्मिक उतरले आहे. कीर्तन्यांचे हे ऐतिहासिक नाटक शोकपर्यवसायी आहे आणि रंगभूमीवर शोकाचा प्रसंग आणणे हे तर संस्कृत नाटकात अजिबात वर्ज्य मानले जाते. परंतु कृष्णशास्त्री यांनी त्यातील 'रसनिर्मिती' लक्षात घेऊन त्याचे कौतुक केले आहे इतकेच नव्हे तर अशी शोकपर्यवसायी नाटके ही संसाराचे वास्तविक स्वरूप दाखवीत असल्यामुळे वाङमयक्षेत्रात अशा प्रकाराला मान्यता द्यावयास हवी असेही त्यानी प्रतिपादिले आहे.

> नाटक म्हणजे सृष्टिक्रमाचे ज्यात अनुकरण करून लेखनद्वारे संवादरूपाने मानव संसाराचे रूप वास्तविकपणे दाखविले असते असा ग्रंथ. नाटकाचा आणि कवितेचा हेतु एकच आहे. आता मानव संसारात सुखदु:खे पुष्कळ असतात. ज्यांनी अनृत भाषण केले नाही, जे परम सदाचारी, परम ज्ञाते अशांचेही अंत कधी कधी दु:खकारक होतात. या करिता संसाराचे रूप वास्तविक दाखविण्यास दु:खपरिणामी नाटके अवश्य आहेत. एवढे मात्र धोरण ठेविले पाहिजे की ज्या सत्पुरुषाचा आपण अंत दाखविणार

त्याच्या हातून अंतकाळी लज्जा आणण्यासारखी काही गोष्ट होऊ नये. †

'रत्नाद्भुत' कादंबरीविरुद्ध प्रतिक्रिया

चिपळूणकर शास्त्री ज्यावेळी ही परीक्षणे लिहीत होते त्या काळात संस्कृतातील काव्यविचार मराठीमध्ये उतरविण्याचा प्रयत्न चालू होता. कृष्णशास्त्री राजवाडे यांचा 'अलंकारविवेक' (१८५३) दाजी प्रधान यांचा रसमाधव (१८६८) व गणेशशास्त्री लेले यांचे 'साहित्यशास्त्र' (१८७२) हे तीन ग्रंथ यादृष्टीने लक्षणीय ठरतील. परंतु या ग्रंथकर्त्यांनी संस्कृतातील विचार मराठीमध्ये जसेच्या तसे आणण्यापलीकडे फारसा प्रयत्न केलेला दिसत नाही. 'मराठी भाषेमध्ये अलंकार आजपर्यंत कोणी लिहिले नाहीत म्हणून ते लिहिणे आवश्यक आहे' असे अलंकारविवेकाचे कर्ते सांगतात तर 'संस्कृत साहित्यशास्त्राचे जे नियम तेच प्रायः ह्या भाषेतील साहित्यशास्त्रासंबधी गोष्टीस लाग पडतात' असे साहित्यशास्त्रकर्ते लेले लिहितात. या मानाने दाजी प्रधानांच्या 'रसमाधव' ग्रंथात रसाला काव्यामध्ये अधिक महत्व असावे' हा मुद्दा स्पष्ट केलेला असून शांतबरोबर भक्तिरसालाही संस्कृत रसव्यवस्थेत स्थान दिले आहे. भानुदासाचा रसतरंगिणी ग्रंथ आधारास घेऊन संस्कृत श्लोकांचे मराठीत जुन्या टीका–पद्धतीप्रमाणे शब्दशः विवेचन केले आहे. रसाचे विवेचन करणारा मराठीमधील पहिला प्रयत्न या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा ठरेल. परंतु संस्कृत वळणाची ही मूल्ये आधारास घेऊन मराठीतील पुस्तकांची परीक्षणे करण्याचे प्रयत्न या ग्रंथकर्त्यांनी केलेले नाहीत. त्या दृष्टीने पाहाता कृष्णशास्त्री चिपळूणकरानी रसोत्पत्तीला प्राधान्य देऊन त्याच्या आधाराने मराठी वाङमयाच्या संदर्भात जे मतप्रकटन वेळोवेळी केले ते जास्त उपयुक्त वाटते. किंबहुना संस्कृती वळणाचा सरसनीरसतेचा निकष लावून मराठी वाङमयाचे मूल्यमापन करू पाहणारा पहिला टीकाकार या

† शालापत्रक पु. ५ अं. १

दृष्टीने कृष्णशास्त्री चिपळूणकराना मराठी टीकेच्या क्षेत्रात एक महत्वाचे स्थान आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकरानी परीक्षणाच्या रूपाने जो वाङ्मय-विचार मराठीत मांडला त्याचा विचार करताना आणखी एका व्यक्तीचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. ही व्यक्ति म्हणजे न्या. मू. माधवराव रानडे हे होत. कृष्णशास्त्री यानी जशी परीक्षणे लिहून संस्कृती वळणाचा वाङ्मयविचार मराठीत आणला तसाच त्याहून भिन्न असा इंग्रजी वळणाचा वाङ्मयविचार मराठीत दर्शविण्याचे काम रानड्यानी केले. १८६६ च्या जुलैपासून ते १८६८ च्या एप्रिलपर्यंत मेजर क्यांडी यांच्या गैरहजिरीत ओरिएंटल ट्रान्स्लेटराच्या नात्याने त्यांनी जे तुला-ध्यक्षाचे काम केले आणि त्या निमित्ताने रत्नप्रभा, सैरंध्री, केकादर्श इत्यादि नव्या पुस्तकावर जे अभिप्राय दिले ते शाळाखात्यामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या 'बाँबे एज्युकेशनल रेकार्ड' या मासिकात प्रकाशितही झाले.

माधवराव रानडे हे या काळात न्यायमूर्ती नव्हते. त्यांचे विद्याध्ययन नुकतेच १८६६ मध्येच संपले असून सरकारी नोकरीत त्यांचा हा पहिलाच प्रवेश होता. त्यांच्या अध्ययनाच्या काळात संस्कृत भाषेशी त्यांचा फारसा संपर्क नव्हता. त्यांच्या वाचनाचे क्षेत्र तावत्काळपर्यंत बहुतांशी इंग्रजी ग्रंथापुरतेच मर्यादित होते. इंग्रजीतही शेक्सपीयरची एक दोन नाटके त्यानी अभ्यासापुरती नजरेखाली घातली होती तर स्कॉटच्या ऐतिहासिक कादंबऱ्या आणि काव्ये मात्र आवडीच्या दृष्टीने वाचली होती हा फरक लक्षात घेण्यासारखा आहे. या दृष्टीने त्यानी नव्या मराठी पुस्तकांची जी परीक्षणे केली त्यात रत्नप्रभा ह्या कादंबरीवरील परीक्षण त्यांचा वाङ्मयीन दृष्टिकोन समजून घेण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरेल. रत्नप्रभा कादंबरीवरील त्यांचा अभिप्राय बराच विस्तृत असून त्यात तरुण स्त्री–पुरुषांची परस्परानुरक्ति हा विषय मराठी कादंबरीकारास कितपत झेपेल याचा मार्मिकपणे उहापोह केला आहे, तर परीक्षणाच्या उत्तरार्धात युरोपियन कादंबऱ्यांची वैशिष्टये कोणती ती सांगितली आहेत. रानडे लिहितात—

> युरोपियन कादंबऱ्यात निसर्गाचे आणि नैसर्गिक अवस्थांचे हुबेहुब विश्वसनीय वर्णन आढळते. मनुष्याच्या मनोरचनेतील अंगोपांगे चितारण्यातही युरोपियन कादंबरीकारांचा हातखंडा आहे. एखाद्या व्यक्तीचे स्वभावचित्र रेखाटून ते तसल्या स्वभावाच्या लोकांचा सगळा वर्ग वाचकासमोर ठेवतात. त्यांच्या वर्णनात अतिशयोक्ति मुळीच असत नाही असे नाही पण सत्याला उठाव मिळण्यापुरतेच व चटकदारपणा येण्यापुरतेच त्याजकडून अतिशयोक्तीचे साह्य घेतले जाते. आमच्याकडे या गुणाला थाराच नाही. *

आपल्या काळातील वाङ्मयाभिरुचीचे वर्णन करताना रानडे यांच्यापुढे संस्कृती वळणाच्या अद्भुत कथा कादंबऱ्या होत्या असे खालील उताऱ्यावरून वाटते.

> अरबी भाषेतल्या सुरस व चमत्कारिक गोष्टी किंवा तसल्या धाटणीच्या संस्कृत गोष्टी हेच काय ते आमचे कथात्मक वाङ्मय. त्यांची गोडी आम्हास वंशपरंपरेने लागलेली. राजा, राणी, प्रधान यांच्याविषयीच्या पाणचट, पाल्हाळिक किंवा विनोदी कथानी आमची आजपर्यंतची कथाभिरुची सिद्ध झालेली आहे. असल्या कथात मन रमते याचे कारण त्यातले विस्मयजनक व अत्युक्तिमय चमत्कार हेच होय.

इंग्रजी कादंबऱ्या वाचताना जी रसास्वादाची मूल्ये आपल्या लक्षात येतात त्यांची आपल्या वाङ्मयात अपेक्षा करता येत नाही ही वस्तुस्थिति रानड्यांनी लक्षात घेतली आहे. ही इंग्रजी वळणाची मूल्ये सुशिक्षित विद्यावंताना मोह पाडत होती आणि रानड्यासारख्या इंग्रजी विद्याविभूषिताला सुद्धा आकर्षक वाटत होती. ती मूल्ये कोणत्या स्वरूपाची होती हे रानड्यानी पुढील उताऱ्यात काहीशा 'नेति नेति' यासारख्या व्यतिरेकात्मक पद्धतीने सांगितलेले आढळेल.

---

* न. र. फाटक—**न्या. मू रानडे चरित्र १९२४, पु. ७२**

> निरनिराळ्या परिस्थितीत व प्रसंगात मानव समाजाची कोणत्या प्रकारे हालचाल सुरू असते याचे विश्वसनीय आणि अस्सलबरहुकूम बेमालूम चित्र पहावयास सापडावे अशी आमच्या कथात्मक वाङमयाची रचना नसल्याने या वाङमयाचा आस्वाद घेताना तसल्या चित्राची अपेक्षा कोणीच धरीत नाही. आमच्या कथातल्या निसर्गाच्या व मानवाच्या वर्णनात वैचित्र्य असत नाही. बागेचे किंवा व्यक्तीचे वर्णन करताना तेच तेच दृष्टान्त व शब्द पुन: पुन: वापरण्यात येतात.

एकंदरीने पाहाता पार्श्वभूमीदाखल वर्णिली जाणारी सद्य:स्थितीची चित्रणे, निसर्गाची वर्णने आणि मानवी स्वभावातील वैचित्र्य ही इंग्रजी कादंबऱ्यांची रानड्यांच्या मते प्रमुख वैशिष्टये ठरतात. याच्याच जोडीला स्त्रीपुरुषांच्या परस्पर प्रीतीचा विषय ठेवला म्हणजे रानडे यांच्या नजरेपुढे असलेली कादंबरी ही स्कॉटच्या अद्भुतरम्य वळणाची आहे हे स्पष्ट होते. स्त्रीपुरुषांच्या परस्परप्रेमाचे चित्रण आपल्या वाङमयात आढळत नाही ही व्यथा रानड्यांनी किती मनोज्ञपणे व्यक्त केली आहे ते पाहण्यासारखे आहे. रानडे लिहितात--

> अनुराग हा एक मनुष्य हृदयातला मधुर विकार आहे. निष्कपट वृत्तीच्या आणि आरोग्याच्या पहिल्या मंगल बहारीत परस्पराकर्षक तरुण स्त्रीपुरुषांच्या ठिकाणी हा विकार उभयपक्षी सारख्या प्रमाणात उदयास येऊन व वळावत जाऊन शेवटी पवित्रतम विवाह बंधनाच्या रूपाने त्याची परिणति झाल्याचा इतिहास ज्या वाङमयात दाखविला गेला, तेच वाङ्मय चिरंजीव झाले आहे. कारण निसर्गसिद्ध प्रकृतिधर्माचे सर्व बंधारे फोडून माणसाला उदात्त स्वरूपाचा स्वार्थत्याग करावयास लागणारा जर कोणता मनोविकार असेल तर तो हाच होय. हे कार्य पितापुत्रातील विषम आणि नियंत्रित प्रीतीला देखील साधत

नाही. पण दुर्दैवाने या विकाराच्या उत्पत्तिविकासाला हिंदु समाजात अणुमात्र स्थळ ठेविलेले नाही. *

हिंदु समाजातील प्रेमाच्या बाबतीतील चालीरीती लक्षात घेऊनच कादंबऱ्या–नाटके लिहिली जावी अशी सूचना याच परीक्षणाच्या उपसंहारात दिलेली आढळते.

"हिंदी समाजातील विशिष्ट चालीरीतीकडे सर्वथैव डोळेझाक करून युरोपियन समाजाची नक्कल वठविणाऱ्या कादंबऱ्या अगर नाटके चिरकाल लोकप्रिय होण्याची आशा धरणे व्यर्थ आहे. अजून या विषयाची अभिरुचि उत्पन्न व्हावयाची आहे आणि जोवर ही अभिरुचि योग्य दिशेने उत्पन्न झालेली नाही तोवर हा प्रेमाचा अनिष्ट विषय टाळणेच उचित ठरते. नाही तर प्रेमाच्या नावाखाली भलत्याच भयंकर व अभद्र विकारांचे लोकात प्राबल्य माजेल. †

रानडे यांचे 'रत्नप्रभा' कादंबरीवरील हे परीक्षण पाहिले म्हणजे त्या काळात इंग्रजी वळणाने मराठीत येऊ पाहणाऱ्या रम्याद्‌भुत कादंबरी-विरुद्ध पहिला आवाज उठविण्याचे श्रेय रानड्याकडे जाते ‡ हे सहज लक्षात येईल.

---

* तत्रैव पृ. ७३.

† तत्रैव पृ. ७४

‡ यावेळच्या रम्याद्‌भुत कादंबरीविरुद्ध का. बा. मराठे यानी १८७२ सालीच आवाज उठविला होता असे विधान 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' (खं. ४, १९६५) या ग्रंथाच्या उपसंहारात आलेले दिसते (पृ. ५११). वस्तुतः मराठे हे रम्याद्‌भुत कादंबरीच्या विरुद्ध नसल्यामुळे आवाज उठविण्याचे त्याना कारणच नव्हते. तो आवाज उठविण्याचे श्रेय सर्वस्वी रानडे यांच्याकडे आहे. या संदर्भात याच प्रकरणातील 'अद्‌भुत व रम्याद्‌भुतविवेक' हा मराठे यांच्या संबंधातील विवेचनाचा भाग पाहावा.

रानडे यानी वरीलप्रमाणे जो धोक्याचा इशारा दिला तोच या काळातील इतरही टीकाकारानी कल्पित कादंबऱ्या–नाटकांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेला आढळतो. १८६७ साली मुंबईत 'विविध-ज्ञान-विस्तार' हे मासिक निघाले. रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे पहिली सात वर्षे या 'विस्तारा'चे संपादक होते. या काळात त्यानी दैवसेनी, राजा शिवाजी या सारखी काव्ये, मनोरमा व अभिज्ञान शाकुंतल ही नाटके आणि वसंतमाला यासारख्या कादंबऱ्या यांची परीक्षणे केली. यापैकी 'वसंतमाला' कादंबरीचे परीक्षण करताना समाजाच्या या स्वैर वर्तनावरच त्यांनी बोट ठेवले आहे. कादंबरीतील नायकास पहिली सुंदर पत्नी असता त्याने नायिकेशी दुसरा विवाह करावा आणि सद्‌गुणी मानल्या जाणाऱ्या नायिकेने केवळ विवाहासाठी म्हणून वडिलांच्या घरातून गुपचुप पलायन करावे हा प्रकार गुंजीकराना रुचलेला नाही. ते लिहितात--

> या कथेवरून व पुस्तकावरून असे दिसते की या उभय नायक-नायिकांचे कृत्य कवीला स्तुत्य वाटते व शेवटी जेव्हा ती त्या संकटातून सुटतात तेव्हा ते त्या सद्‌गुणांचे फळ आहे असे तो म्हणतो. परंतु आमचे म्हणणे याच्या अगदी उलट आहे व ही कथा उपदेश घेण्यास अगदी अयोग्य आहे. कारण यातील नायक व नायिका यांची मूळची आचरणे आम्हास दूषणार्ह वाटतात. *

गुंजीकरांच्या या टीकालेखनातील एक महत्वाचा विशेष हा की अशी ग्रंथपरीक्षणे करणाऱ्या टीकाकारापुढेही ग्रंथास बरे–वाईट ठरविण्याचे काही तरी स्पष्ट निकष असावेत असे त्यांचे मत आहे. विस्ताराच्या पहिल्या वर्षातच 'काव्यविचारा'वरील लिहिलेल्या लेखात ते आपले हे मत पुढीलप्रमाणे मांडताना दिसतात––

> ..परीक्षा म्हटली म्हणजे तेथे काही तरी कसोटीची अवश्य गरज आहे. नाही तर अमुक पदार्थ अमक्यास

* विस्तार पु. २ अं. १

> चांगला वाटतो म्हणून तो चांगला म्हणतो आणि अमक्यास वाईट वाटतो म्हणून तो वाईट म्हणतो याप्रमाणे मनाच्या लहरीवरच अवलंबून राहिले तर कांही वेळाने ती लहर फिरली म्हणजे बऱ्याचे वाईट आणि वाईटाचे बरे होण्यास चुकत नाही.*

मूल्यमापनाच्या क्षेत्रात ग्रंथांची सरसनीरसता ठरविणारे काही तरी निकष असावे ही जाणीव सर्वात महत्वाची ठरते आणि या जाणिवेने टीकालेखनाला प्रवृत्त झालेले आणि ती जाणीव स्पष्टपणे बोलून दाखविणारे गुंजीकर हे पहिले मराठी टीकाकार होत असे म्हटल्यास त्यात विशेष अत्युक्ति होणार नाही. सरसनीरसतेच्या निकषांचीही जाणीव देऊन गुंजीकरांनी मराठी मूल्यमापनाचा एका परीने पाया भरण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.

नीति-बोधाचे नवे मूल्य

संस्कृतातील काव्यविचाराप्रमाणे 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हे रसाला प्राधान्य देणारे काव्याचे लक्षण मान्य करूनही गुंजीकरांनी रंजनाचे प्राधान्य उडवून त्याऐवजी नीतिबोध हा काव्य-नाटकादि वाङमयाचा प्रधान गुण मानला आहे. अव्वल इंग्रजीपासून तावत्काल-पर्यंत वाङमयाच्या सरसनीरसतेचे एकमेव मूल्य म्हणून मान्य केलेली रंजनप्रधानता मागे सरून त्याऐवजी सदुपदेश व सदभिरुचि प्रस्थापित करणारा नीतिबोध हा अशारीतीने वाङमयाचा प्रमुख दंडक ठरला असला तरी जुन्या पारमार्थिक स्वरुपाच्या बोधाहून मात्र तो वेगळा आहे. हा नीतिबोधाचा निकष गुंजीकर काव्य, नाटक व कादंबरी या तिन्ही वाङमयप्रकारांना मोठ्या हिरीरीने लावतांना दिसतात. उदाहरणार्थ, वर उदधृत केलेल्या 'काव्यविचार' लेखात काव्याचे महत्व सांगतांना ते म्हणतात—

> वेद आणि शास्त्रे हे जे अतिशय पूज्य बुद्धीचे मानलेले

---

* विस्तार पु. १ अं. १

> ग्रंथ त्याहूनही काव्याची योग्यता विशेष मानलेली आहे व त्याचे कारण असे की त्या ग्रंथातील गहन विषय समजण्यास असमर्थ अशा कोमल बुद्धीच्या पुरुषांनाही काव्यापासून सुबोध होतो.

नाटकावरील आपल्या लेखातही गुंजीकरानी हेच लक्षण पुढीलप्रमाणे मांडले आहे--

> संसारामध्ये ज्या आपण अनेक घडामोडी पाहतो त्यातील मर्मे ढळढळीत डोळ्यासमोर पाहून मनास क्षणिक आनंद आणि सद्‌गुणाचा कित्ता घ्यावा, दुर्गुणाचा त्याग करावा इत्यादि उपदेश हा या नाटकांचा उद्देश असतो. †

'वसंतमाला' कादंबरीवरील आपल्या परीक्षणातही सुरवातीला हाच विचार त्यानी डोळ्यापुढे ठेवलेला दिसतो.

> कोणतेही नाटक अथवा कोणतीही कथा असो तिजमध्ये कवीने मुख्यत्वे हे तत्व ठेवले पाहिजे की जेथे जेथे प्रसंग पडेल तेथे तेथे सद्‌गुणांचे वर्चस्व, दुर्गुणाचा पराभव आणि कदाचित इतकेही न साधल्यास सद्‌गुणांची प्रशंसा आणि दुर्गुणाची निंदा ही प्रदर्शित करून आपल्या पुस्तकापासून इतरांना काहीतरी चांगला उपदेश मिळावा अशी त्याची रचना असली पाहिजे. ‡

प्रचलित नाटक–कादंबऱ्यातून नीति वा सदुपदेश यास प्राधान्य असावे एवढेच सांगून गुंजीकर थांबत नाहीत तर सदुपदेशाचे वा सुधारणेचे पांघरूण घेऊन दुराचाराचे चित्रण करू पाहणाऱ्या ग्रंथकारांच्या उद्देशाची सूक्ष्मपणे चिरफाड करून त्यांच्या लेखनाचे योग्य ते स्वरूप वाचकापुढे ठेवण्यास ते कमी करीत नाहीत. 'मनोरमा' नाटकाच्या कर्त्याने आपल्या इंग्रजी प्रस्तावनेत 'सुधारणेला साधनीभूत, उपदेश घेण्यास

† विस्तार पु. ३ अं. ७

‡ तत्रैव पु. २ अं. १

योग्य' असा उद्देश ठेवून नाटकरचना करीत असल्याचे लिहिले होते. गुंजीकरांनी तपशीलात जाऊन 'या पुस्तकापासून हे इष्ट मनोरथ कसकसे सिद्ध झाले आहेत ते पाहू' म्हणून खोल विचार करून शेवटी तो उद्देश सिद्धीस न गेल्याबद्दल अभिप्राय दिला आणि पुस्तकाच्या इतर गुणा-वगुणांची चर्चा करताना 'असभ्य व बीभत्स' प्रकार आणल्याबद्दल ग्रंथकर्त्यास पुढीलप्रमाणे चपराक हाणली आहे.

> या पुस्तकाचा असभ्यपणा पाहिला असता असे वाटते की दुसऱ्या मनुष्यासमोर हे पुस्तक वाचण्यास बेशरम मनुष्य वाचून दुसऱ्या कोणालाहि छाती होणार नाही. यातील न्हाव्याची भाषणे, कसबिणीचा धंदा, फौजदाराची चौकशी व भाषणे, लावणीचे गाणे वगैरे इतकी चावट व असभ्य आहेत की स्त्रियांच्या हाती हे पुस्तक देणे फारच अयोग्य

'मनोरमा' व 'वसंतमाला' या वरील प्रतिकूल अभिप्रायावरून गुंजीकर ग्रंथातील गुणाबद्दल मौन राखतात असे वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिति तशी नाही. उलट गुंजीकर हे नवीन पुस्तकनिर्मितीस शक्य तो प्रोत्साहन देत असतात. आणि मधूनमधून योग्य त्या सूचनाही करतात. उदाहरणार्थ दैवसेनी'च्या कर्त्याची त्यानी 'स्वभाव-जन्य मनोविकार आणि सृष्टि सौंदर्याचे वर्णन' या गुणाबद्दल प्रशंसा केली तर घोसाळकरांनी छापलेल्या 'अभिज्ञानशाकुंतला'च्या भाषांतरात 'संस्कृतातील कवितेचे मराठीत कवितारूपाने भाषांतर न केल्याबद्दल' त्यांची पाठ थोपटली. 'पुण्याचे वर्णना'च्या लेखकाची 'हिंदु लोकांच्या संबंधाने म्हणून जे काही तितके सर्व वाईट' मानल्याबद्दल हजिरी घेतली तर वसंतमालेच्या कर्त्यास † 'पात्रांच्या मुखातून जितके उद्गार निघतील तितके चांगले' अशी सूचना दिली. 'राजा शिवाजी' या काव्याचा तीन अंकात सविस्तर परामर्श घेऊन 'महादेवराव यांच्या कवितेत निःसंशय पुष्कळच गुण आहेत. परंतु सकृद्दर्शनी त्यांच्या

† **विस्तार** पु. ३ अं. ९; पु. १ अं. ३, पु. २ अं. ९, पु ९ अं. ८, पु २ अं. १.

कवितेपासून वाचकांच्या मनावर जो ठसा उमटतो तो महादेवराव यास प्रतिकूल आहे अशी आपल्या मनाची धारणा स्पष्ट केली तर विश्वासराव या कादंबरीवरील परीक्षणात कल्पित कथेतही असंभवनीय वाटणाऱ्या गोष्टी नसाव्या असा अभिप्राय दिला आहे. या सर्व परीक्षणातून गुंजीकरांच्या काळातील ग्रंथांचा व त्यातील गुणावगुणांचा उहापोह आहे तशाच त्या निर्मित्तीबद्दल योग्य त्या सूचनाही आहेत. पण हा सारा परीक्षणविचार एकत्र करून डोळ्यापुढे ठेवला म्हणजे एक गोष्ट लक्षात येते आणि ती म्हणजे या साऱ्या विचारांना पुरून उरलेली गुंजीकरांची प्रबळ नीतिनिष्ठा. कालिदासासारख्या कवीच्या नाटकातील गोडी सांगतानाही 'बीभत्सपणा येऊ न देता सभ्यपणाला योग्य' अशी ही शृंगारिक असल्याचा जेव्हा ते निर्वाळा देऊ लागतात तेव्हा सरस-नीरसतेच्या संदर्भातही त्यांची नीतिनिष्ठा जागरूक आहे असाच प्रत्यय येतो. 'विश्वासराव' वरील परीक्षणात उपसंहारादाखल लिहिताना 'वाईट कृत्ये या जगात क्षणभर विजयी झाली तरी त्यांचे स्थैर्य होणार नाही असा वाचकांच्या मनावर ग्रह बसावा' असे जेव्हा गुंजीकर सांगतात तेव्हा त्यांची प्रमुख अपेक्षा कोणती ते चटकन लक्षात येते. नीतिबोधाचा सोज्वळ उद्देश सांगून एखादा कादंबरीकर्ता भ्रष्ट वा विकृत अभिरुचीचे प्रदर्शन करतो ही गोष्ट गुंजीकरांच्या सूक्ष्म दृष्टीतून कधी लपत नाही हे 'मनोरमा' नाटकावरील परीक्षणाच्या संदर्भात आपण पाहिलेच आहे. 'विश्वासराव' कादंबरीच्या कर्त्यानेही सभ्य स्त्रियांच्या वाचनासाठी आपली कादंबरी लिहिल्याचा आव आणून जो असभ्य मजकूर त्यात दडपला त्याबद्दल त्यावर कसा ताशेरा झाडला आहे तो पाहा--

> आमच्या हुशार ग्रंथकर्त्यांनी हे पुस्तक सभ्य स्त्रियास वाचनासाठी सुलभ लिहिले आहे असे म्हटले आहे. आम्ही जशा समजत आहोत तशा हिंदु स्त्रिया या पुस्तकातील काही भागास शिवणार नाहीत इतकेच नाही तर ११० पासून ११९ पानापर्यंत मजकूर सदाचरणाचा पुरुष ढुंकूनही पाहणार नाही, मग स्त्रियांची गोष्ट लांबच.

या परीक्षणाच्या सुरवातीस एरवी कधी न दिसणारे एक इंग्रजी अवतरणही परीक्षण-कर्त्याने जोडले आहे ते असे–If bad writers were to pass without reprehension what should restrain them ?

जॉन्सनसारख्या एका महान टीकाकाराचे हे उद्गार जोडण्यात परीक्षणकर्त्याने सद्भिरुचीविषयीची आपली भूमिका मार्मिकपणे ध्वनित केली आहे यात शंका नाही.

इष्टानिष्ट–विवेकाची भूमिका

सरसनीरसतेचे निकष प्रकट करीत असतानाच नीतिबोधाचे मूल्य कसे पुढे सरसावत होते हे गुंजीकरांच्या टीकालेखनावरून दिसून येते. पण असल्या मूल्यांची आवश्यकता उत्पन्न झाल्याशिवाय सहजासहजी ती लोकांपुढे येत नाहीत. वाङ्मयाच्या प्रयोजनात आणि रसिकांच्या अपेक्षेत नीतिबोधाची जाणीव दिसू लागावी याला महाराष्ट्राची परिस्थितीही बरीच कारणीभूत होती. प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या समाजाला आपल्या आसपास चालू असलेल्या भ्रष्ट वा विकृत अभिरुचींचा शोध नेहमीच घ्यावा लागतो आणि वाङ्मयाभिरुचीच्या बाबतीत इष्टानिष्टतेचा विवेकही सदैव जागता ठेवावा लागतो. अव्वल इंग्रजीत सुखासीन व स्वास्थ्यप्रिय समाजाची रंजनाची भूक भागविण्याच्या निमित्ताने जी वाङ्मयनिर्मिती होत होती आणि 'सभ्य स्त्रियांचे मनोरंजन करावे' 'स्त्रियांची सुधारणा घडून यावी' अशी जी साळसूदपणाची भाषा क्वचित प्रयोजनाच्या निमित्ताने बोलली जात होती तिचे खरे स्वरूप काय होते आणि तिचा समाजाच्या अभिरुचीवर कोणता परिणाम घडत होता याचा विचार केव्हा तरी व्हावयास हवाच होता. नावले व नाटके यांची निर्मिती बरीच लोकप्रिय होऊ पाहात होती. सभ्य कुटुंबातील स्त्रियांचा एक नवा वर्ग याकडे आकृष्ट होत होता आणि 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने या स्त्री–वाचकांच्या मनोरंजनाचा आणि त्यांच्यात सुधारणा घडविण्याचा उद्देश बोलून दाखवीत नवा नवा लेखकवर्ग या लेखनक्षेत्रात हिरीरीने उतरत होता. मग जुन्यांची गोष्ट काय सांगावी ? १८६६ साली छापलेल्या रिसबुडांच्या

मंजुघोषेसारख्या कादंबरीची दोन वर्षांच्या आतच दुसरी आवृत्ति निघण्याचा योग आला तर त्यांच्याच आणखी एका कादंबरीची जाहिरात नुसती फडकली मात्र, आगाऊ पैसे भरून कादंबरीचे ग्राहक होणाऱ्यांची संख्या पाहता पाहता ४०–५० च्या घरात येऊन ठेपली. १८६८ च्या पुढल्या काळात हा वाङ्मयनिर्मितीचा वेग इतका वाढला की 'आताशी नावलांची कीड फार झाली आहे' असा आक्रोश जाणकार रसिक करू लागला तर 'कोणा तरी चांगल्या विद्वानाने नावल व नाटक यांच्या स्वरूपाविषयी निबंध लिहून मार्गदर्शन करावे अशी सूचना वि. प. रानड्यासारख्या देशाभिमानी वृत्ती जागवू पाहणाऱ्या रसिक ग्रंथकारालाही जाहीरपणे करावीशी वाटली.

याच कारणाने प्रेरित होऊन का. बा मराठे यानी १८७२ मध्ये नावल व नाटक ह्याविषयी निबंध लिहिला. या निबंधात सुरवातीला नावलाचे आणि पुढे नाटकाचे विवेचन केले आहे या दोन्ही विवेचनामध्ये इष्टानिष्ट विवेचकाची भूमिका बरीच जागरूक दिसते. नावलांविषयी लिहिताना मराठे लिहितात.

> नावलांमध्ये हलक्या जातीचे व मध्यमप्रकारचे लोक जितके जास्त घालावे तितका वर्णनात स्वाभाविकपणा येतो. हे विलायती नावले लिहिणारांचे मत खरे आहे असे आम्हास वाटत नाही †

हेच मत नाटकावरील विवेचनातही त्यांनी मांडले असून त्या संदर्भात मनोरमा व स्वैरसकेशा या नाटकांची कशी हजिरी घेतली आहे ते पाहा--

> दुष्ट व हलकट लोकांचा नाटकामध्ये उल्लेख असू नये. त्यापासून अज्ञान वाचणारांचे मत बिघडते व सज्ञान वाचणारास वीट येतो. मनोरमा व स्वैरसकेशा या नाटकात हलकटपणाचा व दुष्ट वर्तनाचा कडेलोट केला आहे. नीच,

† का. बा. मराठे-**नावल व नाटक ह्या विषयी निबंध** आ. २ पुणे १९६२ पृ. १२

> कपटी, व्यभिचारी लोकांची एक मालिकाच लावली आहे. चांगल्या कुळातली गंगी सोद्याच्या हाती कराचीस काढून नेऊन मद्यपानाच्या योगाने तिचा सर्वस्वी नाश केला आहे व त्या तिच्या नीच अवस्थेचे मोठ्या रसिकपणाने वर्णन केले आहे स्त्रियांची अशी वर्णनें ऐकून पुरुषांच्या मनाला देखील खेद होतो. बायकांना तिटकारा येईल यात नवल काय? साध्वी स्त्रिय तर असली पुस्तके फाडन चलीत टाकतील.. सारांश सभ्य लोकानी वाचण्याजोगी ही नाटके बिलकुल नाहीत व आमचे विद्वान बंधु असली नाटके रचण्याकडे आपला अमूल्य वेळ खर्च करणार नाहीत अशी आशा आहे *

इष्टानिष्टविवेकाच्या बाबतीत अशी सडेतोड भूमिका घेतली असली तरी गुंजीकराप्रमाणे मराठे यांच्या टीका प्रवृत्तीचा तो स्थायिभाव वाटत नाही. कारण नावलाविषयीच्या १६ आणि नाटकावरील १८ पृष्ठातील विवेचनातील हे तुरळक उल्लेख सोडले तर वाङमयातील या अनिष्ट प्रवृत्तीविषयी त्यानी विशेष रण माजविलेले दिसत नाही. 'नावल म्हणजे काय' आणि 'नाटक म्हणजे काय' अशी जी शीर्षके या दोन निबंधांच्या आरंभी योजिली आहेत त्यावरून त्यांचा उद्देश या वाङमयप्रकारांचे स्वरुप व तंत्र कथन करावे हा दिसतो. या दृष्टीनेच त्यांनी नावल-विभागात काही नियम सांगितले असले तरी 'अद्‌भुत' आणि 'रम्याद्‌भुत' याचा विशेष विचार केला आहे तर नाटक–विभागात संस्कृत, इंग्रजी नाटकांची लक्षणे देऊन त्यातील नव्या प्रकारांकडे आणि प्रवृत्तींकडे प्रामुख्याने लक्ष पुरविले आहे.

'अद्‌भुत' व रम्याद्‌भुत'–विवेक

मराठे यांची नावलावरील १६ पृष्ठातील चर्चा काटेकोर नसली तरी त्यातील मीमांसा बरीच मार्मिक आणि अद्यावत वाटावी अशी आहे. त्यातही टीका–कर्त्याची स्वतःची काही आवडनिवड आहे आणि तिकडे

* तत्रैव पृ. ३१–३२

त्याचे विशेष लक्ष आहे हे ध्यानात आल्याशिवाय राहत नाही. वि. प. रानडे यांच्यासारख्या देशाभिमानी पुरुषाच्या प्रेरणेने म्हणा किंवा शूर पुरुषांच्या चरित्राची जात्याच आवड असल्यामुळे म्हणा मराठे यांचे मन उत्साहाच्या, वीररसाच्या आणि देशाभिमानाच्या गोष्टीत विशेष रुची घेताना दिसते. नाटकांत क्वचित संमेलनासारख्या प्रसंगी सोंग घ्यावयाचे झाल्यास 'मित्रांच्या आणि सभ्यांच्या मनोरंजनाकरिता घटकाभर वीर पुरुषाचा आविर्भाव आणण्यास' त्यांना हरकत वाटत नाही. वीर पुरुषांच्या गोष्टी कितीहि ऐकल्या आणि वाचल्या तरी त्या पुनः पुन्हा ऐकतच राहाव्याशा वाटतात असा सर्वसामान्यांचाही अनुभव असल्याचे ते सांगतात पण या आवडीचे स्वरूप सांगताना मात्र लोकामध्ये सुप्तपणे वसत असलेल्या स्वदेशाभिमानाच्या भावनेची ती द्योतक आहे हे स्पष्ट करून सांगावयास ते विसरत नाहीत. वीरांच्या चरित्राविषयीची लोकांच्या आवडीनिवडीची मीमांसा करताना शिवाजीचे उदाहरण देऊन मराठे म्हणतात--

> ....कानोकानी शिवाजीच्या गोष्टी ऐकिल्या, लिहिलेल्या बखरी पाहिल्या, मराठ्यांची बखर वाचली, कविताबद्ध शिवाजीची कहाणी वाचली तरी शिवाजीविषयी कोणी नावल लिहितील तर लोक उड्या टाकून घेतील. कारण आपल्या देशात जे वीर होऊन गेले त्याविषयी आपल्या मनात फार बहुमान असतो व प्रीति असते हे देशाभिमानाचे माहात्म्य.*

थोर आणि वीर पुरुषांची चरित्रे ही कोणत्याही देशाला लाभलेली अपूर्व देणगी असते आणि ही देणगी जतन करण्यासाठीच जुन्या कवींनी आपली नावले लिहिली असे सांगून ही परंपरा ते रामायण–भारतापर्यंत नेऊन पोचवितात. रामायण हे त्यांच्या दृष्टीने एका शूर पुरुषाचे चरित्र असून वाल्मीकीने अद्‌भुत शैलीने लिहिल्यामुळे ते चिरकाल मान्यता पावले अशी त्याच्या यशस्वितेची मीमांसा ते लावतात. या-

* तत्रैव (पृ. १४)

वरून पाहता अद्‌भुताची ओढ ही सर्वकाळ टिकणारी प्रवृत्ति असून आज ती फारशी विद्वन्मान्य नसली तरी तिची लोकप्रियता कायम आहे; फक्त तिचा या नव्या काळाला अनुरूप असा विकास व्हावयास हवा असा मराठे यांच्या विवेचनाचा एकंदर डौल दिसतो.

रामायण–भारताना 'अद्‌भुतमिश्रित चरित्रे' असे मराठे म्हणत असले तरी आजच्या विद्वान लोकांना ती फारशी आवडत नाहीत हे त्यांना माहीत आहे. या तत्वबुभुत्सु व सत्यशोधक वृत्तीच्या विद्वानाना पुराणातील कथा 'भाकडकथा' वाटतात आणि इतिहास हाच त्यांना 'सत्य सांगणारा' आणि म्हणून विशेष आवडणारा प्रकार आहे हे लोकहितवादीसारख्या विद्वानांच्या लेखनावरून मराठ्यानी कधीच हेरून ठेवले आहे. पण या विद्वानानी निषिद्ध वा त्याज्य मानलेल्या अद्‌भुताकडेच सर्वसामान्य लोकांची विलक्षण ओढ होती. आपल्या काळातील विद्वान आणि अविद्वान यांच्या आवडीनिवडीमधील हे अंतर सांगताना मराठे लिहितात––

> हल्लीच्या काळी सुधारलेल्या देशात सत्यशोधक विशेष झाले आहेत म्हणून सत्य इतिहासाची अभिरुचि पुष्कळ लोकांस उत्पन्न झाली आहे. परंतु असत्य अगदी अप्रिय असेही अद्याप झाले नाही. आणि अज्ञान लोकांना ते कधीही अप्रिय होणार नाही. खऱ्या गोष्टी एकीकडे ठेवून ज्यापासून मनोरंजन होते त्या गोष्टी खोट्या, अगदी कल्पित असे जरी पहिल्या पानावर सांगितले असले तरी त्या पसंद पडतात व लोकप्रिय होतात. मराठ्यांच्या बखरीला गिऱ्हाईक मिळत नाही. पण मुक्तमाला, मंजुघोषा ह्यांच्या निघाल्या दिवसापासून दोन दोन आवृत्ती झाल्या.†

लोकांची ही अभिरुचि आणि विद्वानांची इतिहासाविषयीची आवड यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीने मराठे यापुढे कोणता उपाय सुचवीत आहेत ते पाहा–

† तत्रैव (पृ. ५-६)

> इतिहासात वर्णिलेल्या पुरुषाचे वृत्त लिहिणे झाल्यास त्यात देखील काही कल्पित चमत्कार मिश्र केले असता ते वृत्त पुष्कळ लोकास मनोरंजक होते. पक्की खात्री आहे की शिवाजीसारिख्या पुरुषाचे चरित्र त्यात काही अलौकिक गोष्टी मिसळल्या असता, फार लोकप्रिय होईल.

यापुढे शिवाजीच्या चरित्रातील अद्‌भुत गोष्टी लोकांना किती प्रिय आहेत ते सांगून मराठे विचारतात

> वीर व थोर पुरुषांच्या चरित्रापासून वाचणारास व ऐकणारास मोठा फायदा होत आहे तर ती लोक प्रीतीने वाचतील असे त्यास स्वरूप देण्यास काय चिंता आहे ?

येथवरल्या विवेचनावरून पाहता देशाभिमान जागृत होईल अशा शूर पुरुषांची चरित्रे हा विषय घेऊन त्याची अद्‌भुताच्या आश्रयाने मांडणी करावी असा मराठे यांच्या म्हणण्याचा आशय स्पष्ट दिसतो. महाराष्ट्रातील काही विद्वज्जड पुरुषाना हा प्रकार आज पसंत पडला नाही तरी इंग्रजी भाषेत तो विद्वन्मान्य आहे आणि तोच नमुना डोळ्यापुढे ठेवून मराठी भाषेतही लेखकानी एक नवे दालन सुरू करावे असाही सल्ला या प्रकरणी मराठे स्पष्टपणे देताना दिसतात--

> इंग्रजीमध्ये सर वॉल्टर स्कॉटची ऐवेनो, आबट, केनिल्वर्थ नावाची नावले आहेत त्यातील विषय असाच उत्तेजक व आनंददायक आहे. इंग्लंडाच्या इतिहासातील प्रसिद्ध पुरुषांची त्यात वर्णने दिली आहेत. नार्मन लोकांचा अतोनात जुलुम, साक्सन लोकांचा स्वतंत्र होण्याविषयी विलक्षण आवेश, स्त्रियांविषयी अत्यंत बहुमान ही प्रत्येक इंग्लंदातील मनुष्याच्या हृदयाला भिनली आहेत आमच्या देशात असे विषय काय थोडे आहेत ? . . त्यांच्या चरित्रांचा शोध करून त्याविषयी का नावले लिहू नयेत ? ‡

मराठे यांच्या नावल–विचारातील महत्वाचा भाग म्हणजे 'अद्‌भुत'

‡ तत्रैव (पृ. १४)

आणि 'रम्याद्भुत' यातील विवेक हा होय. विषय आणि वर्णन या दोन्ही दृष्टीनी असंभाव्य अशी कथा ही 'अद्भुत' तर विषय सत्य पण वर्णन कल्पित अशा संभाव्य वाटणारी कथा ही 'रम्याद्भुत'–असा फरक मराठे यांनी केलेला दिसतो. महाभारत–रामायणे ही अद्भुतमिश्रित असूनही तिची मोहिनी अद्याप कायम आहे याचे कारण त्यात शूर पुरुषांची चरित्रे असून ती विश्वास वाटतील अशा पद्धतीने लिहिलेली आहेत तर याच्या उलट मंजुघोषा, विचित्रपुरी ही प्रचलित 'नावले' विषय आणि वर्णन या दोन्ही दृष्टीनी असंभाव्य व म्हणूनच विद्वानांना असत्य वाटावी अशी होत असे मराठे सांगतात. निव्वळ 'असत्य' अशा मंजुघोषादि कल्पित, असंभाव्य व अदभुत कथा चालू घडीस लोकप्रिय असल्या तरी त्या विद्वन्मान्य कधीच होणार नाहीत; परंतु इतिहासाचा आधार घेऊन लिहिलेल्या 'रम्याद्भुत' कथा सत्याच्या बळकट पायावर असल्यामुळे त्या विद्वन्मान्य तर आहेतच पण लोकप्रियही होतील आणि म्हणून विद्वानानी अशा रचनेकडे मन वळवावे अशी सूचना मराठे यानी नावलाविषयीच्या विवेचनात केली आहे. इतिहासाच्या आधाराने रचल्या जाणाऱ्या या रम्यादभुत कथेविषयी स्वतःचा अभिप्राय देताना मराठे लिहितात –

> विषयगत व्यक्ति सत्य असून त्यांचे वर्णन अंशतः अद्भुत मिश्रित पाहिजे. ह्यास इंग्रजीत रोमान्स (romance) म्हणतात. हा प्रकार फारच उत्तम. कारण अशा प्रकारच्या नावलापासून मोठा उपयोग होतो. *

रम्याद्भुत परंपरेची नवी मूल्ये

'अशा नावलापासून उपयोग होतो' म्हणून लेखकाना एका बाजूने रम्याद्भुत कादंबरी लेखनाचे महत्व पटवून देत असतानाच दुसऱ्या बाजूने मराठे या लेखकांना ज्या सूचना देत आहेत त्या पाहिल्या म्हणजे एक विशिष्ट वाचक वर्ग नजरेपुढे ठेवून ते बोलत आहेत असे वाटते. 'वेश्या

* नावल व नाटक ह्यांविषयी निबंध पृ. ६

स्त्रीला नायिका करू नये' 'नवरा–बायकोच्या एकांतातील शृंगारिक भाषण लिहावयाचे झाल्यास अभिप्राय गूढ राखावा' 'कोणावर संकटाच्या राशी आणून वाचणारास दुःख देणे अश्लाघ्य' 'अनेक संकटे ऐकवून अंतःकरणे खिन्न करण्यापेक्षा पुष्कळ उत्साहाच्या शौर्याच्या गोष्टी सांगवून उल्हसित करावे' यासारख्या मथून मथून केल्या जाणाऱ्या सूचना मराठे कोणत्या वाचकवर्गासाठी करीत आहेत हे सांगावयास नको. 'अशी संकटे वाचता वाचता वाचकास पुस्तक खाली ठेवावे लागते, डोळ्यातले अश्रु पुसावे लागतात व कधी कधी खेद अतिशय झाल्या कारणाने गोष्ट सोडून द्यावी लागते.' § असेही या मृदु प्रकृतीच्या वाचकांचे वर्णन त्यानी केले आहे. हा विशिष्ट वाचक वर्ग नजरेसमोर असल्यामुळे नावल लिहिणाऱ्याना मराठे आणखी एक सूचना करतात ती विशेष महत्वाची वाटते. ती म्हणजे 'संकटाचे वर्णन अतिशयोक्त नसावे आणि त्यातही सकटग्रस्त स्त्रीला शेवटी सुटकेचे आश्वासन असावे' ही होय.

संकटग्रस्त तरुणी आणि तिची शौर्यशाली पुरुषाकडून होणारी सुटका हा तर या काळात नव्याने मराठी वाचकापुढे येणाऱ्या स्कॉट-प्रभृति इंग्रजप्रणीत रम्याद्भुत ऐतिहासिक कादंबरीचा एक ठरलेला संकेत आहे. हे लक्षात घेता मराठे ज्या रम्याद्भुत संप्रदायाचे मराठीत प्रवर्तन करण्याची इच्छा करीत आहेत त्याचे 'देशाभिमान' हे पहिले तर 'स्त्री विषयक दाक्षिण्य' हे दुसरे प्रधान अंग होऊ पाहात होते असे दिसते. 'नावल व नाटक' या आपल्या निबंधाच्या उत्तरार्धात इंग्रजीतील ऐतिहासिक नाटकांचे स्वरुप सांगताना या स्त्रीदाक्षिण्यप्रधान प्रवृत्तीचा आणि त्यासंबंधीच्या आपल्या आवडी निवडीचा उल्लेख मराठे पुढीलप्रमाणे करताना दिसतात––

> इंग्लंडात व इतर युरोपातील सुधारलेल्या देशात स्त्रिया म्हणजे देव, त्यांचा मान सर्वांनी राखला पाहिजे.. असे फार दिवस एक वेड मातले होते अशा सौंदर्यसंपन्न

§ तत्रैव पृ. १९, ८, १०, ११,

खऱ्या किंवा कल्पित नायकांच्या * संबंधाने जी नाटके
लिहिली आहेत ती फार आनंददायक आहेत.

स्त्री–पुरुषातील मोकळ्या प्रणयाला अनुकूल असे शृंगारिक वातावरण थोडे बहुत शेवटच्या रावबाजींच्या काळातील शाहिरी कवनात भासते आणि म्हणूनच या काळातील शाळेत शिकणारा विद्यार्थी इंग्रजी तऱ्हेला जवळच्या वाटणाऱ्या अशा लावणी वाङमयावर खूष झालेला क्वचित दिसतो. १८६३ सालच्या एल्फिन्स्टन स्कूल पेपरमधील † एका विद्यार्थ्याचे उद्‌गार या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत. रामजोशाची लावणी वाचताना त्यातील मराठमोळ्या सुकुमार स्त्रियाबद्दल आदरभाव जागृत होतो तर त्याबरोबरच त्यांच्या बल-दंड नवऱ्यानी केलेला त्यांचा छळही तितकाच जाणवतो अशा स्वरुपाचा तो अभिप्राय आहे. या अभिप्रायातील 'बलदंड नवऱ्याकडून स्त्रियांचा होणारा छळ' रामजोशांच्या लावणीत कितपत आढळतो याबद्दल शंका वाटली तरी सुकुमार स्त्रियाबद्दलच्या आदराची त्यातून व्यक्त होणारी भावना या काळातील तरुण पिढीच्या अपेक्षेची द्योतक ठरेल यात शंका नाही. पण सूक्ष्म-दृष्टीने पाहिले तर शाहिरी कवनातील वातावरण स्वैर व आडदांड वळणाचे असून ते संस्कृत नाटकातल्याप्रमाणे 'बहुवल्लभ' राजांच्या प्रणयाशी जुणणारे असल्यामुळे नवशिक्षिताना हव्या असलेल्या–शौर्य व स्त्रीदाक्षिण्य प्रगट करू पाहणाऱ्या इंग्रजी पद्धतीच्या–रम्याद्‌भुत युगाला त्याबद्दल जवळीक वाटण्यासारखी नव्हती. उलट इंग्रजीतील नाटक कादंबऱ्यांच्या तुलनेने तर जुन्या कल्पित कथामधून वावरणारी ही 'बहुवल्लभता' सुशिक्षित वाचकाना खड्यासारखी बोचत होती. खुद्द का. बा. मराठे यानी आपल्या नावलविषयक निबंधात 'रत्नप्रभा' कादंबरीतील या 'बहुवल्लभते'विषयी कसा टोमणा मारला आहे तो पाहा––

मदनविलासाची लग्नाची बायको चंपकवल्लरी सुंदर

---

* येथे मूळ निबंधात '**नायिकांच्या**' असा शब्द असावा काय? (पाहा पृ. २६–२७) † **निबंधमाला अं. ६३**

> असता व तिचे ह्याचे हृदय खवळून देण्यासारिखे प्रेम असता...तो रत्नप्रभेला पाहिल्याबरोबर तिला घरातून पळवून नेतो ह्या गोष्टी अमळ विलग दिसतात. कारण पुनर्विवाह करण्याची चाल होती असे जर शेवटी मानले आहे तर त्याच काळी दोन बायकाना एकदम नाडणे हे त्या लोकांस आवडत नव्हते अशी कल्पना केली असता अम्मळ बरी दिसेल. ‡

एकंदरीने पाहाता 'रत्नप्रभा' सारख्या कादंबऱ्या प्रणयप्रधान असल्या तरी बहुवल्लभतेचा हा रंगेलपणा आणि स्त्रियांकडे पाहण्याची कामुक दृष्ट या त्यातील दोन्ही गोष्टी नव्या रम्याद्भुत संप्रदायाला कधीच पसंत पडण्यासारख्या नव्हत्या. ही गोष्ट अप्रत्यक्षपणे जुन्या नाटकांच्या संदर्भात मराठे यानीही बोलून दाखविली आहे. मराठे लिहितात--

> जुन्या नाटकातून स्त्रीपुरुषांची प्रीति दाखवायची असली तर ती केवळ विषयोपभोगाच्या संबंधाने दाखवीत व स्त्रियांच्या सुंदर देहावरून त्यांची किमत करीत असे समजते. स्त्रियांच्या अंतःकरणातले संकल्प, विकल्प, इच्छा, प्रीति, ममता व स्नेह यांचा ते फारसा विचार करीत नसत आणि त्यामुळे स्त्रियाविषयी फारसा मान प्राचीन लोकामध्ये नसे. पण हल्ली पुरुषांच्या मनोवृत्तीमध्ये फेरफार झाल्यामुळे स्त्रियांची योग्यता उत्तरोत्तर वाढत चालली आहे व पुष्कळ अंशी स्त्रियांचे अवलत्व जाऊन सबलत्व येण्याची चिन्हे दिसत आहेत. *

स्त्रीदाक्षिण्यास प्राधान्य देण्याची ही जाणीव का. बा. मराठे यांच्या निबंधात बरीचशी भीतभीत व आडवळणाने व्यक्त झाल्यासारखी वाटते. पण त्याबरोबरच जुन्या नव्या इंग्रजी नाटकांची तुलना करताना सरसतेच्या दृष्टीने त्यानी हे मूल्य आधारासाठी घेतले आहे आणि

‡ उपरिनिर्दिष्ट (पृ. ८-९)

* तत्रैव पृ. २७

नावलातही संकटग्रस्त सुंदर स्त्रीला शूर पुरुषाकडून सुटकेचे आश्वासन मिळावे अशा वर्णनाची अपेक्षा बोलून नव्या निर्मितीला एक दिशा दाखवून दिली हे ही लक्षात घेणे आवश्यक आहे. किंबहुना साध्या अद्भुताहून रम्याद्भुताची वेगळीक स्पष्ट करणारे आणि त्याबरोबरच त्या रम्याद्भुत परंपरेतील 'देशाभिमान' व 'स्त्रीदाक्षिण्य' या दोन प्रमुख मूल्यांची जाणीव ठेवणारे का. बा. मराठे यानी आपल्या या निबंधाच्या रूपाने रम्याद्भुततेचा ध्वज मराठी टीकाक्षेत्रात प्रथम फडकावला ही त्यांची कामगिरी मोलाची ठरेल आणि 'रम्याद्भुत संप्रदायाचा पहिला भाष्यकार' अशी पदवी कधी काळी कोणाला द्यावयाचीच झाली तर तो मान मराठे यांना द्यावा लागेल यात शंका नाही.

अभिरुचीच्या संदर्भात एक तक्रार

पण किती झाले तरी रम्याद्भुततेची परंपरा नवी होती आणि म्हणूनच या परंपरेविषयी मराठी वाचकात नव्याने आवड उत्पन्न व्हावयास हवी होती. ही गोष्ट लक्षात घेऊनच मराठे यानी आपल्या दोन्ही निबंधांच्या अखेरीस इंग्रजी शिकलेल्या तरुण विद्वानानी नावले व नाटके लिहिण्याकडे लक्ष लावावे अशी विनंती केलेली दिसते.

या विनंतीच्या संदर्भात नावल व नाटक याहून भिन्न अशा क्षेत्रातील कुंटे यांचे प्रयत्न लक्षात घ्यावयास हवे. 'राजा शिवाजी' या ऐतिहासिक काव्याच्या रूपाने कुंटे याच रम्याद्भुत परंपरेचे जागरूकतेने प्रवर्तन करू पाहात होते. शिवाजीसारखा देशाभिमानी व शौर्यशाली पुरुष त्यानी आपल्या काव्यासाठी नायक म्हणून निवडला होता. पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की कुंटे यांचा हा शौर्यशाली नायक आपल्या सुंदर पत्नीसह प्रसंगी रानावनात विहार करण्याइतका रसिकही दिसतो. स्त्रिया देखील या शूर पुरुषांच्या बरोबरीने संकट प्रसंगी साथ देताना आढळतात. देशाभिमानी वातावरणाला शोभेशा या नायिकाप्रमाणेच रोमँटिक कवितेला आवडणाऱ्या संकटग्रस्त स्त्रियाही या काव्यात आहेत. किंबहुना संकटप्रसंगी आपणास साह्य करणाऱ्या

शूर पुरुषावर भाळून त्याच्यावर प्रेम करणारी व त्याचा रानोमाळ शोध घेणारी धीट वल्लभाही कुंटे यांनी चित्रित केली आहे या शोधाच्या निमित्ताने रानावनातील डोंगरदऱ्यांचे, तलावांचे आणि गुहांचे वर्णन आहे, वनभोजनाचा थाट आहे आणि जलविहारही आहे.

इंग्रजीतील रोमँटिक वातावरणाची ही सारी नवी अंगे उल्हासाने खेळवूनही कुंटे यांची कविता लोकप्रिय झाली नाही. या अपयशाचे खापर कुंटयांनी इंग्रजी शिकलेल्या सुशिक्षितांच्या माथ्यावर फोडले आहे. संस्कृत जाणणारा शास्त्री–पंडितांचा वर्ग हा जाणुनबुजून या नव्या अभिरुची समजून घेण्यास उत्सुक नव्हता; अशास्थितीत इंग्रजी वाङ्मयाचा स्वाद घेऊन ज्यांची रसिकता चांगल्या वाइटाची पारख करू शकत होती असा सुशिक्षित वर्गच नव्या अभिरुचीला प्रोत्साहन देण्यास समर्थ होता. या सुशिक्षित वर्गाविषयी कुंटे लिहितात--

> Their taste is improved ; their understanding is enlarged, their judgement is generally correct and formed after consideration and their minds are free from prejudices. They are therefore properly qualified to be judges. But there are certain circumstances which prevent this They admire what deserves admiration when they read English ; but as soon as they take up a Marathi book they are out of humour. *

कुंटे यानी सुशिक्षित वर्गाची जी अवस्था सांगितली आहे त्यावरून हे वर्णन करताना माधवराव रानडे त्यांच्या नजरेपुढे असावेत अशी शंका येते. रानडे हे कुंटे यांच्याच पिढीतले पण मराठीपेक्षा इंग्रजीवर विशेष भर ठेवणारे होते आणि नुकतीच 'रम्याद्भुतते' विरुद्ध आपली प्रतिक्रियाही त्यांनी रत्नप्रभेवरील परीक्षणाच्या संदर्भात स्पष्ट केली होती. ते काही असो, या नव्या सुशिक्षित वर्गाबद्दलचाच आपला रोष कुंटयांनी या प्रकरणी प्रगट केला आहे असे म्हणावयास हरकत नाही.

* राजा शिवाजी–(इं. प्रस्ता. पृ. ३–४)

संस्कृत वळणाच्या शास्त्रीपंडितांची असमर्थता आणि इंग्रजी शिकलेल्या विद्वानांची उदासीनता या दोहोंच्या कात्रीत आजची नवनिर्मिति सापडली आहे, अशी कुंटे यांची तक्रार दिसते. ही तक्रार त्यानी आपल्या इंग्रजी प्रस्तावनेत पुढीलप्रमाणे नोंदवून ठेवली आहे. कुंटे लिहितात--

> Here there are two facts-the fact that the educated do not find Marathi tolerable and the fact of the shastris looking down upon it. Nothing is common to these two classes except that they do not labour at Marathi and cultivate it but that they look at it either from a sanskrit or from an English point of view.

गंमत अशी की रम्याद्भुत वळणाच्या संदर्भात जशी कुटे आपली तक्रार नोंदवीत होते तशाच तऱ्हेची तक्रार नेमक्या याच काळात आणखी एका बाजूने उद्भवत होती. संस्कृत आणि इंग्रजी वळणाची मूल्ये आपणास अपायकारक-नव्हे अन्यायकारक-ठरत आहेत असा या तक्रारीतला सूर होता.

त्या तक्रारीचे स्वरूप आणि त्यामागची भयावह अवस्था यांची कथा जितकी शोचनीय तितकीच आपल्या विषयाच्या दृष्टीने उद्‌बोधक ठरेल ती कथा आपण पुढील प्रकरणात पाहू.

नवी मूल्ये व जुनी कविता : २

ज्या देशात व ज्या लोकात
रसभरित म्हणून प्रसिद्ध काव्ये
असतात त्यांच्या गुणांचे यथायोग्य
परीक्षण करण्यास आणि त्यांची
रुचि घेण्यास त्याच देशाचे डोळे
आणि जीभ असली पाहिजे.

तुलनात्मक बुद्धीची जाणीव

मूल्यमापनाच्या क्षेत्रातील टीकाकाराचा उदय आणि ऐहिक मूल्यांचे नवे आविष्कार हे एकोणिसाव्या शतकाचे जसे वैशिष्टय म्हणता येईल तसेच हे आविष्कार प्रगट करू पाहताना दिसणारी टीकाक्षेत्रातील तुलनात्मक बुद्धीची जाणीव हेही या एकोणिसाव्या शतकातील मूल्य-मापनाच्या दृष्टीने एक वैशिष्टयच म्हणावे लागेल. ही तुलनात्मक टीकापद्धति एका अर्थाने पाहता नव्या इंग्रजी वाङमयाच्या आवडी-निवडीची महाराष्ट्रावर पडलेली छाप होती हे तर खरेच, पण तिला तत्कालीन टीकाक्षेत्रातील परिस्थिति थोडीबहुत कारणीभूत होती हेही तितकेच खरे. अव्वल इंग्रजीत एकाबाजूने संस्कृत काव्य-नाटकांचे अध्ययन केलेले शास्त्रीपंडित तर दुसऱ्या बाजूने इंग्रजी वाङमयाचा आस्वाद घेतलेले नवे पदवीधर सुशिक्षित या दोन्ही टीकाकारांची प्रथमच मराठी भाषेशी जणु नव्याने गाठ पडत होती. याचा एक परिणाम

असा झाला की मराठीचा विचार करताना त्यांच्या टीकेत त्या त्या वाङ्मयाची मूल्ये तर आलीच पण त्याबरोबरच त्या मूल्याबरहुकूम लिहिल्या गेलेल्या संस्कृत किंवा इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथाशी मराठी लेखनाची तुलना करण्याचा मोह या टीकाकाराना झाला. उदाहरणार्थ, कृष्णशास्त्री चिपळूणकर यानी वि. ज. कीर्तने यांच्या जयपाळ नाटकाचे परीक्षण करताना त्या पुस्तकाबद्दल योग्य ते कौतुकाचे उद्‌गार काढूनही 'प्राचीन कवीच्या नाटकाशी ताडून पाहता संविधानकाच्या वा रसपरिपोषाच्या संबंधाने संस्कृत नाटकाशी कोणत्याही प्रकारे बरोबरी नाही' अशी टीका केल्याचे आपण मागे पाहिलेच आहे. माधवराव रानडे यानी 'रत्नप्रभा' कादंबरीचे परीक्षण करताना त्यात कर्त्याने जे प्रेमप्रसंग वर्णिले ते युरोपियन पद्धतीचे निवळ अनुकरण असल्याच्या सबबीवर त्याज्य मानले होते. याच्या उलट बजाबा नेने यांच्या सैरंध्री नाटकावरील परीक्षणात विदूषकाचे पात्र घातल्यामुळे मूळ कथावस्तूचा विचका झाला असे मत प्रदर्शित केले असून संस्कृत नाटकाचे अयोग्य अनुकरण करणाऱ्या आणि गांभीर्याचा विचका करणाऱ्या विदूषकी विनोदावर चांगलीच झोड उठविली आहे. रानडे लिहितात—

> The modern perfomances on the stage sanction this absurd practice (of introducing vidushak every now and then) because the vulgar portion of the audience is much disposed to expect from them the excitement of the show or tamasha and think they have a right to be frequently moved to laughter, it may be at the expense of the most serious pleasure of tragedy.

कृष्णशास्त्री चिपळूणकर किंवा माधवराव रानडे या जुन्या-नव्या टीकाकारानी तुलनात्मक बुद्धीची जी जाणीव येथे दाखवली ती त्यांच्या उच्च अभिरुचीला धरूनच होती यात शंका नाही. तुलनात्मक बुद्धीची

रानडे चरित्र (पृ. ७०)

जाणीव संस्कृत व इंग्रजी या दोन्ही वळणाच्या टीकाकाराना अंधानुकरणासारख्या अनिष्ट प्रवृत्तीपासून वाचवण्याच्या आणि योग्य अभिरुची लावण्याच्या दृष्टीने किती उपकारक ठरत होती हे या उदाहरणावरून स्पष्ट होते.

पण अशी समंजस उदाहरणे फार कमी आहेत. किंबहुना वर निर्देशिलेले एक दोन टीकाकार सोडले तर या तुलनात्मक बुद्धीने मराठीच्या टीकाक्षेत्रात फारशी उपयुक्त भर टाकलेली दिसत नाही. उलट जुन्या मराठीचा त्यानी जेव्हा जेव्हा विचार केला तेव्हा तेव्हा त्यांच्या टीकेत अप्रयोजक तुलना, असमंजस निर्णय आणि अज्ञानजन्य मते यांचाच प्रादुर्भाव विशेष झालेला दिसतो.

अंत:करणाचे अकृत्रिम आणि स्वाभाविक उद्‌गार, नाजुक मनोविकाराचे दर्शन, निसर्गाचे, सौंदर्याचे किंवा सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब या गोष्टी ज्या काव्यात आढळतील ते काव्य तत्कालीन युरोपियन रसिकांच्या दृष्टीने सरस्वतीचे सारसर्वस्व होते. शब्दालंकाराची तत्कालीन युरोपियन पंडितांना विशेष चाड वाटत नव्हती आणि श्लेषात्मकतेची तर उलट त्यांना चीडच होती. शब्दालंकाराची यमकानुप्रासाची आणि श्लेषाची हौस बाळगणारे मिल्टन, ड्रायडन आणि पोप यासारखे इंग्रजी वाङमयातील पंडिती वळणाचे कवि आणि त्यांची प्रशंसा करणारे जॉन्सनसारखे टीकाकार हे दोघेही एकोणिसाव्या शतकांतील इंग्रजी टीकाकारांच्या दृष्टीने अनादरास पात्र ठरले. याच्याउलट चॉसर, शेक्सपीयर, स्कॉट आणि वर्डस्वर्थ यासारखे जे ग्रंथकार या काळांत विशेष मान्यता पावले होते त्यालाही वर उल्लेखिलेली वाङमयीन मूल्ये कारणीभूत होती. या इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनाचे आणि आवडी–निवडीचे ज्यांच्या रसिकतेवर संस्कार झाले होते असे रा. ब. रानडे आणि कुंटे यासारखे नवे पदवीधर विद्वान मराठी वाङमयाचे व विशेषत: जुन्या कवितेचे गुणदोषविवेचन करतांना वरील वाङ्मयीन दृष्टिच बाळगून होते. त्याचा साहजिक परिणाम असा झाला की वरील इंग्रजी तऱ्हेचा प्रकार ज्यात आढळेल अशी

मराठी काव्येच या टीकाकारांच्या दृष्टीने सुप्रतिष्ठित ठरली. अंत:करणाचे स्वाभाविक उद्गार काढणारा तुकाराम, ऐतिहासिक काव्य रचणारा अनंत फंदी, प्रेमासारख्या नाजुक मनोविकाराचे दर्शन घडवून देणारा रामजोशी या कवींना त्यांच्या गुणविशेषामुळे नव्हे तर इंग्रजी पद्धतीशी साधर्म्य दाखविणाऱ्या गुणविशेषामुळे मानमान्यता मिळाली, तर याच्या उलट मिल्टन, ड्रायडन व पोप यांच्या धर्तीची काव्ये काव्ये रचणाऱ्या वामन मोरोपंतादि पंडितांची 'यमक्या' 'कृत्रिम' अशा शब्दांत संभावना होऊ लागली. १८६३ साली प्रसिध्द झालेल्या एल्फिन्स्टन स्कूल पेपरमधील एका टीकालेखांतील तुलनात्मक बुध्दीचा हा नमुना पहा—

> Tuka, the cowper of the Marathas, is a Marathi Poet. We are for popularising him for the purification of the corrupt morals of the Marathas. Anant Fandi, the great Dryden of the Marathas is a Marathi poet. We are for printing him to awaken the nationalities of the Marathas and to remind them of the thrice famous deeds performed by their ancestors. Ram Joshi, the head of the Lawani School and the great Anacreon of the Marathas is a Marathi poet. We are for annotating him to inspire regard for the fair sex and tenderness for the beautiful Maratha damsels who are oppressed by their rustic husbands. *

अंत:करणाचे स्वाभाविक उद्गार प्रगट करणारा तुकाराम इंग्रजी रसिकांनाही जेथे मोह पाडू शकला आणि सर अलेक्झांडर ग्रँटसारख्या डायरेक्टरानेही लेख लिहून ज्याच्या कवितेची प्रशंसा केली तेथे तो मराठी टीकाकारांना प्रशंसनीय वाटला तर नवल नव्हते. पण नवल हे

* निबंधमाला अं. ६३

की तुकारामाची मराठी टीकाकारांनी चालविलेली ही प्रशंसा त्याच्या कवितेशी इंग्रजी मूल्याच्या असलेल्या साधर्म्यामुळे बाहेर पडत होती; गुणाच्या जाणिवेने नव्हे. इंग्रजी कवितेचे प्रेमाने अध्ययन करणाऱ्या या विद्वानाची नजर जेव्हा जेव्हा मराठीकडे गेली तेव्हा तेव्हा तीत त्याना हवे असलेले 'स्कॉट' किंवा 'आनाक्रियन' आहेत का हे पाहण्याची सुद्धा विशेष उत्सुकता होती असे दिसत नाही. 'हे आमचे स्कॉट' 'हे आमचे वर्डस्वर्थ' ही तुलनात्मकतेची भाषा मात्र याच काळात या नव्या पदवी-धरांनी प्रथम सुरू केली असे दिसते. या तऱ्हेच्या पदव्या देणाऱ्यांना दोन्ही कवींचे साधारण गुणधर्म अभिप्रेत होते असेही म्हणता येण्यासारखे ज्ञान त्यांच्या लेखनात आढळत नाही. किंबहुना ते कार्यच त्यांच्यापुढे नसावे असे वाटते आणि त्यामुळेच त्यांच्या तुलनात्मकतेला अप्रयोजकपणाची कळा आलेली आहे. वर उद्धृत केलेल्या एल्फिन्स्टन स्कूलपेपरमधील टीकालेखात तुकाराम व मोरोपंत यांची जी तुलना करण्यात आली ती या दृष्टीने पाहण्यासारखी आहे.

> Moropant is as inferior to Tukaram as a raw Elphinstone scholar is to an M. A from the Oriental College, Oxford.

आर्या-पंडितांची जुनी परंपरा

संस्कृत आणि इंग्रजी वळणाच्या या नव्या टीकाकारांनी मराठीत आपापल्या आदर्शानुसार आणि अभिरुचीनुसार नवी ऐहिक मूल्ये प्रगट केली आणि नव्या गद्ययुगाला मार्गदर्शनही केले. परंतु जुन्या मराठी कवितेचे योग्य ते मूल्यमापन त्यांच्याने झाले नाही. ज्या नव्या आवडी-निवडीचा चष्मा लावून ते जुन्या मराठीकडे पाहत होते तो चष्मा त्यांना जुन्या मराठीचे मूल्य पारखण्यास उपयोगी पडला नाही. जुन्या मराठी कवितेची एक स्वतःची विशिष्ट परंपरा आहे, तिची स्वतःची आवडनिवड आहे आणि त्या आवडीनिवडीचा ज्यांच्यावर संस्कार झाला आहे असा एक सर्वसामान्य रसिकांचा वर्ग मराठीत आहे हे जणु त्यांच्या ध्यानातच आले नव्हते.

ज्या ऐहिक प्रवृत्तीने या टीकाकारांची रसिक दृष्टि भोवतालच्या जगाकडे पाहत होती त्याच प्रवृत्तीने प्रेरित झालेली सर्व सामान्यांची रसिकता मात्र एका जन्याच परिचित वळणाने आपल्या आवडीनिवडीचा शोध घेत चाललेली होती. या वाटेने जाणाऱ्यांना व्युत्पत्तीचे किंवा अलंकारशास्त्राचे थोडे ज्ञान पुरेसे होते. शाहिरी वाङ्मयातील रंगेलपणाला किंवा तमाशातील चावटपणाला तेथे फारसा वाव नव्हता हे खरे पण शृंगाराचे आणि विनोदाचे मर्यादेने रससेवन करण्याइतकी सोय होती. उपमा उत्प्रेक्षादि शोभेचे अलंकार येथेही मिरवले जात होते पण संस्कृत काव्यपध्दतीप्रमाणे केवळ रम्य रमणींच्या किंवा विरहातुर राजस्त्रियांच्या शोभेसाठी ते वेचले जात नव्हते. संस्कृतातील श्लेषात्मक आणि चित्रबंधसदृश इंद्रजाल येथेही होते पण त्यांत फसणारा माणूस लुटला जाण्याऐवजी रामकृष्णादि मंत्रवर्णाच्या नामोच्चाराने पुनीत मात्र होत होता. ज्यांना देवाधर्माविषयी विशेष आवड नव्हती पण पुराणेतिहासाच्या कथालापांत ज्याचे मन रुची घेत होते त्यांनाही या विहारस्थलांत आमंत्रण होते. कर्णाच्या रथाचे चाक पृथ्वीने गिळल्याबद्दल ज्यांना विषाद वाटत होता, सुभद्रेच्या दर्शनाने गोंधळलेल्या यतिवेषातील अर्जुनाची भ्रमिष्ट स्थिति पाहून ज्याना गंमत वाटत होती, सुभद्रेला तिच्या मनाविरुध्द दुर्योधनाला देण्याचे ठरविलेले पाहून ज्याना तिची कीव येत होती, आपल्या जन्माचे दारिद्र्य फिटावे म्हणून पतीला द्वारकेस जाण्याचा आग्रह करणाऱ्या पण ऐनवेळी बरोबर द्यावयास काही नाही म्हणून कष्टी झालेल्या सात्विक मनाच्या गृहिणीची स्थिति पाहून ज्याचे मन गहिवरले होते अशा रसिकांसाठी त्यांना प्रिय असलेल्या रसांच्या पाणपोया या वाटेवर सज्ज होत्या. सर्वसामान्य रसिकांना प्रिय होऊन बसलेली ही कविता म्हणजे मुक्तेश्वर मोरोपंतादि पंडित कवींची कविता होय. बाबा पाध्यासारखे विद्वान, रामजोशासारखे रंगेल कवि, पांडुरंगरायासारखे श्रीमंत, रामबडव्यासारखे व्युत्पन्न आणि गोपिकाबाई पेशवे किंवा अहिल्याबाई होळकर यासारख्या राजकाजचतुर स्त्रिया अशा साऱ्यांनाच मोरोपंतांच्या कवितेने आपणाकडे आकर्षून घेतले होते.

रसालंकारान्वित आणि चमत्कृतिप्रचुर अशा मोरोपंती कवितेने पेशवाईच्या अखेर अखेरच्या कालात स्वत:भोवती जो विशिष्ट रसिकांचा वर्ग गोळा केला होता तो अव्वल इंग्रजीतही वाढत गेला. राम जोशी, राम वडवे, मैराळ बाबा चातुर्मासे, तुका विप्र इत्यादि पंतकालीन हरिदासांनी मोरोपंताची आर्या कीर्तनांत म्हणण्याचा प्रघात सुरू केला होता. तीच हरिदास, कवि आणि रसिक यांची परंपरा अव्वल इंग्रजीत कायम होती. मोरोपंती कविता आदर्श मानून त्याप्रमाणे काव्यरचना करणारी परशुरामपंत तात्या गोडबोले, गणेशशास्त्री लेले, श्रीमंत कुरुंदवाडकर, रा. ब. पाळंदे, चिंतामणिपेठकर अशी एकाहून एक सरस आणि नामवंत पंडित कवींची परंपरा एकाबाजूने उदयास आली तर दुसऱ्या बाजूने फलटणकर, रहिमतपूरकर, पन्हाळकर यासारखा मोरोपंती काव्याचा महाराष्ट्रांत प्रसार करणारा आणि त्याची गोडी शिकविणारा मर्मज्ञ हरिदासांचा वर्ग बहरास आला होता. आत्मारामबुवा फलटणकरांची गोष्ट सांगतात की कीर्तन प्रसंगी मोरोपंती आर्यांचा अर्थ विशद करताना मधूनमधून 'वाहवा मोरोपंत ! धन्य त्याची माय' असे उद्‌गार आपोआप त्यांच्या ओठावाटे बाहेर पडत. याच्या उलट पन्हाळकर बुवांची रीत होती. कीर्तन प्रसंगी रहिमतपूरकरबुवांनी मोरोपंतांची आर्या म्हटली की ते लागलीच तत्सदृश संस्कृत सुभाषित म्हणून दाखवीत आणि अशारीतीने संस्कृताच्या तुलनेने मोरोपंती कवितेचे स्वारस्य रसिक श्रोत्यांच्या लक्षांत आणून देत.†

मोरोपंतांच्या आर्यांचे प्रेमाने अध्ययन करणारा आणि त्यांच्या कवितेचे मर्म समजावून सांगणारा मर्मज्ञ रसिकांचा एक फार मोठा वर्ग त्याकाळी महाराष्ट्रात होता. अशा मर्मज्ञांना आर्यापंडित म्हणत. मोरोपंताचे पणतू बळवंतराव पराडकर आणि त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई ही दोघेही आर्यापंडित म्हणून प्रसिद्ध होती. एकंदरीत मोरोपंतांची काव्ये संग्रही ठेवावी, पाठ करावी, त्याचा अर्थ लावण्याची स्पर्धा करावी, कुणी समजावून देत असल्यास त्यातील रसास्वाद घ्यावा आणि 'वाहवा,

† मोरोपंत चरित्र (पां. प्रस्ता. पृ. ३–५)

धन्य आहे त्या मोरोपंताची' म्हणून आदराने मान डोलवावी अशी जुन्या रसिक मंडळींच्या आवडीनिवडीची दिशा होती. हरिदासांनी पंताच्या आर्या महाराष्ट्रात सारीकडे खेळविल्या आणि महाराष्ट्राने तितक्याच तत्परतेने त्या आपल्या ओठावर नाचविल्या. भोजनाच्या पंगतीत, मुलामुलींच्या खेळात, स्वयंपाकघरात, ओटीवर आणि अंगणात, दिवाणखान्यात, मित्रांच्या गप्पागोष्टीत आणि कवींच्या बैठकीत जिकडे पाहावे तिकडे मोरोपंताच्या आर्या ऐकू येत.

भाषासरणी शुद्ध व्हावी म्हणून पंताच्या आर्या मुलामुलींकडून पाठ करून घ्यायच्या हे तत्कालीन शिक्षणक्रमांतील बौद्धिक विकासाचे एक महत्वाचे अंग समजले जात होते. परशुरामपंत तात्या गोडबोले आणि दादोबा पांडुरंग यासारख्या रसिकांची मोरोपंती कवितेशी याच पद्धतीने ओळख झाली होती आणि दादोबा पांडुरंगानी याच हेतूने आपली कन्या कावेरी हिला मोरोपंतांची केकावली शिकवायला घेतली होती असे त्यांच्या यशोदापांडुरंगीच्या प्रस्तावनेवरून दिसते.

जुन्या मराठीचे नवे अभ्यासक

अव्वल इंग्रजीत मुद्रणसंस्कार सुलभ होत गेला तेव्हा प्राचीन मराठी कविता हळुहळु प्रकाशात येऊ लागली. १८४० च्या सुमारास पांडुरंग बापू जोशी पावसकर यांनी 'ज्ञान चंद्रोदय' हे मासिक काढून त्यातून जुनी मराठी कविता प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. पुढे पुणे कॉलेजातील मराठीच्या वर्गासाठी पद्याचा एक संग्रह तयार व्हावा अशी सूचना कृष्णशास्त्री चिपळूणकरासारख्या विद्याखात्यातील एका ज्जेष्ठ पंडिताने केली तेव्हा तत्कालीन विद्याखात्याचे अधिपति मे. क्यांडी यानी परशुरामपंत गोडबोले याजकडून 'नवनीत' हे पुस्तक करवून घेतले ते १८५४ साली प्रसिद्ध झाले. १८६० साली पुन्हा एकदा 'सर्वसंग्रह' मासिकाच्या रूपाने जुन्या मराठी कवींच्या काव्यप्रकाशनाला गति मिळाली. १८६६–६७ पर्यंत हे प्रकाशनाचे सत्र अखंड चालू होते. प्राचीन मराठी कवितेचा परिचय करून देणे आणि मराठी वाचकास

त्याची गोडी लावणे हेच अशा 'सत्रां'चे उद्दिष्ट होते आणि या कार्यात माधव चंद्रोबा डुकले यांना आपले बंधु डॉ. अनंत डुकले यांच्याप्रमाणे तत्कालीन इतर रसिक विद्वानांचेही साह्य मिळत होते असे दिसते. पण या मासिकात प्रसिद्ध झालेल्या जुन्या काव्यात मुक्तेश्वर–मोरोपंता-सारख्या पंडित कवींचीच वर्णी विशेष लागली आणि त्यातही मोरोपंतांच्या कवितेला विशेष प्रसिद्धि मिळाली. किंबहुना तसे पाहिले तर सर्वसंग्रहातच नव्हे तर इतरत्रही मोरोपंतांची कविता मराठी वाचकांच्या बरीच पुढे आलेली दिसते. माधवराव रानडे यांनी १८६४ सालापर्यंत प्रसिद्ध झालेल्या मराठी पुस्तकांची जी यादी सरकारी आदेशानुसार तयार केली त्यात तावत्काल प्रसिद्ध झालेल्या प्राचीन काव्यांची संख्या १९७ च्या आसपास असल्याचे दाखविले आहे. या प्राचीन काव्यातही मोरोपंतांच्या कवितेला प्रसिद्धीच्या बाबतीत अग्रक्रम मिळालेला आढळतो. उपरिनिर्दिष्ट यादीच्या जोडीला रानडे यांनी जो निबंध लिहिला त्यात त्यानी याबाबतीत जे उद्‌गार काढले आहेत ते मोरो-पंतांच्या कवितेविषयी तत्कालीन लोकप्रियतेची साक्ष देणारे ठरतील. रानडे लिहितात––

> Pauranik poetry forms by far the largest aggregate total of poetic works being no less than 99 books, or fully one half of the entire collection I have had the curiosity to analyse their large total and was not surprised to find that the largest collection in point of quantity and first in order of poetieal merit is Moropant. *

मोरोपंताच्या कवितेला अशी लोकप्रियता लाभण्याचे कारण उघड होते. 'आर्यापति' म्हणून गाजलेला मोरोपंत तत्कालीन कवींचा आणि लेखकांचा आवडता कवि होता. संस्कृताच्या अध्ययनाने पुष्ट झालेली आणि त्या तऱ्हेची कविता मराठीत वाचावयास मिळावी

* The Miscellaneous writings (M. G Ranade) 1915 p. 8

म्हणून इच्छा करणारी रसिकांची पिढी अद्याप कायम होती आणि लेखक वा कवी या नात्यानेही वावरत होती. या काळातील एक कवि व नाटककार भास्कर दामोदर पाळंदे हे मोरोपंती कवितेचे विशेष चाहते होते. भाषासरणीची शुद्धता, प्रौढी आणि अलंकारांची धाटणी या तीन गुणामुळे पाळंदे याना मोरोपंताची कविता नेहमीच आदर्श वाटत असे. १८५४ साली 'विक्रमोर्वशीय' नाटकाचे जे भाषांतर त्यांनी 'ज्ञानप्रसारका'त प्रसिद्ध केले त्याला जोडलेल्या प्रस्तावनेत आपल्या पद्यरचनेविषयी निवेदन करताना मोरोपंतांच्या कवितेविषयीचे आपले मत त्यानी पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे—

> रचना अशिक्षित पुरुषासहि अर्थाचा स्पष्ट बोध व्हावा अशी करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे श्लेष, प्रास, यमक इत्यादि अलंकार साधता आले नाहीत व ज्यांनी ज्यांनी मोरोपंत आदि करून प्राकृत कवींची कविता वाचली आहे त्यास ही कविता आवडली नसेल. असे झाले असल्यास त्यांची क्षमा मागितली पाहिजे. †

शंकर पांडुरंग पंडित हे नवे पदवीधर पंडित याच परंपरेतील पहिले रसिक टीकाकार होत. विद्यार्थिदशेपासूनच यांची वामन मोरोपंतादि प्राचीन पंडिती कवितेशी बरीच ओळख होती. एल्फिन्स्टन स्कूल पेपरमध्ये आक्टोबर १८६३ च्या अंकातील एका लेखात त्यांनी मराठी गणवृत्ते व लांब यमके आणण्याची प्रथा वामन पंडिताने कशी आणली व मोरोपंतानी ती कशी बहरास आणली याचे थोडक्यात मार्मिक वर्णन केले आहे. पंडित लिहितात—

> Waman was the first who introduced the greatest number of sanskrit metres and words, the first who adorned his verses with long harmonious rhymes and was the first who imposed upon every one that wished to hear

† ज्ञानप्रसारक पु. ४ अं. १२

> him, the necessity of having at least some elementary knowledge of sanskrit.

यापुढे वामन पंडिताच्या याच पद्धतीचा अनुवाद करून मोरोपंताने या गोष्टीत कशी भर टाकली याचे वर्णन पंडितानी कसे ऐटदार पद्धतीने केले आहे ते पाहा—

> Then followed our lofty and learned poet of the eighteenth century. He wrote as he says himself in a mystical kantha (a patchwork of many coloured cloth) and carried to the utmost height the outword ornament of rhyme, the logical accuracy and scientific exactness in the use of words, the art of expressing long complicated thoughts within a most wonderfully short compass, by means of compounds and samasas (which is one of the characteristic beauties of sanskrit and thence of Marathi); and lastly almost a reverential observance of the rules of grammar and idiom. †

हा लेख लिहित असतानाच शं. पां. पंडित हे एल्फिन्स्टन कॉलेजात सीनियर स्कॉलर म्हणून काम करीत असावेत. कारण याच वर्षी 'टीपाचिन्हांकनादिकांनी सुबोध केलेला' मोरोपंत-कृत बृहद्दशम (कृष्ण-विजय) हा ग्रंथ त्यांनी संपादन करून प्रसिद्ध केला. मोरोपंताचा बृहद्दशम हेच काव्य संपादन करण्यास निवडण्याचे कारण सांगताना 'मोरोपंतांच्या कवनचातुर्याचा तो एक उत्कृष्ट नमुना' असल्याचे विद्वज्जनांचे मत त्यांनी आपल्या प्रस्तावनेत प्रदर्शित केले आहे. सर्व लोकास हा ग्रंथ समजावा या उद्देशाने शोधपूर्वक ग्रंथ रचला असला तरी टीपा जोडण्याचे काम परीक्षेच्या घाईगर्दीत उरकावे लागत असल्यामुळे ते मनाजोगते झाले नाही अशी हुरहूर ग्रंथकर्त्याने बोलून दाखविली आहे ती अशी—

† निबं. ६४

> माझ्या मनात फार इच्छा होती की संस्कृत काव्यास जशा भरपूर टीपा असतात अथवा इंग्रजीत क्लासिकल कवितेस जशा अनोटेशन्स म्हणून असतात तशा सविस्तर टीपा या ग्रंथात लिहून संबंधी वाक्ये उघड करून दाखवावी, धात्वर्थावरून शब्दार्थाची सिद्धता स्पष्ट करावी आणि याच कवीच्या इतर ग्रंथातील वा अन्य कवींच्या अनेक ग्रंथातून उदाहरणे प्रत्यतर आणून शक्य तर योग्यायोग्यता अथवा रसगुणावगुण यांचे योग्य स्थळी विवरण करावे*.

पंडितांच्या या उद्‌गावरून संस्कृत व इंग्रजी यातील दोन्ही टीका-पद्धतीचा समन्वय करून नवे टीका ग्रंथ लिहिले जावे असे त्यांचे धोरण असावेसे दिसते.

नवनीतकर्ते परशुरामपंत तात्या गोडबोले हे पाळंदे व पंडित यांच्याप्रमाणेच नावाजलेले पण जुन्या पठडीतील पंडित होते. कृष्ण-शास्त्री चिपळणकरासारख्या तत्कालीन विद्वत्प्रमुखानेही जुन्या मराठी कवितेचा अर्थ समजून घ्यावयाचा झाला तर गोडबोले यांच्याकडे धाव घ्यावी असा त्यांचा बोलबाला होता; इतकेच नव्हे तर मेजर क्यांडी-सारखा सरकारी विद्याखात्यातील प्रमुखाने मराठी पद्यरचनेचे कोणतेही पुस्तक गोडबोले यांच्याकडे परीक्षेसाठी पाठवावे असा शिरस्ता होता. बहुधा यामुळेच सरकारी विद्याखात्यातर्फे मराठी कवितांचे वेचे काढण्याचे काम १८५४ साली परशुरामपंत गोडबोले यांच्याकडे सोपविले गेले आणि ते 'नवनीता'च्या रूपाने प्रसिद्ध झाले.

जुन्या कवितेमध्ये मोरोपंती कविता ही परशुरामपंत तात्यांची अतिशय आवडती होती. किंबहुना मोरोपंतांची कविता प्रौढ व सरस असून 'ती संस्कृत कवितेच्या बरोबरीची म्हणण्यास चिंता नाही' असा त्या कवितेबद्दलचा त्यांचा अभिप्राय होता.

जुन्या मराठीचे ज्ञान करून घ्यावयाचे असेल तर ते ग्रंथ वाचणे

---

* शं. पां. पंडित–**मयूरकृत बृहद्दशम**, १८६३ प्रस्तावना पृ. ३–४

आवश्यक आहे असेही ते प्रतिपादन करीत असत. १८५४ साली प्रसिद्ध केलेल्या नवनीताच्या प्रस्तावनेत ते लिहितात--

> ज्याला मराठी भाषेचे चांगले ज्ञान असावे अशी इच्छा असेल त्यानी प्राचीन व अर्वाचीन कवींचे प्राकृत ग्रंथ पुष्कळ वाचणे हे आवश्यक आहे. ज्याला ज्या भाषेचे पूर्ण ज्ञान असते त्याला त्या भाषेच्या कवितातील नाना प्रकारचे चमत्कार व रस पाहून किती आनंद वाटतो. §

मोरोपंती कवितेतील दुर्बोधतेची मीमांसा

परशुरामपंतानी १८६७ च्या सुमारास मोरोपंतांच्या केकावलीवर 'केकादर्श' या नावाची टीका लिहिली. कवीचे हृद्गत समजून घेणे आणि त्याच्या कवितेचा अर्थ जितका उघडा करवेल तितका थोडक्यात करणे या उद्देशाने त्यांनी ही संक्षिप्त टीका रचली. शब्दांचे अर्थ, समासांचे विग्रह, पौराणिक कथांचे संदर्भ आणि काव्यातील श्लोकांचे परस्परानुसंधान या गोष्टीवर त्यांनी विशेष भर दिला. त्या मानाने संस्कृत वळणाच्या मल्लिनाथी टीकेत आढळणारी अलंकार, व्याकरण वा पाठभेद याविषयीची चर्चा तीत फारशी आढळत नाही आणि इंग्रजी वळणाची रसग्रहणात्मक वा गुणदोष-विवेचनात्मक प्रस्तावनाही जोडलेली दिसत नाही. संस्कृत भाषेचे अध्ययन न केलेल्या मराठी वाचकास कवितेच्या अर्थग्रहणाविषयी साह्य करणे एवढाच मर्यादित उद्देश नजरेसमोर ठेवून लेखकाने ही टीका रचलेली दिसते. पण गंमत अशी की आपल्या याच प्रास्ताविकात मोरोपंतांची कविता प्रसंगी पंडितजनासही दुर्बोध असते असा सूर त्यानी कसा काढला आहे तो पाहा--

> हा ग्रंथ जरी प्राकृत भाषेत केला आहे तरी कवीने यात संस्कृत शब्द फार घातले आहेत आणि कोठे संक्षेपाने, कोठे संकेताने आणि कोठे अन्योक्तीने वर्णन केले आहे. यामुळे

> याचा भावार्थ प्राकृत-जनांच्या तर काय पण पंडितजनांच्याही मनात विचार केल्याशिवाय लवकर यावयाचा नाही. *

मोरोपंतांच्या केकावलीचे महत्व सांगण्याच्या भरात परशुरामपंतानी मोरोपंतांच्या कविता पंडित जनासही दुर्बोध असतात असा जो सूर इथे छेडला तो मोरोपंतांच्या कवितेवर दुर्बोधत्वाचा आक्षेप घेणाऱ्या टीकाकारांच्या बराच कामी आला असावा. विविधज्ञानविस्ताराचे संपादक रा. भि. गुंजीकर यांनी मोरोपंतांच्या कवितेच्या दुर्बोधतेसंबंधी असाच एक समज लोक वदंतेच्या रूपाने बोलून दाखविला आहे. गुंजीकर सांगतात--

> मोरोपंतांचे ग्रंथ मोठ्या आवडीने वाचणाऱ्या एका विद्वान व मान्य गृहस्थाने एकदा अशी गोष्ट सांगितली की पंतांची कविता पाहून त्यांचा एक स्नेही म्हणाला, 'ही कविता कसली, एखादे पोरसुद्धा ही लावील', हे ऐकून पंतांनी बृहद्दशमाच्या आर्यागीति तयार केल्या. †

केकादर्शाच्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'यशोदा–पांडुरंगी' या केकावली–टीकेचे कर्ते दादोबा पांडुरंग यांनी मात्र मोरोपंती कवितेतील या दुर्बोधतेची मीमांसा जरा वेगळ्या रीतीने केली आहे. यशोदापांडुरंगीच्या आपल्या प्रस्तावनेत यासंबंधीची चर्चा करताना दादोबा लिहितात--

> ज्यांना संस्कृत भाषा अवगत नाही अशा प्राकृत जनांस मोरोपंतांच्या काव्यात संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ असल्याने सहाजिक त्या शष्दांच्या अपरिचयामुळे आणि प्राकृत जनास अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द आणि निव्वळ प्राकृत व ग्राम्य शब्द यांचे मिश्रण असल्याने संस्कृत भाषाभिज्ञ अशा पंडितासही त्यांची निवड करून अर्थ योजना करण्यात अवघड प्रसंग असण्याच्या दृढ संभवामुळे तसेच

---

* परशुरामपंत गोडबोले–केकादर्श (१८६७, प्रास्ताविक)

† विस्तार पु. ४ अं. ६

समयविशेषी शब्दांचा दूरान्वय असल्याने अर्थज्ञानाच्या दु:साध्यत्वामुळे मोरोपंतांचे काव्यही दुर्बोध आणि कठीण म्हणून सर्व जनास अनुभूत आहे. ‡

मोरोपंतांचे काव्य पंडित जनास दुर्बोध असलेच तरी ते संस्कृत शब्दामुळे नव्हे तर अपरिचित व अप्रसिद्ध शब्दांमुळे आहे असे सांगण्यात दादोबानी विशेष सावधपणा बाळगला असून दुर्बोधतेच्या आक्षेपाचा बराचसा निरास केला आहे यात शंका नाही. मोरोपंतांची कविता संस्कृत वळणामुळे दुर्बोध झालेली नसून उलट त्यामुळेच ती प्रौढ, भारदस्त बनली असून रसिक जनांना अधिक आवडती आहे असेही दादोबा म्हणतात. किंबहुना मोरोपंतानी संस्कृत वळणाची कविता लिहून मराठी कवितेला जे प्रौढ, सुरस वळण लावले तो त्यांनी मराठीवर फार मोठा उपकार केला असून जाणत्या रसिकाने मराठी वाचकाना समजावून द्यावयास हवा अशी टीकेची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली आहे आणि ती करण्यास आजपर्यंत कोणी पुढे न सरसावल्यामुळे आपण हे टीकालेखनाचे कार्य हाती घेतले असे त्यानी म्हटले आहे.

मल्लिनाथी टीकेचा मराठी आदर्श

दादोबांची 'यशोदापांडुरंगी' हा मराठीतील संस्कृती वळणाच्या मल्लिनाथी टीकेचा उत्तम आदर्श ठरावा. पण त्या टीकेइतकीच सुरवातीची इंग्रजी धर्तीची प्रस्तावनाही त्यांच्या रसिकतेची द्योतक आहे. या प्रस्तावनेत त्यानी मोरोपंती कवितेचे जे महत्वमापन केले आहे त्यात त्यांच्या आंगची चिकित्सा आणि रसिकता या दोन्ही गुणांची साक्ष पटते.

दादोबांनी १८३४ साली महाराष्ट्र भाषेचे व्याकरण रचले तेव्हापासूनच मोरोपंतांची कविता त्यांच्या नजरेपुढे होती आणि तिची व्याकरणशुद्धता आणि प्रौढता या गुणावर ते मुग्ध झाले होते. प्रस्तुतच्या टीका ग्रंथात हा व्याकरणशुद्धतेचा गुण तर त्यानी वाखाणला

‡ रा. ब. दादोबा पांडुरंग—यशोदा पांडुरंगी (आ. २, १९३१-प्र. पृ ११)

आहेच पण त्याबरोबरच प्रासयमकान्वित आणि रसालंकार–युक्त रचना हाही दुसरा गुण त्यांच्या नजरेत भरलेला दिसतो. रस, अलंकार, प्रास आणि यमके हे चारही प्रकार रम्य आणि उत्कृष्ट रीतीने साधून पुन: शुद्ध शब्दांच्या निवेशाकडे जे त्यांही अपूर्व लक्ष दिले तेणेकरून त्यांही रसिक आणि भाषाभिज्ञ अशा विद्वज्जनांच्या स्तुतिग्रहणाविषयी पर्वकाळच साधिला असे सांगण्यात दादोबांनी मोरोपंती कवितेची गोडी जाणणारा 'रसिक' आणि 'भाषाभिज्ञ' असा दोन प्रकारचा मर्मज्ञ वर्ग नजरेपुढे ठेवलेला आहे असें म्हणावयास हरकत नाही

पण संस्कृत वळणाच्या या मराठी कवितेला प्रसंगी नव्या इंग्रजी वळणाची मूल्ये लावली तरी तिच्या गुणात कमतरता येणार नाही असा दादोबांना विश्वास वाटतो. स्वत: दादोबा जितके रसिक तितकेच मताने सुधारकी वळणाचे होते. स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह यासारख्या नव्या सुधारणांना त्यांची वृत्ति जात्याच अनुकूल होती तशीच शूद्र म्हणून हेटाळल्या जाणाऱ्या तमाशा व लावण्यासारख्या करमणुकीलाही उच्च प्रतिष्ठा लाभावी अशी त्यांची मनीषा होती रामजोशांच्या लावण्याचे त्यांनी जे कौतुक केले ते याच उद्देशाने. 'स्त्रीदाक्षिण्य' हा तर त्यांच्या मूल्यविचारातील एक महत्वाचे अंग होते आणि गंमत अशी की मोरोपंती कवितेची श्रेष्ठता पटविण्यासाठीही त्यांनी हे मूल्य रसिकांच्या नजरेसमोर प्रगट केले आहे. मोरोपंतांच्या कवितेतील सुंदर स्थळांचे निर्देश करताना द्रौपदी–सत्यभामा-संवादाचे त्यानी आपल्या प्रस्तावनेत जे विस्तृत व रसाळ विवेचन केले आहे त्यातील उद्देश तरी हाच होय.

> साध्वी स्त्रियानी कोणत्या सदाचरणानी आपल्या पतीस वश करावे म्हणून भारतात वनपर्वात द्रौपदी आणि सत्यभामा यांच्या संवादात सत्यभामेने द्रौपदीस पुसले; त्या तिच्या प्रश्नास हे द्रौपदीचे प्रत्युत्तर पंतांनी पहा कसे सरस ग्रथित केले आहे.

असे या संवादाच्या आरंभी सांगून शेवटी दादोबा लिहितात––

> हा वरील वेचा म्या उगीच उदाहरणाकरिता अचानक काढून वाचकापुढे सार्थ सादर केला आहे; यावरून सहज त्यांच्या ध्यानात येईल की आपल्या कवीची वाणी प्रौढ, गंभीर आणि गीर्वाण शब्दानी प्रचुर अशी असून तीत अलंकार, लोकव्यवहार आणि यमक इतके सर्व सरस रीतीने साधण्याचे चातुर्य कसे प्रकट केले आहे. यापेक्षाही दशगुणित त्याचे कवनकृतीचे चातुर्य त्याच्या रचलेल्या साऱ्या भारतात व रामायणात जागोजाग जे कोणी त्यांच्या सर्व कृतीचे लक्षपूर्वक पर्यालोचन करितील त्यांच्या प्रचीतीस आल्यावाचून राहणार नाही, असा माझा दृढ निश्चय आहे†.

पण अशारीतीने दादोबा नव्या मूल्यांचा आधार घेत असले तरी जुन्या परंपरागत मूल्यांनाही ते अजीबात विसरलेले नाहीत. किंबहुना मोरोपंतांच्या 'केकावली' काव्यावर येणाऱ्या आक्षेपांचे निरसन करताना त्यांनी या मूल्यांचा आदर केलेला दिसतो. अशा स्तोत्रपर काव्यात आपल्या अंतःकरणाचा नम्रभाव व्यक्त करण्याऐवजी मोरोपंतानी परमेश्वराशी जी सलगी दाखविली ती अनुचित आहे असे आपले स्वतःचे मत व्यक्त करूनही दादोबा पुढे म्हणतात––

> या मत दृष्टीने पाहिले असता हे पुढले आमच्या कवीचे काव्य दोषारोपणास पात्र होण्यास योग्य आहे खरे; परंतु ज्या लोकांमध्ये लडिवाळपणाने आणि सलगीने ईश्वराची प्रार्थना आणि स्तुति करण्याचा सांप्रदाय व्यासाच्या वेळेपासून पडला आहे त्यामध्ये आपल्या कवीसच निवडून काढून या दोषाचा भार त्याच्या मस्तकावर ठेवण्यास त्यास पुढे करणे मला योग्य दिसत नाही. §

याच 'केकावली' काव्यात दुसरा दोष म्हणजे त्यातील शृंगार वा बीभत्सरसाचे अस्तित्व हा होय. पण त्याही बाबतीत 'भगवत्स्तुतीत या

† तत्रैव पृ. २०–२५

§ तत्रैव पृ. ३३

रसाचे नुसत्या लवणाप्रमाणे ही अल्पसेवन दु:सह' असा अभिप्राय प्रथम निवेदन करूनही दादोबा स्वत:च त्या आक्षेपाचे पुढीलप्रमाणे निरसन करताना दिसतात. श्रीमद्भागवत, गीतगोविंद, ब्रह्मवैवर्तक आणि वेणीसंहार या ग्रंथाची उदाहरणे देऊन दादोबा लिहितात--

> असा शृंगाररसान्वित भक्तिप्रेम प्रकट करण्याचा जेथे शिष्टसांप्रदाय प्राचीन काळापासून चालत आहे, तेथे आपल्या य:कश्चित प्राकृत कवीने पुढल्या स्तोत्रात कोठे सात आठ श्लोकात या रसाचे एक दोन थेंब ओतले असल्यास...हा यांजकडेस मोठा दोष न येता उलट मला वाटते की हे त्या रसाचे अत्यल्पत्व त्यांच्या सदभिरुचीचे ज्ञापक होते. $

दादोबांच्या या गुणदोषविवेचक प्रस्तावनेप्रमाणेच त्यांची काव्यावरील टीका रसिक व चिकित्सक जनांना आवडावी अशीच आहे. ती त्यांनी आपल्या कावेरी नामक कन्येला शिकविण्यासाठी लिहिली आणि तिच्या वियोगानंतर तिच्या स्मृतीला अर्पण केली. परंतु कन्येसाठी लिहिलेली ही टीका बरीच विदग्ध आणि पांडित्यपूर्ण वाटते. अमरकोश, वायुपुराण, साहित्यदर्पण, श्रीमद्भागवत, गीतगोविंद यासारख्या भिन्नभिन्न संस्कृत ग्रंथांची त्यातील अवतरणे आणि त्याबरोबर ज्ञानेश्वर, मुकुंदराज, तुकाराम, रामजोशी यासारख्या मराठी कवींच्या काव्यातील अर्थ-सादृश्यासाठी घेतलेले उतारे यामुळे ग्रंथाला रसिकतेची कळा आली. 'महाराष्ट्र टीकेचा अपूर्व प्रकार' म्हणून ही टीका तत्कालीन मर्मज्ञांत लोकप्रिय झाली. निबंधमालाकारांना वयाच्या चवदाव्या वर्षी या टीकाग्रंथाने मोरोपंती कवितेची गोडी लावली आणि उत्तरोत्तर वाढत्या वयाबरोबर मोरोपंती कवितेशी जो त्यांचा दृढस्नेह होत गेला त्याला हीच टीका कारणीभूत झाली. या टीकाग्रंथाच्या प्रस्तावनेतच वरील आक्षेपांच्या संदर्भात दादोबांनी 'मोरोपंती कवितेचे खरे रसज्ञ कोण' हे सांगताना खालीलप्रमाणे उद्गार बोलून दाखविला आहे. दादोबा लिहितात--

$ तत्रैव पृ. ३५

ज्या देशात व ज्या लोकात रसभरित म्हणून प्रसिद्ध काव्ये असतात त्यांच्या गुणाचे यथायोग्य परीक्षण करण्यास आणि त्याची रुचि घेण्यास त्याच देशाचे डोळे आणि जीभ असली पाहिजे. इतर लोकांच्याने तसे यथान्याय परीक्षण होणे केवळ अशक्य असे माझे म्हणणे नाही ... परंतु त्यांच्या रुचीने जो तद्देशीय सुज्ञास आनंद होईल त्याच मानाचा आनंद अन्यदेशीय विद्वानास होणार नाही. □

मिशनरी पंडिताची भ्रमपुष्ट टीका

दादोबा पांडुरंगांनी १८६५ सालच्या आपल्या प्रस्तावनेत वरील-प्रमाणे जे खणखणीत उद्गार काढले ते मराठीतील टीकाशास्त्राच्या रचनेला पायाभूत ठरावेत इतके महत्वाचे आहेत. 'सुधारक' मनो-वृत्तीच्या आणि मुंबईच्या 'परमहंस' सभेचे एकाकाळचे अध्वर्यु म्हणून मिरवलेल्या दादोबांनी एतद्देशीय काव्यांचा ड्रायडनच्या आवेशाने आणि कडोविकडीने असा कैवार घ्यावा याचे सकृद्दर्शनी आश्चर्य वाटते. पण तत्कालीन मराठीच्या टीकाक्षेत्रातील परिस्थितीच या गोष्टीला बहुतांशी कारणीभूत होती. परद्वीपस्थ इंग्रज मिशनरी विद्याखात्यात शिरकाव करून बसला होता आणि सरकार–दरबारी त्याला बरेच महत्वाचे स्थान प्राप्त होऊ लागले होते. याचा एक परिणाम असा झाला की या मिशनरी पंडितांनी सरकारी कृपेच्या बळावर मराठीच्या क्षेत्रात आपली सुभेदारी गाजवावयास सुरवात केली. डॉ. विल्सनसारखा मिशनरी पंडित मराठी कवीबद्दल आपली मते सुनावू लागला आणि सरकार दरबारी राबणारा शास्त्री–पंडितांचा आश्रित वर्ग आणि इंग्रजप्रणीत आवडीनिवडींनाच ग्राह्य मानून त्या पावलावर पाऊल टाकण्यात धन्यता मानणारा इंग्रजी शिकलेल्या पदवीधरांचा वर्ग त्या मतांचा अनुवाद करू लागला. वस्तुतः डॉ. विल्सनसारख्या पंडिताची हयात महाराष्ट्रात गेली एवढ्याने ते मराठी भाषेचे सर्वज्ञ ठरू शकत नव्हते. पण इंग्रजी

□ तत्रैव पृ. ३५

सत्तेच्या त्या उत्कर्षकाळात कोणत्याही क्षेत्रात इंग्रज-वचनाला विशेष प्रामाण्य येऊ लागले होते यात शंका नाही. यामुळे डॉ. विल्सन-सारख्या इंग्रज पंडिताने मोरोपंती कवितेबद्दल एखादे चुकून जरी विधान केले तरी त्यातील चुका लक्षात घेण्याऐवजी ते जसेच्यातसे शिरोधार्य मानावे किंवा त्यातील वचनांचा आपल्या पल्लवित भाषेने अनुवाद करावा अशी परिस्थिति मराठी भाषेच्या क्षेत्रात १८५७ पासूनच्या पुढील सात आठ वर्षात दिसू लागली. या दृष्टीने डॉ. विल्सन यांनी मोरोपंती कवितेसंबंधी मांडलेली मते आणि त्या मतांचे पुढील ७-८ वर्षात गाजलेले पडसाद लक्षात घेणे मनोरंजक ठरेल.

मोल्सवर्थ-कोशाच्या आपल्या प्रस्तावनेत डॉ. विल्सन यांनी महाराष्ट्र कवींच्या वर्णनाच्या ओघात मोरोपंताबद्दल पुढीलप्रमाणे माहिती दिलेली आढळते.

> The reign of the first Brahman Peshwa who was established in his administration in the year 1717 was honoured by the appearance of the greatest Marathi poet from the priestly order. This was Mayur pandit or Moropant of Baramati in the Deccan. He belonged to the tribe of Brahmans, the Karhadi, having no great prominence in the Maharastra, but he has become the great favourite of all the Brahmans since his day.

मोरोपंत हा कवि पहिल्या बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीत उदयास आला ही गोष्ट इतिहासदृष्टचा चुकीची आहे. या दृष्टीने डॉ विल्सन यांची माहिती बरोबर दिसत नाही. पण यापेक्षाही मोरोपंत हे कऱ्हाडे ब्राम्हण होते हे सुचविण्यातील विषारी दंश कोणाही जाणत्या वाचकाच्या लक्षात यावा. वस्तुतः इंग्रजी वाङमयाच्या इतिहासात किंवा कवीच्या वृत्तान्तात कवीचे कुलशील पाहण्याची आवश्यकता कधी पडत नाही; ती मराठी कवीचा वृत्तान्त सांगताना उन्मळून यावी हे आश्चर्य

आहे. कऱ्हाडा जातीच्मा ब्राम्हणाला पेशवाईपूर्वी प्रतिष्ठा नव्हती ती पुढे मोरोपंतांच्या कवित्वशक्तीच्या प्रतिष्ठेमुळे आली या विल्सन साहेबांच्या मतात वरवर पाहता मोरोपंतांच्या कवितेची प्रशंसा दिसली तरी महाराष्ट्राच्या सामाजिक अभिरुचीला होणारा अन्याय ही स्पष्ट दिसतो. तुकारामाच्या कवितेला मोरोपंतासारख्या पंडित कवीने शिरोधार्य मानले तर शेखमहंमदासारख्या अविंध कवीचा भोसल्यांच्या कुलपुरुषानी सन्मान केला असे महाराष्ट्राच्या वाङमयाभिरुचीचा इतिहास सांगतो. अशा स्थितीत जातिभेदाची कल्पना आणून विल्सनसाहेबानी तिचा मराठीतील मूल्यमापनक्रियेशी जो संबंध लावून दाखविला तो बराचसा नेणतेपणाचा निदर्शक वाटतो.

पण एवढेच विधान करून विल्सनसाहेब थांबले नाहीत तर याच्याही पुढे जाऊन त्यानी मोरोपंताच्या कवितेविषयी पुढीलप्रमाणे मत प्रदर्शित केले आहे.

> Thongh a follower of Vishnu, he wrote in the respect for other Deities for whom, such as Shiva, the accute and intelligent konkan or chitpawan Brahmans in full power at Poona had a special regard. The rise of the Peshwas indeed was a signal for the Marathi bards–who had nothing like the heaven–born light and the fire of the Hebrew poets–altering their tune.

विल्सनसाहेबांनी केलेल्या या विधानातून त्यानी एकाच वेळी कितीतरी 'पक्ष' जायबंद केलेले आढळतील. त्यातली एक महत्वाची गोष्ट दिसते ती ही की पेशव्यांच्या कारकीर्दीत मराठी कवितेला राजाश्रय मिळाला, आश्रित कवींची गर्दी उडाली आणि अशा राजाश्रयाला लालचावलेल्या साधारण कवीपैकीच मोरोपंत हाही एक कवि होय. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे इंग्रजी धर्मग्रंथातील स्तोत्रे लिहिणाऱ्या हिब्रू कवीप्रमाणे मराठी कवींना ईश्वरी स्फूर्तीचे वरदान तर नव्हतेच पण कवित्वरचनेसाठी मुळात भावनेची जी उत्कटता लागते तीही नव्हती. अर्थातच

मोरोपंताच्या कवितेतही ही दोन अंगे सापडत नाहीत हे सांगावयास नकोच. डॉ. विल्सन यांच्या मते मोरोपंतांच्या धर्मकल्पनेतही बरीच मोठी धरसोड होती. पेशव्यांचा राजाश्रय मिळावा म्हणून या कवीने स्वतःच्या घराण्यात विष्णुभक्ति असतांना शिवावरही आर्या रचण्यास कमी केले नाही आणि या लाचारीचे कारण काय तर राज्यकर्ते पेशवे हे शिवाचे उपासक होते असे डॉ. विल्सनचे मत दिसते.

पण याहूनही विल्सन यांच्या मते मोरोपंताचा घोर अपराध तो वेगळाच आहे. तो म्हणजे मोरोपंताचे आर्या–वृत्तावर प्रभुत्व असूनही त्याने जुन्या भारतरामायणादि कथा सांगण्यात आणि शब्दांचे चमत्कार साधण्यात आपल्या कवित्वशक्तीचा अपव्यय केला. विल्सन लिहितात––

> He is the lord of Arya Metre in which he copiously writes with power and ease drawing his ideas from the Ramayan, Mahabharat and Bhagwat so often mentioned as the sources of Marathi excitement but seldom improved upon either in thought or feeling.

एका बाजूने पेशव्यांच्या काळातील श्रेष्ठ कवि म्हणून मोरोपंतावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करीत असतांनाच दुसऱ्या बाजूने त्याच्या कवित्वाचे उद्देश आणि स्वरूप मात्र हीन वा साधारण प्रतीचे आहेत असे सांगून डॉ. विल्सन मोरोपंतांच्या कवित्वशक्तीबद्दल व काव्यविषयक अभिरुची-बद्दल जी शंका घेत आहेत त्यावरून त्यांच्या दृष्टीने मोरोपंतांच्या कवितेचे स्थान कोठे आहे हे लक्षात येण्यास वेळ लागत नाही आणि त्याबरोबरच १८५७ पासून १८६३ पर्यंतच्या काळात मोरोपंती कवितेच्या बाबतीत याच आक्षेपांचा राहून राहून भडिमार का होत होता याचीही नीट संगति लागते.

इंग्रजप्रणीत मताचे मराठी अनुवाद

मोरोपंतांच्या कवितेबद्दलचा हा इंग्रजप्रणीत न्यायाचा काटा लक्षात असल्यामुळेच की काय, कृष्णशास्त्री चिपळूणकरासारख्या रसिक–श्रेष्ठा-

लाही मोरोपंतासारख्या लोकप्रिय व विद्वन्मान्य कवीची 'साधारण कवि' म्हणून गणना करण्यास संकोच वाटला नसावा. १८६१ साली प्रसिद्ध झालेल्या 'अनेकविद्यामूलतत्व' या संग्रहात्मक स्वरुपाच्या त्यांच्या पुस्तकात 'वाक्यातील अलंकार' या पाठातून श्लेष आणि यमक या अलंकाराचे जे विवरण आले आहे ते या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. श्लेषाच्या विवरणात प्रथम व्याख्या आणि त्यानंतर 'तू मलिन कुटिल नीरस' ही मोरोपंतांची आर्या उदाहरणादाखल देऊन कृष्णशास्त्री पुढे शेरा मारतात तो असा--

> साधारण कवि ह्या अलंकाराचा हवा तेथे प्रयोग करून आपल्या काव्यास दुर्बोधता आणतात व त्यांच्या ग्रंथात एका शब्दाचे दोन अर्थ होत असतात. एवढ्यानेच त्यास व कितीएक अरसिकास ते ग्रंथ मोठे चांगले वाटतात पण सहृदय पुरुष तसे लेख पसंत करीत नाहीत.

वस्तुतः मोरोपंतानी आपल्या कवितेत प्रत्येक ठिकाणी श्लेषाची योजना केलेली नाही आणि श्लेष म्हणजे कवित्वचातुर्याची सीमा हे मत मोरोपंतास विशेष अभिमत होते असेही म्हणता येत नाही. पण याहून गंमत अशी की श्लेषालंकाराबद्दल मोरोपंताना 'साधारण कवि' म्हणून शब्द लावणारे हेच कृष्णशास्त्री संस्कृत वाङमयातील बाणभट्टासारख्या कवींची श्लेषपूर्ण पद्ये वाखाणीत असत आणि जगन्नाथरायाच्या भामिनीविलासातील 'निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा' अशा श्लेषपूर्ण संस्कृत पद्याचे 'विरहिविलाप' या आपल्या काव्यात स्वतःच भाषांतर करावयास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. पण मराठी कवितेविषयी त्यांच्या मनात उपेक्षाभाव वास करीत होता हेच खरे. कालिदास भवभूतीसारखे तर राहोच परंतु यत्किंचित गोष्टीत तरी संस्कृत कवींची बरोबरी ज्यास करता येईल असे सुद्धा कवी मराठीत झाले नाहीत असे त्यांचे म्हणणे असे आणि आपले मत ताडून पाहण्यासाठी का होईना, मराठी कविता त्यांनी कधी हातात घेतली नाही अशी खुद्द त्यांच्या थोरल्या चिरंजीवांचीच साक्ष आहे. "जुन्या व नव्या पंडितांचे बिचाऱ्या

मयूरकवीविषयीचे अप्रेम त्यांच्या ठायी एकवटलेले होते. मोरोपंत मुळी कवीच नव्हे, तर पुराणातील अर्थ घेऊन तो शुद्ध प्राकृत भाषेत त्याने आर्यारूपाने ग्रथित केला येवढीच काय ती त्याची करामत हे त्यांचे ठरीव मत होते." ‡ मोरोपंताविषयी मागे निर्देशिलेले डॉ. विल्सन-प्रणीत मत इतक्या जोमदारपणे मराठीत प्रतिपादन करण्याचा पहिला मान कालक्रमाने बहुधा कृष्णशास्त्री चिपळूणकराकडेच येतो.

कृष्णशास्त्री चिपळूणकरासारख्या रसिक श्रेष्ठाची ही गत तर इंग्रजी आवडीनिवडीच्या इतर नवशिक्षित पदवीधरांची स्थिति सांगावयास नको. सर्वसामान्यांना आवडणाऱ्या या मराठी कवितेवर टीकेचे शरसंधान करण्यात त्यांची आपापसात जणु अहमहमिका लागलेली दिसते. एकाने कवीला 'यमक्या' म्हणावे तर दुसऱ्याने काव्य दुर्बोध म्हणून त्याज्य मानावे. एकाने त्यातील अलंकारिक पध्दतीची 'कृत्रिम' म्हणून अवहेलना करावी तर दुसऱ्याने या बाह्य आभूषणावरच दंग झालेली जुनी रसिकताच तिरस्करणीय ठरवावी. एकाने कवितेतील श्लेषाबद्दल नाक मुरडावे तर दुसऱ्याने 'साधारण कवि' म्हणून गणना करावी असा एकंदर या साऱ्या टीकाकारांचा मोरोपंतांच्या कवितेच्या बाबतीत प्रकार ठरून गेला होता. 'राजा शिवाजी' या काव्याचे कर्ते म. मो. कुंटे हे तर वामन मोरोपंतादि साऱ्याच पंडित कवींना degenerate Sanskrit Marathi poets अशा पदवीने संबोधताना दिसतात. 'श्लेषयमकाने खचून भरलेली' असा या कवितेबद्दल त्यांनी ग्रह करून घेतला होता आणि अशी कृत्रिम कविता करणारा कवि म्हणून मोरोपंताना ते 'हीन कवि' समजत असत. १८६३ साली विद्यार्थि-दशेत असताना एल्फिन्स्टन स्कूल पेपरमध्ये जो टीकालेख त्यानी लिहिला तो मागे* उद्धृत केलाच आहे. त्याच उताऱ्यातील मोरोपंताविषयीचे हे उद्गार कुंटे यांच्या मताच्या दृष्टीने लक्षणीय ठरतील.

> Moropant is deisdedly the degenerate poet of the degenerate sanskrit age when the

‡ निबं. अं. ५९   * प्रस्तुत पुस्तकाची पृष्ठे ६१–६२ पहावी

Brahmans betray a great want of invention, arrangement and originality when whatever is old is admired immoderately and when unable to write original treatises in any department but actuated by the desire of writing, they reproduce the sentiment of the old Sanskrit poets in Marathi for the good of the ignorant as they allege. Read Moropant as much as you like, you will find nothing new but the stale thoughts in elaborate, grand and artificial style and loaded with ornaments which cannot but disgust a reader of taste.

मागे उद्धृत केलेल्या इंग्रजप्रणीत टीकेवरील मराठी विद्वानांनी केलेले हे 'भाष्य' लक्षणीय ठरेल.

'कविभूमिका' म्हणजे ब्रह्मवाक्य नव्हे !

दादोबा पांडुरंग आणि परशुरामपंत गोडबोले यांचे मोरोपंतांच्या केकावलीवर जे दोन टीकाग्रंथ १८६५–६६ च्या सुमारास एकामागोमाग बाहेर पडले त्याचा थोडाबहुत सुपरिणाम मराठीच्या टीकाक्षेत्रावर झाल्याशिवाय राहिला नाही. या ग्रंथांच्या रचनेमुळे एका बाजूने मोरोपंती कवितेचा विचार प्रसिद्ध होऊ लागला; स्तुति–निंदात्मक स्वरूपाचे उडते उल्लेख जाऊन त्याऐवजी गुणदोषविवेचनात्मक टीका बाहेर पडू लागली आणि दुसऱ्या बाजूने टीकेच्या लेखनप्रकारातही एक प्रकारची शिस्त दिसू लागली. १८६७ साली 'केकादर्श' या टीकेचे परीक्षण करताना गुंजीकरानी काव्यावरील टीका–ग्रंथ कशा स्वरुपाचे असावे याविषयी जे विचार व्यक्त केले ते याच वृत्तीचे द्योतक आहेत. गुंजीकर लिहितात—

> ही मोरोपंतकृत केकावलीची फार पाल्हाळ न करता केलेली टीका आहे... केवळ कवीचा भावार्थ स्पष्ट केला

> इतक्यानेच टीकाकाराचे सगळे काम झाले असे आमचे मत नाही. हे पुस्तक केवळ नवशिक्याकरताच नव्हे, परंतु विशेषेकरून विद्वान लोकांस याचा उपयोग व्हावा एतदर्थ केले आहे असे टीकेच्या रचनेवरून दिसते. *

यापुढे 'केकावली' काव्याचे महत्व आणि स्वरूप लक्षात घेता केकादर्श–काराने त्याचे गुणदोषविवेचन करावयास हवे होते असे मत गुंजीकरानी व्यक्त केले आहे.

> मोरोपंताच्या स्वकल्पित ग्रंथामध्ये हा ग्रंथ मुख्य असून यात त्याने शब्दपांडित्य पुष्कळ दाखविले आहे व याच ग्रंथावरून काय ती त्याची कविताशक्ति विशेष दृष्टोत्पत्तीस येणार. याकरिता तिजमध्ये वास्तविक प्रशंसेस पात्र जे पुष्कळ गुण आहेत ते दाखवून तद्नंतर मोरोपंताचे शब्द म्हणजे केवळ ब्रम्हवाक्य ही कल्पना सोडून त्याच्या प्रीतीच्या एकशे एकवीस श्लोकामध्येच जो पूर्वापर असंगतपणा किंवा इतर दोष असतील तेही दाखविणे हा टीकाकाराचा धर्म आहे.

कवीचे शब्द केवळ ब्रम्हवाक्य ही कल्पना सोडून कवीच्या गुणाप्रमाणेच दोषांचाही विचार निर्भीडपणे व्हावा ही गुंजीकरांची सूचना टीका-शास्त्रातील गुणदोषविवेचनाचे कार्य लक्षात घेता मार्मिक आहे. कविभूमिका ही कवीची दृष्टी सांगणारी आणि क्वचित समर्थनात्मक स्वरूपाची असू शकते आणि म्हणूनच परीक्षकाने बेतास बात एवढेच तिचे साह्य घ्यावयाचे असते. 'किंबहुना निर्मिति आणि आस्वाद यांच्या मूल्यकल्पनेत अंतर पडत असले तर कविभूमिकेपेक्षा आस्वादकाचीच भूमिका ग्राह्य मानणे जास्त सयुक्तिक ठरते; या दृष्टीने गुंजीकरानी व्यक्त केलेला हा विचार लक्षणीय आहे.

गुंजीकरानी केवळ 'टीकाकाराचा धर्म' सांगितलेला नाही; तर

---

* विस्तार पु. १ अं. ४

केकावली काव्यात पूर्वापर असंगतपणा कोठे कोठे दिसतो त्याची उदाहरणे थोडीबहुत दाखविली आहेत. उदाहरणार्थ ९६ व्या केकेतील 'जशी जगदघक्षयी कर भवन्नदी नावरी' हा चरण 'म्हणे अगइ' या १० व्या केकेशी अर्थदृष्टया विसंगत ठरतो असे त्यांचे म्हणणे दिसते. अशी थोडीबहुत उदाहरणे देऊन गुंजीकर म्हणतात--

> अशा प्रकारचा पूर्वापर विरोध आणि याशिवाय त्याच्या कल्पनेच्या ओघाचे पुनः जाहलेले परिभ्रमण इत्यादि॰ काविषयी टीकाकाराची मते 'केकादर्श' मध्ये आली असती तर फार चांगले झाले असते.

दोषदर्शनाकडे कल

विविधज्ञानविस्ताराच्या संपादकानी 'केकादर्श'वर अभिप्राय देऊन तेवढयावरच मोरोपंताच्या कवितेची बोळवण केलेली दिसत नाही. विस्ताराच्या पुढल्याच अंकात मोरोपंत हा विषय † चर्चेला घेऊन त्यातून मोरोपंती कवितेचा बराच विस्तृतपणे परामर्श केलेला आढळतो. ७ व्या अंकातील आपल्या टीकालेखाच्या उपसंहारात इतर प्राकृत कवीं-प्रमाणे मोरोपंत शृंगाराबद्दल फारसा चावटपणा करीत नाही असा जो मुद्दा मांडला आहे तो दादोबा पांडुरंगानी आपल्या यशोदापांडुरंगीच्या प्रस्तावनेत मोरोपंताच्या शृंगारवर्णनाविषयी केलेल्या विवेचनाशी सदृश आहे. पण हा एक गुण सोडला तर 'विस्तारा'तील या दोन्ही लेखांकात गुणांपेक्षा दोषांचीच यादी विस्तृत आहे. मोरोपंतांच्या कवितेतील यच्चयावत दोष एकत्र पाहण्याच्या दृष्टीने मात्र हे विवेचन बरेच उपयोगी पडेल. परंतु ते वाचताना एक गोष्ट सारखी जाणवत राहते; ती ही

† 'केकादर्श'चे हे परीक्षण गुंजीकरांचे असून मोरोपंतावरील (अं. ५ व अं. ७) दोन लेख मात्र कोणा 'गं. शिनारी' या लेखकाचे आहेत असे 'विविधज्ञानविस्तार लेख-सूची' मध्ये दाखविलेले दिसते. (पाहा— **वि. वि. लेख सूचि,** सौ. पुष्पा भावे, १९६८ —**साहित्य चर्चा** पृ २ आणि **परीक्षणे** पृ. ५७)

की नव्या नव्या पुस्तकांची परीक्षणे करताना सुधारणेची दृष्टी बाळगल्यामुळे त्यात गुणांपेक्षा दोषांचाच विचार प्रामुख्याने येणे अपरिहार्य असले तरी जुन्या ग्रंथाबद्दलही दोषैकदृष्टि बाळगून निभण्यासारखे नव्हते. उलट कवि आणि त्याचा काल यांचा अभिरुचिदृष्टया विचार करून ती अभिरुचि आज घटकेला कितपत योग्य ठरते या विचाराच्या बरोबरीने त्या अभिरुचीचा आस्वाद कोणत्या स्वरुपाचा होता तो विशद करणे हेही टीकाकारांचे कर्तव्य होते. मोरोपंतावर लेख लिहिणारा हा 'विस्तारातील' टीकाकार मात्र मोरोपंताच्या कवितेचे गुण समजावून देण्याऐवजी त्यातील दोषच मोठ्या हुरुपाने सांगत आहे असा भास हा लेख वाचताना पदोपदी होतो. किंबहुना टीकाकाराने न्यायाधीशाचा दंड हातात घेतला असून तो कवीच्या विरुद्ध एकापाठोपाठ एक आरोप करीत अ हे आणि कवीला मात्र आपला बचाव करण्यास यत्किंचितही वाव नाही असेही दृश्य या लेखाच्या वाचनाने सतत जाणवत राहते. लेखक लिहितो—

> त्याने जी कविता केली ती सर्व स्वतःचे कीर्तीसाठी केली, परमेश्वराचे गुणवर्णन करण्यासाठी रचिली नाही. सूक्ष्म पाहिले असता मोरोपंत ईश्वराला फारच थोडा मान देत असे... यमक जोडण्यासाठी ज्याने भगवंताला 'शिनळ' असे विशेषण दिले त्याची भक्ति केवढी होती ते सहज ध्यानात येईल...
>
> मोरोपंताने बाबूजी नायकावर तीन चार आर्या केल्या आहेत त्या तर कोणीही साधारण मनुष्य देखील करूं शकला असता. याचे कारण मोरोपंताच्या हृदयात कृतज्ञता फारच थोडी होती. मनःपूर्वक जे भाषण आपण करतो तेच चांगले निघते...
>
> मोरोपंताला आपली कविता सर्वोत्कृष्ट वाटत असे ...आपली योग्यता व्यासवाल्मीक्यादिपेक्षा काही अंशी (त्याला) अधिक वाटत असे असे दिसते†

† विस्तार पु. १ अं. ५

जुन्या–नव्या अभिरुचीचा विचार

मोरोपंतांचे दोष दाखविता दाखविता लेखकाची नजर मध्येच त्यांच्या भक्ताकडे वळली असून त्यांच्या अभिरुचीबद्दलही या लेखात त्याने मधून मधून चिमटे घेतलेले दिसतात. मोरोपतांच्या विराट-पर्वातील 'न्यावा चमूवरि तुवा रथ तरुणीप्रति जसा स्मरे तरुण' ही अर्जुनाच्या तोंडची आर्या उद्धृत करून लेखक लिहितो--

> वीर–रसात शृंगार–रस मिसळल्याने काव्यास कशी गोडी येत असते ती एक मोरोपताचे भक्तच केवळ जाणत असतात; इतरास अतर्क्यच.

याचप्रमाणे रामायणातील 'सेतु न तो' ही आर्या देऊन लेखक म्हणतो--

> काय हा अलंकार! रावणाने जर दुसऱ्याची बायको आणली तर त्याच्या स्त्रियेला ते बरे वाटेल काय? सहसा वाटणार नाही. तर मग तिची उगाच का वेणी धरून ओढावी?..रा. ब. भास्कर दामोदर पाळंदे यांनी नवनीताचे प्रस्तावनेत ह्या उत्प्रेक्षेची फारच प्रशंसा केली आहे त्याला तीजमध्ये काय जो चमत्कार वाटला असेल ते असो. आमचे मत तर अगदी भिन्न.

याप्रमाणे मोरोपंताच्या भक्तांवर आणि त्यांच्या अभिरुचीवर ताशेरे उडवून अशा अभिरुचीच्या जाळ्यात सापडल्यामुळेच मोरोपतांच्या कवितेला हीन वळण लागले असाही निष्कर्षवजा अभिप्राय लेखाच्या शेवटी दिलेला आहे.

> मोरोपंताचे लक्ष इतर अलंकारापेक्षा यमकादिकांवर विशेष होते यात सगळा अपराध त्याचाच नव्हे. त्याच्या वेळच्या विद्वज्जनांची अभिरुचि काही विलक्षणच होती. गूढ व दुर्बोध शब्द ज्याच्या लेखनात येतात त्यालाच काय ते विद्वान म्हणावयाचे; इतरांस मूर्ख नाहीतर प्राकृत म्हणत असत.

या लेखामध्ये मोरोपंतांच्या कवितेतील जे दोष दाखविले आहेत ते बहुतांशी विल्सन–कुंटे प्रणीत किंवा तसल्याच धर्तीच्या नव्या इंग्रजी मूल्यांशी जास्त जवळचे वाटतात. विल्सनने मोरोपंतांच्या भक्तीच्या धरसोडपणाबद्दल शंका घेतली तर या लेखकाने त्यांच्या कृतज्ञतेबद्दल घेतली एवढाच काय तो फरक. 'मोरोपंतांचे उद्‌गार अंतःकरणापासूनचे नव्हत आणि अंत.करणापासून निघते तेच खरे काव्य असल्यामुळे मोरोपंतांची कविता हीन प्रतीची ठरते' हा यातून उमटणारा सूर नव्या इंग्रजी मूल्याला धरून आहे हे सांगावयास नको. विशेषतः 'सेतु न तो' या आर्येविषयी लेखकाने जो आक्षेप घेतला आहे तो तत्कालीन 'रोमँटिक' टीकाकारांच्या कल्पनेत वावरणाऱ्या, कुंटे–मराठे यांनी बोलून दाखविलेल्या आणि दादोबा पांडुरंगांच्या प्रस्तावनेतही निर्देशिलेल्या स्त्री–दाक्षिण्याच्या रूढ व इंग्रजप्रणीत कल्पनेला साजेसाच आहे. मोरोपंती कवितेला 'स्त्री-दाक्षिण्या'चे हे मूल्य लावून दाखविण्याचा प्रयत्न जसा दादोबानी केला तसाच तो प्रस्तुत लेखकानेही केलेला दिसतो. दादोबांनी मोरोपंती कवितेचे कौतुक करण्यासाठी त्या मूल्याचा उपयोग केला तर प्रस्तुत लेखकाने दोषदर्शनासाठी ते जवळ बाळगले एवढाच काय तो फरक. एकाच कालखंडातील दोन टीकाकारांनी एकच मूल्य आपल्या उपयोगाकरता वापरावे यात म्हटले तर त्या मूल्यकल्पनेचे टीकाकारांना वाटणारे आकर्षण सिद्ध होते असे या निमित्ताने कोणी म्हटल्यास ते अगदीच चुकीचे ठरणार नाही. पण त्या मूल्यकल्पनेचा नावीन्यापलीकडे फारसा उपयोग झालेला नाही हेही विसरून चालता येत नाही.

रानडे यांची 'द्वयाश्रयी' भूमिका

याच सुमारास परशुरामपंत गोडबोले यांच्या केकादर्शाच्या निमित्ताने केलेले केकावली काव्याचे आणखी एक परीक्षण पाहावयास मिळते व ते म्हणजे रा. ब. माधवराव रानडे यांचे होय. १८६६–६८ साली ओरिएंटल ट्रान्स्लेटरच्या हुद्यावर असताना रानडे यानी सरकारी

रिपोर्टराच्या भूमिकेवरून जी पुस्तक-परीक्षणे केली त्यातच गोडबोले यांच्या केकादर्शाचे हो परीक्षण त्यानी केले आणि ते माधवरावजींचे विद्यागुरु आणि त्या काळातील विद्याखा याचे डायरेक्टर सर अलेक्झांडर ग्रांट यानी 'एज्युकेशनल रेकार्ड'च्या नोव्हेंबर १८६७ च्या अकात प्रसिद्ध करविले. रानडे यांचा केकावलीवरील हा अभिप्राय इंग्रजीत असला तरी तो त्यांच्या विवेचक गुणाचा व विवेकी टीकेचा एक उत्तम नमुना म्हणावा लागेल. शिवाय मोरोपंतांच्या कवितेसारख्या लोकप्रिय विषयाबद्दलची त्यांची मते समजावून घेण्याच्या दृष्टीनेही तो उपयोगाचा ठरतो.

हा अभिप्राय लिहिण्यापूर्वी माधवरावजींनी आपल्याकडून बरेच परिश्रम घेतलेले दिसतात. परंतु त्या काळी परंपरेने चालत आलेली मोरोपंतांच्या कवितेतील अनेकार्थसंभवाविषयीची समजूत त्यांच्या मनात दृढ झाली आहे असेही दिसते. मोरोपंताच्या काळापासून कीर्तनात ज्या हरिदासानी आर्या म्हणण्याचा प्रघात पाडला त्या रामजोशादि व्युत्पन्न रसिकांनीच आपल्या समोरच्या 'श्लेषप्रिय' श्रोत्यांना क्षणभर दंग करण्यासाठी पंतांच्या आर्याचे 'विशाल' अर्थ उलगडून सांगण्याचा उपक्रम चालू केला होता. एका आर्येचे अनेक अर्थ सांगण्याच्या हरिदासांच्या या पद्धतीमुळे अजाणतेपणाने का होईना तत्कालीन श्रोत्यांच्या मनात पंतांच्या कवितेविषयी भलते समज निर्माण करून ठेवले. 'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे' या आर्येचे जे वेगवेगळे अर्थ सांगितले जात ते सर्वच जाणत्या रसिकांना मान्य होते अशातली गोष्ट नव्हती. परंतु या समजुतीच्या भरीस पडून खुद्द दादोबा पांडुरंगासारख्या रसिक टीकाकारानी केकावलीतील पहिल्या मंगलाचरणरूप केकेचा अद्वैतपर अर्थ उलगडून सांगण्याचा जो उत्साह दाखविला आणि १३ व्या केकेतील 'हरिमदापहे' या पदातील 'हरि' शब्दाचे वेगवेगळे अर्थ लावण्यात जे पांडित्य प्रकट केले त्यामुळे बहुधा रानड्यांचा केकावलीतील अनेकार्थत्वाविषयीचा समज दृढ झाला आणि म्हणूनच 'केकावली' बद्दल लिहिताना त्यानी पुढीलप्रमाणे उद्गार काढले--

> With authors who mean only one thing and whose sole object is to give an expression to that meaning without casting any side-glances, there is no difficulty. But in works of art of our national poetry like the one under consideration, it may be counted on as a rule that the author did intend to be variously understood. This capacity of being diversely rendered is deemed to be a great merit and authors take very considerable pains to succeed in this line

केकावलीतील हा अनेकार्थ उलगडून न सांगितल्याबद्दल रानड्यांनी केकादर्शकार गोडबोले याना दोष दिला असून पुढल्या आवृत्तीत हा दोष काढून टाकण्याची शिफारसही केली आहे.

परंतु या दोषाबरोबरच रानडे यांना केकावलीत आणखी एक दोष जाणवलेला दिसतो. तो अर्थातच त्यांच्या 'समाजिस्ट' वृत्तीच्या दृष्टिकोनातून निर्माण झाला आहे. दादोबा पांडुरंगानी आपल्या यशोदा-पांडुरंगी'च्या प्रस्तावनेत मोरोपंतांच्या अद्वैतपर भक्तीविषयीचा थोडा बहुत उलगडा केला असून त्या अद्वैत भक्तीतूनच निर्माण झालेल्या देव आणि भक्त यांच्यातील सलगीचा आणि त्यातून सकृद्दर्शनी विचित्र वाटणाऱ्या केकावली काव्यातील कविभूमिकेचा उहापोह तेथे आला आहे. रानडे यांचा धर्मविषयक दृष्टिकोन या अद्वैतपर भूमिकेहून काहीसा वेगळा असल्यामुळे आपल्या दृष्टीने उत्कृष्ट वाटणारी भक्ति-विषयक कल्पना लक्षात घेऊन त्यानी केकावलीचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. रानडे लिहितात--

> It is, as I have said, a hymn addressed to the Deity and belongs to the devotional class of poetry. The devotional breathings are, however, of a sort which can be understood and relished in this country alone. There is

> no awe about the Deity, nothing of terror surrounding his glory, no humiliation of spirit on the devotee's part, no dazzling of sight at the awful vision. The relations between the worshipper and the worshipped are exceptionally free; every now and then there is a side-thrust and a push at the Deity which can be understood, if not relished in a country where both the Prevailing philosophy and theology place man almost on an equality with God and advocate either his present unity with or his future absorption in God. This kind of philosophy is destructive of all real devotion.

गंमत अशी की येथे रानड्यांची विवेकी दृष्टि कायम असली तरी रसिकता आणि धर्मविषयक श्रद्धा यातील द्वयाश्रय बुद्धि मात्र स्पष्टपणे उमटून बाहेर आली आहे. काव्यगुणाच्या दृष्टीने केकावली काव्याची सरसता मान्य करूनही त्यातील आशयामुळे ते काव्य उच्च पातळीवरील विचारवंतांना मात्र तितकेसे रुचण्यासारखे नाही असा अभिप्राय रानडे या प्रकरणी देतात—

> As a work of art there is not another equal to it in the language. As a devotional hymn it does not strike harsh to the orthodox reader, but it is disqualified for any higher acceptance by the fault above pointed out.

रानड्यांचा हा अभिप्राय पाहिला म्हणजे 'विठोबाच्या नावामुळे तुकारामाचे अभंग नासले' या तत्कालीन मिशनऱ्याच्या अभिप्रायाची आठवण होते. श्लेषपूर्णतेतील द्विसंधानावर टीका करणाऱ्या रानड्यांच्या लेखणीतून असा 'द्विसंधानपर' अभिप्राय निघावा हे एकापरीने त्यांच्या द्वयाश्रयी भूमिकेचेच द्योतक नव्हे काय? अभिव्यक्ति योग्य असूनही आशय जर योग्य नसला तर ते काव्य सरस ठरू शकते काय असाही

एक मूलभूत प्रश्न या विवेचनातून उपस्थित होत असल्यासारखा वाटतो परंतु एकतर हा प्रश्न खुद्द रानड्यांना अभिप्रेत असेल असे वाटत नाही आणि दुसरे म्हणजे येथे आशय व अभिव्यक्ति यांची क्षेत्रे एक नाहीत. धर्मविषयक समजुती आणि काव्यविषयक अभिरुचि यात अंतर पडत चालल्यामुळेच नवशिक्षित पिढी जुन्या परंपरेला आणि त्या परंपरागत मूल्यातून मिळणाऱ्या आस्वादाला झपाट्याने दुरावत असल्याचा धोका मात्र रानडे यांच्या या द्वयाश्रयी भूमिकेतून केलेल्या टीकेमध्ये जाणवल्यावाचून राहत नाही.

अशारीतीने जुन्या वळणाच्या आर्या-पंडितांची व सर्वसामान्यांची रसिकता एका बाजूला तर कृष्णशास्त्री चिपळूणकरासारख्या संस्कृती वळणाच्या शिष्ट पंडिताची व कुंटे–रानडे यासारख्या नव्या पदवीधरांची रसिकता दुसऱ्या बाजूला असे जे दृश्य या काळात दिसते ते मूल्यमापनाच्या क्षेत्रात काहीसा गोंधळ करणारे ठरले तर त्यात नवल नाही. पण त्याचा परिणाम वाङ्मयनिर्मितीवर आणि जुन्या अभिरुचीवर विशेष झाला. संस्कृती वळणाच्या शास्त्री–पंडितानी केलेली उपेक्षा आणि सुशिक्षितानी चालविलेली हेटाळणी या दोन्ही गोष्टी मराठी भाषेच्या हिताला विघातकच ठरल्या. १८६२ सालानंतरच्या काळात संस्कृत भाषेचा पक्ष बळावून देशी भाषांची विद्यापीठातून हकालपट्टी झाली होती त्यालाही या जुन्या–नव्या पंडित वर्गाची मराठीविषयीची उदासीनताच कारणीभूत होती. विशेषत: संस्कृती वळणाच्या शास्त्री पंडितापेक्षाही नव्या सुशिक्षितांच्या उदासीनतेमुळे मराठीच्या पीछेहाटीच्या सरकारी भूमिकेला विशेष बळ चढत होते. जुन्या मराठीविषयी प्रेम नाही, पूर्वपरंपरेचा पाठिंबा नाही, फार काय मराठी भाषेचेही पुरेसे ज्ञान नाही असा नवा पदवीधर वर्ग जेव्हा जुन्या मराठी कवितेवर टीका करू लागला तेव्हा मिशनरी लोकांचीच टीका आपण पुन्हा ऐकत आहोत असा भास महाराष्ट्राला झाला असल्यास नवल नाही. मिशनरी लोक तर आधीच मराठीतील जुन्या कवितेच्या शुद्धत्वाविषयी साशंक होते. मराठीतील जुना शृंगार दुराचरणाने लडबडलेला, कथा

पाहाव्या तर पुराणातील भाकडकथांचीच नवी आवृत्ती आणि काव्ये म्हटली तर ती म्हणजे निवळ भाषांतरे अशी मिशनऱ्यांची मराठीकडे पाहण्याची सर्वसाधारण दृष्टी होती. तुकारामासारख्या कवीची कविता साधी आणि स्वतंत्र खरी पण ती सुद्धा विठोबाच्या नावाने त्यांना बाटलेली वाटे. संस्कृत काव्याकडे सुद्धा याच पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहिले जाई, मग बिचाऱ्या मराठीचा पाड तो काय ! गंमत अशी की अशा दृष्टीच्या 'रसज्ञ' पंडितांना मराठी विद्याखात्यात मान होता आणि ज्यांच्याकडे मराठीच्या विद्याखात्याची सूत्रे सोपविण्यात आली होती ते सरकारी अधिकारीही या मिशनरी पंडितांच्या इतकेच दुराग्रही असत. मेजर क्यांडीसाहेबासारख्या प्रमुख विद्याधिपतींचा तर लौकिक * असा सांगतात की जोपर्यंत गद्य आहे तोपर्यंतच काय ते त्यांचे पांडित्य. पद्य आले की तो मग साहेबांचा विषय नव्हे. एखादी ओवी का असेना, ती आली की लागलीच त्यांचे 'पंडित' गोडबोले यांच्याकडे ती जावयाची. पण क्यांडीसाहेबांची विद्वत्ता ही अशी असली तरी सरस्वतीच्या दरबारातील तुलाध्यक्षाचे काम त्यांच्याकडेच असावयाचे आणि त्याचा परिणाम व्हायचा तोच होत असे. या साहेबांची मराठीविषयी जी हेकटपणाची व कोती मते असत त्यांची धग त्यांच्याकडे अभिप्रायासाठी येणाऱ्या वा सरकारी खात्यातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या पाठ्य-पुस्तकांनाही लागत असे. १८७८ साली नवनीताची जी नवी आवृत्ति काढण्यात आली त्यातून मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्या कवितेचे वेचे वेदांतपर आणि दुर्बोध म्हणून गाळून टाकण्यात आले. 'सर्वसंग्रहा'सारख्या जुन्या कविता छापणाऱ्या मासिकाचा सरकारी आश्रय तोडला आणि 'काव्येतिहाससंग्रह' या मासिकाने मदतीसाठी केलेल्या विनंतीस नेहमीचा रोखठोक शेरा † आला की 'तुमच्या पुस्तकाची विद्याखात्यास बिलकुल जरूर नाही.'

सरकारदरबारी होऊ लागलेली ही हेळसांड आणि मिशनरी

* विद्याखात्यावर टीका-(लेखांक ३-केसरी, २५ जानेवारी १८८१)

† तत्रैव.

लोकांनी चालविलेली मराठीची निंदा ही या टीकाकारांच्या मराठी भाषेविषयीच्या उपेक्षेच्या वा तिरस्काराच्या वृत्तीमुळे अधिकच वाढली आणि मराठीविषयीच्या मानापमानाच्या कल्पनेतही अनास्था आणि अभिमानशून्यता यांचे वारे खेळू लागले. १८६२ च्या सुमारास मुंबई विद्यापीठातून बाहेर पडलेल्या रानड्यांसारख्या पदवीधरांच्या पहिल्या पिढीला मराठी भाषेचे काही तरी ज्ञान होते. पुढल्या पिढीला तेही मिळण्याची सोय राहिली नाही. त्याचा परिणाम या पदवीधरांच्या मराठी लेखनावरही व्हायचा तोच झाला. रावसाहेब मंडलीक, वि. ज. कीर्तने यासारख्या श्रेष्ठ पदवीधरांच्या ग्रंथातील भाषा मिशनऱ्यांच्या भाषेची बहीण शोभावी अशी होती. बी. ए. झालेल्या विद्वानांनी इंग्रजीत प्रस्तावना लिहाव्या पण मराठी मात्र अर्धेकच्चे बोलावे अशी स्थिति दिसू लागली. एका बड्या तत्कालीन पदवीधराची गोष्ट * सांगतात की त्यास काही ठेचायाचे होते. तेव्हा ते पाकशाळेत आपल्या पत्नीकडे गेले आणि तिला म्हणू लागले, 'अग, ते दगड कोठे आहेत? ते असे असे फिरवायाचे व वाटायाचे ते?' त्यांच्या मनात पाटावरवंटा म्हणावयाचे होते, पण शब्द कोठून आठवावा? साऱ्या जन्मभाषेवर एकदाच पाटा-वरवंटा फिरून जावा अशी डायरेक्टरप्रमुख पंडितसमाजाने पक्की तजवीज करून ठेवली होती. तत्कालीन पदवीधरांचे मराठी भाषेविषयी किती लज्जास्पद अज्ञान होते याचे हे नमुनेदार उदाहरण आहे. 'राजा शिवाजी' या काव्यातील कुंटे यांची ओबडधोबड भाषा ही वस्तुत त्यांच्या पूर्वपरंपरेविषयीच्या किंवा मराठी भाषेविषयीच्या अज्ञानाचीच काही अंशी द्योतक होती. वाङ्मयनिर्मितीत जशी ही अनास्था दिसते तशीच एकप्रकारची अभिमानशून्यताही दिसते. त्या काळात मराठीमध्ये जे ग्रंथलेखन चालले होते ते बहुतांशी दक्षिणेच्या लोभाने वा प्रोत्साहनानेच होय. अशी स्थितीत दक्षिणा प्राइझ कमिटीच्या किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या मान्यतेस उतरेल अशा पद्धतीने चरित्राची वा इतिहासाची निवड व्हावी हे क्रमप्राप्त होते. १८५०

* तत्रैव–लेखांक २, केसरी १८ जाने. १८८१

सालानंतरच्या पंचवीस वर्षांत जी बारा चरित्रे प्रसिद्ध झाली त्यातील अकरा चरित्रे पाश्चात्य स्त्री-पुरुषांची आणि एकच काय ते आपल्या-कडील नाना फडणविसाचे आणि तेही मॅक्डोनाल्डच्या इंग्रजी बखरीच्या आधाराने लिहिलेले ! इतिहासलेखनाच्या बाबतीत त्या काळातील एक प्रमुख लेखक विनायक कोंडदेव ओक यांनी आपल्या 'हिंदुस्थान कथारस' या पुस्तकाच्या लेखनाबद्दलचा जो अनुभव सांगितला आहे तोही मोठा बोधप्रद ठरेल. ओक लिहितात, 'मी पुस्तके लिहावयास बसलो त्यास सगळा आधार काय तो सरकारचा होता. पुस्तकास आश्रय मिळण्याचे सगळे धोरण मराठी ट्रान्स्लेटरांच्या अभिप्रायावर असे. आणि तेव्हा मराठी ट्रान्स्लेटर परलोकवासी मेजर क्यांडी होते... त्यास सरकारच्या किंवा सरकारी कामदारांच्या विरुद्ध खरा प्रकार असला तरी त्याचे एक अक्षरही सहन होत नसे आणि ग्रंथाचे शुद्धीकरण त्या दृष्टीने होई त्यास मान्य व्हावे लागे.' येथपर्यंतचे ओकांचे निवेदन ठीक आहे. पण याच इतिहासाच्या शेवटी 'जे हे राज्य आम्हा रयतेला सुखावह आहे ते परमेश्वर कृपेने आम्हावर निरंतर असो' असे जे भरत-वाक्य ओकानी लिहिले ते त्यांच्या इंग्रजधार्जिण्या वृत्तीचेच निदर्शक नाही काय ? ललित लेखनाच्या बाबतीतही अशीच परप्रत्ययनेयता दिसून येते. योगी नावाच्या एका लेखकाने प्रेमबंधन या नावाची एक कादंबरी लिहून सरकारी बक्षिसासाठी पाठविली होती. त्यात सुरवातीला 'ब्रह्मस्तुति' नावाचा एक लहानसा पद्यसमूह मंगलाचरण म्हणून लेखकाने जोडला होता. वरील कादंबरी जेव्हा मराठी ट्रान्स्लेटरांकडे अभिप्रायाकरिता गेली तेव्हा त्यांनी आपल्या समजुती-प्रमाणे बरा वाईट अभिप्राय दाखल करून पुस्तकाची शिफारस केली, पण एक विलक्षण आडकाठी मध्ये घालून ठेवली. ती ही की जर ग्रंथकार ब्रह्मस्तुति काढून टाकील तरच त्याच्या प्रती सरकारने उत्तेज-नार्थ घ्याव्या-आणि गंमत ही की या सरकारी उत्तेजनाच्या लोभाने ग्रंथकाराने ग्रंथातील ब्रह्मस्तुति काढूनही टाकली. ‡ अभिमान-शून्यतेचा याहून कळस तो कोणता ?

‡ केसरी, जाने. १८८१

मूल्यमापनाच्या क्षेत्रातील या काळातले सरकारधार्जिणेपणाचे आणखी एक उदाहरण लक्षात घेण्याजोगे आहे. 'नीलदर्पण' या नावाचे दीनबंधु मित्र यांनी बंगालीत लिहिलेले एक नाटक होते. नीळ पिकविलेल्या गोऱ्या साहेबानी बंगाली शेतकऱ्यांचे कसे शोषण चालविले आहे आणि त्यामुळे शेतकरी कुटुंबाची कशी वाताहत होत आहे याचे मोठे विदारक चित्र लेखकाने या नाटकात केले होते. या नाटकातील विषय गोऱ्या इंग्रजी अधिकाऱ्यांना तर राहोच, खुद्द इंग्रज सरकारलाही झोंबला. इंग्रजी अनुवादकर्ते मायकेल मधुसूदन दत्त हे ख्रिस्ती असूनही त्यांची नोकरी गेली तर रेव्हरंड जेम्स लाँग या इंग्रजी मिशन-ऱ्याला या नाटकाचे प्रकाशन केल्याबद्दल कारावास भोगावा लागला. § असे हे पुस्तक वाळवेकर नांवाच्या एका गृहस्थाने मराठीत आणले तेव्हा त्याचा हा 'भयंकर' पूर्वेतिहास लक्षात घेऊनच की काय 'ज्ञान-संग्रह' मासिकाच्या कर्त्यांनी या नाटकावर प्रतिकूल टीकेचा बराच मारा केला. 'काही साहेब लोक बंगाल्यातील रयतेवर जुलूम करितात ही गोष्ट ६०० कोस दूरच्या लोकानी नाटकद्वारा प्रसिद्ध केली ती मराठी वाच-णाऱ्यांचे पुढे आणण्यापासून यत्किंचितही फायदा नसून उलटे नुकसान आहे' असा आपला अभिप्राय प्रदर्शित करून वर 'नवीन शिकलेले नेटिव लोकांचे हे कर्तव्य आहे की इंग्रज लोकाविषयी (आपल्या देशबांधवांच्या) मनात पूज्यबुद्धि व सख्य उत्पन्न करण्याचा यत्न † करावा' असा त्यांनी वाळवेकरास उपदेश सुनविला आहे.

सामान्य वाचकांचे ज्ञानचक्षु म्हणून समजल्या जाणाऱ्या या नियत-कालिकातून प्रगट होणाऱ्या परप्रत्ययनेयी आणि अभिमानशून्य विचार-सरणीचा परिणाम सर्वसामान्य लोकांच्या मतावर होणे अगदी साहजिकच होते. त्यातच जुन्या शास्त्री पंडितांच्या आणि नव्या पदवीधरांच्या बोलण्यात मराठी वाङमयाविषयीचे तुच्छतापूर्वक उद्गार नेहमीच ऐकावयास मिळत होते. याचा परिणाम लोकांच्या मराठीच्या

§ मराठी वाङमयाचा इतिहास (खं. ४-पृ. ३३५-३३६ पाहा)

† ज्ञानसंग्रह पु. १ अं. ८ (आगस्ट १८७२)

मूल्यमापनविषयक दृष्टिकोनात जाणवू लागला आणि सामान्य जनताही या महाजनांच्या पावलावर पाऊल टाकत मराठीविषयी अनादर प्रगट करू लागली. मराठी भाषा भिकार आणि मराठी ग्रंथही भिकार ठरले. मराठी वाचन करणे कमीपणाचे वाटू लागले. किंबहुना 'सर्व-संग्रहा'तली जुनी कविता वाचण्यात तादृश फायदा नाही अशी शिकवण चिरंजीवांना वडिलांकडून वेळोवेळी मिळू लागली. हरिदासांच्या तोंडून कीर्तनात मोरोपंतांच्या आर्या ऐकण्यापेक्षा मोरोपंतावर टीका करणे हा शिष्टसंमत मार्ग ठरला. जुनी काव्ये वाचणारे, त्याच्या प्रती तयार करणारे, ती कविता ओठावर खेळविणारे आणि पंतांच्या आर्या ऐकण्यासाठी हरिदासाच्या कीर्तनास धाव घेणारे जुने रसिक यच्चयावत् मूर्ख ठरले. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. जुन्या मराठी पोथ्यांचे महत्व नष्ट झाले आणि आणि त्या पोथ्यांचा गावोगाव प्रसार करणारा वर्गही ओसरत गेला. किंबहुना या जुन्या पोथ्यांची आता हॉवर्डच्या पहिल्या बुकाइतकीही किंमत नाही अशा विचाराने व्यंकटेशपंत केतकरांसारखे जुने ग्रंथविक्रेते आपल्या जवळचे पुस्तकाचे पेटारे खुशाल अग्नीच्या भक्ष्यस्थानी टाकू लागले. ‡

भर्तृहरीने 'सुभाषित जीर्ण होण्याला जी परिस्थिति लागते' म्हणून वर्णन केले आहे ती सारी यावेळी जुन्या मराठीच्या वाटचाला आली होती. सरकारी विद्याखात्यातील पूर्वग्रहदूषित इंग्रज अधिकारी, दक्षिणा प्राइझ कमिटीतील त्याच्या हाताखालचा द्वयाश्रयी वृत्तीचा 'नेटिव' वर्ग, मराठीच्या परंपरेविषयी विशेष माहिती नसतानाही तिच्यावर निंदेचा मारा करणारा मिशनरी वर्ग आणि त्यांच्या मांडीला मांडी लावून मराठीविषयी जेव्हा तेव्हा तुच्छतेचे उद्गार काढणारा शिष्ट पंडितांचा व पदवीधरांचा वर्ग यापैकी एकाच्याही कचाट्यात मराठीची दैना झाली असती. मग चौघांच्याही तावडीत सापडल्यावर तिच्या अवहेलनेला पारावार उरला नसला तर त्यात नवल ते काय ?

एकंदरीत एकोणिसाव्या शतकातील मराठीच्या मूल्यमापनाच्या

‡ डॉ. श्री. व्यं. केतकर–**महाराष्ट्रीयांचे काव्य परीक्षण** पृ. १२६

क्षेत्रात संदेहात्मक अवस्था निर्माण झाल्यासारखी वाटते. मुद्रणाचा नवा अलंकार मराठीला या काळात लाभला म्हणून हर्ष मानावा की जुन्या पोथ्यांचे पेटारे नष्ट झाल्याबद्दल सुस्कारा टाकावा हेच कळत नाही. देवाधर्माच्या बंधनातून मुक्त झालेली कला नाटक–कादंबरीच्या आश्रयाने काही नवे जग दाखवील म्हणून उमेद बाळगावी तर स्वतः कादंबरीकारच हिंदु लोकांच्या आयुष्यात मोहक सद्गुण नसल्याची केविलवाणी कबुली देताना आढळतो. तुलनात्मक बुद्धीचे हत्यार लाभल्याबद्दल बरे वाटावे तोच चिमुकल्या वाशिंग्टनच्या हातातील कुऱ्हाडीप्रमाणे या नव्या हत्याराने जुन्या मराठीचा गळा कापला जाणार की काय अशी शंका उत्पन्न होते. संस्कृत व इंग्रजी अशा दोन वळणाच्या रसिकतेने मराठीला नीट वळण लागेल म्हणून आशा करावी तर तीच रसिकता सर्व सामान्यांच्या जुन्या परंपरागत आवडीनिवडीला दाबून टाकत आहे असे भीतिदायक दृश्य दिसू लागते. या अंधकार-मय व अंदाधुंद वातावरणामुळेच हा अव्वल इंग्रजीचा कालखंड मराठी-तील 'तमोयुग' म्हणून संबोधण्याचा वाङ्मयाच्या अभ्यासकांना व इतिहासकारांना जो मोह पडतो तो योग्यच होय.

पण या तमोयुगाचा अंत करणारी नवी किरणे महाराष्ट्राच्या क्षितिजावर दिसू लागली होती.

पौर्वात्य आणि पाश्चात्य यांच्या संगमावर : २

कोणत्याहि दोन भिन्न राष्ट्रांचे कोणतेहि संप्रदाय एकाशी एक अगदी सारखे कधीहि मिळत नाहीत व तसे होणे हे शक्यहि नव्हे; कां की व्यक्तीव्यक्तींत जसा मनोधर्माचा भेद नेहमी दृष्टीस पडतो तसाच तो राष्ट्राराष्ट्रांतही अवश्य असायचाच.

स्वत्वाची जाणीव देणारा नवा टीकाकार

मराठी मूल्यमापनाच्या क्षेत्रात स्वतःच्याच घरात अपमानित होण्याची स्थिति जुन्या मराठीवर कशी येऊन पडली आणि ज्यांनीं तिच्या रक्षणाचा भार उचलावा ते तिचे पदवीधर पुत्रच तिला अवहेलनेनें कसे घायाळ करू पाहत होते हे आपण मागील प्रकरणांत पाहिले. पण अशी स्थिति जास्त वेळ टिकावी असा योगायोग नव्हता आणि क्षितिजाच्या एका बाजूला आभाळ काळवंडले असता दुसऱ्या बाजूनें दिनकराची तेजस्वी किरणे वर दिसू लागावीत असा देखावा लवकरच महाराष्ट्राच्या नजरेला पडला. इंग्रजी भाषारूपी वाघिणीच्या दुधानें ज्याच्या तेजस्वीपणाला नवी कांति चढलेली आहे असा एक नवा टीकाकार जेव्हा धीरोद्धत पावले टाकीत १८७२ च्या सुमारास टीकाक्षेत्रांत आला आणि 'वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव समज'

अशा शब्दात जेव्हा जुन्या रथीमहीरथींना आव्हान देऊ लागला तेव्हा क्षणभर 'हा कोण संप्रति नवा पुरुषावतार' म्हणून मराठी भाषा त्याच्याकडे स्तिमित होऊन पाहत बसली असल्यास नवल नाही. हा नवा टीकाकार कृष्णशास्त्री चिपळूणकराइतकाच संस्कृत साहित्य-शास्त्रांतला दर्दी होता इतकेच नव्हे तर प्रसंगी वेणीसंहारासारख्या संस्कृत नाट्यप्रयोगांत जातीने भाग घेण्यापावेतो त्याच्या रसिकतेची मजल चार पावले पुढेच होती. पण त्याबरोबरच कृष्णशास्त्रींच्या ठिकाणी नसलेले मराठीविषयीचे प्रेम लहानपणापासून त्याच्या नसानसात संचरले होते. शाळेत शिकत असताना वडिलाच्या कचेरीतील सर्व-संग्रहाच्या फायली त्याने कारकुनाकडून घरी आणून हौसेने चाळल्या होत्या आणि 'याचा तुला तादृश उपयोग नाही' म्हणून वडिलानी निषेध केला असताही त्याची हौस नष्ट झाली नाही. पन्हळकरबुवांच्या तोंडच्या मोरोपंती आर्या त्याला ऐकायला मिळाल्या होत्या आणि दादोबा पांडुरंगाच्या यशोदापांडुरंगी टीकेने तर वयाच्या पंधराव्या वर्षापासून मोरोपंती कवितेविषयी ओढ उत्पन्न केली. काव्याइतकीच इतिहासाची त्याची आस्था लोकहितवादीइतकीच प्रखर होती. मोरो-पंतांच्या आर्येप्रमाणेच पेशवाईतील शूर कर्त्या पुरुषांच्या आख्यायिकाही त्याला वृद्ध पुरुषाच्या तोंडून ऐकायला मिळाल्या. इतिहासाच्या वाचनाने त्याच्या स्वदेशाविषयीच्या अभिमानाला पालवी फुटली आणि गटेसारख्या अन्यदेशीय विद्वानाच्या तोंडून शाकुंतलाविषयी निघालेले गौरवाचे उद्‌गार पाहून त्याच्या शरीरावर आनंदाचे रोमांच उठले होते. इंग्रजीच्या शिक्षणाने नव्या रसिकतेची आणि मूल्यांची त्याला ओळख झाली आणि त्याच्या स्वदेशाविषयीच्या अभिमानाला चिकित्सेची नवी जोड मिळाली. इंग्रजीतील मेकॉलेचे टीकालेख पाहून—त्याच्या टीकालेखनाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून—डौल-दार टीकालेखन करण्याचे ध्येय त्याला मोह पाडू लागले होते. एकंदरीत कृष्णशास्त्र्यांची रसिकता, गुंजीकरांची टीकालेखनाची हौस, परशुरामपंताची मराठीविषयीची प्रीति, दादोबांची स्वाभिमानबुद्धि, न्या. मू. रानड्यांची चिकित्सा आणि नीलकंठराव कीर्तन्यांची ग्रँट

डफवरील टीकेत दिसून आलेली निर्भयता या साऱ्या गुणांचा योग्य समवाय ज्यांच्यात वैशिष्टयाने झळकतो आणि त्यांच्यातील उणीवा ज्यांच्यात अभावाने तळपतात असे विष्णुशास्त्री चिपळूणकर हे एकोणिसाव्या शतकाच्या मूल्यमापनक्षेत्रातील युगप्रवर्तक होत.

चिपळूणकरांच्या ठिकाणच्या या साऱ्या उच्च गुणांचा पहिला बहर आपणास त्यांचा संस्कृत कविपंचकावरील टीकालेखात दिसतो. त्यांच्या रसिकतेइतकाच मूल्यमापनशक्तीचा विलासही त्यात नव्या तेजाने तळपत आहे असे वाटते. मेकॉलेच्या भाषासरणीचा आदर्श डोळयापुढे ठेवून त्यांनी संस्कृत कवीवरील आपले जे पहिले टीकालेख लिहिले आणि पौर्वात्य काव्यवाङमयाची मूल्ये कोणती याचा शोध घेण्याचा जो प्रयत्न केला त्यात संस्कृत काव्यावरील युरोपियन पंडितांच्या मतांचाही निर्भीडपणे समाचार घेतलेला आहे. एकाबाजूने पाश्चात्य पंडिताच्या शोधक बुद्धीची तारीफ करीत असतानाच दुसऱ्या बाजूने स्वदेशाविषयीच्या अभिमानाला कमीपणा आणू पाहणाऱ्या, कुचेष्टा करणाऱ्या आणि पौर्वात्यांची काव्ये हीन आहेत असे एकतर्फी निर्णय देण्यासाठीच हातात लेखणी घेणाऱ्या पाश्चात्य पंडितांची आणि मिशनऱ्यांची कडक शब्दात संभावना करायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. संस्कृत कवीवरील आपल्या निबंधाच्या प्रस्तावनेत प्रारंभालाच युरोपियन पंडितांना उद्देशून त्यांनी कसे उद्‌गार काढलेले आहेत ते पाहा--

> "यापूर्वी युरोपीय पंडित आम्हास जे सांगतील ते आम्ही निमूटपणे मान्य करावे, त्यावर आक्षेप काढण्याचीही आम्हास योग्यता नाही, मग खंडन करण्याची तर वार्ता दूरच, असा प्रकार चोहोकडे असे. पण आता व पुढे उत्तरोत्तर वरील शिरजोरपणा बिलकुल चालावयाचा नाही. त्यांची मते जेवढी यथार्थ असतील तेवढयाचेच ग्रहण करून अज्ञानास्तव, अरसिकतेमुळे किंवा दुराग्रहाने ज्या मतिभ्रमांचा प्रसार त्यांनी आजपर्यंत केला आहे व पुढे करतील त्यांचा

आमच्या लोकाकडून निरास झाल्याविना कधीही राहावयाचा नाही." $

या भूमिकेत दाखविलेल्या बाणेदार वृत्तीनेच त्यांनी पुढे बाणभट्ट व दंडी या कवीवरील निबंधात मिशनरी पंडितांची मते खोडून पौर्वात्याची मूल्ये स्पष्ट केली आणि डॉ. हॉलसारख्या पंडिताच्या दुर्मताचे दलन केले. बाणभट्टावरील निबंधात आक्षेपकांच्या विधानांना उत्तर देताना 'बाणभट्टाच्या ग्रंथातील रहस्य परस्थ विद्वानाना कां समजू शकत नाही.' याची कारणमीमांसा करतांना चिपळूणकरांनी मराठी मूल्यमापनाचे स्वत्व स्पष्ट करणारा एक नवा सिद्धांत बोलून दाखविला आहे. चिपळूणकर लिहितात--

"कोणत्याही दोन भिन्न राष्ट्राचे कोणतेही सांप्रदाय एकाशी एक अगदी सारखे कधीही मिळत नाहीत व तसे होणे हे शक्यही नव्हे; कां की व्यक्तीव्यक्तीत जसा मनोधर्मांचा भेद नेहमी दृष्टीस पडतो तसाच तो राष्ट्राराष्ट्रांतही अवश्य असायचाच." †

'पाश्चात्याचे जेवढे असेल तेवढे चांगले–किंबहुना तीच आवडनिवड श्रेष्ठ' अशी प्रवृत्ति तत्कालीन महाजनात वावरत असतांना त्या महाजनप्रणीत सिद्धांताला ठोकर देऊन अभिमानाने आणि आत्मविश्वासाने उद्गार काढणारा आणि प्रसंगी पाश्चात्य पंडिताच्या तुच्छतादर्शक अभिप्रायांना बाणेदार उत्तरे देणारा हा टीकाकार मराठीच्या टीकाक्षेत्रात येऊन उतरला तेव्हा आपल्या बरोबरही स्वत्वाची आणि अभिमानाची नवी जाणीव त्याने मराठीतही आणून सोडली. ज्या सुरांत चिपळूणकरांनी संस्कृत कवि पंचकाच्या प्रस्तावनेपासूनच डॉ. हॉलसारख्या मिशनऱ्याच्या दुर्मतदलनाला आरंभ केला त्याच सुरांत मराठी कवितेवरील आपल्या निबंधात पाश्चात्य पंडित व त्याचे अनन्यशरण भक्त जे एतद्देशीय पंडित त्यांना पहिल्याच झटक्यात सांगून टाकले की—

$ वि. कृ. चिपळूणकर–संस्कृत कविपंचक आ. ३, १९२२ (पृ. ७)

† तत्रैव पृ. १५४

"इंग्रजांच्या रुचिभेदाने एतद्देशीय भाषातील कविता जरी त्यांस कदाचित नापसंत ठरली, तरी येवढ्यावरूनच ती दोषास पात्र होईल असे कदापि होणार नाही आणि त्याप्रमाणेच इंग्रजाच्या तऱ्हेचे जेवढे असेल तेवढेच काय ते ज्यास गोड वाटू लागले त्याच्या तिरस्कारानेही आमच्या भाषेतील कवितेस हीनत्व आहे असे नाही." ‡

शालापत्रकांतील 'मराठी कविता' हा निबंध त्यांचा या विषयावरील पहिला लेख होय. या लेखांत 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या न्यायानें त्यानी इंग्रजाच्या बरोबरीनें एतद्देशीय नव्या विद्वानांच्या अभिरुचीविषयीं जे मत दिले ती त्यांची मराठी कवितेच्या या प्रतिपक्ष्यांना दिलेली पहिली सलामी होय. एतद्देशीय पंडिताचें मराठी भाषेविषयीचे अज्ञान आणि मिशनऱ्यांच्या व सरकारी अधिकाऱ्यांच्या चालीवर आपली मते चालविण्याची त्याची परप्रत्ययनेयता चिपळूणकरांना नेहमीच बोचत असावी असे दिसते. 'नौकानयनाचा इतिहास' या पुस्तकावर अभिप्राय देताना संधि साधून त्यांनी नव्या विद्वानाच्या या परमताधीनतेवर चांगला कोरडा ओढला आहे.

"कोणत्याही गोष्टीस हलकेपणा किंवा थोरवी साहेबाच्या केवळ संबंधानेच किती येते याचा प्रत्यय पदोपदी आहे... सुमारे चार पांच वर्षांपूर्वीच इतर मराठी कवीप्रमाणें तुकारामही एक असून वारकरी, कुणबी वगैरे अडाणी लोकांतच काय ती त्यांची चहा असे... पण भाग्य त्या कवीचे! सर अलेक्झांडर ग्रांट यांनी त्याचे कांही अभंग वाचून आपल्या थोर व प्रांजल बुद्धीने एका मासिक पुस्तकात त्याची फार प्रशंसा केली. पण एवढ्याशा लहान गोष्टीपासून चमत्कार केवढाले झाले! विठोबाचा वेडगळ भक्त होता तो एकदम जगद्गुरुची पदवी पावला, त्याच्या अभंगास विद्वत्समाजांत खुशाल येण्यास मोकळीक झाली, वर्तमान-

‡ शालापत्रक पु. ११ अं. ११ (मार्च १८७२)

पत्रांच्या व पुस्तकाच्या अग्रभागी त्याचे नाव झळकू लागले, मराठी पुस्तक हाती घेणे हे अत्यंत लांच्छन मानणारे जे फाकडे नवीन विद्वान तेही तेवढापुरता मात्र आपला नियम मोडून त्यावर मेहेरनजर करू लागले, आणि मराठी भाषेत म्हणण्यासारखा कवि एक तुकारामच अशी चोहोकडे प्रसिद्धि झाली. ग्रांटसाहेब मराठीत इतके निष्णात होते काय? किंवा पूर्वी कोणासही न समजलेले असे कांही अपूर्व गुण त्यांनी प्रगट केले काय? कांही नाही; त्यांच्या नुसत्या मोर्तबाचा येवढा प्रताप!" *

मराठीच्या टीकाक्षेत्रात स्वत्वाची आणि अभिमानाची जाणीव निर्माण करण्यासाठी चिपळूणकरांनी या नव्या विद्वानांच्या परप्रत्यनेयतेवर हल्ला चढविला तसाच त्यांच्या अभिमानशून्यतेवरही चढविला. लोकहितवादीच्या निबंधसंग्रहावरील परीक्षणाच्या शेवटल्या लेखांकात लोकहितवादीवर कडक टीका करण्याचा आपला हेतु निवेदन करताना चिपळूणकर लिहितात—

"लोकहितवादींच्या मतावर आम्ही जी चरचरीत टीका केली ती येवढयाकरिता की, त्याच्या या देशाच्या संबंधाने ज्या समजुती आज चाळीस वर्षे होऊन बसल्या आहेत... त्या अगदी चुकीच्या व अनर्थकारक आहेत. आपले लोक पेशवाईत अगदी मूर्ख होते यात संशय नाही हे महातत्व ज्यांच्या हृदयात एकदा बाणले त्याच्या ठायी स्वदेशाचा इतिहास वाचण्याविषयी कितीशी उत्कंठा होईल बरे? असे लोक बापू गोखल्याचे चरित्र, पानिपतची लढाई, महादजी शिंद्याचे चरित्र, ऐतिहासिक गोष्टी ही पुस्तके मोठ्या प्रेमाने वाचतील काय? त्यांस अर्थातच असे वाटणार आहे की या बेवकूफ लोकांची चरित्रे वाचल्यापासून काय फायदा होणार आहे?... आमच्या देशात स्वतः-

* शालापत्रक पु. १२ अं. ५. (सप्टेंबर १८७२)

> विषयीचे जे अज्ञान आढळते व स्वदेशाच्या इतिहासाविषयी अनास्था व अरुचि जी चोहोकडे दृष्टीस पडते, ही सर्व फळे लोकहितवादी प्रभृति अर्वाचीन तत्ववेत्यांच्या पांडित्याचीच होत हे उघड आहे." †

अशा रीतीने नव्या आंग्लभाषाविज्ञ विद्वानांचे मराठीविषयीचे अज्ञान प्रकटपणे दाखवून एका बाजूने त्यांच्या परप्रत्ययनेय बुद्धीला तर दुसऱ्या बाजूने अभिमानशून्यतेला डिवचण्यात चिपळूणकरांचा हेतु मराठी भाषेविषयी हरपलेली स्वत्वाची जाणीव पुन्हा निर्माण करणे हा होता.

स्वत्वाची ही जाणीव चिपळूणकरांनी मराठीला दिलेली पहिली वैशिष्टपूर्ण देणगी होय.

संस्कृताहून मराठीचा वेगळेपणा

इंग्रजीची आवडनिवड ही मराठीच्या आवडीनिवडीहून भिन्न आहे हे जसे एक सूत्र चिपळूणकरांनी बोलून दाखविले तसेच संस्कृत भाषेहून मराठीचे वळण कसे वेगळे आहे हेहि त्यांनी स्वष्ट केले आहे. शालापत्रकांत प्रसिद्ध केलेल्या मराठी कवितेवरील ज्या पहिल्या निबंधात त्यांनी मिशनरी आणि सुशिक्षित विद्वान ह्या मराठीच्या प्रतिपक्ष्यावर हल्ला केला त्याच ठिकाणी संस्कृताच्या श्रेष्ठपणाची भाषा बोलत असतांना मराठीची योग्यता त्यापुढे काहीच नव्हे असे समजणाऱ्या शास्त्रिपंडितांनाहि त्यांनी खालील शब्दात समज दिलेली आढळते.

> "संस्कृत भाषा ही मराठी वगैरे चालू भाषाहून सर्वप्रकारे अत्यंत श्रेष्ठ आहे ही गोष्ट सर्वांच्या मते केवळ निर्विवाद आहे. यास्तव इतकेच जर त्यांचे म्हणणे असेल तर वादाचे मूळच खुंटले. पण संस्कृत भाषा सर्व प्रकारांनी उत्कृष्ट असून सध्याच्या प्राकृत भाषा सर्वथा तिरस्कारास्पद होत असे जर त्यांचे म्हणणे असेल तर ते मात्र बरोबर

† **निबंधमाला** अं. ७६ (मार्च १८८१)

> नाही... मराठी हिंदुस्थानी वगैरे भाषांतील कवितांस जरी संस्कृत कवितांचीच निखालस बरोबरी झाली नाही तरी अंगभूत योग्यता म्हणजे मुळीच शून्य असे कोणाच्यानेही म्हणवणार नाही." §

इंग्रजी काय किंवा संस्कृत काय या दोन्ही परभाषांतील गुणविशेष मराठीला लाभावे आणि तिचा उत्कर्ष व्हावा ही चिपळूणकरांची इच्छा होती. 'भाषापद्धती'वरील निबंधात हा दिवसेंदिवस होत जाणारा इंग्रजी आणि संस्कृत या भाषांचा प्रभाव आणि त्यांचा मराठीला मिळत असलेला आधार त्यांनी मराठीच्या उत्कर्षाला अनुकूल होईल असा होरा वाहिला आहे. इतिहास, टीका, विनोद, नाटक, कादंबरी, वृत्तपत्रे-मासिके या बाबतीत इंग्रजीचा होणारा प्रभाव आणि भाषा, व्याकरण, साहित्य यादृष्टीने होणारे संस्कृताचे साह्य ही दोन्ही त्यांना हवीशी वाटतात. पण त्याबरोबरच या भाषांतील ज्ञानभांडार आपलेसे करतांना आपल्या भाषेचे स्वत्व म्हणजे निराळेपण राखले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' या निबंधात त्यांनी हा मुद्दा स्पष्ट केला आहे.

> "ज्याप्रमाणे तेच रस शरीरास हितावह होत की जे शरीरप्रकृतीस मानून जीवतत्वास ढका लावणार नाहीत, त्याचप्रमाणे जे भाषांतरादि ग्रंथ भाषेच्या सरणीस अगदी बरोबर उतरून तिच्या रचनेस यत्किंचितही अपाय न करतील तेच मात्र तीस वर्धक होत." *

मराठीची सरणी संस्कृताहून कशी वेगळी पडते आणि विशेषतः जुन्या मराठी कवितेत आणि संस्कृत कवितेत किती भेद आहे हे चिपळूणकरांनी मोरोपंताची कविता या निबंधात एका ठिकाणी स्पष्ट करून सांगितले आहे. चिपळूणकर लिहितात—

---

§ शालापत्रक पु १४ अं. १० (मार्च १८७२)

* निबं. अ. १ (जानेवारी १८७४)

"संस्कृत कवितेचा झोक सामान्यतः पाहता सगळा ऐहिक विषयाकडे आहे व मराठी कवितेचा परमार्थाकडे आहे... संस्कृत कवींच्याप्रमाणे वाचकांचे किंवा श्रोत्यांचे रंजन करणे येवढाच महाराष्ट्रकवींचा उद्देश नव्हता; तर लोकांची मने प्रवृत्तिमार्गाकडून निघून निवृत्तिमार्गाकडे लागावी हेच त्यांचे मुख्य धोरण होते. त्यांच्या काव्यांत नवरसाचे वास्तव्य नाही असे नाही पण ते सर्व भक्ति व वैराग्य यांच्या अंगभूत आहेत... सारांश, संस्कृत व मराठी कवितेत इतके अंतर आहे की पहिलीमध्ये नवरसांचे जसे प्रसंगोपात्त मिश्रण आढळते त्या प्रमाणेच शांत व भक्ति या रसांचेही क्वचित आढळते; त्यांच्याकडे प्राधान्य मुळीच नाही पण मराठी कवितेत पाहावे तो वरील रसच मुख्य असून इतरांचे मिश्रण असलेच तर ते अप्रधानत्वेकरून असते. तिचे मुख्य विषय म्हटले म्हणजे वैराग्य व अध्यात्म हे होत, तेव्हां यास अनुसरूनच अर्थात तींतील रससंपत्ति होय." †

संस्कृत व मराठी कवितेच्या रचनेचा उद्देश, विषय आणि रसाचे गौणप्रधानभाव लक्षांत घेऊनच मराठी कवितेचे मूल्य हे वेगळ्या रीतीने पारखले जावे असा जो सूर याठिकाणी चिपळूणकरांच्या लिहिण्यात दिसतो तो त्यांनीच दुसऱ्या एका प्रसंगी विशेष स्पष्ट करून दाखविला आहे. प्रास व अनुप्रास याविषयी लक्षणांत फरक दाखविल्याबद्दल एका जिज्ञासु वाचकाने जेव्हा शंका प्रदर्शित केली तेव्हा त्या शंकेला उत्तर देतांना प्रास व यमक यांची लक्षणे दिली ती संस्कृत साहित्यास धरून नाहीत हे चिपळूणकरांनी उत्तरात स्पष्ट तर केलेच पण त्याबरोबरच ही लक्षणे अशी संस्कृताहून भिन्न का दिली त्याचीही कारणे दिली ती पाहण्यासारखी आहेत. संस्कृतांत मराठीतल्याप्रमाणे यमक व प्रास नाहीत; आहेत पण ते मराठीतल्यापेक्षा निराळे असे उदाहरणाने दाखवून चिपळूणकर म्हणतात—

† तत्रैव अं. ४७ (मार्च १८७८)

"तेव्हा वरील भिन्नभाव ज्याअर्थी मराठीत अगोदरच झाला आहे त्याअर्थी आम्ही बांधलेली प्रास, अनुप्रास व यमक यांची लक्षणेही तशीच मूळच्याहून निराळी असल्यास आमच्या मते काही हरकत नाही. मराठी व्याकरण जसे महाराष्ट्र-भाषेस अनुसरून स्थलविशेषी संस्कृताहून निराळे आहे त्याप्रमाणेच महाराष्ट्रकवितेच्या पद्धतीस अनुसरून साहित्याची लक्षणेही अमळ निराळी होण्यास आमच्या बुद्धीने बाध नसावा." □

संस्कृताहून मराठीचा वेगळेपणा सिद्ध करण्याच्या भरांत चिपळूणकरांनी एक मोठा महत्वाचा सिद्धांत याठिकाणीं बोलून दाखविला आहे आणि तो म्हणजे मराठी व्याकरणाप्रमाणे मराठीच्या होऊं पाहणाऱ्या नव्या साहित्यशास्त्राला संस्कृताहून वेगळे आणि स्वतंत्र अस्तित्व असू शकते हा होय.

भ्रामक अपसिद्धांताचे खंडन

कवितेचे खरे मूल्य पारखून घेतांना चिपळूणकरांनी आपल्या प्रतिपक्षावर टीका करण्याच्या निमित्ताने यथार्थ मूल्यमापनाला बाधक ठरणाऱ्या भ्रामक अपसिद्धांताचे केलेले खंडनहि महत्वाचे आहे.

यापैकी पहिला अपसिद्धांत म्हणजे कथानक हे काल्पनिक किंवा असंभवनीय नसावे हा होय. कथानकाच्या या असंभाव्यतेवर 'मनोरमा' नाटकाच्या कर्त्याने घेतलेला आक्षेप आपण मागील प्रकरणांत पाहिलाच आहे. इंग्रजीतील ऐतिहासिक आणि लौकिक विषयाची काव्ये वाचल्यापासून तत्कालीन विद्वानांचा असा समजच झालेला दिसतो की काव्याचा विषय हा संभाव्य, वस्तुस्थितीस धरून असावा; त्यांत काल्पनिकतेची वा अद्‌भुततेची झाक नसावी. विविधज्ञानविस्तारकर्ते गुंजीकर यांनीही आपल्या एका परीक्षणांत या असंभाव्यतेबद्दल कादंबरीकर्त्याला दोष दिलेला आढळतो. 'विद्याधनप्रशंसे'च्या कर्त्यानेहि आपल्या कथानकाचा

□ तत्रैव अं. ४५ (आक्टो. १८७७)

विषय पौराणिक घेतला आणि त्याबद्दल तो विषय अलीकडील विद्वानांना रुचणारा नाही म्हणून भय प्रदर्शित केले होते. विद्वानांच्या या नव्या मताचा ग्रंथकारांच्या मनावर असा विपरीत परिणाम होऊं नये हे लक्षांत घेऊनच चिपळूणकरांनी 'विद्याधनप्रशंसे'वर अभिप्राय देण्याच्या निमित्ताने या समजुतीचा परामर्श घेतला आहे.

> " कवितेचा मुख्य संबंध कल्पनाशक्तीशी आहे, म्हणून मनास रंजवणे हेच तिचे काम... आता हे मनोरंजन खऱ्याच गोष्टींनी होते खोटयांनी होत नाही असे मुळीच नाही. उलटे विचाराअंती असेच दिसून येईल की सामान्यतः ज्या आपण अनेक गोष्टी पाहतो त्यांत चमत्कार वाटण्याजोगे काहीच नसल्यामुळे त्या मनास कंटाळवाण्या मात्र वाटतात; व काव्यांचे विषय बहुधा कल्पावे लागतात त्याचे तरी हेच कारण. यास्तव भारत, इलियड, किंवा प्याराडैज् लॉस्ट वाचताना सत्यासत्यविवेचक शक्ति पुष्कळ अंशी गुंडाळूनच ठेवली पाहिजे... काव्याचा रसास्वाद घेत असता त्याच्या कथानकाच्या असत्यतेकडे किंबहुना असंभाव्यतेकडे लक्ष पोचवणे हे अरसिकतेचे दर्शक होय. यावरूनच पाहतां स्पष्ट दिसून येईल, की अलीकडील विद्वानाचा पुराणादिकांवर जो येवढा रोख आहे तो, व काव्ये नाटके ही ऐतिहासिक विषयावर असली तरच वाचण्यास योग्य, एरवी नाहीत हे मत–ही दोन्ही अज्ञानमूलकच आहेत. त्यामुळे कवितेच्या अनिर्वाच्य सुखास, ते निर्दोष असतांही आपण व्यर्थ अनेक वेळा अंतरतो." §

कथानकाची असंभाव्यता हा जसा दोष नव्हे तद्वतच काव्यांतील सिद्धांतांच्या खरेखोटेपणा हाही त्या काव्याचा दोष समजू नये असा एक दुसरा एक सिद्धांत चिपळूणकरांनी रा. ब. रानडे यांच्या आक्षेपाचे निरसन करतांना बोलून दाखविला आहे. चिपळूणकर म्हणतात—

§ शालापत्रक पु. १२ अं. ३ (जुलै १८७२)

"पूर्वोक्त लेखावर 'मूले कुठारः' असा एक विचार अद्याप राहिलाच आहे. हा म्हणजे आम्ही रावबहादुरासारख्यास सुचवावा असे नाही.. तो हा होय की काव्यांची परीक्षा जी करायाची ती रसिकजन त्यांतील सिद्धांतांच्या खरेखोटेपणावर तादृश करीत नसतात. तर आमच्या कवीची धर्मविषयक मते रावबहादुरांच्या मतांहून कितीही भिन्न असली, किंवा वादविषयक काव्यांत त्याने ईश्वराचे वर्णन कोणत्याही पद्धतीने केले असले तरी कवित्वदृष्ट्या हे सर्व विचार केवळ बाह्य होते. हे रावबहादुरांनी लक्षांत आणायाचे होते." *

विविध–ज्ञानविस्तारकारांनी † मोरोपंताच्या आर्यांतील उपमा तर्कशास्त्राच्या तराजूत जोखून पाहण्याचा जो प्रकार केला त्याचाही चिपळूणकरांनी अशाच रीतीने धुव्वा उडविलेला आढळतो. विस्तारकारांनी मोरोपंताच्या दोन भिन्न प्रसंगीच्या दोन आर्या घेऊन त्यातील उपमांचे साधर्म्य लक्षांत न घेतां त्यावर कडाका उडविला. नलाख्यानांतील एका आर्येत 'राधाप्रात्प्यर्थ जसा तो स्वकरगतामला यशा शिनळ' अशी उपमा आली त्याबद्दल "यमक जोडण्यासाठी ज्याने भगवंताला शिनळ असे विशेषण दिले त्याची भक्ति केवढी होती ती सहज ध्यानांत येईल" असे म्हटले तर रामायणातील एका आर्येत सेतूवर लंकादेवीची ओढलेल्या वेणीची उत्प्रेक्षा आली त्यावर "काय हा अलंकार! रावणाने जर दुसऱ्याची बायको आणली तर त्याच्या स्त्रियेला ते बरे वाटेल काय? सहसा वाटणार नाही. तर मग तिची उगीच का वेणी धरून ओढावी? रा. ब. भास्कर दामोदर यांनी नवनीताचे प्रस्तावनेत ह्या उत्प्रेक्षेची फारच प्रशंसा केली आहे. त्याला तीजमध्ये काय जो चमत्कार वाटला असेल तो वाटो. आमचे मत तर अगदी भिन्न." असा शेरा मारला आहे. पहिल्या आक्षेपाला उत्तर देतांना चिपळूणकर लिहितात–

* **निबं**. अं. ५४ (जून १८७८)

† प्रस्तुत पुस्तकातील प्र. २ पृ. ८४ वरील तळटीप पाहावी.

"मोरोपंताच्या धर्मसंबंधी मताविषयी जर विचार कर्तव्य असता तर प्रस्तुत लिहिणाराचा वरील सर्व उहापोह यथायोग्य होता. पण जोपर्यंत कवित्वाच्या संबंधाचेच विवेचन आहे तोपर्यंत वरील धर्ममीमांसा केवळ अप्रस्तुत होय."

दुसऱ्या आर्येवरील विस्तारामधील लेखकाच्या या अभिप्रायाविषयी चिपळूणकर लिहितात––

"आमच्या आक्षेपकास लंकादेवीची वेणी धरून ओढल्याबद्दल तिची फार कीव आली आहे. या किवेवरून त्याची सदयता प्रकट होते, पण सहृदयता प्रकट होत नाही. पहिल्या आक्षेपात कृष्णभक्ति अस्थानी प्रकट होऊन ती जशी प्रस्तुत रसिकाच्या यथार्थदर्शनास विघातक ठरली त्याप्रमाणेच येथे वरील हृदयवृत्ति झाली आहे." ‡

मूल्यमापन कसे करावे ?

मूल्यमापनाच्या कामी अडथळा करणाऱ्या भ्रामक अपसिद्धांताचा जसा चिपळूणकरांनी परामर्श घेतला तद्वतच आणखीही कांही असत्प्रवृत्तींचा घेतलेला दिसतो. टीकाक्षेत्रांत माजलेल्या गोंधळात मूल्यांचा जसा गोंधळ होता तसाच मूल्यमापनांच्या कर्तव्याच्या बाबतीतही होता आणि त्यामुळे टीका करताना मूळ उद्देश कोणता त्याचे विस्मरण पडून टीकाकार साहित्याचे यथार्थ मूल्यमापन करण्याऐवजी नवा गोंधळ उत्पन्न करीत होता. मराठीच्या टीकाक्षेत्रांतील हा देखावा लक्षांत घेऊनच चिपळूणकरांनी 'ग्रंथावर टीका' हा निबंध लिहून टीकाकाराला आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी काही गुणांची आवश्यकता असते हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आणि इतर टीकालेखांतही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने टीकाकाराला लागणाऱ्या गुणांची ओळख करून दिली आहे तर कित्येक वेळेला ते अंगात नसता टीकालेखनाला उद्युक्त झालेल्या

‡ तत्रैव अं. ५९ (नोव्हे. १८७८)

टीकाकाराचा उपहासही केला आहे. मूळ ग्रंथाचे ज्ञान, सत्यप्रीति, समतोल वृत्ति आणि विषयाशी तन्मय होण्याइतकी सहृदयता या चार गुणांचा आढळ ज्यांत असेल तोच खरा टीकाकार समजावा असे चिपळूणकरांनी 'ग्रंथावर टीका' या निबंधात मत व्यक्त केले आहे. किंबहुना इतके बोलूनच चिपळूणकर थांबले नाहीत तर या गुणांचा अभाव ज्यां या टीकालेखनांत आढळला त्याच्यावर तीव्र शब्दाचा मारा करायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. विशेष गमतीची गोष्ट ही की जुन्या मराठीचे प्रतिपक्षी म्हणून जे रथीमहारथी टीकाक्षेत्रांत मत्त मतंगजाप्रमाणे वावरत होते त्यांच्यात वरील गुण अभावानेच तळपत होते आणि म्हणूनच चिपळूणकरांच्या लेखणीच्या कचाटचात ते सापडले तेव्हां चिपळूणकरांनीही महाराष्ट्रवाणीच्या साधुत्वाविषयी दुर्जन ठरलेल्या त्या कुपरीक्षकांची चांगलीच झडती घेतली. मराठी भाषा ज्यांना पुरती बोलता येत नाही, लिहिताना ज्यांची लेखणी चार ठिकाणी अडखळते, ज्यांचा अभिप्राय एका ओळीपलीकडे जात नाही आणि पुस्तकात पद्य आले की ज्यांना हाताखालच्या मराठी पंडिताकडे धांव घ्यावी लागते अशा सरकारी विद्याखात्याच्या अधिपतीने मुकुंदराज आणि ज्ञानेश्वर यांचे नवनीतातील वेचे नव्या आवृत्तींच्या वेळी दुर्बोध म्हणून गाळले तेव्हा त्या ग्रंथाचे परीक्षण करणाच्या निमित्ताने चिपळूणकरांनी साहेबांच्या मराठीच्या अज्ञानावर ताशेरा झाडायला कमी केले नाही. डॉ. विल्सन यांनी आपल्या पांडित्याच्या ऐटीत मोरोपंताच्या कवितेवर रामायण-भारताचे भाषांतर म्हणून शेरा दिला, तेव्हा 'साहेबानी हे ग्रंथ मुळात वाचले तरी काय' असा प्रश्न चिपळूणकरानी सुनविला. ज्ञानोदयाच्या आक्षेपाला उत्तर देताना तर त्यांनी स्पष्टच सांगितले की, 'मराठी भाषेविषयी नाक मुरडणे व तिची चवढव सांगणे या भानगडीत आमच्या ख्रिस्ती बंधूनी फार करून पडूच नये.' पण सर्वात जबर हल्ला त्यांनी नवीन सुशिक्षितावर केला. मोरोपंताच्या काव्यावरील दुर्बोधतेच्या आक्षेपाला उत्तर देताना चिपळूणकरांनी याच कारणास्तव त्यांची टर उडविली आहे. चिपळूणकर लिहितात—

"हा आक्षेप बहुधा अशांच्या तोंडी ऐकू येतो की ज्यांनी स्वभाषेचे कधीही म्हणण्यासारखे अध्ययन केले नसून इंग्रजीच्या ज्ञानावरच जे आपणास थोर व विद्वान म्हणून लेखीत असतात. यापैकी कित्येक बहाद्दर असे आहेत की, त्यांस मोरोपंताची सामान्य आर्या किंवा वामनाचा सामान्य श्लोकही लावण्याची पंचाईत. अशांची रसिकता काय ती कोणा कवीला बुळबुळीत म्हण, कोणाला कुचकट म्हण, कोणाला खुळा म्हण असा चारगटपणा करण्यानेच बहुधा प्रगट होत असते."*

नवीन सुशिक्षितांना मराठीच्या जुन्या परंपरेचे हवे ते ज्ञान नव्हते तसे ते मिशनरी पंडितांनाही नव्हते. पग मिशनरी टीकाकारांत निवळ एवढाच अवगुण तळपत होता असे नाही तर त्याच्याच जोडीला सत्यनिष्ठेचा अभावही होता आणि म्हणूनच चिपळूणकरांची मिशनऱ्यावरील वा इंग्रज लेखकावरील टीका कडक झाली आहे. डॉ. विल्सनसारख्या पंडिताने पेशव्यांच्या उत्कर्षाबरोबर मोरोपंताने त्यांच्या शिवोपासनेचा कल लक्षांत घेऊन शिवावरील आर्या लिहिल्या अशी असत्य विधाने करावी आणि हिंदुधर्मातील देवतांच्या उपासनेविषयीची निर्मत्सरता लक्षांत न घेण्याइतकी डोळेझाक करावी ही गोष्ट चिपळूणकरांचा आधीच मिशनऱ्याविषयी असलेला कलुषित ग्रह वाढवावयालाच कारणीभूत होती. मेकॉले आणि मिल्ल या इतिहासकाराच्या ग्रंथातही हिंदु लोकाविषयी अज्ञानमूलक आणि दुराग्रहजन्य दूषणे लावलेली त्यांना दिसत होतीच. इंग्रज लेखकांच्या या वृत्तीबद्दल काहीशा उपहासाने तर काहीशा आवेशाने चिपळूणकरानी टीका केलेली असून त्यांच्या असत्य मतावर आणि कलुषित पूर्वग्रहावर कडक मजकूर लिहिलेला आहे. संस्कृत कविपंचकातील बाणभट्टाच्या कादंबरीतील गुणदोषविवेचनाच्या रूपाने उद्भवला आहे. ज्यांचा संस्कृत कवितेशी चांगलासा परिचय नाही अशा युरोपीय पंडितांना बाणभट्टाच्या कादंबरीतील

* तत्रैव अं. ४६ (डिसेंबर १८७७)

कविसंकेत लक्षात येणार नाहीत आणि ते त्यास विचित्र ठरवतात. अशा पंडितांना व त्यांच्याच दृष्टीने संस्कृत काव्याकडे बघणाऱ्या एतद्देशीयांना उद्देशून चिपळूणकर म्हणतात--

> "बाणकवीसारख्या कादंबरीकाराच्या तर्फेने तर आणखीही एक विचार कळविण्यासारखा आहे. वरील ग्रंथात वस्तुस्थितीस विरुद्ध अशा अनेक गोष्टी आणल्या आहेत खऱ्या...पण यासंबंधे उक्त ग्रंथास सदोष ठरविण्यापूर्वी गुणदोषविवेचकांचा बहाणा करणारानी ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, बाणकवीचा उद्देश इतिहास लिहिण्याचा नव्हता, तर कल्पित अद्‌भुत कथा लिहिण्याचा होता. यास्तव त्याच्या कल्पनानिर्मित अपूर्व सृष्टीस व्यवहारी जगातील गोष्टी सर्व प्रकारे लावू पाहणे म्हणजे अरसिकतेची पराकाष्ठा असून कविवाग्देवतेचा मोठा उपमर्द करणे होय."‡

जुन्या काळातल्या कवितेचे यथार्थ मूल्यमापन करण्यासाठी लेखकाचा मूळ उद्देश जसा परीक्षकानी लक्षात ठेवावयास हवा तशीच लेखकाच्या काळची परिस्थिति व त्या परिस्थितीने तत्कालीन ज्ञानाच्या जाणिवेला वा प्रगतीला घातलेली मर्यादाहि जाणून घ्यावयास हवी हेही चिपळूणकरानी जाणले आहे--आणि म्हणूनच जेव्हा रा. ब. रानडे यांनी केकावलीवरील अभिप्रायात 'मोरोपंतांनी ईश्वराशी केलेली सलगी ही खऱ्या ईश्वरभक्तीची विध्वंसक आहे' आणि 'ज्यास ईश्वराविषयी यथार्थ ज्ञान असेल त्यास ती मान्य होणारी नाही' असे उद्‌गार काढले तेव्हा त्यांचा हा आक्षेप या कालभेदाच्या आणि प्रकृतिभेदाच्या मुद्यावरच चिपळूणकरानी खोडून काढलेला आहे. चिपळूणकर लिहितात--

> "आम्हास असे वाटते की आमच्या रावबहादुरानी वरील निकाल कागदावर नमूद करण्यापूर्वी आमच्या बिचाऱ्या

‡ सं. कवि (पृ. ११५)

कवीच्या संबंधाने काही गोष्टी ध्यानात आणल्या असत्या तर बरे झाले असते. ..ज्याअर्थी आमच्या बिचाऱ्या कवीचा ग्रंथ पेशवाईच्या आमदानीतच आटपला व पुढील सुधारलेल्या राज्याचा व धर्माचा आमच्या गाढांधकारमय देशात उदय होण्यापूर्वीच त्याचा अस्त झाला त्याअर्थी वादविषयक ईश्वर-भक्तीचा प्रकार परिपक्व बुद्धीच्या लोकास मान्य होईल अशा प्रकारे वठला नाही याबद्दल आमच्या हीनभाग्य कवीस ठपका ठेवणे बरोबर नाही."†

अशा रीतीने जुन्या मराठी कवीच्या कवितेचे गुणदोषविवेचन करून त्याचे यथार्थ मूल्यमापन करण्यापूर्वी त्या राष्ट्रातील संप्रदायाचे, प्रकृतिभेदाने उत्पन्न झालेल्या आवडीनिवडीचे आणि कालगत भेदाचे तत्व लक्षांत ठेवले जावे ही गोष्ट चिपळूणकरानी जुन्या मराठी कवितेच्या प्रतिपक्ष्यांना स्पष्टपणे बोलून दाखविली आहे.

यथार्थ मूल्यमापनाच्या दृष्टीने चिपळूणकराच्या दृष्टीने लक्षात ठेवण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे रुचिवैचित्र्य ही होय. आपल्या आवडीनिवडीशी एकरुप न होण्याइतके रुचिवैचित्र्य जगात असू शकते हे चिपळूणकराना माहीत आहे. अशी रुचिवैचित्र्य दाखविणारी वाचकांची पत्रे त्यांना येत तेव्हा त्यांच्या आवडीनिवडीकडे पाहण्याची त्यांची दृष्टि बरीचशी समतोलपणाची आणि सहानुभूतीची असे. निबंधमालेच्या ४५ व्या अंकात एका जिज्ञासु वाचकाचे पत्र आहे, त्यात त्याने जॉन्सनचरित्राचे कंटाळवाणे भारूड लावल्याबद्दल मालाकारांना ठपका दिला. तेव्हा त्या पत्राला उत्तर देताना हा रुचिवैचित्र्याचा सिद्धांत चिपळूणकरांनी बोलून दाखविला आहे.

"जॉन्सन्चा निबंध जिज्ञासूस कर्मकथाच वाटला, व विनोद, सुभाषित वगैरेचे मान त्यांच्या मते उतरतेच आहे, या आक्षेपांवर आरंभी आम्ही त्यास आमचा अभिप्राय

† निबं. अं. ५४

कळविलाच आहे. तो अर्थात् 'भिन्नरुचिर्हि लोकः' हा होय. जिज्ञासु महाराष्ट्र कविता हा विषय सुचवितात व या अंका-पासून तो आम्ही सुरूही केला आहे, पण हाही सर्वांस जिज्ञासूच्या प्रमाणेच पसंत पडेल असे आम्हास वाटत नाही. प्रत्येकाचे मत व अभिरुचि ही भिन्नभिन्न असल्यामुळे एकाच गोष्टीविषयी मनुष्याचे नेहमी निरनिराळे अभिप्राय पडत असतात."$

तुलनात्मक पद्धति व रुचिवैचित्र्य

रुचिवैचित्र्याची ही जाणीव आणि तिला सहृदय दृष्टिकोनाची मिळालेली जोड या दोन्हींचा मजेदार मिलाफ चिपळूणकराच्या टीका-पद्धतीत जर कुठे प्रकर्षाने पाहायला मिळत असेल तर तो त्यांच्या तुलनात्मक टीकापद्धतीत होय. दोन सदृश वस्तूंची गुणविशेषाच्या वा वैगुण्याच्या दृष्टीने देखील तुलना करणं हा मानवी स्वभाव आहे. पण या तुलनेला समंजसपणाची जोड असेल तर टीकेच्या क्षेत्रांत ती एक विशिष्ट कार्य करू शकते आणि ते म्हणजे प्रकृतिभेदाने वा काल-भेदाने इतर राष्ट्राच्या वा संस्कृतीच्या वाङ्मयाहून आपल्या वाङ्मयात कोणते गुणावगुण वेगळे आहेत याचे यथार्थ ज्ञान करून घेणे हे होय. परंतु अशा तऱ्हेची तुलना करणाऱ्या टीकाकाराला या तुलनीय अशा दोन्ही वाङ्मयातील गुणविशेषाची यथार्थ पारख व्हायला हवी आणि त्याबरोबरच आपल्या संस्कृतीचे वैशिष्टच वा जीवनसत्व कोणते याचेही ज्ञान असायला हवे. यापैकी कोणत्याही एका गोष्टीची कमतरता असेल तर त्याच्या तुलनेला एकांगीपणाचा आणि प्रसंगी अप्रयोजक-पणाचाही वास आल्याशिवाय राहणार नाही. चिपळूणकराच्या पूर्वी हे तुलनेचे शस्त्र ज्यांनी ज्यांनी वापरले त्यांना मराठीच्या पूर्वपरंपरेचे ज्ञान नव्हते आणि त्यामुळे छोट्या वाशिंग्टनच्या हातातील कुऱ्हाडीने ज्याप्रमाणे बागेतील झाडांच्या मुळावरच घाव बसण्याचा जसा प्रसंग

$ तत्रैव अं. ४५

आला त्याप्रमाणे या टीकाकारांची तुलना मराठीच्या स्वत्वाला विघातकच ठरली. या टीकाकारांच्या तुलनाबुद्धीवर मराठीपेक्षा परक्या इंग्रजी भाषेचे आणि आवडीनिवडीचेच विशेष संस्कार झाले होते आणि त्याकाळात इंग्रजी वाङ्मयात जुन्या पंडिती काव्यांना नाक मुरडण्याची जी प्रथा चालू झाली होती तीच या मराठी टीकाकारांनी मराठीतही चालू केली. चिपळूणकरांचे वैशिष्ट्य हे की त्यांनी इंग्रजी वा संस्कृत या भाषेतील वाङ्मयीन आवडीनिवडी लक्षात घेतल्या असल्या त्या प्रमाणेच त्याची कारणमीमांसाही जाणून घेतली होती आणि त्यामुळेच या भाषांतील उत्कृष्ट वाङ्मयातील गुणविशेष ते त्यांना दोन्हीकडे सारखे दिसले त्याची जशी त्यांनी तुलना केली तद्वतच त्या दोन्हीत न आढळणाऱ्या सादृश्याची कारणमीमांसाही त्यांनी बोलून दाखविली. निष्ठुर आणि कडक टीका करण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या चिपळूणकराच्या टीकालेखनातील हा विधायक अंश लक्षात घ्यायला हवा. कालिदासाच्या सृष्टिवर्णनात इंग्रजी काव्यातल्याप्रमाणे जिवंतपणा दिसत नाही हे सत्य त्यांनी जसे उजेडात आणले तद्वतच त्याची सहृदयतेने कारणमीमांसाही केली. याच्या उलट हा जिवंतपणा ज्याच्या कृतीत आढळतो त्या भवभूतीची इंग्रजीतल्या वर्डस्वर्थशी कसे सादृश्य आहे तेही दाखविले. कालिदासाच्या काव्यातील अजइंदुमतीच्या पहिल्या भेटीच्या प्रसंगातील भाग वाचून त्यांना स्कॉटच्या कादंबऱ्यातील स्त्रीदाक्षिण्याची आठवण येते तर इंद्रियातीत काल्पनिक सृष्टीचे मनोहर चित्रच असे जे मेघदूत त्याचा परामर्श घेताना त्याच्या बरोबरीने शेक्सपीयरचे मिडसमर नाइटस ड्रीम आणि मिल्टनचे पॅराडाइज लॉस्ट या कृतीचाही ते तितक्याच कौतुकाने उल्लेख करतात.

"काव्याचे विषय पाहिले तर प्रायः संसारातील अनेकविध प्रसंग, सामान्यतः दृष्टीस पडणारे सृष्टीतील चमत्कार वगैरेच असतात; व ह्याचे हुबेहूब वर्णन करणे हे जरी लहानसान कविताशक्तीचे काम नव्हे; तरी असे कवि एकंदरीने पाहता पुष्कळ होतात; कारण अनुभविलेल्या

गोष्टीचेच वर्णन करणे तादृश कठीण नाही. पण जेथे केवळ मनाचाच रिघाव होतो, अशी जी इंद्रियातीत अद्‌भुत काल्पनिक सृष्टि तीत यथेच्छ विहार करणे हा अधिकार 'मिडसमर नाइटस् ड्रीम' 'प्याराडैज लॉस्ट' 'मेघदूत' ही रचणाऱ्या वाग्देवतेच्या लालाचाच मात्र. येथे इतरांची गति नाही."†

इंग्रजीतील उत्कृष्ट काव्ये–नाटके आमच्या दृष्टीला कोणत्या गुणविशेषाने प्रिय असू शकतात हे जसे या प्रसंगाने चिपळूणकरानी दाखविले तद्वतच आमची काव्ये कोणत्या गुणविशेषामुळे इंग्रजी रसिकांना प्रिय होतात तेही त्यांनी दंडीच्या निबंधात सांगितले आहे.

"दशकुमारचरित युरोपातील लोकात विशेषतः मान्य होण्याचे दुसरेही एक कारण आहे. ते हे की, त्यांत त्या-वेळची स्थिति रेखलेली आढळते. यास्तव इतिहासज्ञास किंवा प्राक्कालजिज्ञासु जनास ती फार उपयोगी पडण्या-सारखी आहे."*

पण तुलनात्मक पद्धतीने दोन्ही वाङ्मयातील उत्कृष्ट गुणविशेषाचे निदर्शन करून दोन्हीतऱ्हेच्या आवडीनिवडीचे साधर्म्य कितपत जुळते हे पाहण्याचे काम करून चिपळूणकरानी तुलनात्मक पद्धतीतील विधायक अंश प्रगट केला असला तर त्याबरोबरच त्यापैकी कोणत्या एका वाङ्मयाऱ्या प्रभावाने दिपून जाऊन दुसऱ्या वाङ्मयाला अन्याय करू पाहणाऱ्या दोषैकदृष्टि टीकाकाराचे आक्षेप याच तुलनात्मक पद्धतीने खोडून त्या पद्धतीतील विध्वंसक अशा दुसऱ्या अंशही त्यांनी दाखवून दिला आहे. सुबंधुच्या निबंधात डॉ. हॉलसाहेबाच्या सुबंधुवरील दोषाचा हल्ला त्यांनी शेक्सपीयरवर त्याच दोषाच्या बाबतीत प्रतिहल्ला करून कसा परतविला आहे तो पाहण्यासारखा आहे. चिपळूणकर लिहितात—

† सं कवि (पृ. २४)
* तत्रैव (पृ. २२०)

"हॉलसाहेबांनी सुबंधुविषयी जे अभिप्राय दिले आहेत त्यांत हाही मोठा दोष आहे की ते सारे एकपक्षी आहेत. त्यांची दृष्टी दोषांविषयी जशी सूक्ष्म आहे तशी त्यांतील गुणाविषयी तादृश नाही.

.. कवित्वाचा व भूगोलज्ञानाचा नित्यसंबंध नाही म्हणून शेक्सपीयर कवीचे कैवारी भांडत असतां विचाऱ्या सुबंधूचा त्या अज्ञानाबद्दल उपहास करण्याची संधि साहेबांनी फुकट दवडली नाही." †

जे दोष इंग्रजीतील उत्कृष्ट कवीच्या काव्यातही आढळतात तेच दोष सामान्यतः संस्कृत वा मराठी कवींत आढळतात असा एकंदरीत चिपळूणकरांच्या या प्रतिहल्याचा भावार्थ आहे. आणि म्हणून जेव्हा जेव्हा संस्कृतातील वा मराठीतील एखाद्या कवीच्या काव्यातील दोष-निरूपण करण्याचा प्रसंग त्यांना येतो तेव्हा तेव्हा त्यानी इंग्रजीतील कवींच्या काव्यातील त्या दोषांची स्थले उघडून दाखविलीं आहेत. निबंधमालेच्या १३ व्या अंकात उत्कृष्ट उतारे या सदरात बाणकवीच्या कादंबरीतील अत्युक्तिवर्णनपर उतारा देतांना खाली टीपेत "हे अत्युक्तिरूप वर्णन आलीकडील लोकांच्या अभिरुचीस पसंत होणार नाही. अशी वर्णने पूर्वदेशीय कवींच्याच ग्रंथांत केवळ येतात असे नाही" □ असे म्हणून पुढे पाश्चात्य कविशिरोमणीच्या अथेल्लो नाटकांतील सप्तर्षीवर अभिषेक करणाऱ्या व ताऱ्यांना थंडगार करणाऱ्या लाटांच्या वर्णनाचा इंग्रजी उतारा उद्धृत केलेला आहे.

मराठी कवितेविषयीच्या मिशनऱ्यांच्या आक्षेपाला त्यांनी जी उत्तरे दिली * तीही या थाटाची. 'मराठी कविता ही नीतिदृष्टचा भ्रष्ट आहे' या आक्षेपाला उत्तर देताना चॉसरपासून शेक्सपीयरपर्यंतच्या

---

† तत्रैव (पृ. १९५)

□ निबं. अं. १३ पृ. १९ वरील तळटीप.

* शालापत्रक पु. १४ अं. ११.

प्रसिद्ध कवींच्या काव्यातील अनंगरंग त्यांनी बोटाने दाखवून दिला. पुराणातील खोटया गोष्टीवर मराठी कविता आधारलेली आहे असे कुणी म्हटले तर त्याला ईलियड व ईनियड या इंग्रजीतील पौराणिक काव्याची आठवण करून दिली. मराठी कवितेत वेदांत आहे असे म्हणताच 'सर्वच देशांतील तत्वज्ञ लोकांनी जे वैराग्यपर विचार जागोजाग प्रदर्शित केलेले आढळतात ते आमच्या महाराष्ट्र कवीनीही प्रगट केले असले ह्यात काय बिघडले' असा सवालही मिशनरी पंडितांना विचारला आहे आणि 'चावटपणाच्या बाबतींत आमची मराठी कविता इंग्रजी कवितेशी ताडून पाहिली असतां पुष्कळच शुद्ध ठरेल' असा रोख जबाबही एके ठिकाणी दिलेला आहे.

पण या तुलनात्मक पद्धतीचे विधायक व विध्वंसक हे दोन्ही अंश मोरोपंतांच्या निबंधात इंग्रजी व संस्कृत वळणाच्या टीकाकारांच्या आक्षेपाला उत्तर देताना एकत्रित झालेले दिसतात. मोरोपंतांच्या कवितेवर दुर्बोधता, श्लेषात्मकता, शब्दालंकाराची हौस, भाषांतरितता असे जे एकाहून एक विलक्षण आक्षेप दोन्ही वळणाच्या पंडिती टीकाकारांनी केले ते उडवून लावताना चिपळूणकरांनी मधूनमधून या तुलनात्मक पद्धतीचा उपयोग करून मोरोपंताच्या कवितेचे स्वत:चे जे वैशिष्टच आहे ते दाखविण्याचा प्रयत्न केला. चिपळूणकरांच्या काळात संस्कृत व इंग्रजी या दोन्ही वळणाच्या टीकाकारांत शब्दालंकाराविषयी आणि पांडित्याच्या थाटामाटाविषयी तुच्छताबुद्धि होती आणि मोरोपंताच्या कवितेवरील साऱ्या आक्षेपाचे मूळ म्हणजे 'त्याची कविता ही इंग्रजी वा संस्कृत कवितेसारखी साधी नसून पंडिती थाटाची आहे' या मुद्यांत होते. चिपळूणकरांनी या मुद्याला उत्तर ज्या सिद्धांताच्या आश्रयाने दिले तो सिद्धांत म्हणजे रुचिवैचित्र्याचा होय. साधे कवित्व व पंडिती कवित्व हे कवित्वाचे कवीच्या रुचिवैचित्र्याप्रमाणे घडलेले भेद आहेत आणि हे भेद इंग्रजी व संस्कृत काव्यातही आढळतात हे त्यांनी कालिदास आणि भवभूति, ॲडिसन व जॉन्सन, शेक्सपीयर आणि मिल्टन यांच्या काव्यपद्धतीतील फरक दाखवून सुचविले आहे.

> रुचिपरत्वें करून जगांत हरएक प्रकरणी कृतिभेद आढळतो हे सर्वप्रसिद्धच आहे. दोघेही कोटयाधीश असतात; पण एकास साधाच पोषाक पसंत पडतो व एकास भपकीदार आवडतो... अशीच ग्रंथकर्त्यांचीही गोष्ट. ‡

रुचिवैचित्र्याचा वरील सिद्धांत आणखी एका प्रसंगी विशेष मार्मिकपणाने प्रगट झाला आहे. तो प्रसंगही कांहीसा हृदयंगम आणि मजेदार आहे. चिपळूणकराच्या टीकालेखनातील एरवीची वादकुशलता आणि कठोरता याप्रसंगी काहीशी नमलेली दिसते. एरवी अकरा अक्षौहिणीशी युद्धप्रसंग खेळणाऱ्या अर्जुनाला द्रोणाचार्याशी प्रसंग आला तेव्हा जसे अवघड वाटले तसाच कांहीसा अवघड प्रसंग चिपळूणकरावर या टीकाक्षेत्रांत आला आणि तो म्हणजे आपल्या रसिक पित्यावरील मोरोपंताच्या कवितेविषयीच्या वादात होय. पण या वादात एरवी विशेष न दिसणारी सहृदयता आणि कांहीसा कोमलभाव जागृत होऊन चिपळूणकराची एरवी प्रतिपक्ष्यावर काटयाचा वर्षाव करणारी लेखणी फुलांचा वर्षाव करू लागल्याचा भास होतो. चिपळूणकर म्हणतात--

> "आमचे वडील मराठी भाषेचे उत्कृष्ट अभिज्ञ व अत्यंत मार्मिक असतां प्रस्तुत कवीविषयी त्यांच्या मनांत येवढी अढी सदोदित कशी राहिली ? पद्यरत्नावली ज्यानी वाचली असेल व विशेषत: शेवटला विलाप वाचला असेल त्यांच्या मनाची खात्री असेलच की ते भाषांतर अत्यंत रसावाचून होण्याजोगे नाही पण काय चमत्कार आहे की कालिदास भवभूति, बाण, बिल्हण, जगन्नाथराय वगैरे गीर्वाण कवींविषयी ज्या रसिकाची परम भक्ति असे त्याची महाराष्ट्र कवितेविषयी सामान्यत: पाहता उदासीनत्वाचीच बुद्धी दृष्टीस पडे... जॉन्सनच्या ग्रंथांत व भाषणांत बिचाऱ्या ग्रे कवीविषयी जशी सदोदित अवहेलना आढळते किंवा संस्कृत विद्येचे नांव निघाले की मेकॉलेसाहेबांच्या कपाळाला तिडीक

‡ निबं. अं. ४६

गेलीच; तसाच प्रकार प्रस्तुत कवीचा व प्रस्तुत रसिकाचा आहे. पहिल्याचे कवित्व सामान्यातले आहे असे नाही, व दुसऱ्याची रसज्ञताही साधारण होती असे नाही. पण एका कवीने म्हटले आहे... भ्रमर हा वनात विकास पावलेल्या नूतन मंजरीचा सर्वांचा स्वाद घेत असतां एका चंपक-कलिकेचा मात्र अनादर करता झाला; आतां वस्तुतः पाहतां ती म्हणजे रमणीय नाही असे नाही व तो भोक्ता नाही असेही नाही... सारांश, प्रस्तुत प्रकरणी वरील समाधानच पत्करले पाहिजे." §

पंडिती परंपरेची प्रतिष्ठा

वरील उताऱ्यातच चिपळूणकरांनी जशी मोरोपंताची कृतिभेदाबद्दल वकिली केली तद्वतच त्याचे काव्य पंडित लोकांनाच आवडेल असे सुचवून स्वतःच्या रुचिवैचित्र्याचेही समर्थन केलेले आहे असे म्हणायला हरकत नाही. चिपळूणकरांनी इंग्रजी भाषेचे अध्ययन केले तरी ते फक्त त्यातील मूल्ये लक्षात घेण्यापुरतेच आणि इंग्रजीतील इतिहास व टीका वाचून त्यांच्या मनात जर कोणती प्रेरणा उत्पन्न झाली असली तर मराठी टीकापद्धतीतील स्वाभिमान व डौल वाढविण्याची होय. परंतु त्यांच्या रसिकतेचा कल पाहिला तर तो रसालंकारांनी युक्त अशा पंडिती परंपरेकडेच होता. संस्कृतातील बाणभट्ट, जगन्नाथ इत्यादि संस्कृत कवींच्या काव्याला मान डोलविणारी त्यांची रसिकता मराठीत तुकारामाचे साधे अंतःकरणांतील अकृत्रिम उद्गार पाहून तोष पावत असली, ज्ञानेश्वरांचे उपमाचातुर्य पाहून तिला विस्मय वाटत असला आणि शाहिरांच्या साध्या, रांगड्या आर्ष पण ऐकताक्षणी चित्तवृत्तीचा ठाव घेणाऱ्या लावण्यापोवाड्यांनी त्यांचा देशाभिमान उचंबळून येत असला तरी तिला खरा विसावा पंडिती काव्याच्या क्षेत्रांतच वाटत होता असे दिसते. संस्कृत कविपंचकात कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु व दंडी

§ तत्रैव अं. ७२ (डिसें. १८८०)

या पांच कवींच्या कवित्वाचे गुणदोषविवेचन करतांना त्यांचे मन ज्याप्रमाणे बाणभट्टाच्या सश्लेष व अलंकारिक वर्णनशैलीपाशी घोटाळले तद्वतच मराठीत ते मुक्तेश्वर, रामजोशी, रघुनाथपंडित, आणि विशेषतः मोरोपंत यांच्या कवितेत विशेष रमलेले दिसते. चिपळूणकरांना कवितेत कोणते गुण हवे, कोणत्या तऱ्हेची कविता त्यांना आवडते, ते कोणत्या गुणाला विशेष महत्व देतात हे पाहायचे असेल तर 'बाणभट्ट' 'भाषापद्धति' 'रसातळची मराठी भाषा' 'वेदार्थयत्न' 'विद्याधनप्रशंसा' 'आणि मोरोपंताची कविता' हे लेख पाहावे. यापैकी कांही लेख परीक्षणस्वरूपाचे असून त्यात भाषाशुद्धीवर विशेष कटाक्ष दिलेला आढळेल. भाषापद्धतीच्यानंतर अलंकारांचा थाटमाटही त्यांच्या मनाला चटकदार वाटतो. 'श्लेषयोजनेची अतोनात हौस ही कवितेला विघातक ठरते आणि यमकादि शब्दालंकार हे गौण अंग होत' हे त्यांनी बाणभट्ट, सुबंधु, दंडी या कवीवरील निबंधात स्पष्ट केले असले तरी त्या गौण अंगांनीही यथोचित प्रमाणांत कवितेची शोभा वाढते असेही विधान करून त्यांनी अलंकाराचा थाटमाट हा कवितेचा एक गुणच मानला आहे. सश्लेष पदरचनेच्या हौसेमुळे सुबंधूने संविधानक, रस, प्रसाद इत्यादि सर्वांवर पाणी घालून अश्लीलत्वादि दोषासही जागा दिली तर बाणभट्टाने ही रचना शोभेल तेथेच घातली असल्यामुळे कथेच्या अंगास लेशमात्रही दोष वा न्यूनता न येता उलट त्याच्या कवितेचे स्वारस्य वाढले असा अभिप्राय चिपळूणकरांनी सुबंधूवरील निबंधात बाणभट्ट व कवि सुबंधु यांच्या कवितेच्या तुलनेने बोलून दाखविला आहे. शब्दालंकाराबद्दलचा आपला अभिप्राय त्यांनी 'विद्वत्व व कवित्व' या लेखात प्रथम प्रगट केला. 'पदलालित्यादि गुण काव्यास शोभादायक खरे, पण ते काव्याचे सर्वस्व नव्हेत' असे प्रथम सांगूनही सत्काव्याशी त्यांचा योग झाला तर ते त्याचे रमणीयत्व फारच वाढवतील असेही त्यांनी म्हटले आहे आणि हाच प्रकार व्हर्जिल वगैरे ल्याटिन व कालिदासादि संस्कृत कवींच्या ग्रंथातून आहे व म्हणूनच त्यांची काव्ये मोठ्या मार्मिक रसिकांस जशी रिझवितात तशीच सामान्यजनासही आजपर्यंत

आनंद देत आली आहेत अशी उदाहरणाने पुष्टिही दिली आहे त्यावरून चिपळूणकरांना शब्दालंकाराचेही अगत्य वाटते असे दिसते. 'मोरोपंताची कविता' या निबंधात तर ते स्पष्टच सांगतात--

> शब्दालंकाराची योग्यता स्वतंत्रता अर्थालंकाराहून कमी खरी, पण यावरून त्यास मुळीच योग्यता नाही असे होत नाही. हे तर काय, पण जेथे . . सुंदर अर्थाचा व अनुप्रास यमकांचा यथास्थित योग झालेला असतो तेथे प्रमदालोचन-न्यस्तं मलीमसमिवांजनम् या न्यायाने वरील शब्दालंकारासही काही अपूर्व शोभा प्राप्त होते. †

'विद्याधनप्रशंसा' या पुस्तकावर अभिप्राय देतांना चिपळूणकरांनी त्या पुस्तकाची प्रशंसा केली आहे ती या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. चिपळूणकर लिहितात--

> भाषा ग्रंथकर्त्याच्या आटोक्यात बरीच असल्यामुळे भाषणाचा किंवा वर्णनाचा ओघ जसा काय सहज चालून यमकेही बरीच मोठी असताही त्यात लेशमात्र देखील क्लिष्टता दिसत नाही. ही शेवटली गोष्ट तर विशेष वाखाणण्यासारखी होय असे आम्हास वाटते. कारण की मोरोपंतांच्या अनुयायी वर्गाप्रमाणे यमक म्हणजे काव्यशिरोभाग असेही केवळ न मानता किंवा त्याच्या प्रतिपक्ष्यांचे जे यमक–भीरुत्व व बाह्यालंकारांच्या सर्वपरित्यागविषयीचे कडकडीत व्रत तेही न धरितां अर्थहानि व रसहानि न होऊन जितकी साजरी करवेल तितकी आपली कविता त्याने साजरी केली आहे. *

व्याकरणशुद्धता, भाषेची प्रगल्भता, शब्दालंकारांची उचितता व नीट-नेटकेपणा हे सारे चिपळूणकरांच्या दृष्टीने पंडिती परंपरेला जुळणारे

---

† तत्रैव अं. ४७

* शालापत्रक पु. १२ अं. ३

गुण मोरोपंताच्या कवितेत आढळतात आणि म्हणून मोरोपंताला चिपळूणकरांनी महाकवि ही पदवी दिली आहे. मोरोपंतांनी भाषेच्या शुध्दतेकडे दिलेले लक्ष, संस्कृत भाषेचा मराठी कवितेला आणून दिलेला डौल, व्याकरण बिघडू न देता व अर्थहानि न करता लांब लांब यमके साधण्याची आणि प्रासांची साखळीची साखळी जुळविण्याची केलेली अपूर्व करामत आणि चितान्यापाशी सारे रंग झाडून उभे राहावेत किंवा पाकाचार्याजवळ षड्रस सिध्द असावेत तसा आपल्या स्वाधीन करून ठेवलेला संपूर्ण रसवर्ग या कवित्वगुणावर चिपळूणकर लुब्ध झालेले आहेत. मोरोपंताची कविता संपूर्णपणे संस्कृत कवितेच्या वळणावर गेली असती तर बरे झाले असते असे जे उद्गार त्यांनी मोरोपंताच्या कवितेविषयी शेवटीं उपसंहारांत काढले आहेत ते पाहिले म्हणजे त्यांच्या रसिकतेचा कल कांहीसा संस्कृती वळणाकडे व त्यातही पंडिती तऱ्हेच्या आलंकारिक काव्यरचनेकडे वळलेला दिसतो असे म्हणायला हरकत नाही.

> जर आमचे महाराष्ट्र कवि साहित्यशास्त्रज्ञ असते तर सध्या आहे त्याहून मराठी कवितेत पुष्कळ बहार दृष्टीला पडती; म्हणजे संस्कृत कवितेत जसी हृदयंगम वर्णने, अलंकारिक भाषणप्रकार वगैरे आढळतात तसे प्रकार मराठी कवितेंतही आले असते. §

पौर्वात्य व पाश्चात्य गुणांचा समन्वय

परंतु चिपळूणकरांची रसिकता अशारीतीने यमकप्रासप्रचुर व अलंकारयुक्त संस्कृती वळणाच्या काव्याकडे झुकलेली दिसत असली तरी तो तिचा विशेष नव्हे तर संस्कृत व इंग्रजी या दोन्ही वळणाच्या रसिकतेतील योग्य ते व तेवढेच अंश घेऊन त्यांनी मराठीतील नव्या आधुनिक वाङ्मयमूल्याची प्रतिष्ठा केली हे त्यांच्या कामगिरीचे ठळक वैशिष्टच होय. इंग्रजी काव्यातील निरनिराळ्या गुणविशेषांचे ग्रहण

§ निबं. अं. ६३ (मार्च १८८०)

करून चॉसर, स्कॉट, शेक्सपीयर, ड्रायडन, मिल्टन, मेकॉले इत्यादि निरनिराळ्या कवींची वा नाटककारांची त्यांनी प्रशंसा केली तद्वतच संस्कृतातील कालिदास, भवभूति, बाणभट्ट, इत्यादि कवींची व नाटककारांचीही केली आणि तसे करताना त्यांच्या काव्यांतील वर्णनशैली, सृष्टिसौंदर्य, विनोदात्मकता, सश्लेष पदरचना, उपमाचातुर्य, अंतःकरणाचे स्वाभाविक उद्गार या निरनिराळ्या गुणांची मराठीत वाढ व्हावी अशी सूचनाही प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या त्यांनी आपल्या लेखांतून दिली. 'भाषापद्धति' या लेखात तर ते स्पष्टच सांगतात--

> मराठी कवितेचा ओघ आजपर्यंत ज्या दिशेने वाहत आला ती दिशा आता बदलली. मुळीच बंद न होता जर इतउत्तर पुढे चाललाच तर त्याचा रोख अगदी निराळा होईल यात संशय नाही. तो काही इंग्रजी कवितेच्या व काही संस्कृत कवितेच्या मार्गाकडे वळेल किंवा कवीच्या रुच्यनुरूप तो वरच्यापैकी एकेका पंथासच अनुसरेल.

चिपळूणकरानी इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषांतील योग्य तो गुणविशेष घेऊन ज्या नव्या मूल्याची मराठी प्रतिष्ठा करण्याचा प्रयत्न केला ते मूल्य दिसावयास वरवर पाहाता पंडिती वा अलंकारिक पद्धतीचे दिसत असले तरी त्याचे खरे स्वरूप संस्कृत वा इंग्रजी वळणाचे नसून ऐहिक वळणाचे होते. मराठीतील गेल्या कित्येक शतकांच्या पारमार्थिक कल्पनाचा निरास होऊन त्या ऐवजी नव्या ऐहिक कल्पनावर अधिष्ठित असलेले नवे वाङमयमूल्य चिपळूणकरांना हवे होते. ते मूल्य प्रस्थापित करण्यासाठी अवश्य त्या गुणविशेषांचा त्यांनी स्वीकार केला. तो करण्यापुरते त्यांनी इंग्रजी व संस्कृत वाङ्मयाचे साह्य घेतले आणि त्यासाठीच योग्य त्या प्रमाणात जुन्या परंपरेचाही मान ठेवला. 'विद्वत्व आणि कवित्व' या लेखात त्यानी मेकॉलेची धाटणीच नव्हे तर त्याचे सिद्धांतही आत्मसात् केले असले तरी ते आपल्या परंपरेच्या साच्यात नीट बसतील अशारीतीने उजळून मांडले आहेत. 'कवित्व आणि विद्वत्व या दोन गोष्टी एक नव्हत' आणि 'जसजशी

सुधारणा होते तसतसा कवित्वाचा ऱ्हास होतो' हे ते दोन सिद्धांत होत. पुढे 'संस्कृत कविपंचका'ला नव्याने जोडलेल्या प्रास्ताविकात मल्लिनाथाच्या टीकेसंबंधी जे विवेचन केले आणि त्यामुळे रुष्ट झालेल्या श्रीमंत कुरुंदवाडकरानी निबंधमालेकडे पाठविलेल्या त्यासंबंधीच्या पत्राला त्याना जे उत्तर द्यावे लागले त्यामध्ये आपले हे मत त्यानी पुनः एकदा प्रतिपादिले आहे पण त्याबरोबरच त्या मताला केवळ इंग्रजी ग्रंथकारांचाच नव्हे तर संस्कृतातील ग्रंथकारांचाही आपण आधार दाखवून दिला आहे हे सांगायला ते विसरले नाहीत. ‡ किंबहुना आपल्या मोरोपंतावरील निबंधातही 'मोरोपंत पंडित नसून साधा पुराणिक होता' हे वारंवार सांगण्याच्या त्याच्या अभिनिवेशाचे मर्म तरी हेच आहे.

पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की मोरोपंतांच्या कवितेची त्यांनी जी प्रशंसा केली ती त्यातील पारमार्थिक विषयामुळे नसून त्यात आढळणाऱ्या अलंकार–रस आदि गुणविशेषामुळे होय. संस्कृत वळणाच्या या ऐहिक गुणांना त्यांनी सृष्टिवर्णन, विनोदात्मकता, सत्यशोधन, देशाभिमान अशा नव्या इंग्रजी वळणाच्या ऐहिक गुणविशेषाची जोड दिली. इंग्रजी व संस्कृत या दोन्ही वळणांतून त्यानी नव्या मराठीला जे वाङ्मयमूल्य निर्माण करून दिले ते लोकरंजन व लोककल्याण यांचा समन्वय करू पाहणाऱ्या त्यांच्या प्रवृत्तीला धरूनच होते. निबंधमालेतील 'संपत्तीचा उपभोग' गर्व' 'लोकभ्रम' 'इतिहास' आणि 'वक्तृत्व' हे त्यांचे लेख या नव्या ऐहिक जीवनमूल्याला साजेसे आहेत. एकाबाजूने जुन्या कीर्तन पद्धतीतील साधे स्वरूप जाऊन त्याऐवजी त्याला अलंकारादि रंजनसामग्रीची मिळत असलेली जोड जशी त्यांना मानवते तितकीच युरोपियन टीकाकाराच्या आंगची सत्यशोधनात्मक

‡ "त्यातील विवेचन इंग्रजी ग्रंथकाराच्याच वचनावरून केले आहे असे नाही तर इकडील एका मोठ्या कवीचाच खुद्द त्या विषयीचा अभिप्राय स्पष्ट दाखविला आहे." (निबं. अं. ३५)

चिकित्साप्रवृत्तिही त्यांना आवडते. 'मनोरमा' नाटकातील बीभत्स रसाचा प्रकार निंद्य मानूनही भाषासौंदर्याचा विचार करताना ते बीभत्सत्वाचा आक्षेप बाजूला सारतात पण त्याच्याच बरोबरीने 'सुखं च मे शयनं च मे' या सुखवादी प्रवृत्तीचाही आपल्या 'इतिहासा' वरील निबंधात ते अधिक्षेप करताना दिसतात. एका बाजूने 'इतिहासा'सारख्या देशाभिमानास पोषक अशा विषयाचे महत्व वाचकांच्या मनावर त्यांनी ठसविले तर त्याबरोबरच दुसरीकडे ग्रंथोत्तेजक मंडळीच्या काव्य-कादंबरीविषयीच्या प्रतिकूल दृष्टिकोनाला विरोधही केला. रंजन आणि शिक्षण या दोन्ही प्रवृत्तीला धरून वाङमयाची निर्मिति होत असावी आणि याच ऐहिक दृष्टीने मराठी वाङमयाचे नव्याने प्रवर्तन व्हावे अशी चिपळूणकरांची दृष्टि दिसते. याबाबतीत लोकशिक्षणाच्या ध्येयाइतकाच लोकरंजनाच्या तत्वालाही ते सारख्याच हिरीरीने उचलून धरतात; इतकेच नव्हे तर करमणुकीची वा कलेची भ्रष्ट होत असलेली अवस्था सावरून धरण्याच्या दृष्टीने सुसंस्कृत व सदभिरुचीच्या रसिकानी तिला जवळ करावे अशीही सूचना करण्यास ते कमी करीत नाहीत आणि हीच दृष्टि त्यांनी नाटकाविषयीच्या आपल्या एका लेखात बऱ्याचशा विस्ताराने बोलून दाखविली आहे. अण्णा किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' नाटकाचा १८८० त जो पहिला प्रयोग पुण्याला झाला तेव्हापासून नाटके करावी का करू नयेत असा एक वाद वर्तमानपत्रात माजलेला दिसतो. या वादाच्या निमित्ताने चिपळूणकरांनी केसरीत जे एक दोन लेखांक लिहिले त्यात परमार्थपरायण असे विरक्त आणि शास्त्रीय वृत्तीचे अरसिक अशा दोघांचाही त्यांनी उपहास केला असून उच्च शिक्षणाप्रमाणेच करमणुकीचे महत्व मान्य केले आहे.

> नाटके करणे बरोबर आहे की नाही हा जर आम्हास कोणी प्रश्न केला तर त्यावर आमचे उत्तर असे आहे की अगदी बरोबर आहे. ते कां? तर त्यापासून लोकरंजन होते. म्हणून लोकरंजनाचा जो जो मार्ग असेल तो तो लोकांत अवश्य प्रवृत्त झाला पाहिजे... इतकेच की त्यापासून

शरीरास किंवा मनास, साक्षात किंवा परंपरेने इजा होण्यासारखी मात्र नसावी. *

'वक्तृत्वा' वरील आपल्या निबंधात कीर्तनपरंपरेचा मराठीतील इतिहास सांगताना रामजोशाने आपल्या स्वकृत लावण्या कीर्तनात म्हणण्याचा परिपाठ ठेवून लावण्याचा त्या परपरेत कसा प्रवेश मिळवून दिला हे मोठ्या रसभरित शब्दात मांडून या लावण्याचा आस्वाद घेण्याची रसिकांना कटाक्षाने जी तळटीपेत सूचना केली आहे ती यादृष्टीने पाहण्यासारखी आहे. चिपळूणकर लिहितात--

> कीर्तनात लावण्या म्हणण्याबद्दल अद्यापही लोकांचा ग्रह अगदी कमी झाला नाही. मागे सुमारे दहा वर्षांपूर्वी पन्हळकर म्हणून एक नामांकित हरदास येथे आले होते. त्यांचे कीर्तन वरील कारणास्तव पुष्कळ असमंजस व अरसिक लोकांस अप्रशस्त वाटे. वरील गोसाव्याजवळ इतर मराठी कवीच्यासारखा रामजोशाच्या लावण्यांचा भरपूर भरणा होता आणि त्या म्हणण्याची त्याची रीत फारच बहारदार असे. मराठी कवितेची माहिती करून घेऊन तिचा आस्वाद ज्यास घेणे असेल त्यानी वरच्यासारखे प्रसंग कधी दवडू नयेत. ‡

या रामजोशांच्या लावण्याच्या संदर्भात निबंधमालेच्या रसिक वाचकांना आणखी एक गोष्ट आठवण्यासारखी आहे व ती म्हणजे मालेच्या पहिल्याच वर्षाच्या सहाव्या अंकात 'उत्कृष्ट उतारे' या सदराखाली रामजोशांची 'कुणा ग सुभगाची मदन मंजरी' ही लावणी चिपळूणकरानी प्रसिद्ध केली असून तिचे मार्मिक रसग्रहणही तेथेच करून दाखविले आहे. चिपळूणकरांच्या आंगच्या मर्मज्ञतेची साक्ष पटविण्याच्या दृष्टीने ते रसग्रहण मोठे उद्बोधक ठरेल.

---

* केसरी २९ नोव्हेंबर १८८१

‡ निबं. अं. २० पृ. १८ वरील तळटीप.

एकंदरीत 'रंजन' व 'लोकशिक्षण' या दोन्ही तत्वांचा समन्वय त्यांनी केला आणि नाटके किंवा लावण्या यासारख्या एरवी अप्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या करमणुकीच्या प्रकारांनाही त्यांनी महत्वाचे स्थान दिले.

चिपळूणकरांची कामगिरी

एकुणिसाव्या शतकातील–पेशवाई, इंग्रजी अमदानीचा १८५७ पूर्व आणि १८५७ नंतरचा विद्यापीठाच्या स्थापनेपासूनचा उत्तरार्ध अशा तीन कालखंडांतील मूल्यमापनाचे चित्र हे असे आहे. रावबाजीच्या काळी देवाधर्मापासून मुक्त होत चाललेली महाराष्ट्राची कला अव्वल इंग्रजीत ऐहिक मूल्यावर एकाबाजूने संस्कृती आणि दुसऱ्या बाजूने इंग्रजी वळणाचे संस्कार होऊं लागले आणि त्याबरोबरच मराठीच्या आजवरच्या परंपरेचा पायाच नष्ट होणार की काय असा संभव दिसू लागला. जुन्या शास्त्रीमंडळाची प्राकृताविषयीची अवहेलना आणि नव्या पदवीधरांची परप्रत्ययनेयबुद्धी या दोन्ही मराठीच्या जुन्या अभिरुचीच्या वाढीला विघातकच ठरल्या. एकाबाजूने नवसाहित्याची निर्मिति होऊं लागली खरी पण त्यातही जुन्या परंपरेतील मराठीचे स्वत्व वा जीवनसत्व मात्र नव्हते. त्यातच जुन्या संस्कृती वळणाने जे नवे मूल्य पुढे मांडले होते तेही ध्येयहीन आणि निवळ रंजनप्रधान असल्यामुळे मराठीच्या शतकानुशतकाच्या परंपरेला ही रुचण्यासारखे नव्हते. नव्या पदवीधरांच्या परप्रत्ययनेयबुद्धीने निर्माण केलेली तुलनात्मक पद्धतीही विधायक ठरण्याऐवजी मराठीच्या अध्ययनाच्या दृष्टीने विध्वंसक ठरण्याची वेळ आली आणि अव्वल इंग्रजीच्या पहिल्या प्रहरात मराठीला राजाश्रयाचे जे थोडेबहुत सुख मिळू पाहत होते ते जाऊन त्याऐवजी तिला पोटभर जीवनसत्व न मिळाल्यामुळे तडफडण्याची वेळ आली–आणि त्यातच मिशनरी पंडिताच्या आक्षेपाचे शरसंधानही तिला घायाळ करूं लागले.

एकुणिसाव्या शतकातील या कांहीशा अभ्राच्छादित देखाव्याकडे पाहिले म्हणजे चिपळूणकरांच्या कामगिरीचे मर्म लक्षांत येते. चिपळूण-

करांनी इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषाचे अध्ययन केले, त्यातील गुणविशेषाची प्रशंसा केली परंतु त्याबरोबरच या दोन्ही भाषांच्या दडपणामुळे मराठीचे स्वत्व नष्ट होण्याची जी वेळ आली होती ती लक्षात घेऊन ते संकट दूर करण्यासाठी त्यानी आपली लेखणी वाहिली. चिपळूणकरांच्या टीकालेखनात ज्वलज्जहालपणा आहे तितकीच स्वाभिमानाची आग आहे. मेकॉलेच्या टीकापद्धतीचा डौल त्यांच्या भाषेत आहे पण तितकाच भाषेच्या उद्धाराला हवा असणारा जिवंतपणाचा गुणही आहे. त्याच्या रसिकतेचा कल पंडिती वळणाकडे असला तरी युरोपियन पंडिताची चिकित्साबुद्धि त्यांना तितकीच प्रिय आहे. ज्या रसिकतेच्या उचंबळीमुळे त्यांनी नाटकप्रयोगात भाग घेतला तीच प्रेरणा त्यांना ग्रंथोत्तेजकमंडळीच्या ललित साहित्याच्या प्रकाशनावर टाकलेल्या वहिष्कारावद्दल टीका करायला लावण्यास कारणीभूत झाली. इतिहासाविषयीची जी आस्था तत्कालीन कर्त्या पुरुषांत होती ती त्यांच्यातही होती पण त्या इतिहासाच्या वाचनाने देशाभिमानाच्या वृत्तीचे रोमांच जसे त्याच्या रोमारोमांतून उठले आणि त्याच्या लेखणीतून त्या वृत्तीचा प्रकाश जसा फाकत गेला तो मात्र इतरांत अभावानेच तळपत होता. कृष्णशास्त्री चिपळूणकराप्रमाणेच रंजनाचे काव्यलक्षण त्यांनी मान्य केले असले तरी ते त्यांच्या वाङमयमूल्याचाच एक अंशभूत होते. त्या रंजन–तत्वाला मान्यता देऊनही त्या तत्वाच्या मागच्या ध्येयहीन, स्वाभिमानशून्य आणि चावटपणाला वाव देणाऱ्या पार्श्वभूमीचा त्यांनी धि:कारच केला आणि त्याऐवजी लोकशिक्षणात्मक ध्येयाच्या, स्वाभिमानाच्या आणि सभ्य रसिकतेच्या नव्या पार्श्वभूमीची जोड त्यांनी स्वत: दिली.

तेजस्वी दिनकराच्या ज्या किरणांनी विश्वातील तमोमयता नाहीशी होते त्या किरणाचे रंग पाहिले तर एकमेकाहून वेगळे असतात पण आपल्या तेजाळपणामुळे सामान्य दृष्टीला त्यांचे पृथक्करण करता येत नाही. चिपळूणकरांच्या ज्वलज्जहाल टीकालेखनातही असेच सात रंग भरलेले आहेत. त्यांनी एका बाजूने स्वत्वाची जाणीव निर्माण करून दिली तर दुसरीकडे मराठीचे वेगळेपण व वैशिष्टच कोणते तेही

दाखविले. कवितेच्या रसास्वादनाला विघातक ठरणाऱ्या भ्रामक अपसिद्धांताचे खंडन केले तर त्या बरोबरच मूल्यमापन कसे केले जावे याचीही मीमांसा केली. तुलनात्मक पद्धतीतील अप्रयोजकता नाहीशी करून तिची विधायक व विध्वंसक अशी दोन्ही टोके पाजळून दाखविली आणि त्या पद्धतीच्या साह्यानेच पंडिती कवितेच्या परंपरेला प्रतिष्ठा मिळवून दिली. पण या साऱ्या गोष्टी करीत असतानाच पौर्वात्य व पाश्चात्य यातील गुणविशेषांचा योग्य समन्वयही घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. चिपळूणकरांच्या या टीकालेखनाचे व कामगिरीचे सारे मर्म त्यांच्या तीन सिद्धांतात आहे. ते तीन सिद्धांत म्हणजे राष्ट्र-भेद, कालभेद आणि रुचिभेद हे होत. पहिल्या सिद्धांताने इंग्रजांची व आमची रुचि वेगळी हे दाखविले, तर दुसऱ्या सिद्धांताने जुन्या मराठीला नव्या काळांतील कसोटी लावणे कसे अयोग्य होईल हे सुचविले. तिसऱ्या रुचिभेदाच्या सिद्धांतावर त्यांनी मोरोपंतांच्या कवितेवरील आक्षेप खोडून त्या काव्यपरंपरेलाही स्वतःचे वैशिष्ट्य असू शकते ही जाणीव निर्माण करून दिली. या सिद्धांताचे उद्घाटन वा प्रतिपादन करताना त्यांनाही वेळोवेळी आपल्या प्रतिपक्ष्यांवर तीव्र शरसंधान करावे लागले. पण ही विध्वंसकता देखील त्यांच्या विधायक काम-गिरीचेच तेजाळ स्वरूप होते. निबंधमालेच्या तिसऱ्या वर्षाच्या उप-संहारांत आपल्या कडक भाषेविषयी लिहिताना टीकाकारास बागवा-नाचेच काम करावे लागते असे त्यांनी म्हटले आहे आणि एका संस्कृत सुभाषितात राजाला जी बागवानाची उपमा देण्यात येते तीच टीका-काराला देण्यासारखी आहे असे सुचविले आहे. खुद्द चिपळूणकरांची कामगिरी थोडक्यांत सांगायची झाल्यास ती त्यांनी सुचविलेल्या या सुभाषितातून चांगली व्यक्त होते असे म्हणायला हरकत नाही.

उत्खातान् प्रतिरोपयन्कुसुमितांश्चिन्वन् शिशून्वर्धयन्
प्रोत्तुंगान्नमयन्नतान्समुदयन् विश्लेषयन् संहतान्
तीव्रान्कंटकिनो बहिर्नियमयन् ग्लानान्मुहुः सेचयन्
मालाकार इव प्रयोगनिपुणो राजा चिरं नंदतु ॥

रसिक आणि रसज्ञ : ४

स्वपक्षसमर्थनासाठी तुम्ही जो प्रतिखंडणाचा यत्न केला आहे तो त्या उल्लेखावरील आक्षेपांच्या संबंधाने कितपत निराकरणसमर्थ आहे ही गोष्ट तुमच्या वाचकापैकी जे तारतम्यविलोकी आणि सुजाण असतील त्यांच्या तर लक्षात येऊन चुकली असेल. काही अंशी अशा वादामध्ये सत्यासत्याचा निर्णय करण्याचा अधिकार उभय पक्षकार आणि प्रतिपक्षकार यांचा नसून निःपक्षपात, उदासीन व समंजस वाचकाचा आहे.

निबंधमालेतील वाचकांची पत्रे--

समीक्षेच्या इतिहासात कधी कधी असाही एक काळ येतो की ज्यावेळी लेखक आणि टीकाकार यांच्याइतकाच वाचकवर्गही सुबुद्ध आणि जाणकार असतो आणि एखाद्या विशिष्ट अभिरुचीचे प्रतिपादन करण्यात या दोन्ही वर्गाइतकाच तोही महत्वाने पुढाकार घेत असतो. विष्णुशास्त्री चिपळूणकर ज्यावेळी निबंधमालेच्या द्वारे एक विशिष्ट अभिरुचि स्थापू पाहात होते त्याचवेळी त्या निबंधमालेच्या अंकातून

किती तरी वाचक आपापल्या अभिरुचीची आणि आवडीनिवडीची तितक्याच साक्षेपाने दखल घेताना दिसतात. कुणी मालाकाराचा शिष्य* म्हणवून घेणारा वाचक 'सुभाषित आणि विनोद महदाख्यायिका अति सर्वोत्कृष्ट असतात' असे सांगतो पण त्याबरोबरच 'निबंधाकडे विशेष लक्ष द्यावे' म्हणून आग्रहाची सूचना करतो. कुणी वाचक बुंदेलखंडातील एखादी आख्यायिका प्रसिद्धीसाठी पाठविताना 'ऐतिहासिक गोष्ट आपणास वेधून घेते' अशी कबुली† देतो तर कुणी 'नवी पुस्तके' सदर आवडत नसल्याचे§ स्पष्ट करतो. 'साहित्य' हे सदर कुणाला‡ फार चित्ताकर्षक वाटते पण जॉन्सन–चरित्र मात्र कर्मकथा वाटते तर याच्याउलट 'मालेचा एक भक्त'$ जिज्ञासुला ते चरित्र का आवडू नये अशी याबद्दल पृच्छा करताना दिसतो. कुणी नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एखाद्या ग्रंथाचे परीक्षण करण्याच्या निमित्ताने ग्रंथकर्त्यास काही सूचना करू पाहतो □ तर कुणी एखादा नव्याने मराठीत येऊ पाहणारा वाङ्मय–प्रकार कसा लिहिला जावा याचा पाठ देऊ लागतो.+ मोरोपंतांच्या कवितेसंबंधी होत असलेल्या वादविवादात कुणी मालाकारांच्या बाजूला उभे राहून प्रतिपक्ष्याला प्रत्युत्तर करताना दिसतो● तर कुणी वाचक प्रतिपक्ष्याची भूमिका घेऊन 'प्रत्येक सिद्धांत स्थापित करताना स्व–मतप्रतिपादन आणि स्वाभिप्राय-

---

याठिकाणी दिलेल्या तारखा मालेच्या अंकाच्या नसून पत्राच्या तारखा आहेत असे समजावे.

* **वा. वि. लेले** (अं. ५६–५ मार्च १८७९)

† **का ब.** (अं. ४०–तारीख नाही)

§ **मो. ग. लोंढे,** (अं. ६३–ता. १ एप्रिल १८७९)

‡ **जिज्ञासु** (अं. ४५–तारीख नाही)

$ **आपला एक भक्त** (अं. ५०–ता. २१ एप्रिल १८७८)

□ **के. बा. का.** (अं. २२–३१ ऑक्टो. १८७५)

\+ **भक्त** (अं. ५५–ता. १३–१–१८७९)

● **वेताळ** (अं. ७०–ता. ९ फेब्रु. १८८१)

दाढर्चदर्शक आधार आपल्यापाशी तयार ठेवावे लागतात' असे खुद्द मालाकारांनाच सुनावतो.[卐]

थोड्याशा बारकाईने न्याहाळून पाहिले तर असेही दिसेल की निबंधमालेच्या जन्मापासूनच्या पुढल्या सात–आठ वर्षाच्या काळात त्या काळातील इतर मासिकातल्यापेक्षा निबंधमालेतील वाचकमित्रांची आवक आणि पत्रव्यवहार विशेष वाढलेला दिसतो. १८७४ ते १८८१ पर्यंतच्या काळात निबंधमालेत प्रसिद्ध झालेली वाचकांची पत्रे अदमासे १२५–१३० च्या आसपास आढळतात. ही संख्या त्या काळातील इतर कोणत्याही नियतकालिकात न आढळण्याइतकी विपुल आहे आणि त्यातही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की हा व्यवहार केवळ साहित्यविषयक अभिरुचीचे आदानप्रदान करण्यातच संतुष्ट नाही तर विशिष्ट अभिरुचीचे योग्य रीतीने संवर्धन करण्यात मालाकाराइतकीच दक्षता बाळगू इच्छितो. या सुजाण आणि रसिक वाचकाच्या मतांचा कानोसा घेता आला तर चिपळूणकरांच्या काळात जी अभिरुचि मराठीच्या क्षेत्रात नांदायला आली होती तिचा संसार सावरण्यास या सुबुद्ध वाचकवर्गाने कितपत साह्य केले किंवा तत्सदृश इतर कोणती महत्वाची कामगिरी बजावली हे आपणास समजून घेता येईल.

मालाकारांची भूमिका–

या दृष्टीने पुन्हा एकदा चिपळूणकरांच्या निबंधमालेकडे सुरवातीच्या वर्षापासून लक्ष द्यावयास हवे. निबंधमालेच्या बरोबरीने या काळात विविधज्ञानविस्तार, दंभहारक इत्यादि नवी जुनी मासिके काम करीत होती. परंतु वाचकवर्गाला साहित्यविषयाची परोपरीने गोडी लावण्याचे आणि तिला आपणाकडे आकृष्ट करण्याचे जे काम निबंधमालेने सुरवातीपासून केले ते विशेष महत्वाचे म्हणावे लागेल. एखाद्या सुगरण स्त्रीने जेवणाराच्या ताटात निरनिराळे रुचकर पदार्थ वाढावे आणि त्यापैकी कोणत्या पदार्थाकडे जेवणाराचे लक्ष वेधले जाते

[卐] **वा. दा. ओक** (अं. ७४–२९ मे १८८०)

याचा अदमास मनाशी घेत राहावा तसे याबाबतीत चिपळूणकरांचे धोरण दिसते. निबंधमालेच्या पहिल्या दुसऱ्याच अंकात चिपळूणकरांनी आपल्या वाचकवर्गाला स्वतःची मते मांडण्यास आवाहन केले होते इतकेच नव्हे तर या वाचकवर्गाची अभिरुची समजून घेण्यासाठीच की काय त्यांनी सुभाषित, अर्थसादृश्य, उत्कृष्ट उतारे, चमत्कारिक माहिती, विनोद–महदाख्यायिका, भाषापरिज्ञान आणि साहित्य यासारखी चटकदार सदरे आपल्या मालेत समाविष्ट केली होती आणि यापैकी कोणते सदर वाचकांना आवडते याचा ते सुरवातीपासून अंदाज घेत होते.

मालाकारांच्या या धोरणाचा पडताळा पहिल्या वर्षाच्या पाचव्या अंकात पाहावयास मिळतो. या अंकात 'विश्वामित्र' या सहीचे एका वाचकाचे पत्र त्यांनी प्रसिद्ध केले असून त्याबद्दल एक प्रकारचा संतोषही त्यांनी स्पष्ट केला आहे. मालाकार लिहितात––

> या अंकासुद्धा आमच्या पुस्तकाचे एकंदर पाच अंक निघाले. पण येथपर्यंत त्यांच्याविषयी अनुकूल किंवा प्रतिकूल असे मत कोणी दिलेले आम्हास आढळले नाही. याबद्दल जी एक तऱ्हेची दिलगिरी आम्हास वाटत होती ती नुकतीच दूर झाली. मार्च महिन्याच्या अंकात भाषापरिज्ञान या सदराखाली जो थोडा मजकूर आम्ही लिहिला होता, त्यावर विश्वामित्र या सहीचे एक पत्र आम्हाकडे आले आहे.†

मालेच्या सहाव्या अंकांत विश्वामित्राच्या या पत्राला उत्तर देताना मालाकारानी पुन्हा एकदा आपली भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे––

> हे पत्र पाहून आम्हास खरोखर फार आनंद झाला. कां की त्यावरून आमच्या पुस्तकाकडे लोकांचे लक्ष किती

† निबं अं. ५ (पृ. २०)

आहे, व तशीच भाषेविषयीही शोधक बुद्धि किती आहे हे तेव्हाच दिसून आले. वरील लिहिणाराच्या स्पष्ट उक्तीचा आम्हास राग आला नाही हे तर काय, पण वादविवादात असा प्रकार नसला तर सत्याचा निर्णय कधी होणार नाही अशी आमची खात्री आहे यास्तव अशाप्रकारची चर्चा जितकी चालेल तितकी चांगलीच.*

याच सहाव्या अंकात आणखी एक दोन वाचकांचा मालाकारांनी परामर्श घेतलेला दिसतो. बाळाजी रामचंद्र अलूरकर या वाचकाला 'तुमचे सुभाषित श्लोक सवडीने प्रसिद्ध होतील' असा दिलासा ते देतात तर कुणा रत्नागिरीकर वाचकांनी एप्रिल महिन्याच्या अंकातील एका सुभाषिताचा अर्थ चुकीचा असल्याची जी तक्रार केली ती मान्य करून त्या वाचकांनी दिलेले अर्थ जास्त योग्य आहेत याबद्दल मालाकारानी कशी कबुली दिली आहे ती पाहा.

एप्रिलच्या चवथ्या अंकात पहिल्या श्लोकाचा अर्थ लिहिताना 'काकोदर' या शब्दाचा अर्थ रामपक्षी लागत नाही म्हणून आम्ही संशय प्रकट केला होता तो आमच्या दोघा मित्रांनी चांगला निवारण केला; याबद्दल त्यांचे उपकार मानले पाहिजेत.†

मालेतील आकर्षक सदर–

वाचकांच्या मताचा आदर करण्याच्या या प्रांजळ वृत्तीमुळेच निबंधमालेकडे मराठीचा वाचकवर्ग दिवसेंदिवस आकृष्ट होत गेला यात शंका नाही. वाचकवर्गाची रुची समजून घेऊन तिला शक्य तो मान देणारा संपादक ही म्हटली तर त्या काळातही एक दुर्लभ चीज होती आणि म्हणूनच त्या काळातील सुबुद्ध, जाणकार व चिकित्सक वाचक आपल्या मतांचे आणि आवडीनिवडीचे प्रतिपादन करण्यास मालेच्या

---

* **तत्रैव** अं. ६ (पृ. ३३)

† **तत्रैव** (पृ. ३५–३६)

अंकाचा आश्रय घेऊ लागला. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की या वाचकवर्गामध्ये सुबुद्ध आणि बहुश्रुत, जाणकार आणि रसिक चिकित्सक आणि मर्मज्ञ असा वेगवेगळ्या तऱ्हेचा वाचकवृंद आपणास भेटतो. चिपळूणकरानंतरच्या काळात मराठी साहित्याच्या भिन्न भिन्न क्षेत्रात नावाजलेले रथी–महारथी या वाचकवृंदात आढळतात. ज. बा. मोडक, वा. दा ओक, का. पां. परब, मो. ग लोंढे, वा. वि. लेले, अं. रा. हर्डीकर, के. बा. कानिटकर ही या पत्रलेखकांच्या यादीतील नावे लक्षात घेण्यासारखी आहेत. याशिवाय शंकित, जिज्ञासु, शोधक, हितेच्छु, वेताळ, भक्त, शिष्य, वाचक, विद्यार्थी आणि मित्र यासारखे गुप्त नावाने वावरणारे वाचक त्यात दिसतात तसेच गणेशशास्त्री लेले, श्रीमंत कुरुंदवाडकर यासारखा पंतभक्त कविवृंदही मधून मधून आपला पायरव जाणवून देतो.

या विविध वृत्तीच्या आणि वेगवेगळ्या थरातल्या वाचकवर्गाची आवडनिवड लक्षात घेणे, समयविशेषी त्यास प्रोत्साहन देणे, आपल्या रुचीस धरून तीस वळण देणे, आणि तशी ती नसली तरी तिची अगत्याने पूसतपास करीत राहणे हे काम निबंधमालेच्या द्वारे चिपळूणकर सतत आठ वर्षे करीत राहिले आणि त्यामुळे निबंधमालेच्या सर्व सदरामध्ये 'वाचकांचा पत्रव्यवहार' हे सदर विशेष आकर्षक ठरले. निबंधमालेने दाखविलेल्या या दिलदार वृत्तीबद्दल वाचकांच्या मनात कोणत्या भावना होत्या त्या त्यांनीही वेळोवेळी आपल्या पत्रातून व्यक्त केल्या आहेत. त्यापैकी वामनराव ओक या नागपूरकर रसिकाने १८८० च्या फेब्रुवारीत मालाकारांना जे पत्र लिहिले आहे त्यातील हा मजकूर पहा--

> तुम्ही आपल्या मालेमध्ये माझ्यासारख्यांच्या पत्रास अवकाश स्थल देऊन आदर करता आणि अनेक शंकांचे समाधान करण्याविषयी सदा राजी असता म्हणून मी माझ्या तर्फे व मजसारख्या शंका काढणाऱ्या वाचकांच्या तर्फे आपले कृतज्ञताबुद्धिपूर्वक आभार मानितो ‡

‡ निबं. अं. ६५

निबंधमालेच्या वाचकवर्गात १८७४ ते १८८१ पर्यंतच्या* आठ वर्षाच्या काळात आपले अभिरुचीविषयक विचार प्रगट करण्याच्या दृष्टीने हळूहळु क्रमश: अशी वाढ होत गेली हा अभ्यासाच्या दृष्टीने एक स्वतंत्र मनोरंजक विषय ठरावा. १८७४ ते १८७७ पर्यंतच्या काळात केवळ आपली आवडनिवड नमूद करू इच्छिणारा हा सुबुद्ध वाचक १८७८ पासून पुढच्या काळात खुद्द मालाकाराशी अटीतटीची युद्धे खेळताना दिसतो. १८७८ ते १८८१ पर्यंतच्या या उत्तरार्धात एकाबाजूने 'नवी पुस्तके' आणि दुसऱ्या बाजूने 'पत्रे आणि उत्तरें' ही दोन सदरे निबंधमालेची बरीच पाने व्यापून घेत आहेत. क्वचित एखादा वाचक 'हिंदुस्थानचा अर्वाचीन कोश' 'नवनीत' 'षडदर्शन-चिंतनिका' या सारख्या नव्या पुस्तकावर आपले अभिप्राय सादर करीत आहे, क्वचित एखाद्या वाचकाचे दीर्घ व गोष्टीवेल्हाळ पत्र मालेच्या एका अंकावरून दुसऱ्या अंकावर 'चालू' असून ते मालेच्या २–३ अंकांची जागा व्यापून बसले आहे तर क्वचित मालाकारांना बाजूला सारून एखादा नागपूरचा 'वेताळ' दुसऱ्या वाचक-बंधूशी मताच्या बाबतीत वाग्युद्ध करीत आहे असे दृश्य या काळात वारंवार दिसू लागते.

हे सारे दृश्य पाहिले म्हणजे हा सुबुद्ध आणि जाणकार वाचक केवळ आपल्या रसिकतेचीच नव्हे तर रसज्ञतेचीही साक्ष पटवू पाहत आहे असा भास क्षणोक्षणी होऊ लागतो आणि वाचक आणि टीकाकार यांच्यात प्रसंगोपात्त होऊ पाहणाऱ्या समरप्रसंगांच्या निमित्ताने का

* मालेचा ऑगस्ट ते ऑक्टो. १८८१ चा जोड अंक ३०–८–८२ ला प्रसिद्ध झाला, तर अं. ८३–८४ ह्या जोड अंकावर नोहें. डिसें. १८८१ असा काल असला तरी त्याचा प्रसिद्धिकाल मात्र चिपळूणकर निधनानंतरचा म्हणजे १–४–८३ असा त्या अंकाच्या मुखपृष्ठावरच छापलेला आढळतो. म्हणून वर दिलेल्या मजकुरात निबंधमालेचा शेवट हा अंकाप्रमाणे पाहता डिसेंबर १८८१ मानला आहे. ऑगस्ट ते डिसेंबर १८८१ च्या या अंकांत वा. वि. लेले यांचे एकच पत्र **१ जानेवारी १८८२** या तारखेचे दिसते.

होईना मराठी टीकेला एक आश्वासन मिळू पाहत आहे असा सुखकर प्रत्यय येऊ लागतो.

मतभेद आणि मूल्यमापन

निबंधमालेचा वाचक बहुश्रुत असावा आणि महाराष्ट्र भाषेचे त्याला चांगले ज्ञान असावे. मग संस्कृत व इंग्रजी या भाषांचे ज्ञान बेताचे असले तरी चालेल अशी आपल्या वाचकांविषयीची किमान अपेक्षा चिपळूणकरानी मालेतच एका वाचकाला प्रत्युत्तर देताना बोलून दाखविली आहे. परंतु चिपळूणकरांचा एक वाचक वर्ग त्यांना हवा होता त्याहून संस्कृत भाषेचा बराच जाणकार आहे आणि तो सुभाषितांची गोडी जितक्या रसिकतेने सेवन करतो तितक्याच दक्षतेने तो त्यातील चुकाही टिपतो. 'शिवार्या' हे मोरोपंतांचे संस्कृत काव्य निबंधमालेत प्रसिद्ध होत असताना कवितेची गोडी लावण्याच्या दृष्टीने त्यातील गुणस्थले स्पष्ट करावी अशी अपेक्षा एका 'जिज्ञासु' वाचकाने * बोलून दाखविली तर 'मुक्तामाला' हे पंतांचे दुर्मिळ काव्य उपलब्ध करून दिल्याबद्दल मोरोपंतांचे एक रसिक भक्त व मालाकारांचे मित्र ज. बा. मोडक यांनी † मालाकारांचे अभिनंदन करतानाही याच मुक्तामालेत पाचव्या गीतीतील 'सतीर्थ्य' शब्दाचा मालाकारांनी दिलेला अर्थ कसा चुकीचा आहे हेही अमरकोश, अष्टाध्यायी, वृत्ति इत्यादि संस्कृतातील कोशव्याकरण ग्रंथांच्या आधाराने त्यानी मोठ्या आक्षेपाने दाखविले आहे.

आपल्या विधानांना आधार देण्याची ही पंडिती टीकाकाराला साजेशी 'अभिजात' वृत्ति बहुतेक साऱ्याच पत्र-लेखकानी अवलंबिलेली दिसते. शं. बा. दीक्षितासारखा शंकेखोर वाचकही मालेच्या १० व्या अंकातील भाषापरिज्ञान या सदरातील 'गायत्री' शब्दाचा मालाकारानी दिलेला 'गाणारी' हा अर्थ चुकीचा आहे हे सांगताना 'गायत्री प्रोच्यते

* तत्रैव अं. ४५ (पत्राची तारीख नाही.)

† तत्रैव अं. १९ (ता. १४ जुलै १८७५)

तस्माद्गायन्तं त्रायते यत: ' × अशी मुनिवचनाची ढाल पुढे करतो. 'कथा-कीर्तनाचा प्रकार अलीकडे सुरू झालेला दिसतो' या वक्तृत्व' निबंधातील मालाकारांच्या विधानाला हरकत घेताना बाळापूर वऱ्हाडचे पारखी ‡ शास्त्री 'पद्मपुराणा'तील प्रमाणे पुढे ठेवतात तर 'प्राचीन मराठी कवितेत अरबी फारशी शब्द दिसत नाहीत' असे शब्द मालाकारांच्या लेखणीतून निघण्याचा अवकाश की लगेच त्या विधानाच्या यथार्थत्वाची शंका घेणारे वामनराव ओक § जुन्या मराठी कवितेमधून दिसणाऱ्या ४५-४६ अरबी फारशी शब्दांची एक पलटणच जणु डोळ्यापुढे आणून खडी करतात.

मतभेदात पांडित्यप्रकटन करणारा हा वाचक-वर्ग रसिकता दाखविण्यासही प्रसंगी कमी करीत नाही. 'स्मर्तव्योहं त्वया कान्ते' या सुभाषिताचा मालाकारांनी अर्थ चुकीचा आहे हे सांगताना एक वसईकर * वाचक आपला अर्थ पद्यमय करून पाठवितांना दिसतो; तर वर उल्लेखिलेले पारखी शास्त्री आपल्या पत्रावर 'अहो सुमनसां प्रीतिर्वामदक्षिणयो: समा' असे संस्कृत अवतरण जोडून जी मार्मिकता प्रगट करतात ती लक्षणीय आहे. कित्येक वाचक वेगळे भाषांतर सुचविताना जो अभिप्राय व्यक्त करतात तोही असाच मार्मिक व अर्थपूर्ण वाटतो. कृष्णाजी श्रीपत अर्जुनवाडकर † हे रसिक गृहस्थ निबंधमालेच्या एका अंकातील 'यदि स्मरामि तन्वंगीं या सुभाषितातल्या 'जीवितव्यसनेन किं' या चरणाचे 'ते जिणे केवळ भारभूत होय' या मालाकारानी केलेल्या अर्थाऐवजी 'ह्या जगण्याच्या चटीपासून लाभ काय' असे भाषांतर सुचवितात इतकेच नव्हे तर 'असे असल्याने भाषांतर बरोबर उतरून अर्थही मनात फार वेळ घोळत राहतो' असा अभिप्राय

× **तत्रैव** अं. ४३ (ता. १२ ऑगस्ट १८७७)

‡ अं. २३ (ता. १२-१२-१८७५)

§ अं. ५० (१४ डिसें. १८७८)

* **उपरिनिर्दिष्ट** (ता. १ फेब्रु. १८७८)

† **तत्रैव** अं. ३७ (ता. १०-१-१८७७)

नमूद करतात. या अभिप्रायामागची मौज ही की पत्र लेखक नुसतीच भाषांतरकर्त्याची भूमिका घेत नाही तर त्या भाषांतराचे मूल्यही तो आपल्या मताप्रमाणे स्पष्ट करू पाहत आहे. अशावेळी वाचक हा 'वाचक' राहत नाही तो स्वतःला नकळत का होईना एका नव्या-टीकाकाराच्या-भूमिकेवर आरूढ होत असतो.

के. बा. कानेटकर हा पत्रलेखकही असाच आपल्या मनाशी कांही निश्चित मूल्ये बाळगून असलेला दिसतो. निबंधमालेत याची बरीच विविध स्वरूपाची पत्रे आली आहेत. कधी तो मालाकाराना नवी माहिती देतो तर कधी त्यांच्या विधानाला अनुकूल पुरावा दाखवितो. पण त्याच्या सर्व पत्रामध्ये 'प्रेमबंधन' या कादंबरीवर त्यानी जे परीक्षणात्मक पत्र † लिहिले आहे ते त्याच्या विवेचक शक्तीची व रसिकतेची कल्पना देण्यास बरेच उपयुक्त ठरेल. संविधानक, भाषा आणि प्रसंग या सर्व दृष्टीनी त्याने प्रेमबधनाचे परीक्षण केले आहे. त्यातील भाषेची टापटीप, वृत्तीचा प्रौढपणा आणि लेखणीतला संयम सगळेच पाहण्याजोगे आहे. पत्र-लेखक लिहितो--

> कथेचे संविधानक साधारणपणे बरे आहे. तथापि ते उत्तम व खुबीदार आहे असे नाही . . कित्येक चावटपणाच्या हलकट कोटचा केल्या आहेत त्या सभ्यपणास व विशेषतः पुस्तकात तर त्या फारच गैर व अप्रशस्त होत. ग्रंथात कार्यकारणभाव फारसा दृष्टीस पडत नाही. विसंगत कथाभागांची किंवा प्रसंगांची तर या ग्रंथात खूब गर्दी आहे . . . वेणू (कथानकातील नायिका) इतकी सुस्वरूप व सुजाण असे वर्णन करून तिचे जे २५९ पृष्ठात अज्ञान दाखविले आहे तेही फारच चमत्कारिक होय.

ग्रंथकर्त्याच्या भाषेची तारीफ करताना लेखक म्हणतो--

> प्रथमतः ग्रंथकर्त्याची भाषेच्या संबंधाने चांगली तारीफ

† अं. २२ (ता. ३१ आक्टो. १८७५)

> केली पाहिजे. या ग्रंथाची भाषा फार सरळ सोपी व व्यवहारिक आहे. तीत पुष्कळ संस्कृत शब्द आणून दांभिकत्वाचा दोष आणलेला नाही; किंवा इंग्लिश भाषेतील तऱ्हा मिश्र करून ती समजण्यास कठीण अशीही केलेली नाही.

ग्रंथातील निवेदनाची तऱ्हा नाटकाच्या स्वरुपाची असल्यामुळे ती वाचकाला जशी गोंधळाची वाटते तशीच एकसूत्रीपणाच्या अभावी वैरस्य उत्पन्न करणारी ठरते या दृष्टीने परीक्षणाच्या उपसंहारात पत्रलेखकाने ग्रंथकर्त्यास एक मार्मिक सूचना केलेली दिसते.

> एकंदरीत हा ग्रंथ चांगला झाला आहे तरी अखेरीस ग्रंथकर्त्यांस आम्हास एक सूचना करावीशी वाटते. ती ही की, त्याने कल्पित कथा न लिहिता एकादा नाटक रूप ग्रंथ लिहावा कल्पित कथेहून नाटक लिहिणे हे जरी फार कठीण आहे तरी त्यात त्यास अधिक यश येईल असे आम्हास वाटते.

कानेटकरांनी ग्रंथकर्त्यास केलेली ही सूचना जणु ग्रंथकर्त्याची नाडी लक्षात घेऊन केल्यासारखी वाटते–आणि ती पाहिली म्हणजे मराठीतील पुस्तकपरीक्षेच्या त्या आद्यावस्थेत कलावस्तूचे स्वरुप आणि ग्रंथकर्त्याची प्रकृति याचा मेळ जमवू इच्छिणारा मार्मिक रसज्ञ आढळावा या गोष्टीचे थोडेसे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

चरित्र लेखनाविषयी सूचना–

निबंधमालेच्या वाचकांनी ज्या वाङमयप्रकाराची चर्चा विशेष केली आहे असा वाङमयप्रकार कोणता असेल तर तो चरित्रलेखन हा होय. इंग्रजी वाङमयात जॉन्सन–चरित्रासारखी उत्तमोत्तम चरित्रे पाहावयास मिळत होती आणि मराठी भाषेत पाहावे तर त्या मानाने साराच प्रकार निराशाजनक होता. सर्व प्रसिद्ध राजकारणी आणि शूर लोकांची तर राहोच पण जुन्या नव्या विद्वन्मंडलातल्यापैकीही कोणाचे चरित्र प्रसिद्ध झालेले दृष्टीस पडत नव्हते. वस्तुत: या काळात

कार्यकर्त्या विख्यात पुरुषांची उणीव नव्हती. मोठमोठे व्यासंगी आणि कार्यैकनिष्ठ पुरुष डोळ्यापुढे वावरत होते, काहीचे चरित्र समकालीन-त्वामुळे ताजे होते तर कित्येकांची कृत्ये सुविख्यात असून ती सांगणारी माणसे थोडीथोडकी नव्हती. काही सद्गृहस्थांची चरित्रे लिहिणारास बक्षिसाचे प्रलोभनही देण्यात आले होते आणि काहींची चरित्रे लिहिण्या-बद्दल संकल्पही सुटले होते. असे असूनही खुद्द चरित्र लिहिण्याच्या बाबतीत जिकडे तिकडे सामसूमच दिसत होती. 'नवनीता' सारख्या काव्य संग्रहात्मक पुस्तकात मोरोपंताविषयी जशी असावी तशी माहिती दिलेली नव्हती आणि याचे कारण सांगण्यात आले होते ते हे की पुस्तक लवकर छापून प्रसिद्ध करण्याची जरुरी असल्यामुळे जास्तीची माहिती गोळा करण्यास फुरसत मिळाली नव्हती. पण त्यानंतर १८७८ पर्यंत आवृत्तीवर आवृत्ति निघूनही त्यापैकी एकाही आवृत्तीत ते अभि-वचन पूर्ण झालेले दिसत नव्हते.

जॉन्सनचरित्रावरील चिपळूणकरानी प्रसिद्ध केलेल्या निबंधाच्या निमित्ताने मालेच्या एका भक्ताने आपल्या १३–१–१८७९ च्या पत्रात ही निराशाजनक परिस्थिति प्रगट केली नाहे; पण त्याबरोबरच चरित्र-लेखकाने आपली चरित्रे अशी लिहावी याविषयीच्या सूचनाही दाखल केल्या आहेत. त्या आज विचारात घेण्याजोग्या नसल्या तरी त्या काळातील वाचक कोणत्या तऱ्हेच्या चरित्रवाङ्मयाची अपेक्षा करीत होता यादृष्टीने तरी त्या विचारार्ह ठरतील. उदाहरणार्थ खालील सूचना पाहा--

> चरित्रात स्वरचित चरित्र उत्तम होय. परंतु तसे नसल्यास प्रख्यात मनुष्याचे चरित्र त्याच्या मागे लवकरच प्रसिद्ध व्हावे हे चांगले. कारण त्यास जी साधने अवश्य लागतात म्हणजे चरित्रनायकाशी समकालीनत्व, त्याच्याशी सलगी किंवा त्याचा चांगला परिचय, त्याजबद्दल लोकमत इत्यादिकांचा कालगतीने ऱ्हास व्हावयास लागून मग ते चरित्र इतके चांगले होण्याचा संभव राहत नाही.

यापुढे चरित्रातील वृत्तांत वास्तविक वाटण्यासाठी लेखकाने कोणती सावधगिरी बाळगावी हे सांगून ते मनोवेधक होण्यासाठी काय करावे यासंबंधी पुढीलप्रमाणे सूचना केली आहे.

> चरित्रात नायकाचा अथपासून इतिपर्यंत वृत्तांत खुलासेवार असून शिवाय त्याचे विचार कशाप्रकारचे होते, त्याची मते काय होती, याचेही त्यात कथन असावे. याखेरीज त्यात त्याचा स्वभाव, गृहाचार, आयुष्यक्रम वगैरेविषयी मनोवेधक वर्णन असावे. चरित्रकाराने आपल्या नायकाच्या बाह्य गोष्टीपेक्षा (कारण त्यांची थोडीबहुत माहिती सर्वांस असतीच) गृहसंबंधी व खासगी माहितीकडे विशेष लक्ष द्यावे व त्याजविषयी बारीक सारीक गोष्टीहि वगळता कामास नये; कारण याजकडेच वाचकांची विशेष प्रवृत्ति व अभिरुचि आढळते, व यावरूनच नायकाची खरी परीक्षा करिता येते. चरित्र अशा रीतीने लिहिलेले असावे की ते वाचीत असता, वाचकांस आपण जणु काय नायकाच्या संगतीतच आहोत असे वाटावे.*

पत्रलेखकाने वर उद्धृत केलेले विचार हे चिपळूणकरांच्या जॉन्सनचरित्राचे परीक्षण करण्याच्या निमित्ताने लिहिलेले दिसतात. पण बारीकसारीक माहिती देऊन चरित्र मनोरंजक करणे, नायका या बाह्य गोष्टीपेक्षा खासगी माहितीकडे विशेष लक्ष पुरविणे आणि नायकाच्या संगतीत फिरवून आणणे वगैरे ज्या सूचना त्यात केल्या आहेत त्या आधुनिक चरित्रलेखनाला मान्य व्हाव्या अशाच आहेत. सुजाण व रसिक पुरुष आपल्या काळातील अपेक्षा बोलून दाखवीत असला तरी त्या अपेक्षेमागील भावार्थ काळाचा पडदा बाजूला सारल्यानंतर तितकाच चिरंतन स्वरूपाचा व ताजा असू शकतो हे या विवेचनावरून सहज पटावे.

---

* **निबं**. अं. ५५

चरित्रलेखनाविषयीच्या विचारात येऊ पाहणारी आधुनिकता संतचरित्राच्या संदर्भात क्वचित अडखळल्यासारखी होत होती आणि ते एका दृष्टीने पाहता अगदीच अयोग्य नव्हते. अद्भुत व असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टी पारखून पाहताना सत्यासत्यविवेचनाचा काटाही क्वचित भलतेच माप देण्याचा बराचसा संभव होता. सामान्य दृष्टीने पाहिले तर या संतचरित्रातील बराच तपशील सामान्यांना वेडगळ स्वरूपाचा वाटत असावा आणि म्हणूनच अंताजी हर्डीकरासारखे काही चिकित्सेखोर वाचक असल्या गोष्टी इतिहास–चरित्रातून अजीबात वगळून टाकण्याची सूचना ग्रंथकारांना देताना दिसतात. रघुनाथ भास्कर गोडबोले यांच्या 'हिंदुस्थानचा अर्वाचीन कोश' या मासिक पुस्तकाविषयी आपले विचार प्रगट करताना हर्डीकर लिहितात––

> या ग्रंथासंबंधे ग्रंथकर्त्यास एक सूचना करणे आहे ती ही की प्रस्तुत ग्रंथात शूर राजकारस्थानी वगैरे प्रापंचिक पुरुषांपेक्षा साधूंची चरित्रे सविस्तर लिहिलेली आहेत... आता पारमार्थिक दृष्टीने जरी तसे असणे योग्य आहे तरी प्रापंचिकांच्या नजरेने तसे सर्वथैव योग्य होईल असे वाटत नाही. या देशात जे अनेक पुण्यपुरुष होऊन गेले त्यांच्या आख्यायिका कित्येक जरी गोड वाटतात तरी सर्वच तशा असतात असे नाही .करिता अशा वेडगळ दिसणाऱ्या आख्यायिकानी पुस्तकातील जागा आडविणे योग्य नव्हे. ▫

परंतु हर्डीकरांची दृष्टि ही सर्वसामान्य वाचकांची दृष्टि झाली. आणि म्हणूनच संतांची चरित्रे सामान्यांना वेडगळ म्हणून क्वचित दृष्टीआड करता आली तरी इतिहास किंवा प्राचीन काव्य यांचे संशोधन करणाऱ्याला त्यांचे महत्व कमी करून चालण्यासारखे नव्हते. अर्थातच या वेडगळ वाटणाऱ्या सामग्रीइतकीच संशोधकाला अडचणीत टाकणारी दुसरी गोष्ट म्हणजे संतचरित्रातील पाल्हाळ होय. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन संशोधकाने ग्रंथाचे संशोधन केले तर त्याला

▫ तत्रैव अं. ६६ (श्रावण शु. ९ शके. १८०२)

तर 'कृष्णशास्त्री चिपळूणकरांना मोरोपंतांची कविता आवडत नव्हती' हे मालाकारांचे विधान कानेटकरांना पसंत नाही. मोरोपंतांच्या कवितेच्या संदर्भात वाचकाची जी पत्रे आली त्यांची पृष्ठसंख्या १८० च्या आसपास असून नुसत्या खंडनपर पत्रातील मजकुराने निबंधमालेच्या आकाराची ९० पृष्ठे व्यापली आहेत.

या साऱ्या प्रतिपक्षी-वर्गात के. बा. कानेटकर आणि वा. दा. ओक हे दोन वाचक प्रामुख्याने लक्षात राहावे. निबंधमालेच्या ६२-व्या अंकात मालाकारांनी या दोन्ही प्रतिपक्ष्यांच्या आक्षेपास उत्तरे दिलेली आहेत. या दोघां प्रतिपक्ष्यांपैकी 'के. बा. का.' हे बरेचसे संयत आणि विवेकी वाटतात. कृष्णशास्त्री चिपळूणकरांना मालाकार मोरोपंताच्या प्रतिपक्षीवर्गात घालतात ते जसे कानेटकरांना पसंत नाही तसेच 'मोरोपंत हा पंडित नसून साधा पुराणिक होता' हे त्यांचे मतही कानेटकरांना रुचणारे नाही. परंतु विरुद्ध मताचा उपन्यास करताना 'दोष ठेवायचा तो विचाराला-व्यक्तीला नव्हे' हा विवेक त्यांच्या लेखणीने सांडलेला नाही आणि म्हणूनच आपल्या पत्राच्या सुरवातीला चिपळूणकरांच्या निबंधातील लेखनशैलीचे गुण सांगून हे गुणच प्रसंगी कसे दोषरूप होतात हा विचार त्यांनी कसा डौलदार पद्धतीने मांडला आहे तो पाहा--

> 'मोरोपंताची कविता' म्हणून एक मोठा चित्तवेधक व उत्कृष्ट निबंध लिहिण्याची आपण सुरुवात केली हे पाहून मनास मोठा आनंद झाल्यावाचून राहत नाही. . . इंग्रजी भाषेतील सरणीस अनुसरून स्वतंत्र, प्रौढ, झोकदार, आवेश-युक्त, रसभरित व अत्यंत मजेची ग्रंथरचना करण्याचे यश पूर्णपणे आपणाकडे आहे. . मराठीत विनोदात्मक लिहिण्या-ची पद्धत आपण चांगलीच सुरू केली आहे. यामुळे मराठी भाषेस विनोदात्मक वळण लावण्याबद्दलचे पूर्ण श्रेय आपल्यास आहे असे मला वाटते. . . आपण आपल्या कल्पनाशक्तीच्या जोराने व विनोदाच्या घुटक्यानी वाचकांची अंत:करणे

> सद्गदित करून त्यांची मुरकुंडी आपल्या लेखणीवर पडावी म्हणून लिहिण्यात फारच चमत्कार करता. या कल्पना-शक्तीच्या भरारीमुळे आपल्या लेखात कित्येक वेळा प्रमाद व पूर्वापरविरोध यास जागा होते. आपण थोर व खरे सज्जन आहा तेव्हा या स्पष्टोक्तीबद्दल मला आपण माफी करालच.*

यापुढे 'मोरोपंत हा पुराणिक नसून पंडित होता' हे सांगताना त्याच्या 'मुक्तामाला' 'शिवार्या' 'मंत्ररामायण' आदि संस्कृत काव्यावरून त्याचे संस्कृत भाषेतील नैपुण्य दिसते असा युक्तिवाद केला आहे. पण याच युक्तिवादाची दुसरी बाजू मांडताना कानेटकरानी एका भ्रामक अपसिद्धांताचा परामर्श घेतला आहे तो कोणत्याही कविचरित्रावरील अन्याय पुसून टाकण्याच्या दृष्टीने जास्त लक्षणीय ठरेल. कानेटकर म्हणतात.

> ज्या कोणाचे जेवढे अध्ययन असते व ज्याने जेवढे अवलोकन केले असते तेवढे म्हणून त्याच्या ग्रंथात दृष्ट होते अगर ते दृष्टीस पडण्याचा संभव असतो हा जो आपला अभिप्राय तो सर्वांशी मला खरा भासत नाही. कारण एकतर कसलाहि ग्रंथ असला तरी त्यात विषयानुसार ग्रंथ-रचना व्हावी लागते. यामुळे ग्रंथकारास आपली विद्वत्ता आपले ग्रंथात दाखविता येण्यास संधी व अवकाश असावा लागतो. या दोन्हीची अनुकूलता असताही कित्येकास तसे करणे पसंत नसते. वामन हा मात्र मराठी कवीत काय तो पंडित असे आपण म्हणता. पण आपल्या मागील एका लेखात आपण असे म्हटले आहे की वामनाची पंडितत्वा-विषयी प्रसिद्धि आहे, पण त्यांच्या ग्रंथात पाहिले तर तसे फारसे दिसत नाही हा आपला अभिप्राय मलाहि कबूल आहे. पण यावरून इतके मात्र निर्विवादपणे ठरते की

* तत्रैव अं. ६२

भूत टेका धरून केकावलीविषयी त्यांनी आपले मत कशावरून झुगारले नसेल . संस्कृत व प्राकृत कविता म्हटली की तीत श्लेष असावय.चेच असे मत ठरून गेल्यामुळे मोरोपंताचे काव्य तर काय सर्व मराठी भाषेचे सर्वस्व त्यात श्लेष नाहीत असे कसे होईल या तर्कावर रावबहादुरांनी शेरा लिहिला असावा, यात संशय नाही. *

वा. वि. लेले हा वाचक तर साऱ्याच नव्या विद्वानावर घसरला असून अशा रथीमहारथींचे खंडन केल्याबद्दल तो मालाकारांची प्रशंसा करताना दिसतो आपल्या १ जानेवारी १८८१ च्या पत्रात तो लिहितो—

ज्यावेळेस या मंडळींचे प्रस्थ फार असे. . .व त्यांच्या मतास मान फार असे तेव्हा आमच्या आधुनिक विद्वान मंडळीने ही आपल्या पाश्चात्य विद्येच्या घमेंडीत वाटेल त्या विषयावर वाटेल तसे मत झोकून दिले आहे. आपले म्हणण्यावर लोकांचा पूर्ण विश्वास आहे असे समजून मोरोपंताचे महत्व व कवित्व मनात न आणता त्यास 'बळचट', 'कुचकट' 'पुळपुळीत' वगैरे खुशाल म्हणावे असा प्रघात पडला होता. तेव्हा अशाच लोकास पुढे करून त्यांचा फट्टा उडविला म्हणजे पंताविषयी जे अविचारपूर्वक उत्पन्न झालेले ग्रह आहेत त्यांच्या खंडणाबद्दल निराळी तजवीज नको. †

मालेच्या ५१ व्या अंकापासून मोरोपंतांच्या कवितेविषयी आपले मत प्रदर्शित करणारी वाचकांची २४–२५ तरी पत्रे मालेकडे आलेली दिसतात. या वाचकापैकी एक खेडेगावातील वाचक काय लिहितो ते पाहा —

मालाकार, आमच्या दयाळू सरकारी अधिकाऱ्यांच्या कृपेने आमच्या या खेडेगावी आपल्या मालेचे आगमन होत

* **तत्रैव** अं. ५५ (के. बा कानेटकर. ता. २५ फेब्रु. १८७९)
† तत्रैव अं. ८०–८२ (ता. १ जाने. १८८२)

असते इकडे जितके वेळा तिचे येणे झाले तेवढ्यावरूनच तिचे सत्यशील, औपकारिक बुद्धि, दृढ निश्चय, तिची मधुर वाणी इत्यादि सद्‌गुण पाहून तिचे विषयी पूर्ण पूज्यभाव उत्पन्न होऊन तिच्या पुनरागमनाची उत्कंठा फारच लागून राहते. मालेच्या ५३ वे अंकी पृष्ठ ३०/३१ याजवर पंतांच्या कवितेचे दोन दोन तीन तीन अर्थ होतात या गोष्टीचे सिद्धयर्थ एका आर्येचे दोन अर्थ केलेले आपल्या एका वाचकाने दिले आहेत अशा प्रकारचे अर्थ हे काही कवीचे हृद्‌गत नसावेत, विलक्षण तर्काने हव्या त्या कवितेचे किंवा शब्दाचे हवे तसे अर्थ निघण्याचा संभव आहे... असले तर्कटी अर्थ काय कामाचे ! *

अपसिद्धांतांचे निरसन

मोरोपंतांच्या कवितेसंबंधी निबंधमालेत वाचकांनी जी चर्चा केली आहे त्यातून उत्पन्न झालेले बरेचसे प्रश्न आजही त्या कवितेच्या संदर्भात अभ्यासकास आवश्यक असेच ठरतील. या संबंधात लक्षात ठेवण्या-सारखी आणखी एक गोष्ट अशी की मालाकारांना येणारी ही सारीच पत्रे त्यांच्या मताला नेहमी पुष्टि देणारी नव्हती. मोरोपंतांच्या कवितेची गोडी स्वतःशी चाखलेला आणि मनातल्या मनात का होईना त्याचे मूल्य ठरवून बसलेला असा एक वाचकवर्ग या पत्र–लेखकांत मधून मधून दिसतो. या वाचकवर्गाने मालाकारांची सारीच चर्चा शिरोधार्य मानलेली नाही मोरोपंतांच्या कवितेतील ग्राम्यता दोषाची म्हणून मालाकारानी उद्‌धृत केलेली उदाहरणे गणेशशास्त्री लेले यांना मान्य नाहीत तर याच्या उलट मोरोपंताच्या काव्यात व्याकरण-शुद्ध-तेचा त्यानी दाखविलेला गुण वामनराव ओकांना पटलेला नाही. वा. वि. लेले हा वाचक 'मोरोपंतांच्या निबंधापासून मालेचा प्रधान-धर्म जो निबंध तो नाहीसा होत आहे' अशी तक्रार करताना दिसतो

---

*तत्रैव अं ५९ (मल्हार सखाराम–ता. १० जुलै १८७९)

काही सत्य निश्चित गवसेल अशी वा. दा. ओकासारख्या काही सुजाण वाचकांची धारणा दिसते 'रामदासा'वरील आपल्या पत्रात्मक निबंधात रामदासांच्या कीर्तनाविषयीचे मालाकारांचे मत विचारात घेण्याच्या निमिताने वामनरावानी पुढीलप्रमाणे मत मांडले आहे--

> रामदासांच्या कीर्तनाविषयीची गोष्ट खरी कितपत आहे हे सांगवत नाही असे जे तुम्ही म्हणता याचे कारण लक्षात येत नाही. कदाचित् "संतविजया"दिक ग्रंथात अद्भुत, अमानुष–शक्ति साधित अतएव अविश्वासनीय अशा अनेक गोष्टी लिहिल्या आहेत व त्यातून सत्यासत्य गाळून काढण्याची मोठी पंचाईत आहे असे आपले म्हणणे असेल तर कोण जाणे! परंतु अशा गोष्टीत पाल्हाळपणा असला तरी ग्रंथसंशोधन करून काही अंश निवळ सत्य म्हणून काढिता येतील. पूर्वकालच्या कित्येक लेखाविषयी असे म्हणणे फार गैरवाजवी होणार नाही की त्यांत तंतुपट-न्यायाने सत्य आणि असत्य यांचा समवाय संबंध असावयाचाच. तर ह्या उत्कट भक्तिभावाने लिहिलेल्या ग्रंथात असंभाव्य वर्णने आढळतील तरी अशा ठिकाणी त्या वर्णनाचा लौकिकार्थ घेऊन चालले असता त्यातील बराच तथ्यांश हातास लागेल यात संदेह नाही. *

पंतकवितेच्या संदर्भात

मालेच्या ४५ व्या अंकापासून मोरोपंताच्या कवितेवर निबंध येण्यास सुरवात झाली. त्यातील पंत-कवितेवरील नव्या विद्वानांच्या आक्षेपांवर जसजसा मालाकार हल्ला करू लागले तसतशा पंतभक्तांच्या हृदयात आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या. जणु प्रतिपक्ष्यांच्या आवाजाने भेदरून गेलेले रान परत शांत झाले होते. मत्तमतंगजाच्या पादाहताने उठलेली धूळ खाली बसली होती. हळुहळु एकेक पंत–भक्त

* तत्रैव अं. ६५ (ता. २० जून १८८०)

रसिक मालेच्या आसऱ्यास जमू लागला. कुणी दूषकांच्या मुखावर चपेटिका मारण्यास आरंभ केल्याबद्दल अभिनंदन केले, ‡ कुणी वृद्ध हरदासांच्या श्लेषाबद्दलच्या प्रतिक्रिया कळविल्या, § कुणी रानडे-विल्सन यासारख्या महारथींवरील आक्षेपाचे निरसन करण्यात साह्य करू लागला तर कुणी या माऱ्यातून निसटलेल्या कुटचांचे मोरोपंताविषयीचे उद्गार मालाकारांच्या कानावर घालून त्याबद्दलही अभिप्राय † मागविला. याच्या उलट निबंधमालेच्या एका वाचकाने तर मालाकारांच्या शंकेचे निमित्त करून रा. ब. माधवराव रानडे यांच्या मनात केकावलीच्या अनेकार्थसंभवाविषयी गैरसमज का असावा याची मजेदार उपपत्ति लावली आहे त्यावरून पत्रलेखकाचे नवशिक्षिताविषयीचे मत लक्षात येते. पत्रलेखक म्हणतो –

> आपल्या मालेच्या एका अंकात रावबहादूर रानडे यांच्या मनात मोरोपंतकृत केकावली काव्यात अनेक अर्थत्व आहे हे कशावरून आले म्हणून आपण मोठ्या बुचकळ्यात पडला आहा असे दिसते. पण मला वाटते की आपल्यास याबद्दल अगदी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण रा. माधवरावजींचा सर्व जन्मभर व्यासंग पाहिला तर इंग्रजी भाषेवर चालला आहे . इग्रजी भाषेपुढे गरीब बिचाऱ्या स्वभाषेवर रानडे यांचा व्यासंगही तितपतच असणार आहे असे म्हणण्यास काही हरकत नाही. मग हरदासांच्या तोंडून केव्हा केव्हा वेडेवाकडे कसे तरी श्लेष निघतात तोच आधार-

‡ निबं अं ५, (ज. बा. मोडक-ता. १ जून १८७८)

§ तत्रैव अं. ५३ (मोरो गणेश लोंढे, ता. १ फेब्रुवारी १८७९)

† तत्रैव अं. ६३ (पत्रलेखकाचे नाव व तारीख दोन्ही नाहीत; मालाकारानी यावर टीपेत 'वरील मजकुरावर निराळी टीका करणे नलगे. मोरोपंतां या कवितेवर त्यात जो अभिप्राय प्रगट केला आहे तो १८६३ सालाला पूर्णपणे शोभण्यासारखा आहे' असा आपला अभिप्राय दिलेला आढळतो. पाहा टीप पृ. २८)

ज्याची जेवढी म्हणून विद्वत्ता असेल तेवढी त्याच्या ग्रंथात ती दृष्टी पडली पाहिजे असेच केवळ म्हणता येणार नाही.

मालाकारांच्या विरुद्ध युक्तिवाद करून आपली मते ईर्षेने मांडू पाहणारे दुसरे आक्षेपक आहेत वामनराव ओक. आपल्या ता. २९ मे १८८० च्या पत्रात 'लोकांचे अरसिकत्व' या मुद्याविषयी मालाकारांचा अभिप्राय विचारताना ओक म्हणतात.†

भारवीच्या काव्यावरून त्या काळची रसिकता कळून येते असे आपले मत दिसते. कोणत्याहि ग्रंथावरून तो ग्रंथ जेव्हा झाला तेव्हाच्या लोकांचा तो ग्रंथ दर्शक अथवा प्रतिबिम्बरूप आहे असे समजणे सर्वांशी रास्त आहे माझ्या अल्पमतीस वाटत नाही. भारवीच्या अथवा माघाच्या महाकाव्यातील एका सर्गावरून जर तत्कालीन लोकाभिरुचि निश्चित करावयाची, तर त्याच्या समग्र काव्यावरून काय ठरवायाचे? तेव्हा एकाद्या ग्रंथावरून त्या काळच्या लोकाभि-रुचीचे मोठेसे प्रमाण धरता येत नाही. लोकांच्या रुचीचे प्रमाण एक दोन ग्रंथावरून बांधले असता पुष्कळ गोंधळ होण्याचा संभव आहे. जोशीबोवांच्या लावण्यावरून तत्का-लीन लोक उत्कट शृंगाररसतरंगिणीत पोहत होते अथवा 'देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो' ह्या ब्रम्हा-नंदात गर्क झाले होते असे अनुमान काढणे वाजवी होईल काय? तर एकाद्या ग्रंथावरून त्या ग्रंथकाराच्या अथवा तत्समानकालीन लोकांच्या अभिरुचीचे काही सबळ प्रमाण मिळते असे म्हणवत नाही. या मुद्यावर आपला काय अभिप्राय आहे?*

† तत्रैव अं ७७; याच तारखेचे ओकांचे दुसरे पत्र मालेच्या ६७ ते ६९ या तीन अंकात प्रसिद्ध झाले आहे.

* तत्रैव अं. ७७

निबंधमालेचा वाचक केवळ मर्मज्ञ किंवा बहुश्रुत नाही तर टीका-क्षेत्राच्या विकासाला योग्य असे मार्मिक प्रश्न उपस्थित करण्याइतके बुद्धिसामर्थ्य त्याच्या अंगी आहे आणि ते उपयोगी आणण्याची कुवतही तो दाखवू शकतो याची साक्ष या उताऱ्यावरून मिळण्यासारखी आहे.

वाचकांचा टीका-विचार

पण वर उद्धृत केलेल्या उताऱ्याबरोबरच नागपूरच्या 'वेताळा'-च्याही पत्राची आठवण ठेवावयास हवी. कित्येक वाचक मालेच्या अंकातून फार स्वल्पवेळा डोकावून जातात पण त्या थोड्या क्षणासाठी त्यांनी दिलेले दर्शन त्यांच्या विवेचनामुळे महत्वाचे ठरते. विविध-ज्ञानविस्ताराच्या १८८० च्या ५ ते ७ अंकात 'मोरोपंतां'वर जो निबंध प्रसिद्ध झाला त्यात मालाकारांच्या काही विधानांचे खंडन करण्यात आले आहे. 'वेताळा'ने या लेखातील बऱ्याचशा विधानांचा साक्षेपाने आणि पृथकत्वाने परामर्श घेतला. 'मोरोपंतांच्या काव्याची सर्व-सामान्याकडून होणारी प्रशंसा गतानुगतिक न्यायाने चालत आहे' हे विस्तारक यांचे मत खोडून काढताना 'गतानुगतिकत्व म्हणजे काय' आणि 'त्याचा शास्त्रव्युत्पत्तीशी कसा दाट संबंध असतो' याचे विवेचन त्याने आपल्या पत्रात उत्कृष्ट रीतीने केले आहे. 'कोणत्याही उत्कृष्ट ग्रंथाची कीर्ति ही विद्वानांच्या प्रशंसेतूनच उत्पन्न होते आणि ही प्रशंसा साहित्य-शास्त्रोक्त कसोटीला धरूनच असते' असा सिद्धांत प्रस्थापित करण्याचा वेताळाचा या पत्रातील प्रयत्न लक्षात घेण्यासारखा आहे. हा सिद्धांत प्रकट करताना वेताळ लिहितो--

> कविता कोणत्या प्रकारची असावी म्हणजे ती उत्तम म्हटली जाते हा शास्त्रीय विचार आहे आणि हा विचार पंडित लोकांस जितका माहीत असण्याचा संभव आहे तितका इतर लोकांस नाही. कारण पंडित लोकांनी कविता कशी व कोणत्या प्रकारची असावी ह्या विषयावरील ग्रंथांचे अध्ययन केले असून शिवाय कविता-ग्रंथांचे अनेक मासलेही

त्यांच्या पाहण्यात आलेले असतात. तेव्हा अमुक कविता सरस, अमुक नीरस हे ओळखून काढण्याची त्यांची शक्ति प्रखर झालेली असते...तेव्हा अर्थातच कविता चांगली किंवा वाईट हे ठरविण्याचा हक्क पंडित लोकांचाच आहे... एखाद्या चतुर रत्नपारख्याने हिऱ्याची किंमत सांगितली तर इतर अजाणते लोक ती खरी आहे असे मानून व्यवहार चालवितात हे कोणास सांगावयास नकोच. तशीच वरील गोष्ट आहे.†

साहित्याच्या क्षेत्रातले टीकाकाराचे महत्व जाणणारा वाचक मालेच्या पत्रलेखकांत आढळतो ही गोष्ट या पत्रव्यवहाराचे निःसंशय महत्व वाढविणारी आहे.

निबंधमालेच्या ८० व्या अंकात वा. वि. लेले यांनी 'भाषांतर व टीका' या शब्दामधला फरक स्पष्ट करण्याचा जो प्रयत्न केला आहे तो टीकाविचारातील परिभाषेचा उलगडा करण्याच्या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. ता. १ जानेवारी १८८२ च्या आपल्या या पत्रात लेखक लिहितो--

'भाषांतर' याची व्याख्या आपण दिलीच आहे परंतु 'प्राकृत टीका' याची दिली नसल्यामुळे रा. ओक * यास संशयाने घेरले आहे. वरील शब्द समानार्थक होत असे ते समजतात, असा संशय सकृद्दर्शनी येतो; पण त्याचे निरसन थोड्या विचारांती होईल असे वाटते. माझ्या अल्पमतीस 'प्राकृत टीका' हा एक शब्द नाही असे वाटते. यात 'प्राकृत' हे टीकेचे विशेषण होय. टीका याची व्याख्या मी अशी करतो. टीका म्हणजे गूढ किंवा अवघड पदांच्या विशदीकरणार्थ व त्यांचा अर्थ उकलण्याकरिता उदाहरणा-

---

† अं. ७१-(ता. ९ फेब्रु. १८८१)

* निबं अं. ७५ (वा. दा. ओक-ता. १२ ऑगस्ट १८८०)

दिकेकरून केलेले स्पष्टीकरण. भाषांतरात मूळच्या शब्दास समानार्थक शब्द दिले म्हणजे झाले. वामनाचे गीतेचे भाषांतर हे याचे ठळक उदाहरण आहे. संस्कृत ग्रंथातून टीका दिलेली असते तिकडे दृष्टि फेकली असता सहज काम होणारे आहे. त्यात मूळ ग्रंथातील अवघड पद्यांचे अर्थ व पद्यात एखादी खोच असली तर तिचे स्पष्टीकरण करून अर्थबोध होण्याकरिता पुष्कळ वेळा जास्ती मजकूर घालतात.

यापुढे पत्रलेखकाने 'मुरारि' हा शब्द उदाहरणादाखल घेऊन भाषांतर व टीका या पदातील फरक समजावून दिला आहे. त्याच्या मते 'मुरारि' या पदाचे 'कृष्ण' हे भाषांतर ठरेल तर 'मुर नामक जो दैत्य त्याचा जो अरि म्हणजे शत्रु तो (कृष्ण)' ही त्या पदाची टीका होय.

या पत्रात लेले यांनी वामनराव ओकांचा निर्देश केला आहे परंतु त्यांचा सदर प्रश्न उपस्थित करण्यामागचा हेतु पत्रलेखकाला कितपत समजला असेल याची शंका वाटते. वामनपंडितांच्या काळातच 'सम-श्लोकी टीका' हा शब्द बहुधा प्रथम रूढ झाला आणि तो 'भाषांतर' या अर्थाचा बोध करणारा आहे. हे लक्षात घेऊनच मालाकारानी 'मोरोपंताने सप्तशती व गीता ह्यावर प्राकृत टीका केल्या आहेत' (अं. ४५) असे उद्गार काढले. मालाकारांना अडविण्याच्या बुद्धीने ओकानी 'भाषांतर व टीका यातील फरक' समजावून घेण्याचा आग्रह धरला असला तरी—'त्या शब्दाचे समानार्थकत्व मानण्याची रूढी' ओकांनाही मान्य आहे. पण लेले यांनी 'टीका' या शब्दामागचे ऐतिहासिक गूढ उकलण्याचा प्रयत्न करण्याऐवजी केवळ संस्कृतातील परंपरागत टीकांच्या साह्याने 'टीका' शब्दाचा अर्थ उलगडून सांगितला आहे. प्रश्न उपस्थित करणाऱ्या वामनरावांना निश्चितच मराठीचे हे संस्कृताहून वेगळे असे वैशिष्ट्य सिद्ध करावयाचे होते. मराठीचे संस्कृत भाषेहून वेगळेपण सिद्ध करणे ही त्या युगाची एक निकड होती आणि याची जाणीव मालाकाराप्रमाणेच ओकांसारख्या सुबुद्ध वाचकाला

होती. त्यामुळे 'भाषांतर व टीका' याविषयीच्या प्रस्तुतच्या उत्तर-प्रत्युत्तरात लेले यांचे पत्र परिभाषेचा उलगडा करून देण्याच्या दृष्टीने महत्वाचे असले तरी तो प्रश्न उपस्थित करण्याचे वामनराव ओकांचे श्रेय दृष्टीआड करता येण्यासारखे नाही.

मार्मिक प्रश्नांची उपस्थिति

किंबहुना कोणत्याही महत्वाच्या वादात मार्मिक प्रश्न उपस्थित करण्याचे श्रेय वामनरावांचे आहे. मालेत जास्तीत जास्त खंडनपर पत्रे दिसतात ती बहुतांशी ओकांच्या सहीची आहेत. मालेच्या पत्र-व्यवहारापुरते $ पाहिले तर मोडकांच्या खालोखाल जास्त पत्रे ओकांनी लिहिलेली आहेत. आणि या पत्रव्यवहारात त्यांची जी प्रतिमा आपल्या डोळ्यापुढे उभी राहते ती एका जबरदस्त प्रतिस्पर्ध्याची. मराठी कवितेसंबंधी थोडे बहुत चुकीचे विधान मालाकारांच्या लेखणीतून बाहेर पडते न पडते तो वामनराव त्यावर सायुध तुटून पडलेले दिसतात. ओकांची महाराष्ट्र कवितेविषयीची माहिती आधीच जबर आणि प्रति-पक्ष्याला आव्हान देण्याची ईर्षा त्याहून जबर! 'महाराष्ट्र कवितेत यमके व गणवृत्ते प्रथम वामनाने आणली' या मालाकारांच्या विधानावर आक्षेप घेणारे ओकांचे पहिले पत्र मालेच्या ६१–६२ अशा दोन अंकांत आले आहे आणि त्यावरील मालाकारांच्या उत्तराने समाधान न पावून ओकांनी २९ मे १८८० रोजी जी दोन प्रदीर्घ पत्रे लिहिली त्यातील एक

$ निबंधमालेतील पत्रांची संख्या पाहू गेल्यास मोडकांची १४, ओकांची १३ आणि कानेटकरांची १० पत्रे आढळतात. या मानाने का. पां. परब आणि मो. ग. लोंढे यांची प्रत्येकी ३, वा. वि. लेले, अंताजी हर्डीकर, श्रीमंत कुरुंदवाडकर यांची प्रत्येकी २ अशी पत्रे आढळतात. अर्थात ही पत्रसंख्या मालेचे तिसरे वर्ष वजा करून दिलेली आहे. कारण प्रस्तुत लेखकाजवळचे या वर्षाचे अंक उपलब्ध नाहीत.

पत्र मालेच्या ६७–६९ अशा तीन अंकाची पाने व्यापून बसलेले आढळते. मालाकारांच्या विधानाचे खंडन करणाऱ्या या प्रदीर्घ पत्रात ओकानी बरेचसे टीकाविषयक विचार चर्चेला घेतले आहेत त्यादृष्टीने हे संबंध पत्र महत्वाचे ठरावे. उदाहरणार्थ काव्य व साहित्यशास्त्र यांचा परस्परसंबंध स्पष्ट करतान ओक लिहितात--

> ही गोष्ट सर्वसंमत आहे की भाषेचा उदय होऊन काहीसा प्रसार होण्यापूर्वी तिचे व्याकरण कधी होत नसते . भाषा होण्यापूर्वी व्याकरणकार झाले असे ज्या कारणास्तव म्हणता येत नाही त्याच कारणास्तव कवितेच्या आधी साहित्यशास्त्रकार झाले असे म्हणता येत नाही.

याच सिद्धांताच्या आश्रयाने पुढे 'वामन मोरोपंतानी लहान वृत्तामध्येही दीर्घ यमकरचना केली' हा मुद्दा मालाकारांच्या गळी उतरविताना ओक काय म्हणतात ते पाहा--

> तेव्हा जो प्रकार मोठमोठया सत्कवींच्या ग्रंथात आढळतो तो केवळ निबंधमालाकारांच्या म्हणण्यावरून दोषणीय ठरेल आणि त्या कवींची गणना या महादोषास्तव अरसिक जनात होईल अशी मोठी भीति बाळगावयास नको . मालाकारांच्या वेत्रयष्टीला वामन-मोरोपंतासारख्या कविभ्रमरास कधीही शिस्त लावता येणार नाही.

'कविजन साहित्यशास्त्राला प्रसंगी वळण देत असतो पण साहित्यशास्त्र मात्र कवीच्या प्रतिभेला शिस्त लावू शकत नाही' हा सिद्धांत मांडण्यात ओकांनी जसे कवींचे स्वातंत्र्य मान्य केले आहे तसेच वादविवादाच्या प्रसंगी होणाऱ्या टीकेतील तारतम्य लक्षात घेऊन सत्यासत्याचा निर्णय करण्याचा वाचकाचा अधिकारही त्यांनी मान्य केलेला दिसतो. मालेच्या ६७ ते ६९ या अंकांतील आपल्या प्रदीर्घ पत्राच्या प्रास्ताविकात वामनराव मालाकारांना उद्देशून लिहितात—

स्वपक्षसमर्थनासाठी तुम्ही जो प्रतिखंडणाचा यत्न केला आहे तो त्या उल्लेखावरील आक्षेपांच्या संबंधाने कितपत निराकरणसमर्थ आहे ही गोष्ट तुमच्या वाचकांपैकी जे तारतम्यविलोकी आणि सुजाण असतील त्यांच्या तर लक्षात येऊन चुकली असेल. काही अंशी अशा वादामध्ये सत्या-सत्याचा निर्णय करण्याचा अधिकार उभय पक्षकार आणि प्रतिपक्षकार यांचा नसून निःपक्षपात, उदासीन व समंजस वाचकांचा आहे.

युगजाणिवेचा अनुबंध

येथवरच्या विवेचनावरून निबंधमालेच्या वाचकवर्गाबद्दल बरीचशी माहिती कळू शकते. हा वाचक वर्ग ग्रंथाची गोडी चाखण्यात जितका रसिक तितकाच त्या रससेवनात येणारी विघ्ने जाणण्याइतका रसज्ञही आहे. त्याच्या मतभेदात मार्मिकता दिसते तशीच प्रसंगी सिद्धांत प्रस्थापित करण्याची उर्मिही आढळते. पण त्या सिद्धांत–स्थापनेच्या मागे जी एक सुजाण दृष्टी दिसते ती विशेष लक्षणीय ठरेल. चरित्र लेखनाच्या क्षेत्रात प्रापंचिकाचा विचार प्रामुख्याने नजरेपुढे असावा ही सूचना करण्यात तो आपल्या युगाची नाडी ओळखतो तशीच संस्कृताहून मराठीचे वेगळेपण स्पष्ट करण्यात आपल्या युगाची व्यथाही त्याने नेमकी जाणली आहे. १८६७ पासून डायरेक्टर–प्रमुख इंग्रज पंडितांनी 'संस्कृत भाषेहून मराठी भाषा वेगळी नव्हे' या मुद्यावर संस्कृत मराठीच्या तुलनेत मराठीचे मोठेपण–नव्हे अस्तित्वच अमान्य केले आणि उच्च अभ्यासक्रमाच्या क्षेत्रातून आणि पर्यायाने विश्वविद्यालयाच्या परिसरातून मराठीची कायमची हकालपट्टी करण्यात आली. बहुधा ही व्यथा लक्षात घेऊनच विश्वामित्रासारखा मराठीचा भोक्ता 'हातचा मळ' या म्हणीची मराठी उत्पत्ति सिद्ध करून तिचे संस्कृताहून वेगळेपण समजावून घेण्याचा आग्रह धरतो आणि वामनराव ओकांसारखा विचारवंत वाचक मराठी कवितेच्या अध्ययनातून तिचे स्वतःचे साहित्यशास्त्र हळुहळु दिसू लागेल असा भरवसा व्यक्त करतो.

असा रसिक व सुजाण वाचकच कोणत्याही काळात वर्तमानकाळाचा विसावा आणि भविष्याचे आशास्थान असतो.

अशा सुजाण वाचकाला सत्यासत्याचा व चांगल्या-वाइटाचा शोध घेण्यास मालाकारांनी जातीने साद घालावी आणि त्यानेही आपला योग्य तो अधिकार बजावण्यात मालाकारांना 'योगदान' करावे ही निबंध-मालेच्या कार्याची फलश्रुति तर खरीच पण त्याबरोबरच ऐहिकाकडे झुकलेल्या चिपळूणकर–युगाने पुढील पिढीला दिलेले ते एक आश्वासनही आहे.

□ □ □

फलश्रुति

मराठी मनाची आवडनिवड हा मराठी वाङ्मय-समीक्षेचा पाया आहे ही खूणगाठ मनाशी ठेवून एकोणिसाव्या शतकातील समीक्षेचा शोध घेण्यास आपण आरंभ केला आणि त्या शतकाच्या सुरवातीपासून ८१ व्या वर्षापर्यंतचा टप्पा आपण गाठला. 'चिपळूणकर-पर्व' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या कालखंडातील प्रवासाची फलश्रुति कोणती ते आता अजमावून पाहायचे.

१

समीक्षा ही साहित्य क्षेत्रातील एक वेगळी स्वतंत्र वसाहत आहे ही गोष्ट येथवरच्या विवेचनावरून मान्य होण्यास हरकत नसावी. टीकेचा व्यवहार निर्वेधपणे चालावा म्हणून निर्माण झालेली आणि वाचक लेखक यांच्यातील अंतर कमी करून त्यांना अभिरुचीच्या पातळीवर एकत्र विहार करावयास लावणारी अशी साहित्यक्षेत्रातील ती अपरसृष्टी आहे हे मराठीच्या क्षेत्रापुरते ज्ञानेश्वरानी केव्हाच सांगून टाकले आहे. पण अर्वाचीन मराठीच्या प्रारंभीच इंग्रजासारख्या तागडी-पंडिताशी राज्यकर्ते म्हणून मराठीचा संबध आला आणि म्हणूनच की काय मराठीच्या मुलखातही 'परीक्षा' 'मोजमाप' 'कसोटी' यासारखे अर्थशास्त्राच्या संदर्भात कानावर येणारे शब्द ऐकावयास मिळू लागले. कृष्णशास्त्री चिपळूणकरासारखा रसज्ञ पंडित काव्य-

लक्षण सांगताना '**मातब्बरी**'सारख्या मूल्यवाचक शब्दाचा वापर करतो तर निबंधमालेचा वाचकवर्ग 'टीकाकार **रत्नपारखा** असावा' म्हणून सांगतो—आणि गुंजीकरासारखा परीक्षक 'परीक्षा म्हटली म्हणजे काही तरी **कसोटीचा** अवश्य गरज आहे' असे मत व्यक्त करताना दिसतो. 'मराठ्याच्या बखरीला **गिऱ्हाईक** मिळत नाही' अशी भाषाही मधून मधून तक्रारीच्या स्वरूपात नोंदविली जाते तर मोरोपंतांच्या कवितेचे महत्वमापन करताना भलताच **काटा** लावण्यात आला असाही आक्षेपाचा सूर निघताना दिसतो.

'मूल्या'ची कल्पना साहित्य-स्वरूप—शास्त्राला टाळता येणे शक्य असले तरी व्यवहाराच्या क्षेत्रात वावरणाऱ्या समीक्षेला ती डावलता येत नाही; किंवा अर्थशास्त्राच्या परिभाषेतील एक बाजारू शब्द म्हणून तिला निखंदून चालत नाही, 'नीवीविमोक्षवेलायां वस्त्र-मूल्यविचिंतक:' अशा शब्दात खुद्द साहित्य—व्यवहारातही निखंदली जाण्याची पाळी या मूल्यावर अद्यापही येते. परंतु समीक्षा हे व्यावहारिक शास्त्र आहे ही गोष्ट लक्षात घेतली तर समीक्षेच्या व्यवहारात मूल्याच्या प्रक्रियेला एवढे महत्व का असते याचा उलगडा आपोआप व्हावा. समीक्षेच्या प्रांतात निरनिराळ्या प्रकारची मूल्यांची देवघेव चालू असते. प्रत्यक्षाच्या पातळीवर वावरणारी जीवनमूल्ये, सदाचरणाचा कटाक्ष ठेवू पाहणारी नीतिमूल्ये, लोक-व्यवहारातली केवळ आकर्षकतेवर भिस्त ठेवणारी रंजनमूल्ये आपली प्रतिष्ठा पणाला लावण्यासाठी जणू धडपडत असतात. त्यातच कलावंताची निर्मितिमूल्ये आणि वाचकाची आस्वादमूल्ये आपली हजिरी लावू पाहतात. या साऱ्या मूल्यांच्या मेळाव्यातून खरा टीकाकार उच्च दर्जाची वाङ्मयीन मूल्ये शोधत असतो. प्रस्तुतच्या कालखंडात हीच परिस्थिति आपणाला दिसून येते. स्त्रीदाक्षिण्य आणि देशाभिमान यासारखी जीवनमूल्ये, 'आर्ष' व 'अभिजात' अशी रंजनमूल्ये आणि लोकाभिरुचीतील भ्रष्टता टाळू पाहणारी नीतिमूल्ये आपणाला याही काळात दिसतात. परंतु त्याबरोबरच या काळात विशुद्ध वाङ्मयीन

मूल्यांचा आग्रह सुरू झाला हेही आपल्या लक्षात येते स्त्रीदाक्षिण्या-सारखे जीवनमूल्य एरवी कितीही प्रागतिक असले तरी कलेच्या क्षेत्रात ते कधी कधी 'रसविघ्न' ठरते तर याच्या उलट पारमार्थिक दृष्टीने त्याज्य ठरलेली 'गर्वोक्ति' रसिकांच्या दृष्टीने आस्वाद्य वाटते ही कलात्मक जाणीव आपणास प्रथम झाली ती याच काळात. विशुद्ध वाङमयीन मूल्यांची ही जाणीव मराठीच्या समीक्षेला मिळालेले एक वरदानच होय आणि ते वरदान चिपळूणकर-कालात आपणास लाभले हा या कालाचा एक विशेष होय.

२

एकोणिसाव्या शतकातील ८१ वर्षांचा हा काल महाराष्ट्राच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे घडवीत गेला. ती स्थित्यंतरे बरीचशी उंचसखल वळणाची आणि कित्येकदा तर अभूतपूर्व स्वरूपाची वाटावी अशी होती. राजकीय तऱ्हेच्या परिवर्तनापासून तो सामाजिक जाणिवांच्या उलटापालटीपर्यंतचा बराचसा अनुभव या अल्पावकाशात महाराष्ट्राला चाखावयास मिळाला. नवलाची गोष्ट ही की ज्या महाराष्ट्राचे चैतन्य सुरवातीच्या काळात हरपून गेले होते आणि आत्मविस्मृतीच्या गर्तेत जो आकंठ रुतून बसला होता तोच महाराष्ट्र या कालखंडाच्या शेवटी शेवटी आत्मविश्वासाची फणा उभारून ऐटीने पुढे सरसावताना दिसतो. महाराष्ट्राच्या जीवनात हे महत्वाचे स्थित्यंतर घडवून आणण्याच्या कार्यातील बराच मोठा वाटा या कालखंडातील वाङमयसमीक्षेचा आहे.

तसे पाहिले तर खुद्द समीक्षेच्या क्षेत्रातही कमी स्थित्यंतरे झाली नाहीत. याच काळात आपल्या भोवतालचे पारमार्थिक कल्पनांचे पाश तोडून महाराष्ट्र ऐहिक जीवनातील कल्पनांचा आणि आवडी-निवडीचा मोकळेपणाने स्वाद घ्यायला शिकला व या आस्वादाचेच परिणत स्वरूप म्हणजे हरदासी स्वरूपाची रंगभूमि महाराष्ट्रात भरभक्कमपणे उभी राहू शकली. १८४३ मध्ये राजाश्रयाखाली

उत्पन्न झालेले हे नाट्य लवकरच लोकाश्रयाकडे वळले पण तिचे अद्भुत स्वरूप कायम राहिले. हळुहळु अद्भुताकडून रम्याद्भुततेकडे ती वळू लागली आणि याच प्रसंगी एकाबाजूने संस्कृत वळणाची तर दुसऱ्याबाजूने इंग्रजी वळणाची अभिरुचि आपापल्या परीने तिचा ताबा घेण्यास झटू लागली. पण या झटापटीत आता केवळ दोन भिन्न आवडीनिवडींचे रणांगण तटस्थपणे पाहण्याची महाराष्ट्राची भूमिका गळून पडली आणि एकाबाजूने इंग्रजी आवडीनिवडीशी मुकाबला घेऊ पाहणारी मराठीची वाङमयाभिरुची संस्कृती वळणाचा सासुरवासही झुगारून देण्याची आणि स्वतःचे वेगळे साहित्यशास्त्र असल्याची भाषा बोलू लागली. अशा रीतीने अवघ्या ८१ वर्षाच्या काळात पारमार्थिकाकडून ऐहिकाकडे, राजाश्रयाकडून लोकाश्रयाकडे, लोकाश्रयी ओबडधोबड व आर्ष अशा अद्भुताकडून सुसंस्कृत व रसिकमान्य अशा रम्याद्भुताकडे, संस्कृती रसिकतेकडून इग्रजमान्य रसिकतेकडे अशी भिन्न भिन्न वळणे घेत चाललेली महाराष्ट्राची ही वाङमयाभिरुचि जेव्हा स्वत च्या पृथक् व स्वतंत्र अस्मितेचा साक्षात्कार घडवून देते तेव्हा मन क्षणभर स्तिमित झाल्याखेरीज राहत नाही.

त्यातच आणखी अपूर्वाईची गोष्ट अशी की या काळात ज्या एक दोन रसिक भाषाप्रभूंच्या आणि कलाकोविदांच्या सान्निध्यात ती आली त्यांनी तिला एक वेगळीच ऐट आणि वेगळेच ऐश्वर्य मिळवून दिले. वस्तुतः निबंधाच्या जातीची आणि म्हणूनच अललित स्वरूपाची वाटणारी ही समीक्षा त्या कलाकोविदांच्या करस्पर्शाने कलेचे रूप पावली-एक कलाप्रकार म्हणून मिरवू लागली, रसिकांना आकृष्ट करू लागली आणि रसिकही तिला कलाप्रकार म्हणून मानमान्यता देऊ लागला. एकंदरीत स्वतंत्र कलाप्रकाराची ऐट मिरविण्याचे भाग्य जसे या समीक्षेला लाभले तसेच रसिकाकडून योग्य ती दाद मिळविण्याचे यशही तिच्या पदरात पडले. 'दूती म्हणून गेली आणि प्रिया होऊन आली' असा आश्चर्यजनक चमत्कार खुद्द मराठी समीक्षेच्या बाबतीत घडला तो याच काळात !

३

या कालखंडातील वाङ्मयसमीक्षेचा विचार करताना जे प्रवासी वाङ्मयनिर्मितीच्या आणि त्यातही गद्य–वाङ्मयाच्या दिशेने हा शोध घेऊ पाहतात त्यांना या समीक्षेच्या शोधासाठी ५०–६० वर्षांचे एक प्रदीर्घ आणि रुक्ष वाळवंट तुडवावे लागते. वाङ्मयनिर्मितीचे हेतु व प्रयोजन यांचा शोध घेत असताना ते नेमकी ललित वाङ्मयाची पाऊलवाट चुकतात. बालमित्रासारख्या शालेय पुस्तकांच्या मदतीने त्यांचे हे यात्रिक क्रमण चालू होते आणि ते त्यांना शालेय, शास्त्रीय, उपयुक्त आणि प्रसारक स्वरूपाच्या गद्यवाङ्मयाकडे घेऊन जाते. त्या गद्यवाङ्मयाच्या प्रदेशात फिरत असताना या काळातल्या कवितेच्या स्वरूपातील कलात्मक आवडीनिवडींची चाहूल मात्र त्यांना लागत नाही. हाती लागतात ती म्हणजे शिक्षण, मतप्रसार, ज्ञानसंग्रह यासारखी कलाबाह्य प्रयोजने. साहजिकच या साऱ्या शोधातून 'या काळातील लेखक हा प्रामुख्याने समाजशिक्षक होता' यासारखे समीक्षेच्या दृष्टीने दूरान्वित वाटणारे विधान मनाशी घोकत घोकत ते १८६५ च्या सुमारास 'यशोदापांडुरंगी'च्या साक्षीने समीक्षेच्या क्षेत्रात पोचतात. पण कवितेची गोडी समजावून सांगणाऱ्या या भाष्यकाराचा खटाटोप नजरेत भरण्याऐवजी 'देशाच्या करमणुकीची सुधारणा होणे हे एकंदर देशसुधारणेचे मोठेच कलम' होय असे सांगणारा गद्यकारच त्यांना जवळचा वाटतो आणि त्यामुळे "या काळातील सर्वसामान्यांची व रसिकांची आवडनिवड प्रामुख्याने मराठी कवितेच्या प्रांतात विहार करीत होती" हे सत्य साठ-सत्तर वर्षांच्या काळाचा प्रवास करूनही या प्रवाशांना अपरिचितच राहते.

या ऐवजी या काळातील वाङ्मयीन आस्वादाच्या दिशेने जे समीक्षेचा शोध घेऊ पाहतील त्यांची एवढी दिशाभूल होत नाही. स. १८०० पासून तो थेट १८६५ पर्यंतच्या काळात एकाबाजूने आपल्या कथाकीर्तनातून मराठी श्रोत्यांना रंजविणारी, त्यांना साहित्यविषयक

अभिरुची लावून देणारी आणि त्या अभिरुचीची सतत जोपासना करणारी हरदासाची एक अखंड परंपरा रामजोशी, तुकाविप्र, फलटणकर, रहिमतपूरकर आणि पन्हाळकर यासारख्यांच्या रूपाने आपल्या नजरेपुढे उभी राहते तर दुसऱ्याबाजूने मोरोपंती कवितेचे हृद्‌गत समजावून देणारा आर्यापंडितांचा वर्गही लोकप्रिय व पंडितमान्य झालेला दिसतो. कृष्णशास्त्री चिपळूणकरासारखा गद्यप्रभु म्हणून मानल्या जाणाऱ्या रसिकवराला मोरोपंतांच्या आर्येचे मर्म उकलून घेण्यासाठी परशुरामपंत गोडबोल्यांसारख्या आर्यापंडिताकडे धाव घ्यावीशी वाटे अशी गोष्ट त्याकाळातील रसिक मोठ्या रुचीने घोळवून सांगत असे.

सर्व सामान्यांच्या अभिरुचीची ही दिशा १८८१ पर्यंतच्या काळातही कशी कायम होती हे आपणास नागपूरकर 'वेताळा'च्या पत्रात पाहावयास मिळते. 'मोरोपंतांची आर्या ज्यात म्हटली नाही असे बहुतकरून कीर्तनच होत नाही आणि कदाचित तसे झालेच तर सगळ्या कीर्तनात मोरोपंताची आर्या आली नाही असा कसा आख्यान लावणारा हा हरदास म्हणून श्रोत्यांचे निंदाव्यंजक शब्दही कधी कधी निघत असत'--या वेताळाच्या उल्लेखातून पुण्यापासून दूर असलेल्या नागपुरकर श्रोत्यांची मोरोपंती कवितेविषयीची आवड लक्षात येते. खुद्द पुण्यातही पन्हाळकर बुवांच्या कीर्तनात मोरोपंतांच्या आर्या ऐकून तत्कालीन विद्वज्जन डुलत असत आणि धाकटचा चिपळूणकरासारखा तरुण श्रोता मोठ्या साक्षेपाने त्यातील गोडी समजावून घेत असे ही गोष्ट चिपळूणकरांच्या बंधूनी त्यांच्या चरित्रात लिहिलेली प्रसिद्धच आहे.

४

या काळातील कविवर्गानेही मोरोपंताची रचना आपल्या काव्यलेखनाचा आदर्श मानलेली दिसते. विठोबा अण्णा दप्तरदार, श्रीमंत कुरुंदवाडकर, परशुराम ढवळे यांची रचना या दृष्टीने पाहण्यासारखी

आहे. फार कशाला सरकारी विद्याखात्यात इंग्रजी ग्रंथांची मराठी भाषेत सुबोध रूपांतरे करण्यात ज्यांचा सारा जन्म गेला असा हरि केशवजीसारखा गद्यलेखकही १८३३ च्या आपल्या 'सिद्धपदार्थविज्ञान'-सारख्या शास्त्रीय ग्रंथात मिल्टन कवीच्या एका इंग्रजी चुटक्याचे भाषांतर करताना मोरोपंतांच्या आर्यावृत्ताचे, संस्कृतप्रचुरतेचे आणि अलंकारिक रचनेचे सही सही अनुकरण करतो तर याच्या उलट पाळंदेसारखा रसिक कवि आपल्या 'विक्रमोर्वशीय' नाटकाच्या भाषांतरातील कविता मोरोपंतांच्या कवितेइतकी प्रौढ उतरली नाही म्हणून हुरहूर प्रगट करताना आढळतो. १८३८ साली रचलेल्या आपल्या महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणावरील ग्रंथात तत्कालीन प्रसिद्ध वैयाकरणज्ञ दादोबा पांडुरंग मोरोपंती कवितेची व्याकरणशुद्धता आणि प्रौढी या गुणांची प्रशंसा करतात तर १८६३ च्या सुमारास हेच दादोबा आपल्या कन्येस महाराष्ट्र कवितेची गोडी लागावी म्हणून नेमक्या मोरोपंती कवितेचीच निवड करतात.

हे सारे पाहिले म्हणजे १८८१ पर्यंतच्या कालखंडातील मराठी रसिकांची अभिरुचि आपणास कळते आणि या काळातील आवडता कवि म्हटला म्हणजे तो मोरोपंतच होय हेही ध्यानात येते. या काळातील जुन्या कवितेच्या प्रकाशनातही जास्तीत जास्त मोठा वाटा मोरोपंती कवितेचा होता हे मागे उद्धृत केलेल्या रा. ब. रानडे यांच्या समालोचनातून आपणास पाहावयास मिळते. मराठी अभिरुचीची ही सुरवातीपासूनची दिशा लक्षात घेतली आणि कवि, हरिदास, श्रोता व टीकाकार यांची वाङ्मयाभिरुची पाहिली म्हणजे १८६५ पूर्वीच्या आस्वादप्रक्रियेचे स्वरूप समजते आणि मराठीतील परीक्षणप्रक्रियेला आरंभ होताक्षणी मोरोपंती कवितेचा जयजयकारच आपल्या कानावर का येतो याचे मर्महो उलगडते. किंबहुना हेही लक्षात येते की १८६५ पर्यंतच्या काळात परीक्षणप्रक्रिया दिसत नसली तरी ती आस्वादप्रक्रियेच्या स्वरूपात चालू होती. या आस्वादप्रक्रियेचे परिणत फळ आपणास १८६५ ते १८६७ च्या दरम्यान एकापाठोपाठ

बाहेर पडलेल्या केकावलीवरील दोन टीकाग्रंथात आढळते.

मराठीतील समीक्षा सुरवातीच्या काळात ग्रंथाची गोडी समजावून सांगण्याचे महत्वाचे कार्य करते हा या युगाचा एक प्रमुख विशेष मानावा लागेल आणि त्यातही हे काम जुन्या कवितेच्या संदर्भात सुरू झाले ही गोष्ट जितकी महत्वाची तितकीच या कार्याचा आरंभ मोरोपंती काव्यावरील टीकाग्रंथाने झाला--किंबहुना मोरोपंती कविता या काळातील जुन्या-नव्या, पौर्वात्य व पाश्चात्य कलातत्त्वांच्या संघर्षाचे रणांगण ठरली ही खूणगाठही महत्वाची ठरेल.

५

मोरोपंताच्या बरोबरीने या काळातील मराठी मनाला आवडलेला दुसरा कवि म्हणजे शाहिरांचा तुरा म्हटला जाणारा आणि मोरोपंता-सारख्याकडून 'कविप्रवर' म्हणून गौरवला गेलेला रामजोशी हा होय. रामजोशांच्या लावण्यांवर--विशेषतः त्यांच्या संस्कृती वळणाच्या छेकापन्हुतीसारख्या रचनेवर तत्कालीन रसिकजन किती लुब्ध होता हे या काळातील कीर्तन-प्रसंगावरून लक्षात येऊ शकते. पन्हाळकर-बुवासारख्या हरदासाच्या कीर्तनात मोरोपंती आर्येबरोबरच राम-जोशांच्या लावणीचा आस्वादही तत्कालीन श्रोत्यांना चाखायला मिळत होता. परशुरामपंत गोडबोले यासारखा आर्यापंडितही पन्हाळकर-बुवांच्या कीर्तनावर खूष होता तर संस्कृत नाटकांचे मराठी भाषांतर करणारे लेले--राजवाडेप्रभृति पंडितमंडळ आपल्या भाषांतर-ग्रंथातील संस्कृत श्लोकांचे अनुवाद करताना मराठी वाचकवर्गासाठी क्वचित लावणीच्या तालावर आपली काव्यरचना नाचवीत होती. लावणीच्या भाषासरणीचे आणि त्यातील विषयाचे रसिकांचे कोड-कौतुक या काळातील मुक्तामालासदृश कादंबऱ्यावरही आपला प्रभाव गाजवताना दृष्टीस पडते. दादोबा पांडुरंगासारखा भाषाभिज्ञ राम-जोशांच्या लावणीतील मिश्र रचनेतील चमत्कृतीचे कौतुक करतो आणि

रामजोशासारख्या पंडितमान्य कवीने शूद्रांच्या आवडीनिवडीस दाद देणारी रचना केल्याबद्दल त्याची दिलदारी वाखाणू लागतो. १८६३ सालच्या एल्फिन्स्टन स्कूल पेपरच्या एका अंकात लेखकाने रामजोशांच्या कवितेबद्दल जे प्रशंसेचे उद्‌गार काढले आहेत ते त्याला रामजोशांच्या कवितेत आढळणाऱ्या स्त्रीदाक्षिण्याच्या प्रवृत्तीमुळे तर विष्णुशास्त्री चिपळूणकरासारख्या रसिक रामजोशांच्या 'मदनमंजरी'चे जे कौतुक करतात ते त्या कवनातील स्त्री-सौंदर्याच्या चित्रणामुळे ! शाहीरांच्या फडासाठी कवने रचण्यात पंडितमान्य रसिकतेला धिःकारण्याची राम-जोशांची धृष्टता दादोबांना जशी प्रिय तशीच अस्सल मराठमोळ्याचे चित्रण करणारी आणि जिवंतपणाचा प्रत्यय आणून देणारी म्हणून कुंटे यासारख्या नवशिक्षित कवीलाही ती तितकीच प्रिय दिसते. एकंदरीत बंडाचा झेंडा मिरविण्याचे साहस, लोकभाषेतील जिवंतपणा, स्त्री-दाक्षिण्य आणि सौंदर्यवर्णन ही या रामजोशांच्या कवितेची अंगे तत्कालीन रसिकांना आवडत असलेली पाहिली म्हणजे कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' काव्यातील रम्याद्‌भुत संप्रदायाच्या आविष्काराचे मूळ रामजोशांच्या लावणीच्या रसास्वादापाशी जाऊन पोचते हे गुपित लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

६

पण ही शाहिरी कविता रम्याद्‌भुत परंपरेला प्रेरणा वा मार्गदर्शन करण्याच्या कामी फारशी उपयुक्त ठरली नाही. रंगेल, स्वैर व चावट अशा कलागुणामुळे ती लोकप्रिय ठरली तरी सभ्य रसिकाना ती मानवणारी नव्हती. विशेषतः शाहिरी कवनाशी सदृश अशा गद्याच्या मुलखातील चावट व शृंगारिक नाटक–कादंबऱ्यांचा १८६६ नंतरच्या काळात जोराने अधिक्षेप होऊ लागला. लोकहितवादी-सारखे लेखक गीतगोविंदासारखी काव्ये आणि श्रीमद्भागवत-ब्रह्म-वैवर्तकासारखी पुराणे या दोन्हींना 'शृंगारिक' म्हणून एकाच पारड्यात घालून त्याज्य ठरवीत होते तर कालिदासाच्या काव्यातील शृंगारा-

बद्दल 'सभ्यपणाला योग्य असा शृंगार' असा निर्वाळा देण्याची गुंजीकरा-सारख्या रसिकांनाही आवश्यकता वाटत होती.

किंबहुना एक विशिष्ट वाचकवर्ग नजरेसमोर वावरत असला तर अभिरुचीच्या दृष्टीने त्याच्या अप्रत्यक्ष प्रभाव पडून वाङ्मयीन वायुमंडळ विशुद्ध राहण्यास कसे उपकारक ठरते याचे नमुनेदार उदाहरण याच काळात आपणास पाहावयास मिळते. १८६६ नंतरच्या काळात जी नावले व नाटके लिहिली जात होती त्यांचा प्रधान उद्देश स्त्री वाचकांना मनोरंजन व ज्ञान मिळावे हा सांगितला जात होता. 'आमच्या वाचनामध्ये स्त्रियांची संख्या बरीच असल्यामुळे ... सर्व पात्रांची भाषणे शुद्ध मराठी ठेवली आहे' असे मनोरंजक राजहंस विजया'चे कर्ते सांगतात, तर 'कित्येक पुस्तके स्त्रियांस वाचण्यास बिलकुल उपयोगी नाही' असे विद्वान लोकांच्या तोंडून ऐकल्यामुळे आपण ही नवी कथा रचली अशी आपली भूमिका 'सुवर्ण मालिनी'चे कर्ते स्पष्ट करतात. पण ग्रंथकर्त्यांनी आपली 'निर्मितिमूल्ये' याप्रमाणे स्पष्ट केली असली तरी 'आस्वादमूल्ये' सांगणारा टीकाकार याबाबतीत त्यांच्याशी कसा सहमत नाही हे आपण मागे पाहिले आहे. 'मनोरमा', 'स्वैरसकेशा', 'वसंतमाला', 'रत्नप्रभा' 'विश्वासराव' या नाटक-कादंबऱ्याची परीक्षणे करताना 'स्त्रियांच्या हाती हे पुस्तक देणे अयोग्य' असे शेरे गुंजीकर देतात तर 'स्त्रियांची योग्यता उत्तरोत्तर वाढत चालली आहे' ही गोष्ट लेखकांनी लक्षात घ्यावी अशी सूचना मराठे करतात. या साऱ्या गोष्टीचे कारण या काळात नाटके-कादंबऱ्या वाचणाऱ्या वर्गात स्त्री-वाचकांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसू लागली हे असावे. चंद्रप्रभाविरह-वर्णनासारखी कादंबरी एखादी साळूबाई लिहिताना दिसते त्यावरूनही या आवडीनिवडीची दिशा लक्षात येते. गुंजीकर आणि मराठे यासारख्या टीकाकारांच्या परीक्षणात नीतिनिष्ठेचा जो जागर दिसतो त्याचे तरी कारण हेच होय.

७

इंग्रजी वाङ्मयाच्या इतिहासात जसा एक 'कॉमन रीडर' नावाचा प्राणी साहित्याची देखभाल करण्यास पुढे आला तसाच तो मराठीच्या मुलखात या काळात सामोरा आलेला दिसतो. रा. ब. रानडे यांनी आपल्या इंग्रजी समालोचनात म्हटल्याप्रमाणे १८४७ ते १८५७ च्या काळात याच वर्गाने सरकारी आश्रयाची तमा न बाळगता प्राचीन कवितेच्या प्रकाशनाचे काम स्वतःच्या अंगावर घेतले. १८५१ च्या सुमारास श्रीमंत सांगलीकर पटवर्धनांच्या मृत्यूमुळे निराश्रयी बनलेल्या पौराणिक रंगभूमीचा आश्रयदाता बनला तो हाच वर्ग! सर्वसंग्रह मासिकाच्या रूपाने १८६० साली डुकले बंधूंनी प्राचीन काव्याच्या प्रकाशनास याच वर्गाच्या भरवशावर कमर बांधली. दक्षिणा प्राइझ कमिटीने १८६६ सालापासून प्राचीन कवितेच्या प्रकाशनाला पुरस्कार न देण्याचे धोरण स्वीकारले आणि त्यामुळे त्या प्रकाशनावर जी अवकळा पसरली तिचा जाब मागण्याच्या निमित्ताने धाकट्या चिपळूणकरांनी त्या सरकारी धोरणावर कडाडून हल्ला केला तो सुद्धा या वर्गाच्या बळावरच! त्यावेळी सरकारी अवकृपेचा प्रलयंकर डोळा उघडला गेला आणि त्यात 'शालापत्रका'ची आहुती पडली हे खरे—पण त्यातच साहित्यातील पेट्रनशाहीची सुद्धा नकळत आहुति पडली आणि पुनः एकदा स्वतःच्या बळावर मराठी साहित्याची देखभाल करणारा एक समंजस व सुजाण वाचकवर्ग पुढे आला. याच वाचकवर्गाच्या भरवशावर रिसबुडासारख्यांच्या अद्भुत कादंबऱ्या जगत होत्या, पौराणिक रंगभूमी तगत होती, नव्या 'बुकिश' नाटकांना रंगभूमीवर स्थान मिळत होते आणि निबंधमालेचे तारू शेवटपर्यंत बंदरात सुखरूप पोचेपर्यंत तिची पाठराखणी करणारा मर्द वाचकवर्गही हाच!

हा वाचकवर्ग नव्या नव्या पुस्तकावरील अभिप्राय वाचण्यास बराच उत्सुक दिसतो आणि एखादेवेळी असा अभिप्राय वाचण्यास नच

मिळाला तर त्याबद्दल सौम्य तक्रारही करतो हे आपण मागे पाहिलेच आहे. मोरोपंती कवितेला न्याय मिळवून देण्यात याने मालाकाराना योग्य ती साथ दिली. श्लेष म्हणजे कवितेचे सारसर्वस्व नव्हे हे जाणून घेण्याइतका तो सुजाण आहे. नाटक आणि कादंबरी यातील फरक जाणण्याइतका तो क्वचित मर्मज्ञताही दाखवतो. सरस-नीरसतेची कसोटी सांगणारा टीकाकार त्याला आवश्यक वाटतो पण 'टीकाकार साहित्यशास्त्रज्ञ असावा असे म्हणणारा हाच वाचक कवीला मात्र साहित्यशास्त्रोक्त नियमांचा अंकुश नसावा असेही क्वचित प्रतिपादताना दिसतो. असा वाचकवर्ग नजरेसमोर असल्यामुळेच 'अभिरुचिवर्धन' हे टीकावाङ्मयाचे या काळातील एक प्रधान उद्दिष्ट ठरले असले तर नवल नाही.

८

या काळातील अभिरुचि–विचाराच्या संदर्भात एक छोटासा संघर्ष जाणवतो आणि तो म्हणजे कवि आणि टीकाकार यांच्या भूमिके-संबंधीचा होय.

टीकाकार हा कवि आणि वाचक यांच्यातील एक मध्यस्थ आहे आणि तो वाचकाप्रमाणेच लेखकालाही मार्गदर्शन करीत असतो अशी या काळातील यच्चयावत टीकाकारांची धारणा दिसते. गुंजीकर–मराठे यासारखे परीक्षक वा समालोचक ग्रंथकारालाही दोष सुनावतात आणि ते पुढील आवृत्तीत नाहीसे करण्याविषयी उपदेश करतात. एखाद्या ग्रंथकाराने इतक्या दोषदर्शनानंतरही आपल्या ग्रंथात सुधारणा केली नाही तर त्याबद्दल 'विस्तारा'च्या संपादकानी आपला रोष प्रकट केलेला दिसतो. डॉ. विल्सन यांच्या 'इंग्रजी आणि मराठी वाक्यावली'च्या चौथ्या आवृत्तीचे ज्ञानप्रसारकात (पु. ११ अं. ७) आलेले परीक्षणही या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. 'विल्सन साहेबानी ही आवृत्ति प्रसिद्ध करण्यापूर्वी मराठी भाषा जाणणाऱ्या एतद्देशीय

विद्वानाकडून तपासून घ्यावयास हवी होती' असा रोकडा अभिप्राय परीक्षणकर्त्याने सादर केलेला आहे. गुंजीकरानीही केकादर्शावरील आपल्या अभिप्रायात 'कवि-भूमिका म्हणजे ब्रह्मवाक्य नव्हे' असा खणखणीत इशारा देऊन कवीचे दोष दाखवणे हा जो टीकाकाराचा धर्म तो न बजावल्याबद्दल केकादर्शाच्या कर्त्याला कसा ठपका दिला तो आपण मागे पाहिलाच.

परंतु याच्या उलट लेखकानीही टीकाकाराविरुद्ध आपला रोष प्रकट केल्याची उदाहरणे कमी नाहीत. टीकाकाराची टीका ही बहुधा negative स्वरूपाची व पूर्वग्रहदूषित असल्यामुळे ती लेखकाच्या उपयोगी पडत नाही असे मत कुंटयासारख्या कवीनी मांडले आहे. शास्त्रीपंडितांच्या व इंग्रजी शिकलेल्या पदवीधरांच्या मानाने सर्वसामान्य वाचकाचे मत जास्त शुद्ध असते असा कुंटे यांचा अभिप्राय त्यांच्या इंग्रजी प्रस्तावनेत पाहावयास मिळतो. गंमत अशी की चिपळूणकराशी वाद करण्याच्या भरात वा. दा. ओकांनीही आपल्या पत्रात टीकाकारापेक्षा वाचकांनाच वरचे स्थान दिले आहे.

अर्थात ही भूमिका घेणाऱ्यांची दृष्टि वाचकांच्या मताला मान देण्याची नसून आपल्या कृतीला त्यांच्यापासून बिनहरकत मान्यता घेण्याची दिसते; म्हणजे येथे कवि-वाचकसंबंधात कवि हा श्रेष्ठ आणि वाचक फक्त त्याचा प्रशंसक असेच दृश्य पाहावयास मिळण्याचा संभव उत्पन्न होतो.

वस्तुतः ही भूमिका मराठीला तशी नवी नाही. ज्ञानेश्वरापासून रामजोशापर्यंतच्या कवींनी श्रोत्यांना वाट पुसतच आपली कलायात्रा साजरी केली असली तरी त्यामध्ये आपल्या विचारांना श्रोत्यापासून मान्यतेचा शिक्कामोर्तब मिळवावा हेच त्यांचे उद्दिष्ट होते; तेव्हा कुंटे, चितळे किंवा कीर्तने यासारख्या ग्रंथकारांनी वाचकांना विश्वासात घेऊन आपली दृष्टि समजून घ्यावी वा ती त्यांच्या गळी उतरवून द्यावी यात आक्षेपार्ह असे काहीच नव्हते. परंतु या प्रकरणी

एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते; ती ही की जुन्या काळात 'श्रोता' असला तरी 'टीकाकार' नव्हता. त्यामुळे या घटकाची फारशी दखल घेण्याची जुन्या कवींना आवश्यकता नव्हती. या काळात टीकाकार' हा घटक जन्मास आला होता आणि कार्यप्रवृत्तही झाला होता. वाचकांना त्याचे कार्य पसंत पडत होते आणि खुद्द लेखकही प्रसंग पडेल तेव्हा शिफारस घेण्यासाठी या वर्गाचे साह्य घेत होते. अशा स्थितीत टीकाकाराला टाळून वा त्याला कःपदार्थ मानून चालणे म्हणजे ताकाला जाऊन भांडे लपविण्यासारखेच होते.

पण या कविभूमिकेच्या प्रकरणी खंत उत्पन्न करण्यासाठी एक गोष्ट म्हणजे या लेखकांच्या भूमिका बहुतांशी इंग्रजी भाषेत लिहिलेल्या आढळतात. ज्या वाचकांच्या मताचा ते उदोउदो करतात त्या वाचकांना समजेल अशा भाषेत ते का लिहीत नाहीत हे कळत नाही. अशावेळी यांचे वाङ्मयविचार हे मराठी वाचकासाठी नसून सरकारी विद्याखात्यातील इंग्रज अधिकाऱ्यासाठी आहेत की काय असे वाटू लागते. गुंजीकरानी 'राजा शिवाजी'वरील परीक्षणात कुंटयांच्या इंग्रजी प्रस्तावनेला जशी हरकत घेतली तशीच साध्या सोप्या भाषेचा जो त्यांचा आग्रह होता त्याबद्दलही अशीच शंका व्यक्त केली आहे. गुंजीकरांच्या मते कुंटयांनी साध्या सोप्या शब्दांची रचना करण्याचे जे धोरण ठेवले त्याचे कारण सरकारी विद्याखात्यातील इंग्रज अधिकाऱ्यांची-विशेषतः तुलाध्यक्षांची आवडनिवड हे होय.

मराठीतील आधुनिक समीक्षेच्या रामप्रहरी 'निर्मिति' व 'आस्वाद' या दोन प्रक्रिया हळुहळू कशा वेगळया होऊ पाहत होत्या याचे हे उदाहरण लक्षणीय ठरेल. सातशे वर्षांच्या जुन्या परंपरेत या निर्मितिप्रक्रियेला जे 'मूल्या'चे स्वरूप व महत्व आले होते ते आता तितक्याप्रमाणात राहिले नाही याला कारण 'टीकाकार' हा नवा घटक साहित्यप्रांतात उदयास आला हेच होय. अर्थात निर्मितिप्रक्रियेचे समीक्षेच्या प्रांतात एक वेगळे महत्व आहे यात शंका नाही. पण

हे मान्य करूनही या निर्मितिमूल्यांचा सासुरवास यापलीकडे मराठी-तील आस्वादप्रक्रिया मानून घेण्यास तयार नव्हती ही वस्तुस्थिति आपल्यापरीने बरीच बोलकी आहे.

९

पण या काळात खुद्द आस्वादप्रक्रियेच्या क्षेत्रातच जे नव्या जुन्या मूल्यविचारांचे 'कुरुक्षेत्र गाजले' ते विशेष लक्षणीय ठरावे. हा वाद केवळ नव्या–जुन्या मूल्यांचा नव्हता तर त्याला दोन सांस्कृतिक मूल्यांच्या संघर्षाचे स्वरूप आले होते. कुंटे आणि गुंजीकर, किंवा रानडे आणि चिपळूणकर यांच्या मतामतातील हा वाद नव्हता तर कुंटे–रानडे यांनी मनाशी जोपासलेल्या आणि उघडपणे पुरस्कारलेल्या इंग्रजप्रणीत आवडीनिवडीशी मराठी आवडीनिवडीची ती लढत होती. त्यातही जोपर्यंत इंग्रजप्रणीत आवडनिवड एखाद्या वाङमयकृतीतून व्यक्त होती किंवा 'उत्कट अंतःकरणाचे उद्‌गार', 'देशस्थितीचे प्रति-बिंब', 'स्त्रीदाक्षिण्याचा पुरस्कार' यासारख्या आपल्या अपेक्षा बोलून दाखवीत होती तोपर्यंत वादाचा प्रश्न निघत नव्हता. पण हे नवे आदर्श जेव्हा मराठीच्या जुन्या पारंपरिक कलेची हेटाळणी करू लागले तेव्हा त्यांच्याशी सामना देणे अपरिहार्य होते. पौराणिक कथा म्हणजे मागासलेली आवड, देवाधर्माचे विषय कल्पित म्हणून त्याज्य, अनेकत्वाकडून एकत्वाकडे जाणारी आमची अद्वैतपरंपरा ख्रिस्ती धर्माच्या पातळीवरून पाहता हीन प्रतीची आणि आमची भक्तिप्रधान स्तोत्रे म्हणजे दात्याच्या तोंडाकडे पाहून केलेली भाटगिरी अशा शब्दात आमच्या जुन्या कवितेचे वाभाडे निघाले आणि त्याबरोबरच आमच्या काव्यविषयक कल्पनाही मूर्खपणाच्या ठरल्या. 'शिवार्या' लिहिणारा मोरोपंत हा राजाश्रयाकडे तोंड फिरवून आपल्या अंतः-करणप्रवृत्तीशी बेइमानी करणारा ठरला तर बाबूजी नाइकासारख्या आश्रयदात्यावर नीटपणे दोन आर्याही लिहू न शकल्यामुळे त्याच्यावर कृतघ्नतेचा आरोप होऊ लागला. वीर रसात शृंगार मिसळू पाह-

णारी त्याची रचना नव्या कसोटीवर घासून पाहता हिणकस ठरली तर 'सेतु न तो' सारख्या उत्प्रेक्षेत रावणाच्या स्त्रियेची वेणी ओढून धरणारे भूदेवीचे त्याने केलेले चित्रण हा स्त्रीदाक्षिण्याच्या दृष्टीने पाहता मोठाच गुन्हा ठरला. अशा रीतीने जुन्या कवितेला न्याय देण्याच्या दृष्टीने ही नवी मूल्ये असमर्थ ठरल्यामुळेच जुन्या–नव्या मूल्यांचा संघर्ष अटळ ठरला – आणि चिपळूणकरासारख्या नव्या पदवीधरालाही या मूल्याशी सामना देऊन नव्या मूल्यांच्या मर्यादा मराठी वाचकाला समजावून देणे भाग पडले.

इंग्रजीच्या संपर्कात आल्यामुळे मराठीला अध्ययनाची नवी दिशा लाभली आणि त्यातून मराठी समीक्षा एखाद्या वनपुष्पाप्रमाणे सहज-गत्या उमलली अशी जर अलीकडील कुणा टीकाकाराची समजूत असलीच तर त्याला आपल्या मताचा पुनर्विचार करावयास लावील अशीच ही परिस्थिति आहे. इंग्रजी–मराठीच्या अशा भिन्न आवडी-निवडींच्या संघर्षातूनच मराठीला आपले हरवलेले अस्तित्व पुन्हा लाभले, जुनी लेणी हौसेने मिरवता येऊ लागली आणि उत्कर्षाची नवी वाटचाल कोणती याचाही शोध लागला.

१०

या नव्या जुन्या मूल्यांच्या संघर्षाच्या दृष्टीने पाहता 'तुलनात्मक टीकापद्धती' ही एखाद्या अस्त्रासारखी समीक्षेला लाभदायक ठरली. याच पद्धतीचा आधार घेऊन कृष्णशास्त्री चिपळूणकर–गुंजीकर–मराठे आणि नी. ज. कीर्तने यासारख्या टीकाकारानी नवनिर्मितीवर जोराचा हल्ला चढविला. आपल्या प्रचलित पुराणकथाऐवजी ख्रिस्ती धर्मशास्त्रातील पुराणकथा आधारास घेतल्याबद्दल कृष्णशास्त्री चिप-ळूणकरानी 'जयपाळ' नाटकाच्या कर्त्यावर घेतलेला आक्षेप, युरोपियन कादंबरीकारांच्या हीन वास्तववादाचे अनुकरण न करण्यासंबंधीचा मराठे यांचा इशारा, संस्कृताऐवजी इंग्लिश तऱ्हा काव्यात आणल्या-बद्दल गुंजीकरानी कुंटयांवर ठेवलेला ठपका, बखरीतील देशाभिमानाचा

रंग ग्रँटसाहेबांच्या इतिहासात नसल्याची कीर्तने यांची तक्रार ही या पद्धतशीर हल्ल्याचीच वेगवेगळी स्वरूपे होत. हरिपंत पंडितानी आपल्या 'टेंपेस्ट'वरील परीक्षणात शेक्सपियरपेक्षा कालिदासाचे वर्ण्य-विषयाचे चित्रण खुबीदार असते असे सांगून कालिदासाचा जो गौरव केला तोही या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे.

चिपळूणकरांनी तर या पद्धतीची कळा जणु परमोत्कर्षाला पोचविली. याच पद्धतीच्या साह्याने त्यांनी डॉ. विल्सन, डॉ. हॉल आणि मेकॉले यासारख्या इंग्रज पंडितांच्या एतद्देशीय काव्याबद्दलच्या अज्ञानजन्य व दुराग्रही मतावर कडाडून हल्ला चढविला. दुसरा हल्ला त्यांनी केला तो परप्रत्ययनेय बुद्धीच्या विद्वान एतद्देशीय सुशिक्षित वर्गावर आणि तिसरा त्यांनी प्रवर्तित केलेल्या इंग्रजी पद्धतीच्या वाङमयीन निकषावर होता. जुन्या मराठी कवितेला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी ड्रायडन, पोप, जॉन्सन यासारख्या पंडित परंपरेच्या कविवर्गाचे काव्यविषयक विचार मराठी वाचकापुढे मांडले आणि या काव्यविचारांच्या कसोटीवर मोरोपंताची कविता ही उत्तम कविता कशी ठरते हे दाखवून दिले. सुशिक्षित मंडळींच्या तोंडी नेहमी बोलले जाणारे स्त्रीदाक्षिण्यासारखे मूल्य जुन्या कवींच्या परिचयाचे होते पण अशी मूल्ये प्रस्तुताप्रस्तुताचा विवेक न केल्यास क्वचित रस-भंगकारक ठरतात हेही त्यांनी स्पष्ट केले इतकेच नव्हे तर देशस्थितीचे प्रतिबिंब ज्यांच्या काव्यात आढळते असे कवि इंग्रजी आवडीनिवडीच्या दृष्टीने श्रेष्ठ ठरत असले तरी ती आवडनिवडच मुळात गौण व दुय्यम स्वरूपाची आहे हे सांगावयासही ते विसरले नाहीत.

परंपरेविषयीचा अभिमान हा चिपळूणकर–काळातील टीकेची प्रमुख प्रेरणा होती. हा अभिमान मराठी वाचकात जागृत करणे हे त्यांच्या टीकेचे एक प्रमुख प्रयोजन होते. या कामात तुलनात्मक टीकापद्धतीचा त्यांना बराच उपयोग झाला. स्वाभिमानाची प्रेरणा लेखकांना देणे, वाचकात ती भावना जागृत ठेवणे आणि साहित्याच्या क्षेत्रातील परप्रत्ययनेयी व दुराग्रही मतांचे निरसन करून साहित्याचे

वातावरण शुद्ध ठेवणे ही तिन्ही प्रकारची कार्ये चिपळूणकर या टीकापद्धतीच्या साह्याने करू शकले हे लक्षात घेतले म्हणजे तुलनात्मक टीकापद्धतीच्या कामगिरीचे मर्म समजून येते.

ही तुलनात्मक टीकापद्धती म्हणजे मराठी समीक्षेला चिपळूणकर काळाने दिलेले एक अपूर्व देणे आहे असे म्हटल्यास ते अगदीच चुकीचे ठरणार नाही.

११

पण या साऱ्या गोष्टीत लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की या काळात पारमार्थिक निवृत्तीच्या आणि देवाधर्माच्या कल्पनेपासून मराठी भाषा सतत दूर सरकण्याच्या प्रयत्नात राहिली—आणि ऐहिकाकडील आपले लक्ष तिने अणुमात्र ढळू दिले नाही. पारमार्थिक कल्पनानीच महाराष्ट्राला दास्यात लोटण्याचा फार मोठा गुन्हा केला होता असे या काळातील विचारवंताला वाटे. याचा एक परिणाम असा झाला की मराठी भाषेचे जुन्या कवितेकडे आणि संतवाङ्मयाकडे पराकोटीचे दुर्लक्ष झाले. सर अलेक्झांडर ग्रांटने तुकारामाच्या कवितेची प्रशंसा केली म्हणून तुकारामाचा गाथा तयार झाला असे दृश्य आपणास पाहावयास मिळते याचे कारण याहून भिन्न नसावे.

मोरोपंताच्या कवितेबद्दल पहिले अधिक्षेपाचे उद्‌गार जर कोणा मराठी भाषिकाने काढले असतील तर ते लोकहितवादीनी आणि त्या अधिक्षेपाचे कारण काय तर त्या कवितेचा विषय देवाधर्माचा व पुराणकथांचा होता. १८७१ साली चितळे यानी आदर्शवादाचा जो पुरस्कार आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेतून केला त्यातही देवादिकांच्या कथावर आधारलेल्या नाटकातून सद्‌गुणाचा ठसा उमटत नाही या मुद्यावर देवादिकांच्या पुराणकथाबद्दलची अनावडच पुन्हा एकदा व्यक्त झालेली दिसते. निबंधमालेच्या वाचकापैकी ओकांनी संत-विजयातील रामदासाच्या कथेविषयी कसे भीत भीत (apologetic) उद्‌गार काढले आहेत ते आपण पाहिलेच आहे. हर्डीकरासारख्या

वाचकाने तर 'साधूंची चरित्रे नकोत' असे मत स्पष्टपणे व्यक्त केलेले दिसते.

जुन्या वाङ्मयाचा–विशेषत: संतवाङ्मयाचा प्रभाव जसा या काळी कमी होत गेला तसा त्याचा परिणाम समीक्षेवरही झाल्याशिवाय राहिला नाही. 'ज्ञानेश्वरीपरिभाषा' आणि 'तुकारामबावांच्या अभंगाचे निवडक वेचे' या दोन पुस्तकाशिवाय संतवाङमयावर अभ्यास दिसत नाही अर्थात परीक्षणेही नाहीत संतवाङमयाच्या अनभ्यासाचे उदाहरणच द्यावयाचे तर ते सुद्धा विष्णुशास्त्री चिपळूणकरांचेच देता येईल. 'गर्व' या निबंधात जगन्नाथपंडिताच्या 'दिगन्ते श्रूयन्ते' यासारख्या आत्मश्लाघापर वाणीचे विलास दाखविताना ज्ञानेश्वरांच्या 'माझा मराठाचि बोल' या प्रतिज्ञोत्तराची त्यांना आठवण झाली नाही आणि तुकारामाच्या अभंगातही प्रसादाचो वाणी' यासारखे धीट व समर्पक उद्‌गार त्यांना उद्धृत करता आले नाहीत.

पण चिपळूणकरांच्या संदर्भात एक गोष्ट मात्र कबूल करावी लागेल; ती ही की देवाधर्माचे विषय हे त्या काळातील इतर सुशिक्षिताप्रमाणे त्यानी असेव्य वा अश्लाघ्य मानले नाहीत. ऐतिहासिक गोष्टीप्रमाणेच पुराणकथा हाही काव्याचा विषय होऊ शकतो — इतकेच नव्हे तर काव्याची परीक्षा करताना विद्वानांनी धर्माधर्मविवेचनाचा किंवा सत्यासत्यविवेचनाचा काटा लावू नये असेच मत त्यानी वेळोवेळी प्रगट केले आहे

१२

गंमत अशी की पारमार्थिक कल्पनेपासून दूर दूर सरकत जाणारी मराठी भाषा इतिहास–प्रेमाच्या पाशात नव्याने जखडली जाताना दिसते. किंबहुना जितकी पारमार्थिकतेविषयी अनावड तितकीच इतिहासाविषयी आवड हा एकापरीने पाहता या कालखंडाचा एक स्थायी भावच ठरेल. लोकहितवादी, रानडे, कीर्तने–बंधु. मराठे, कुंटे हे जुन्या नव्या पिढीतले सारे विचारवंत इतिहासाविषयीच्या प्रेमाने भारून गेलेले दिसतात.

खुद्द चिपळूणकरांवरही या आवडीचा पगडा बसलेला दिसतो. लहानपणी बंडाच्या रोमहर्षक कथा ऐकण्याचे त्यांचे वेड तरुणपणी इतिहासाच्या वाचनात कायम राहिले. निबंधमालेत त्यांनी एकाबाजूने 'महदाख्यायिके'चे सदर सुरू ठेवले तसेच दुसऱ्याबाजूने 'सोनपतपानपत' यासारखे पोवाडेही ते साक्षेपाने प्रसिद्ध करीत होते. याशिवाय 'काव्येतिहाससंग्रह' या मासिकाला त्यांचे साह्य होते तर चित्रशाळा काढून व ऐतिहासिक पुरुषांची चित्रे रंगवून ती लोकापुढे आणण्याचा त्यांचा उपक्रम अखेरच्या घटकेसही चालू होता.

इतिहास-प्रेमाचा त्यांच्या मनावर जो प्रभाव पडला तो तरुणपणी अध्ययनाने दृढ झाला आणि त्यांच्या लेखनातही तो दृग्गोचर होऊ लागला. यातूनच 'इतिहास' आणि 'टीका' यांचा समन्वय करण्याची मनीषा त्यांच्या मनात केव्हा तरी जागृत झाली असावी आणि वयाच्या बाविसाव्या वर्षी शालापत्रकात त्यांनी 'कविता' या सदराखाली जे लेखांक लिहिले त्यांत इंग्रजी कवितेचा विकास कसकसा होत गेला ते ऐतिहासिक दृष्टीने विवरण करून सांगितले. चिपळूणकरांच्या या कामगिरीची दखल मात्र वाङमयेतिहासाच्या प्रांतात अद्याप फार करून कुणी घेतलेली दिसत नाही. एरवी ऐतिहासिक नाटक (१८६१) ऐतिहासिक काव्य (१८६९) ऐतिहासिक कादंबरी (१८७१) या तीन प्रकाराप्रमाणेच 'ऐतिहासिक टीका' (१८७२) असाही एक टीकेचा प्रकार आधुनिक वाङमयेतिहासाकरांना दाखविता आला असता.

१८७२ साली लिहिलेल्या या पहिल्याच टीकात्मक निबंधात चिपळूणकरानी इतिहासातील काही सिद्धांत इंग्रजी काव्याच्या विकासातून कसे प्रगट होतात हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'राष्ट्रात क्रांतीसारखे प्रसंग घडले की काव्यासारख्या प्रांतातही त्याचे परिणाम दिसू लागतात' असा ऐतिहासिक स्वरूपाचा सिद्धांत या निबंधाच्या तीन चार लेखांकात मांडून दाखविला आणि इंग्रजांची आवडनिवड स्पष्ट करताना देशस्थितीचे प्रतिबिंब ज्यात असेल असे काव्य इंग्रजांना आवडते' असे सांगून त्याबद्दल चॉसर या कवीचे उदाहरणही दिले.

परंतु लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की इंग्रजी कवितेतील ही स्थित्यंतरे त्यांनी चुकूनही संस्कृत वा मराठी कवितेवरील निबंधात दाखविली नाहीत. उलट 'अशी स्थित्यंतरे या दोन भाषामध्ये दिसत नाहीत' अशी कबुलीही त्या त्या लेखाच्या प्रारंभी त्यांनी देऊन टाकलेली दिसते. यापैकी काही सिद्धांतांचा त्यांनी पुढच्या काळात त्याग केला असावा की काय अशीही शंका येते. कारण वर चॉसर-च्या बाबतीत इंग्रज लोकांची जी आवड त्यांनी दाखविली तीबद्दलचे त्यांचे स्वतःचे मत प्रतिकूल असून ते त्यांनी कालिदासावरील निबंधात स्पष्ट केले आहे—आणि दंडीचे दशकुमारचरित इंग्रज पंडितांनाही याच कारणामुळे आवडते असे सांगतांना तर ही आवड काव्या-नंदाच्या दृष्टीने दुय्यम दर्जाची आणि गौण स्वरूपाची असल्याचेही त्यांनी ध्वनित केलेले दिसते. अशीच दुसरी गोष्ट म्हणजे सुरवा-तीच्या निबंधात दाखविलेली वास्तवासंबंधीची कल्पनाही त्यांनी पुढे सुधारून घेतलेली आहे. 'जेवढे वास्तव तेवढे चांगले किंवा तेवढेच उत्तम' हा सुरवातीच्या निबंधातील सूर पुढच्या निबंधात लुप्त होत गेला. आणि 'अनुभवाच्या गोष्टी कुणीही लिहतील पण जेथे मनाचा फक्त मनाचा रिघाव...अशा गोष्टी लिहिणारे वाग्देवीचे लाल फार थोडे' (कालिदास) 'अनुभवाच्या गोष्टींचा कंटाळा येतो म्हणून कथा कल्पूनच रचाव्या लागतात (विद्याधनप्रशंसा) पुराणातील कथाही केवळ अद्‌भुत वा काल्पनिक म्हणून त्या त्याज्य नव्हत (मोरोपंताची कविता) असे उद्‌गार ते काढू लागले. हे त्यांचे उद्‌गार पाहिले म्हणजे वास्तवापेक्षा अद्‌भुताचा—निदान वास्तवा-इतकाच अद्‌भुताचा महिमा चिपळूणकरांना प्रिय वाटू लागला आहे हे लक्षात येते.

या साऱ्या प्रकरणी एक गोष्ट मात्र लक्षात घ्यावी लागते; ती म्हणजे या इतिहासातून त्यांनी मेकॉलेच्या धाटणीचे जे दोन सिद्धांत उचलले ते मात्र कधीच सोडलेले दिसत नाहीत. 'कविता सज्ञान दशेत खुंटते' आणि 'सुधारणा ही कवितेस प्रतिकूल होय' हे ते दोन सिद्धांत होत. निबंधमालेतील 'विद्वत्व आणि कवित्व' या लेखात

तर त्यांनी ते मांडले आहेतच पण पुढे मल्लिनाथासंबंधी श्रीमंत कुरुंदवाडकरांच्या पत्राला उत्तर देतानाही त्यांचा पुनरुच्चार केला आहे. हे सिद्धांत किती चुकीचे आहेत हे आजच्या वाचकाला सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु चिपळूणकरांनी ते हौसेने अलंकाराप्रमाणे वागविले याचे कारण मागे दर्शविल्याप्रमाणे 'टीका' व 'इतिहास' यांचा अन्योन्याश्रय स्थापन करण्याचा जो खटाटोप त्यांनी चालविला होता त्याचेच हे फळ होय. आपल्या काळातील ऐतिहासिक काव्य-नाटकांची जी नवी परंपरा त्यांना दिसत होती तशीच 'ऐतिहासिक टीकेची' परंपरा निर्माण व्हावी ही त्यांची मनीषा होती. यादृष्टीने पाहता 'ऐतिहासिक' स्वरूपाची टीका लिहिण्याचा पायंडा या काळात प्रथम पडला हा जसा चिपळूणकरांचा तसाच या कालखंडाचाही एक विशेष मानावा लागतो,

१३

समीक्षेच्या व्यवहारात एक गोष्ट फार महत्वाची असते व ती म्हणजे वाचक, लेखक व 'शास्त्र' हे तिन्ही कोन नीट सांभाळावे लागतात ही होय. विशेषतः नव्या पुस्तकावर टीका करताना एका-बाजूने वाचकाला 'शिफारस' तर दुसऱ्या बाजूने लेखकाला 'सुधारणा' सुचवावयाची असते आणि त्याबरोबर मूळ साहित्यस्वरूप-शास्त्राशी संबंध दुरावला जाऊ नये याचीही काळजी घ्यावी लागते. ही त्रिस्थळी यात्रा करताना 'त्रेधा निदधे पदं' अशी स्थिति होणे अगदी शक्य असते. कारण वाचक व 'साहित्य' यांचा संबंध लावताना ती लेखकाला दुरावली तर कळत नकळत निर्मितिमूल्याकडचे तिचे अवधान कमी होते आणि मग लेखकाला योग्य तो न्याय देण्यास ती तितक्या प्रमाणात असमर्थ ठरते. लेखक व 'साहित्य' एवढ्याचाच ती विचार करील तर वाचकाच्या द्वारा जी रसानुभूतीची आस्वाद-प्रक्रिया समजावून घ्यावयाची असते त्या प्रक्रियेची द्वारे कायमची बंद होण्याचा धोका तिला पत्करावा लागतो. याच्या उलट लेखक-

वाचक यांच्या संबंधावरच विशेष भर द्यावा तर साहित्यविषयक अभिरुचीची पातळी खाली सरकण्याचा संभव उत्पन्न होतो. वर उल्लेखिलेले तिन्ही कोण नीट साधण्याचे चातुर्य या कालखंडात फक्त धाकट्या चिपळूणकरांजवळ दिसते.

"रसात्मकं काव्यम् म्हणजे रसयुक्त ते काव्य" असे सांगून पुढे ग्रंथकारांनी काव्याची लक्षणे पाचपंचवीस प्रकारांनी दिल्याचे चिपळूणकर सांगतात आणि तरीही ती सारी बाजूला सारून वर दिलेले रसात्मकतेचेच लक्षण चिपळूणकरांनी मान्य केले. याच कसोटीवर त्यांनी 'मोरोपंतांची कविता' तावून सुलाखून घेतली आणि पंतांना महाकवीची मान्यता मिळवून दिली. 'महाकाव्य करतो तो महाकवि' हे कुंट्यांच्या प्रस्तावनेतून सूचित होणारे लक्षण अमान्य करून 'सारा रसवर्ग ज्याच्या स्वाधीन असतो तो महाकवि' अशी रसानुकूल व्याख्या त्यांनी केली. सृष्टिवर्णन, स्वभावचित्रण, उत्कट उद्गार यासारखी पाश्चात्यांच्या आवडीनिवडीची अंगे ही रस-निष्पत्तीची विभावात्मक अंगे असल्यामुळे त्यांचा अवयवशः विचार करण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही. पण 'स्त्रीदाक्षिण्य' आणि 'देशाभिमान' यासारखी पाश्चात्यांची लाडकी आणि एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राला आवडू लागलेली जीवनमूल्ये ही जेव्हा लौकिक स्वरूप टाकून साहित्यसृष्टीला अवश्य असे अलौकिक रूप धारण करतात तेव्हा ती रसतत्त्वाचे घटक ठरतात ही गोष्ट त्यांना मान्य होती. याच्या उलट 'देशस्थितीचे प्रतिबिंब' हे पाश्चात्यांचे आवडते मूल्य नेहमी बदलत असल्यामुळे ते 'स्थायीभाव' म्हणून कधीच मान्यता पावू शकत नाही असे त्यांचे मत होते व ते त्यांनी आपल्या 'संस्कृत कविपंचका'तील कालिदासावरील निबंधात काहीशा निराळ्या शब्दात स्पष्ट केले आहे.

एकंदरीत 'रसतत्व' हीच त्यांच्या दृष्टीने वाङ्मयाचे सरसत्व ठरविणारी श्रेष्ठ कसोटी होती. परंतु या कसोटीचा विचार स्पष्ट-पणे मांडता येईल अशा योग्यतेचे नवे ग्रंथ त्यांच्या नजरेपुढे कधी

आले नाहीत. उलट तत्कालीन ग्रंथरचनेचे त्रोटक व प्रयोगशील स्वरूप लक्षात घेता कडक भाषा न वापरता ग्रथकाराला उपयुक्त अशा सूचना त्यांनी केल्या. पण त्याबरोबरच नव्या आंग्लशिक्षितांच्या आवडीनिवडीबद्दलचा धाकही नाहीसा करून ग्रंथरचनेला योग्य ते वातावरण निर्माण करण्याची काळजी त्यांनी घेतली हे 'विद्याधन-प्रशंसे'वरील त्यांच्या अभिप्रायावरून लक्षात येण्याजोगे आहे.

वाचकवर्गाच्या बाबतीत तर याहून जास्त काळजी त्यांना घ्यावी लागली. सामान्य वाचकांच्या अभिरुचीबद्दल ते सुरवातीस बरेच निराश होते आणि 'पद्यरत्नावली' पेक्षा 'मंजुघोषे'च्या आवृत्ती जास्त खपतात ही गोष्ट त्यांच्या मते वाचकांच्या वाङमयाभिरुचीला साजेशी नव्हती पण त्याबरोबरच कादंबरी वाचनापेक्षा इतिहासवाचनाकडे आकृष्ट होऊ पाहणाऱ्या तरुण वाचकाबद्दल त्यांनी संतोष प्रगट केला आहे. मोरोपंतासारख्या कवीच्या बाबतीत जुन्या श्लेषप्रिय हरदासांनी श्रोत्यांच्या मनात जे गैरसमज उत्पन्न केले होते ते नाहीसे करताना त्यांच्या मनाला धक्का न देता मोठ्या कुशलतेने त्यांनी आपले काम केले आहे. या बाबतीत त्यांची भूमिका किती सहृदय व समंजस होती हे मालेतील वाचकांच्या पत्रावरून कळून येते.

१४

चिपळूणकरांच्या टीकेच्या विविध विषयामुळे निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळा पवित्रा त्यांना धारण करावा लागला. त्यामुळे बहुधा त्यांच्या टीकेचे खरे प्रयोजन आपल्या लवकर ध्यानात येत नाही. खंडनमंडनाच्या वेळचे तिचे प्रयोजन 'शिवेतरक्षतये' असे दिसते आणि पुस्तकपरीक्षणाच्या वेळी क्वचित 'उपदेशयुजे' तर क्वचित 'व्यवहारविदे' अशा थाटात ती भेटते. मम्मटाने 'काव्यप्रकाशा'त काव्याची जी सहा प्रयोजने सांगितली त्यातली तीन प्रयोजने चिपळूणकरांच्या टीकालेखनात तर दिसतातच पण या साऱ्या प्रयोजनांत 'मौलिभूत' मानले जाणारे 'सद्य परनिर्वृति' हेच चिपळूणकरांच्या

टीकेचे श्रेष्ठ व प्रमुख प्रयोजन वाटते. या दृष्टीने संस्कृत कवि-पंचकाच्या प्रास्ताविकात त्यानी काढलेले उद्‌गार लक्षणीय ठरतील व ते म्हणजे 'प्रस्तुत विषयाच्या निरूपणाचे पहिले मुख्य कारण म्हणजे त्याचे रमणीयत्व होय'. चिपळूणकरांचे हे प्रयोजन लक्षात घेतले म्हणजे चिपळूणकरांची टीका ही 'टीका' न राहता वाचकांना सौंदर्याचे निधान का वाटते ते समजून येते. 'सा रामणीयकनिधेरधिदेवता' असाच प्रशंसेचा करभार चिपळूणकरांच्या काळातील आणि नंतरच्याही रसिकांकडून त्यांना मिळत आला आहे आणि ही गोष्ट चिपळूणकरांच्या टीकेचेच नव्हे तर चिपळूणकरकालाचेही श्रेष्ठत्व दाखविणारी आहे यात शंका नाही.

सूचि

टीप—१) ही सूचि कु. शुभदा परांजपे हिने तयार केली आहे.

२) फलश्रुतीच्या १ ते ८ पृष्ठा ऐवजी १६१ ते १६८ वाचावे.

या भागाला देण्यात आलेले 'चिपळूणकर काल' हे नाव अत्यंत वास्तविक आहे.... प्रो. परांजपे यांनी चिपळूणकराबरोबरच या काळातील इतरहि सर्व टीकाकारांचा तितक्याच अगत्याने शोध घेतलेला असून विस्मृतीच्या गर्तेत बेपत्ता होऊन गेलेल्या त्यांच्याहि कामगिरीची योग्य संभावना केली आहे हे पाहून मला मोठा आनंद वाटला. दादोबा पांडुरंग, मराठे, रानडे, कुंटे, प्रधान, कीर्तने, पाळंदे, गुंजीकरप्रभृति तत्कालीन लेखकांचे निबंध, टीकालेख, अभिप्राय, प्रस्तावना वगैरे वाङ्मय अत्यंत बारकाईने तपासून, त्यांच्या लिखाणातील केवळ प्रमेये किंवा 'नष्कर्षच नव्हत, तर अगदी लहान सहान नवीन मुद्दे सुद्धा त्यांनी आजच्या अभ्यासकांच्या निदर्शनाला आणले याबद्दल खरोखरी त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. आधुनिक मराठी टीकावाङ्मयाचा ऐतिहासिक पद्धतीने संशोधनपूर्वक सोपपत्तिक सूक्ष्म आढावा घेणारा असा ग्रंथ माझ्या माहितीप्रमाणे मराठीत आतापर्यंत झालेला नव्हता. ती उणीव प्रो. परांजपे यांच्या या संकलित ग्रंथरचनेने उत्तम रीतीने भरून निघेल अशी उमेद वाटते.

--ग. त्र्यं. माडखोलकर